
आशि[illegible] बांधव



शं. भा. गोंधळेकर

आशियातील बांधव

ऐतिहासिक व सांस्कृतिक वैशिष्ट्ये
आणि
मानवी जीवन

लेखक
शं. भा. गोंधळेकर, एम्. ए., बी. टी.

प्रस्तावना
डॉ. ह. वि. **पाटसकर,**
कुलगुरु, पुणे विद्यापीठ, पुणे २.

प्रमुख विक्रेते
हिंदुस्थान साहित्य
३०९, शनिवार पेठ, (मोतीबाग), पुणे २.

किंमत चार रुपये

प्रकाशक :
शं. भा. गोंधळेकर,
४३३, नारायण पेठ, पुणे २.

आवृत्ति पहिली
१९६८

चित्रकार :
शिवाजी थोरात

मुखपृष्ठ व ठसे :
हरिश्चंद्र लचके

मुद्रक :
सौ. उषा ज. नागपूरकर,
श्री मुद्रण मंदिर,
५८०, सदाशिव पेठ, पुणे २.

आरंभीचे दोन शब्द

'**भारतीय बांधव**' हे पुस्तक मी नुकतेच प्रसिद्ध केले आणि त्याच धोरणानुसार '**आशियातील बांधव**' हे छोटे पुस्तक तयार केले आहे.

आपल्या भारतीय संस्कृतीच्या उदार आणि विशाल स्वरूपाचे दर्शन 'वसुधैव कुटुम्बकम्' किंवा संतश्रेष्ठ ज्ञानदेवांच्या 'हे विश्वचि माझे घर ... ' या थोर उद्गारात यथार्थतेने होऊ शकते. भारताने हिरीरीने पुरस्कारलेल्या 'पंचशील' या महान तत्त्वप्रणालीत अंतर्भूत असलेले सहजीवनाचे तत्त्व आणि मानवतेचा धर्म भारत आज काटेकोरपणे आचरणात आणीत आहे. आपला देश आशिया खंडात असून आपल्या अवतीभोवती अनेक देश असून त्या देशांतील रहिवाशी भिन्न भिन्न धर्मांचे आणि संस्कृतींचे असले तरी भारतीय संस्कृतीच्या दृष्टीने ते आपले बांधवच होत. या निरनिराळ्या देशांची ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्ये आणि तेथील लोकांचे आहार-विहार, आचार-विचार, धर्मसमजुती इत्यादी गोष्टींचा विचार या पुस्तकात केला आहे.

पुस्तक छोटे आणि विषय व्यापक, म्हणून विषयविस्तार मर्यादित राहणार हे उघड आहे. तरी पण मुलांच्या दृष्टीने तो विस्तार पुरेसा होईल अशी अपेक्षा आहे. तसेच निरनिराळ्या देशांतील लोकांचे जीवन झपाट्याने बदलत आहे, कालच्या चालीरीतींत क्रान्तिकारक बदल होत आहेत. असे असले तरी कालच्या जीवनाचे आणि जुन्या प्रथांचे दर्शन अधूनमधून झाल्यास ती गोष्ट अयुक्त होणार नाही.

माझा हा छोटासा प्रयत्न विद्यार्थि-वाचकांना अल्पांशाने जरी उद्बोधक वाटला तरी त्यात मला आनंद आहे. विश्वबंधुत्वाच्या वाढीकरिता वृत्तीची सहिष्णुता आणि दृष्टीची विशालता त्यांच्यात निर्माण होवो हीच इच्छा.

पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. ह. वि. ऊर्फ दादासाहेब पाटसकर यांनी या पुस्तकाला 'प्रास्ताविक' लिहिल्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

हे पुस्तक लिहिताना अनेक ग्रंथकारांच्या लेखनाचा आधार मी घेतला आहे, तेव्हा त्या सर्व ग्रंथकारांचे ऋण मी आनंदाने नमूद करू इच्छितो. 'चित्रमय जगत'चे संपादक श्री. रा. प्र. कानिटकर यांनी केलेल्या साहाय्याचा आवर्जून उल्लेख करून माझे ज्येष्ठ स्नेही श्री. रामभाऊ भिडे यांनी हस्तलिखित वाचून बहुमोल सूचना केल्याबद्दल या दोघांचा मी फार आभारी आहे.

शेवटी श्री मुद्रण मंदिरचे श्री. नागपूरकर व त्यांचे सहकारी यांनी कोशीस करून पुस्तक उत्तम तऱ्हेने छापून तयार केल्याबद्दल त्या सर्वांचे आभार मानणे माझे कर्तव्यच आहे.

महाशिवरात्र
शके १८८९
(२६-२-१९६८)

प्रास्ताविक

(पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. ह. वि. पाटसकर)

श्री. शं. भा. गोंधळेकर यांनी 'आशियातील बांधव' हे पुस्तक लिहिले आहे. त्यात त्यांचा उद्देश विद्यार्थी व सर्वसाधारण वाचक यांना ज्या खंडात आपला देश आहे त्या खंडातील इतर देशांची माहिती प्राप्त करून देणे हा आहे व तो उद्देश सफल होईल अशी मला खात्री वाटते.

ही माहिती २१ देशांविषयी आहे. त्यात त्या त्या देशांतील लोक, त्यांचा पूर्व-इतिहास, त्यांची चालू व पूर्वीची सामाजिक माहिती, त्यांचे आर्थिक प्रश्न, त्यांचा राजकीय इतिहास, त्यांचा धर्म व त्यांची वैशिष्ट्ये यांची माहिती थोडक्यात परंतु त्या त्या देशांची यथार्थ माहिती होईल अशा रीतीने दिलेली आहे.

श्री. गोंधळेकर यांची लेखनपद्धती आकर्षक आहे व अत्यंत काळजी-पूर्वक अभ्यास करून हे पुस्तक त्यांनी लिहिले आहे.

आज आशिया खंडातील वातावरण एक चिंतेचा विषय झाला आहे. व्हिएटनामच्या युद्धापासून काय निर्माण होईल हे सांगणे कठीण आहे. चीनमधील परिस्थिती गंभीर आहे. जपान एक औद्योगिकदृष्ट्या अत्यंत प्रगत राष्ट्र आहे, इंडोनेशियातील परिस्थिती नुकतीच स्थिर होऊ लागली आहे. एकंदरीने या खंडातील वातावरण अस्थिर आहे, अशा वेळी आपल्या शेजारच्या देशांची माहिती असणे अवश्य आहे. ती माहिती योग्य शब्दात व योग्य रीतीने या पुस्तकात दिली आहे.

मराठी वाचकांना व विद्यार्थ्यांना असे उपयोगी पुस्तक उपलब्ध करून दिल्याबद्दल मी श्री. शं. भा. गोंधळेकर यांना धन्यवाद देतो.

—ह. वि. पाटसकर


आशिया
युरोप खंड
(सैबेरिया)
रशियाचे सोव्हिएट राज्य
मंगोलिया
तुर्कस्तान
सिरिया
इराक
इराण
पाकिस्तान
तिबेट
चीन
भारत
अरबस्तान
आफ्रिका खंड
फॉर्मोसा
फिलिपाइन बेटे
सिलोन
मालदीव बेटे
बोर्निओ
न्यू गिनी

अनुक्रम

भारतीय बांधव हे स्वतंत्र पुस्तक लिहिल्यामुळे या पुस्तकात भारताचा समावेश केलेला नाही.

१. आशिया खंडाची वैशिष्ट्ये

आपला भारत देश ज्या खंडात आहे ते आशिया खंड वैशिष्ट्यपूर्ण असे आहे. त्यातील काही वैशिष्ट्ये—

१. सर्व खंडांत विस्ताराने आशिया खंड मोठे आहे.

२. जगातील सर्व प्रमुख धर्मांची उगमस्थाने आशियाच्याच भूभागात आहेत. सामान्यपणे खंडाच्या पूर्व भागात बौद्ध धर्माचा प्रसार झाला, तर पश्चिम भागात इस्लामी धर्माचा पगडा अधिक आढळतो.

३. आशिया खंड विषुववृत्तापासून ते थेट उत्तर ध्रुवापर्यंत पसरलेले आहे. त्यामुळे त्यात सर्व प्रकारचे हवामान, सर्व प्रकारचे प्राणी आणि सर्व प्रकारच्या वनस्पती आढळतात.

४. जगातील सर्वांत उंच शिखर, सर्वांत उंच पठार आणि लांब लांब नद्या आशिया खंडात आहेत.

५. हल्लीचे सुधारलेले आणि पुढारलेले लोक रानटी अवस्थेत होते त्या काळात आशियातील चीन देश, भारत देश सुधारणेच्या अग्रस्थानी होते !

६. या खंडात अनेक संस्कृती उदयास आल्या, नांदल्या आणि लयास गेल्या किंवा त्यांची स्थित्यंतरे होत गेली.

७. लोकशाहीचे वारे नव्या युगाला अनुसरून आज बहुतेक सर्व देशांतून संचारलेले आढळते.

• • •

२. जपानी लोक

या लोकांचा देश जपान. याचे वैशिष्ट्य असे की, हा देश खंडाच्या मुख्य भूमीपासून समुद्रामुळे अलग झालेला आहे. अशा या तुटक रचनेमुळे पाश्चात्त्य सुधारणेचे वारे या देशात सन १८५४ पर्यंत पोहोचू शकले नाही. या देशात सन १८५४ मध्ये प्रथमतः अमेरिकेने प्रवेश केलेला असला तरी सन १९०२ मधील ब्रिटन व जपान यांच्यातील सलोख्याचा तह जपानचा कायापालट होण्याला मुख्यत: कारणीभूत झालेला आहे आणि दुसऱ्या महायुद्धानंतर तर, म्हणजे सन १९४५ मध्ये जपान शरण आल्यानंतर कित्येक वर्षे अमेरिकन अधिकारी आणि सैन्य यांचे वास्तव्य जपानमध्ये होते. याचाही फायदा जपानने करून घेतला. कोणत्याही कारणाने जपान जमीनदोस्त झाला तरी अल्पावधीत वैभवाच्या शिखरावर पुन्हा तो चढतो, हेच यांचे वैशिष्ट्य.

जपानी लोक आपल्या देशाला ' निप्पोन ' किंवा ' निहोन ' म्हणतात, याचा अर्थ, उदय दिशेकडील किंवा पूर्वेकडील असा आहे. जपान हे नाव चिनी लोकांनी या देशास दिले आहे. ' जपान'चा अर्थ ' उगवत्या सूर्याचा देश '. जपानच्या राष्ट्रीय निशाणावर उगवत्या सूर्याचे चित्र असते. आशियातील या छोट्या राष्ट्राने अल्पावधीत केलेली प्रगती खरोखर कौतुकास्पद आहे. दुसऱ्या महायुद्धात त्याने आत्मनाश करून घेतला नसता आणि आपल्या आशियायी बांधवांचा छळ केला नसता, तर जपानबद्दल आपल्याला अधिक अभिमान वाटला असता.

या देशाची रचना वैशिष्ट्यपूर्ण अशी की, हा देश मुख्य चार बेटांचा असून ही बेटे भूगर्भातील हालचालींमुळे सागरातून बरीच वर आलेली आहेत ! पण या देशाचे दुर्दैव असे की, ' टायफुन'ची वादळे, भूकंपाचे धक्के आणि नद्यांचे पूर या नैसर्गिक आपत्तींना या छोट्या राष्ट्राला वरच्या-

वर तोंड द्यावे लागते. जपानी लोक मात्र या आपत्तींना धैर्याने आणि धिमेपणाने तोंड देत असतात. खरोखर धन्य आहे त्यांची !

जपानी लोक ओळखण्यास कठीण पडणार नाहीत. ठेंगूपणा, फिकट पिवळसर वर्ण, जरा पसरट चेहरा, बारीक व तिरपे डोळे आणि चपटे नाक ही त्यांची वैशिष्ट्ये. पायाकडून लहान, वरचा भाग मोठा, कवटी मोठी, केस राठ, पापण्या थोड्या फुगीर अशी त्यांच्या शरीराची ठेवण आहे. एकंदरीत हे लोक व्यवस्थित आणि तरतरीत दिसतात. पुरुषांपेक्षां स्त्रिया, त्यांच्या शरीराची कांती नितळ असल्याने, अधिक सुंदर दिसतात.

भारत, चीन या देशांप्रमाणे जपानही एक पुराण-देश आहे. येथील लोकांची उपपत्ती शास्त्रज्ञांना नीट लागत नसली, तरी एक गोष्ट सत्य की, चिनी व जपानी हे मानव वंशातील मंगोलियन शाखेचे आहेत.

जपानी लोक स्वतःला खुद्द परमेश्वरापासून निर्माण झालो असे समजतात, पण हे ऐतिहासिक सत्य असू शकत नाही हे उघड आहे. हे लोक मलाया व जवळच्या ईस्ट इंडिज बेटांवरून या भूभागात येऊन स्थिर झाले असे मानले जाते.

भूकंपाचे हादरे जपानला सतत बसत असतात ! वर्षाला साधारणपणे १५००–१६०० ! अर्थात यातील पुष्कळसे अगदी सौम्य असतात. सन १९२३ साली याकोहामा व टोकियो ही शहरे भूकंपाच्या धक्क्याने पार उद्ध्वस्त होऊन जमीनदोस्त झाली होती ! पण दहा-बारा वर्षांच्या अवधीत पुन्हा नव्याने त्या शहरांची उभारणी करण्यात आली. आज तेथे ७–८ मजल्यांखेरीज इमारत नाही ! याचे कारण विचारले असता एकाने उत्तर दिले, 'Sir, it is a science now.' शास्त्रीय शोधांच्या आधारावर या इमारतींची उभारणी होत आहे. जपानमध्ये पूर्वी घरे लाकडाची, एकमजली आणि लहान असत, खेडेगावांतून अद्याप अशी आहेतच.

जपानमध्ये गरम पाण्याच झरे पुष्कळ ठिकाणी आहेत. गरम पाण्याची स्नानगृहे ठिकठिकाणी असतात. एकट्या टोकियो शहरात स्नानगृहे ८०० च्या वर आहेत !

सन १८७२ मध्ये राजापासून रंकापर्यंत सर्वांनी शिक्षण घेतले पाहिजे

असा कायदा झाला व लगेच त्याची अंमलबजावणी करण्यात आली. साक्षरतेचे प्रमाण या देशात ९९ टक्क्यांहून अधिक आहे! खरोखर अभिमानास्पद गोष्ट आहे ही. माध्यमिक शिक्षण व उच्च शिक्षण यांच्या उत्कृष्ट सोयी असून कोणाही विद्यार्थ्यांची कुचंबणा होणार नाही अशी व्यवस्था आहे. माध्यमिक शाळेपासूनच मुलांना सैनिकी शिक्षण देण्यास सुरुवात होते. एवढ्याकरिता प्रत्येक शाळेला सैन्यातला एक अधिकारी दिलेला असतो. जपानी विश्वविद्यालये नुसती परीक्षा घेणारी नसून ती ऑक्सफर्ड व केंब्रिजच्या पद्धतीवरची आहेत. जपानसारख्या छोट्या देशात ५० च्या वर विश्वविद्यालये आहेत, टोकियोचे विश्वविद्यालय पहिले. या विश्वविद्यालयाच्या आवारात पाच-सहा मजल्यांच्या पन्नास-साठ इमारती उभ्या आहेत! येथे सर्व प्रकारचे विषय शिकविण्याची सोय आहे. शास्त्रीय ज्ञान व तांत्रिक शिक्षण यांवर अधिक भर दिला जातो.

सन १९२२ च्या भूकंपाने टोकियोचे विश्वविद्यालय पार उद्ध्वस्त होऊन गेले होते. पण तेथील अधिकारीवर्ग कपाळाला हात लावून बसला नाही! नवीन योजना आखून ७–८ वर्षांत त्यांनी पूर्वीपेक्षा अधिक भव्य स्वरूपाची उभारणी केली. या उभारणीतील ग्रंथालयाकरिता अमेरिकेचे दानशूर रॉकफेलर यांनी स्वयंस्फूर्तीने साठ लाख रुपयांची उदार देणगी दिली. या देणगीच्या पत्राची एक नक्कल तेथे मध्यवर्ती ठिकाणी प्रदर्शित केली आहे. या देणगीला कोणतीही अट नव्हती! रेडिओवरून परक्या भाषा शिकविण्याची सोय करण्यात आली आहे. इंग्लिश, फ्रेंच, जर्मन इ. भाषांचे पाठ दररोज देण्यात येतात! आणि अशा शिक्षणाकरिता खास स्वतंत्र पुस्तके तयार करण्यात आली आहेत.

जपानमधील ज्वालामुखी पर्वतांत फुजीयामा हा सर्वांत उंच पर्वत असून जपानी लोक याला फार पवित्र मानतात. 'सान' हे मानदर्शक उपपद या पर्वताला लावून त्याचा उल्लेख नेहमी फुजीसान असा करतात.

जपान देश सगळाच डोंगराळ. चोहोकडे लहान-मोठ्या टेकड्याच. येथे २–३ मैलांपलीकडे सपाटीची जमीन नाही. मोठमोठाल्या नद्या असणे शक्यच नाही. छोट्या नद्या मात्र पुष्कळ आणि त्यांना पाणी सदोदित भरपूर.

या नैसर्गिक परिस्थितीचा फायदा जपान्यांनी विजेच्या निर्मितीकरिता भरपूर करून घेतला आहे. या देशात खेडेगावांपर्यंत वीज पोहोचली आहे.

चीनच्या सान्निध्यामुळे कित्येक शतकांपर्यंत जपानने चीनचे अनेक बाबतींत अनुकरण केले. भौगोलिक तुटकपणामुळे परक्या देशांचे लक्ष या छोट्या देशाकडे गेले नाही. शिवाय जपानची भाषा ही एक मोठी अडचण होतीच. या भाषेतील लिहिण्याची पद्धत गुंतागुंतीची भासते. जपानी लोकांनी चिनी लिपी घेतली, पण भाषा घेतली नाही. जपानी मुलांना ही लिपी शिकण्यास फार वेळ खर्च करावा लागतो.

परक्यांकडून नैतिक आणि धार्मिक तत्त्वे वा विचारसरणी जशीच्या तशी उचलण्याची परंपरा जपानी लोकांत आढळते. त्यांच्या मूळच्या तत्त्व-प्रणालीत बदल करण्यात त्यांना बिलकुल संकोच वाटत नाही. सातव्या-आठव्या शतकात चीनचे वर्चस्व जपानात खूपच वाढले. बौद्ध धर्म चीन-मधून जपानात शिरला. त्या काळच्या राजपुत्राने या धर्माला सक्रिय पाठिंबा दिला. याचा परिणाम असा की, चिनी संस्कृती जपानमध्ये चांगलीच रुजली. जपानच्या सरदारांनी आणि अधिकाऱ्यांनी चिनी पद्धतीच्या अंगरख्यांचा, कपड्यांचा स्वीकार केला. एवढेच नव्हे तर इमा-रतीही चिनी पद्धतीने बांधल्या जाऊ लागल्या. जमिनदारी पद्धत त्यांच्याच धोरणानुसार आखली गेली. थोडक्यात, चीनच्या रीतिरिवाजांशी आणि संस्कृतीशी जपान जवळजवळ एकरूप होऊ लागला. पण सुदैवाने नवव्या शतकाच्या अखेरीस जपानचे चीनशी बिनसले आणि जपानी वैशिष्ट्य पुन्हा प्रस्थापित होऊ लागले.

जपानमध्ये एका शतकाच्या अवधीत दोन मोठ्या सामाजिक क्रान्त्या घडून आल्या. विशेष म्हणजे त्या रक्तलांछित नव्हत्या! याचे श्रेय अर्थातच तेथील लोकांच्या शिस्तबद्ध वर्तनाला आणि जबाबदारीच्या जाणिवेला दिले जाते. पहिली क्रान्ती सन १८६८ मधली, या वेळी जपानमधील सरंजाम-शाही नष्ट झाली आणि पाश्चिमात्य सुधारणेला अवसर मिळाला आणि जपान्यांनी त्या सहजपणे अंगवळणी पाडून घेतल्या. पाश्चात्त्य सुधारणेचे वारे बहुतेक सर्व क्षेत्रांत पसरले. दुसरी क्रान्ती सन १९४५ मध्ये जपानच्या पराभवानंतरची. या क्रान्तीने अनेक क्षेत्रांत झंझावाती सुधारणा घडवून

आणल्या. स्त्रियांना समाजात मानाचे स्थान प्राप्त होऊन मतदानाचा हक्क त्यांना प्राप्त झाला.

छोट्या जपानने युद्धभूमीवर जे चमत्कार केले त्यांनी जगाचे डोळे दिपले. इ. स. १९०४ मधील युद्धात जपानने रशियाचा पूर्ण पाडाव केला ! सन १९३१ मध्ये मांचुरियावर स्वारी केली ! सन १९३७ मध्ये तर बलाढ्य अशा चीनवर जपानने हल्ले सुरू करून चीनला चांगलेच जेरीस आणले ! चीन जपानला रानटी समजत होता, पण चीनचे डोळे चांगलेच उघडले. विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे दुसऱ्या महायुद्धाच्या काळात सन १९४१ च्या उत्तरार्धात जपानने पर्ल हार्बर या बेटावर अचानक आणि यशस्वी हल्ला चढवून जगाला थक्क करून सोडले ! या विजयाने उन्मादित होऊन जपानने आग्नेय आशियात धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली ! १९४२ मध्ये फिलिपाईन्सचा पाडाव केला, ब्रिटिशांचे सिंगापूर हस्तगत केले, ब्रह्मदेश पादाक्रान्त केला. हिंदुस्थानच्या सरहद्दीपर्यंत जपान भिडलेला पाहताच कलकत्त्याला धोका निर्माण झाला. ब्रिटिशांचे धाबे दणाणले ! हे सारे विजय जपानने उन्मादात मिळविले खरे, पण ही अवस्था फार काळ राहू शकत नाही. जपानचे दैव फिरले ! अमेरिकेने पूर्वसूचनेने जपानवर ॲटम-बॉंब्ज टाकले आणि जपानचा उन्माद खाडकन उतरला. जपान उद्‌ध्वस्त झाला ! हिरोशिमा आणि नागासकी ही शहरे बेचिराख झाली ! देशात हलकल्लोळ माजला ! जपानची साम्राज्य-विस्ताराची कल्पना धुळीस मिळाली. मानवी शक्ती खूप खर्ची झाली.

जपानने शरणागती पत्करल्यानंतर तहान्वये अमेरिकन सैन्याने जपानात ठाणे मांडले. जपानला अर्थातच अमेरिकेच्या ओंजळीने काही काळ पाणी प्यावे लागले.

जपानने पूर्वी चिन्यांचे अनुकरण जसे केले तसे एकोणिसाव्या शतकात पाश्चिमात्यांचे अनुकरण करण्यास त्यांनी सुरुवात केली. ब्रिटिशांचे व अमेरिकनांचे वर्चस्व तेथे वाढत गेले आणि पाश्चिमात्यांच्या चालीरीतींचा, पोषाखाचा पगडा त्यांच्यावर चांगलाच बसला. बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची विलक्षण हातोटी या लो कां आढळते. सुधारलेल्या

पाश्चात्त्य लोकांच्या सहकार्याने जपानने आपली सर्वांगीण उन्नती करून घेतली आहे, ही गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे.

जपानने प्रथमतः बुद्धिमान लोकांना पुढारलेल्या देशांत पाठवून निरनिराळ्या औद्योगिक क्षेत्रांत शिकवून आणण्याचे ठरविले. याचा परिणाम असा झाला की, ५०–६० वर्षांच्या अल्पावधीत जपान जगाच्या औद्योगिक बाजारात यशस्वीपणे उतरू शकला आणि त्याने जगाचे लक्ष आपल्याकडे कर्तबगारीने वेधून घेतले. जपानी लोक अतिशय उद्योगी आणि तितकेच देशाभिमानी असल्यामुळे जपानला अनेक चमत्कार करून दाखविता आले. प्रत्येक तऱ्हेचा माल जपान तयार करू शकतो आणि विशेष म्हणजे स्वस्तात विकू शकतो. जपानी माल जगात स्वस्त ! सामान्य मनुष्य सामान्यतः किमतीकडेच बघतो. पाश्चिमात्यांच्या मनात धास्ती निर्माण होण्याइतकी प्रगती जपानने केली.

जपानचे ‘ कल्चर मोती ’ प्रसिद्ध आहेत. यांना काही लोक कृत्रिम मोती म्हणतात. एका अर्थाने ही गोष्ट खरी आहे, पण हे मोती शिंपल्यांतूनच तयार केलेले असतात. खरे मोती शिंपल्यांत तयार झालेले असतात; आणि वाळूचे बारीक कण शिंपल्यांत सोडून व तेथे काही संस्कार करून त्यांतून जे मोती मिळतात त्यांना ‘ कल्चर ’ मोती म्हणतात. जपानी लोक यांना ‘ कालवांचे अश्रु ’ म्हणतात. दोहोंच्या दिसण्यात प्रथमदर्शनी काही फरक दिसत नाही. कल्चर मोती बनविण्याच्या कृतीचा शोध मिकिमाटो या गृहस्थाने लावला म्हणून यांना ‘ मिकिमाटो मोती ’ असेही म्हणतात.

जपानचा बादशहा ही एक वैशिष्ट्यपूर्ण अशी संस्था आहे. यांच्या बादशहास ‘ मिकॅडो ’म्हणतात. या लोकांइतके राजनिष्ठ लोक पृथ्वीच्या पाठीवर नाहीत असे म्हटले जाते. पोष्टाच्या तिकिटांवर व नाण्यांवरही राजाचा मुखवटा उठविलेला नसतो ! कारण काय ? तो अवमानित होऊ नये ही प्रबल इच्छा !

जपानवर गेली दोन हजार वर्षे राजा राज्य करीत आहे ! आणखी आश्चर्याची गोष्ट म्हणजे येथील सारे राजे एकाच घराण्यातील आहेत ! राजा हा ईश्वरी अंश समजला गेल्यामुळे तो अतिशय पूज्य समजला जातो;

तो सगुण, साकार देवच ! आणि खरी सत्ता लष्करी वर्गाच्या हातात होती. या वर्गाच्या प्रमुखाला ' शोगून ' म्हणत. लष्करी मदत करणाऱ्या लोकांचा एक वर्ग असे, त्याला ' सामुराई ' म्हणत. या सामुराईंना शिक्षण मिळे ते आत्मनिग्रहाचे. दुसऱ्यावर विजय मिळविण्याआधी त्याने स्वतःवर विजय मिळविला पाहिजे, यालाच आत्मनिग्रह म्हणतात. राजाकरिता, देशाकरिता, यांची प्राणार्पण करण्याची सदैव तयारी असते. समरांगणावर मरण येणे ही भाग्याची गोष्ट समजली जाते.

शोगून हे खरे सत्ताधारी, पण त्यांनी राजाचे ' पेशवे ' म्हणून राज्य-कारभार केला. मनात आणले असते तर त्यांनी राजाला केव्हाच पदच्युत केले असते; पण त्यांनी तसे केले नाही, कारण राजा हा त्यांचा देव.

राजनिष्ठेचे बाळकडू मुलांना वंशपरंपरेने मिळत आलेले आहे. एकदा एका शाळेच्या इमारतीला आग लागली असता शाळेतील राजाचा फोटो जळणार किंवा विद्रूप होणार म्हणून एका शाळकरी मुलाने आगीच्या ज्वालांतून प्रवेश केला आणि राजाचा फोटो स्वतःचे पोट चिरून त्यात ठेवला ! राजनिष्ठेची ही परिसीमाच ! अशी अनेक उदाहरणे आहेत.

वीरमातेची आत्महत्या—आत्महत्या कसली, आत्मयज्ञ ! जपानने रणांगणावर जाण्याकरिता स्वयंसेवकांची भरती सुरू केली. पुष्कळसे तरुण नावे नोंदविण्यास पुढे सरसावत होते. पण त्यात अशी एक अट होती की, एकुलत्या एक मुलाने मात्र नाव नोंदविता कामा नये. या अटीचे दुःख एका विधवा आईला आणि तिच्या एकुलत्या एक मुलाला अतोनात होत होते. आपल्या मुलाला देशाकरिता लढण्याची सुवर्णसंधी मिळत नाही म्हणून त्या वीरमातेने आत्मयज्ञ करून मुलाचा मार्ग मोकळा केला ! केवढा हा त्याग आणि देशनिष्ठा !

जपानमध्ये तीन धर्मपंथांचे लोक आहेत. यांचा मुळचा ' शिंटो ' धर्म. या धर्मानुसार जपानी लोक बादशहाला देव समजतात. पूर्वजांची पूजा करण्याची प्रथा यांच्यात आहे. कठीण प्रसंगी पूर्वजांनी आपल्याला सन्मार्ग दाखवावा म्हणून घरातील पूर्वजांच्या देव्हाऱ्याजवळ त्यांची ते प्रार्थन करीत बसतात. पुढे चौथ्या-पाचव्या शतकात ' कन्फ्युशियन ' धर्म कोरियातून जपानात प्रविष्ट झाला. पण याची तत्त्वे केवळ गृहव्यवस्थेसंबंधी

मर्यादित स्वरूपाची असल्यामुळे त्याची छाप लोकांवर फारशी बसली नाही आणि त्याचा प्रसार फारसा झाला नाही, तरी पण या पंथाचे काही लोक आहेतच. यानंतर सहाव्या शतकात बौद्ध धर्म जपानात शिरला व त्याचा प्रसारही खूप झाला. आजही हाच तेथील प्रमुख धर्म समजला जातो. पण धर्माबाबत जपानी लोक फारसे निष्ठावान नाहीत. ते अनेक धर्मपंथांचा सहजतेने स्वीकार करतील.

जपान हा अतिशय दाट लोकवस्तीचा देश आहे. याचे मुख्य शहर जे टोकियो त्याची लोकसंख्या दीड कोटीच्या जवळपास आहे ! म्हणजे मुंबईच्या तिप्पट ! लोकसंख्येच्या दृष्टीने जगात अमेरिकेतील न्यूयॉर्कचा क्रमांक पहिला आणि टोकियोचा दुसरा, आता बहुधा पहिलाच ! लोकांची विलक्षण गर्दी हेच याचे वैशिष्ट्य. वाहनांच्या रहदारीमुळे पादचाऱ्यांचा खोळंबा तर सहज दोन-अर्डाच तासांचा ! येथील आणखी वैशिष्ट्य म्हणजे विजेच्या लखलखाटाचे. यासंबंधी असा हिशेब केला आहे की, टोकियोत जितके 'न्यूऑन साइन्स 'चे दिवे आहेत तितके जगातील कोणत्याही शहरी नाहीत ! आणि हीच गोष्ट चित्रपटगृहांची.

जपानी लोकांतील लग्नपद्धती साधी आणि बिनखर्चाची असते. लग्न जुळविण्यास मात्र एक मध्यस्थ जोडपे लागते. या जोडप्याला ' नेकाडो ' म्हणतात. वरपक्ष किंवा वधूपक्ष यांचा नकार मिळाल्यास तो असह्य अपमान समजला जातो, म्हणून मध्यस्थीची जरुरी. वधूवरांची परस्पर-पसंती झाली की, त्यांचे जाणे-येणे सुरू होते. लग्नविधीकरिता नेकाडो-जोडपे नवरीला नवऱ्याच्या घरी घेऊन जाते. लग्नविधी म्हणजे नातेवाईकांच्या देखत तीन पेल्यांतून 'साकी'चे म्हणजे दारूचे घुटके तीन वेळा आळीपाळीने घेणे. याचा अर्थ सुख-दुःखांचे वाटेकरी होणे. झाला लग्नविधी ! आपल्याकडे सप्तपदीने विवाह पक्का होतो तसेच या विधीचे महत्त्व. आता ही लग्ने रजिस्टर करून घ्यावी लागतात. लग्नाच्या वेळी नवऱ्या मुलीच्या डोक्यावर एक विशिष्ट तऱ्हेचा मंदिल असतो. दोघांचेही या वेळचे पोषाख जरा भारी असतात. पण हे पोषाख भाड्यानेही मिळतात ! तशी सोय केलेली असते, पण रंगासंबंधी यांच्यात एक चमत्कारिक चाल आहे. पांढरा रंग हा यांच्यात अशुभ मानला आहे. लग्नाच्या वेळी मुलीला पांढऱ्या रंगाचा

किमोनो घालावयास देतात. याचा अर्थ मुलगी यापुढे आई-वडिलांना ' अंतरली ' असे मानण्यात येते. मुलगी सासरी गेल्यावर मुळचे घर झाडून व सडासारवण करून ' शुद्ध ' करतात !



जपानी लोकांइतके पाहुणचार आणि आदरसत्कार करणारे लोक क्वचितच आढळतील. खूप वाकून नमस्कार करण्याची पद्धत यांच्यात आहे, आणि हा नमस्कार अनेक वेळा होतो ! यानंतर चहा. यांच्यात चहा देणे हे मोठे प्रकरण असून त्याचे एक विशिष्ट तंत्र असते. यांचे चहाचे कप फार लहान असतात. गप्पागोष्टी होईपर्यंत निदान दोन-तीन वेळा तरी पुनःपुन्हा चहा होतो. यांचा चहा आपल्याहून निराळा. त्यात दूध नाही की साखर नाही ! चहाच्या जोडीला तांदळाच्या पिठाच्या केक्स, फळे इत्यादी पदार्थ असतात. बैठकीची जागा अगदी स्वच्छ, तेथील सगळ्या वस्तू टापटिपीने ठेवलेल्या, त्यात फुलदाणी असावयाचीच. कपबशा ठेवण्या-

करिता छोटे छोटे चौरंग, बसण्याकरिता गादी आणि बोलण्यातील विनम्र भाषा इत्यादी गोष्टींमुळे पाहुणा भारावून जातो. यांच्यात शिष्टाचारांचे तंत्र विशेष असल्याने त्यांचे शिक्षण मुलामुलींना आवर्जून द्यावे लागते. . . .

जपानी लोक कोणत्याही बाबतीत इतर देशांचे अनुकरण करण्यात फार पटाईत आहेत. असे असले तरी त्यांचे वैशिष्टय व स्वत्व त्यात राखतीलच. कॅमेरे व ट्रान्झिस्टर रेडिओ स्वस्त आणि सुबक बनविण्यात त्यांचे कौशल्य आणि कल्पकता दिसून येते. 'न्यूऑन साइन्स'मध्ये रंगांच्या छटा विलक्षण तऱ्हेने आकर्षक करून स्वतःचे वैशिष्टय राखतील. एका दृष्टीने ही 'संशोधनातील काटकसर'च म्हणावी लागेल.

जपानी शेतकरी अतिशय कष्टाळू असून जमिनीतून शक्य तितकी अधिक ते पिके काढतात. तांदूळ हे महत्त्वाचे पीक असून वर्षातून तीन-तीन पिके काढतात. या बाबतीत जपानी स्वावलंबी आहेत. याचे मुख्य कारण जमिनीची निगा आणि खतांचा पुरवठा. शेतीची कामे अंगमेहनतीने केली जातात. या देशात फारशी गुरे नाहीत. सगळ्या जगात एकरी भाताचे पीक काढण्यात जपानचा पहिला क्रमांक लागतो! आपल्याकडे एकरी ८०० पौंड भात होते आणि जपानात २५०० पौंड! शेतीच्या बरोबरीने मासेमारीच्या व्यवसायात कित्येक लोक गुंतलेले असतात. येथील दुसरे मोठे उत्पन्न म्हणजे रेशमाचे, नंतर चहाचे. अलीकडे रेयॉनचे उत्पन्न या देशात मोठ्या प्रमाणावर होऊ लागले आहे. हे कृत्रिम रेशीम असून बांबूपासून तयार केले जाते. जपानात बांबूची बने विस्तृत आहेत. इतर उत्पादनांत कागद, रबराच्या वस्तू, कापूर, लाखेच्या व चिनी मातीच्या जिनसा, घड्याळे आणि विशेष म्हणजे विविध प्रकारची खेळणी. जपान देश कुटिर उद्योगांकरिता विशेष प्रसिद्ध आहे. घरोघरी माग खडखडत असतात.

जपानी लोकांच्या जेवणातील मुख्य पदार्थ म्हणजे भात व मासळी. हल्ली पालेभाज्या, गाजरे, बटाटे इ. कोंबडी व अंडी ही माफक प्रमाणात त्यांच्या खाण्यात येतात. आपल्याकडचा जोंधळा, बाजरी, तूर इ. धान्ये त्यांना माहीत नाहीत. गहू त्यांच्या खाण्यात अलीकडे येऊ लागला आहे. तसेच ऑस्ट्रेलियातून मांस आणवून हे लोक खाऊ लागले आहेत. गाई, घोडे इ. प्राणी येथे फारच कमी. त्यांचे मुख्य पेय म्हणजे 'साके' या

नावाची दारू; ही तांदळापासून केलेली असते, ही फारशी मादक नसते. जेवणानंतर हे लोक चहा पितात! दिवसातून तीन वेळा यांचे जेवण असते. चिनी लोकांप्रमाणे हे लोक हातात दोन लांब काड्या घेऊन जेवतात. भाताचा घास दोन काड्यांत संभाळून तोंडात घालतात ! अलीकडे मात्र काटे व चमचे यांचा प्रसार सुरू झाला आहे.

मुलींमध्ये शिक्षणाचा प्रसार खूप झाल्यामुळे त्या सर्व तऱ्हेची कामे करू शकतात. बस-ट्राम कंडक्टर, पेट्रोल पंप, लिफ्ट, हॉटेल्स, दुकाने, ऑफिसे, गिरण्या, कारखाने इ. क्षेत्रांत त्या काम करीत असलेल्या आढळतात. या मुली बहुधा गरीब कुटुंबांतील असतात. आपला भार वडिलांवर पडू नये ही त्यांची इच्छा. लग्नसुद्धा पैसा जमविल्यावर त्या करतात. मुलींच्या लग्नाचे वय सामान्यपणे बावीस व मुलांचे सव्वीस. मुलांचे स्वावलंबन वाखाणण्यासारखे असते. आर्थिक मदतीसाठी याचना करणे त्यांना कधीच रुचत नाही. वाटेल ती कामे करतील, पण तोंड वेंगाडणार नाहीत.

जपानातील ‘ गैशा ’ हे या देशाचे वैशिष्ट्य आहे. ह्या गैशा म्हणजे मुली; गाणे, नाचकाम, वाद्ये वाजविणे इ. कलांत प्रवीण असून ह्या धंद्यावर त्या उपजीविका करतात. काही लोक एखाद्या मित्राला ‘ पार्टी ’ किंवा मेजवानी द्यावयाची असेल तर त्याची व्यवस्था गैशेच्या घरी करण्यात येते. ह्या गैशा पाहुण्यांचे आदरातिथ्य करण्यात आणि त्यांना खुश करण्यात विशेष कुशल असतात. पुरुषांचे मन रिझविण्याचे शिक्षण त्यांना मिळालेले असते. अशा शिक्षणाच्या शाळा तेथे आहेत. वादविवाद करण्यातही त्या केव्हाही मागे नसतात. राजकारणी लोकांच्या सभा कधी कधी यांच्या घरी भरतात! पण विशेष गोष्ट म्हणजे गैशांकडून कोणतीही गोष्ट बाहेर फुटत नाही ! ‘ गैशा ’ ही संस्था सामाजिक जीवनाला लज्जत आणणारी म्हणून अभिमानास्पद मानली जाते. जपानला काही लोक दोन ‘ G ’ चा देश म्हणतात. एक ‘ जी ’ म्हणजे Gardens व दुसरी ‘जी’ म्हणजे Geisha !


जपानी लोकांच्या पोषाखात अलीकडे क्रान्ती झाली आहे. पाश्चिमात्यांच्या अनुकरणानुसार त्यांचा हल्लीचा पेहराव असतो. पण विशेष गोष्ट म्हणजे बाहेरील व्यवहाराकरिता युरोपिअन पद्धतीचा पोषाख, पण घरी

येताच जपानी पोषाख. ' सैल हाताचे गुडघ्यापर्यंत पोचणारे बिनबटनांचे दोन-तीन कोट एकावर एक चढवून एक कमरपट्टा बांधला की झाला यांचा पोषाख. या कोटांना ' किमोनो ' म्हणतात. समारंभाला जावयाचे असल्यास किमोनो रेशमाचा असतो. पायात सफेत मोजे घालून यावर चप्पल घालतात. यांच्या चपलांना ' गेटा ' किंवा ' झोरी ' म्हणतात. गेटा लाकडाच्या असतात व त्यांचा अर्थातच आवाज होतो. झोरीचे तळ जाड असतात.

जपानी स्त्रियांनी आपल्या पोषाखात फरक केलेला नाही. यांचा पोषाख म्हणजे एक सुंदर किमोनो व त्यावर ' ओबी. ' किमोनो फुलाफुलांचे आणि चित्रविचित्र रंगांच्या कापडाचे असतात. ओबी म्हणजे १५–२० फूट लांबीची आणि एक फूट रुंदीची कापडाची पट्टी. ही कमरेला गुंडाळून पाठीवर सोडलेली असते. रंगीत छत्री, रंगीत खडावा आणि सुंदरसा पंखा हे यांच्या पोषाखातील आणखी वैशिष्ट्य. जपानी स्त्रिया टापटिपीने केलेल्या किमोनोच्या पोषाखात सुंदर दिसतात. ह्यांची केशरचना ही एक वैशिष्ट्य-पूर्ण अशी गोष्ट आहे. केसांत पिना आणि कंगवे यांचे प्राबल्य असतेच. केसांचे अंबाडे रात्री विस्कटू नयेत म्हणून त्यांची उशी लाकडाची केलेली असते. त्यावर कागदांचा थर असून त्यावर मान अवघडणार नाही अशा बेताने ती ठेवावयाची ! लाकडाची उशी पवित्र समजून तिला पाय लावावयाचा नाही. आकर्षक पुष्परचना व केशरचना करण्याची त्यांना उपजत देणगीच असते. जपानी मुलींना ओबी हे जणू काही सर्वस्व वाटते.

आपल्या देशात आगगाडीचा मार्ग प्रथमतः सन १८५३ मध्ये झाला. जपानमध्ये १८७० मध्ये पहिला लोहमार्ग तयार झाला आणि तेव्हापासून जपानने पाश्चिमात्य लोकांच्या साहाय्याने सर्वांगीण प्रगतीला सुरुवात केली. जपानमध्ये आज इंग्लंडप्रमाणे जमिनीखालून जाणारे लोहमार्ग अनेक आहेत, यांना ' ट्यूब रेल्वे ' म्हणतात. आपल्याकडे असा अद्याप एकही मार्ग नाही. येथील ' फनिक्युलर रेल्वे ' हे वैशिष्ट्य आहे. डोंगराळ भागात अल्पावधीत ३–४ हजार फुटांवर सहजतेने पोचण्याचे हे साधन आहे. आणखी एक वैशिष्ट्य ' रोप-वे 'चे ! एका डोंगरावरून दुसऱ्या डोंगरावर एक दोरी बांधून तिच्यावरून मोठे डबे जा-ये करीत असतात ! या डब्यांत

२५–३० माणसे सहज बसतात. जपानात मोटारी व माणसांनी ओढा-वयाच्या रिक्शा यांची तर खूपच संख्या आहे.



जागेच्या अभावी थोड्या जागेत कुटुंबातील मंडळी गर्दी करून राहतात, सवयीमुळे ती गोष्ट अंगवळणी पडून जाते. पण भरपूर खोल्या असूनही त्यांची ती वृत्ती जात नाही. एखादा परस्थ पाहुणा स्वतंत्र जागेला आसुसलेला असावा आणि त्याला स्वतंत्र खोली देणे शक्य असले तरी 'तुम्हाला एकटे-एकटे नाही वाटणार ?' असे ते विचारतील !

यांच्यात एकत्र कुटुंब-पद्धती बरेच दिवस रूढ होती. तिचे पावित्र्यही राखले जात होते. मुले–मुली–सुना यांची सारी हालचाल धाकात असल्याप्रमाणे चालावयाची. त्यांना मोकळेपणा मिळण्याच्या दृष्टीने अलीकडे मात्र ही परिस्थिती बदलत आहे.

बादशहाच्या मृत्यूनंतर राजधानीचे शहर बदलावयाचे अशी राजधानीच्या शहरांची मोठी विचित्र प्रथा होती. त्यामुळे जपानच्या अनेक राजधान्या झाल्या—ओसाका, नारा भागात नारा, नंतर कामाकुरा, किओटो, आणि इडो (हल्लीचे टोकिओ). **नारा** या ठिकाणाला ऐतिहासिक महत्त्व आहे. येथील बुद्धाची सर्वांत मोठी ब्रॉंझ धातूची मूर्ती प्रेक्षणीय आहे. हिची

उंची ५३½ फूट ! मूर्तीचे तोंड १६ फूट लांब व ९½ फूट रुंद, डोळा सुमारे ४ फूट, कान ८½ फूट इ. इतकी प्रचंड मूर्ती असूनही ही अतिशय प्रमाणबद्ध व रेखीव अशी आहे. या मूर्तीचे मंदिर लाकडी असून जगातील सर्वांत मोठे लाकडी मंदिर म्हणून त्याची ख्याती आहे. **कियोटो** हे शहर विद्वत्तेचे व कलाकौशल्याचे माहेरघर म्हणून मानले जाते. **टोकियो** हे हल्लीचे राजधानीचे शहर.

जुलै १३ चे महत्त्व जपान्यांना विशेष आहे. या दिवशी मृतांचे आत्मे आपापल्या घरी येतात अशी समजूत आहे. त्यांना उजेड मिळावा म्हणून या दिवशी उंबरठ्यांत दिवे लावून ठेवतात किंवा लहानशी होळी पेटवितात. स्मशानात दिव्यांची रोषणाई करतात आणि लोक उत्साहाने हा दिवस साजरा करतात. याला ‘ ओबोन ’ उत्सव म्हणतात.

जपानी लोकांचे मूळचे खेळ म्हणजे ज्यूजित्सु, केन्जित्सु, कुस्ती, पोहणे हे होत. या लोकांना कुस्त्यांचा फार षोक. पाश्चात्त्यांच्या सहवासाने बेसबॉल, टेनिस, फुटबॉल, मुष्टियुद्ध इ. खेळ खेळले जातात. हिवाळ्यात मात्र बर्फ



पडल्यावर स्केटिंग व स्काइंग हे खेळ सुरू होतात. बैठ्या खेळांत पत्ते व बुद्धिबळे. पत्त्यांचा खेळ मात्र आपल्याहून अगदीच वेगळा आहे. पतंगाच्या

खेळात लहानांबरोबर प्रौढ माणसेही हौसेने भाग घेतात. पतंगांच्या लढाया होतात. पाच-पाच चौ. फुटांचे यांचे पतंग असतात, म्हणजे माणसाच्या उंचीएवढे ! मुले माशांच्या, पक्षांच्या आकाराचे रंगीत पतंग तयार करून हवेत उंच उडवितात. अशा असंख्य रंगीत माशांचे व पक्षांचे थवेच्या थवे आकाशात उडत असलेले दिसतात.

हाराकिरी करणे हे जपान्यांचे वैशिष्ट्य आहे. हाराकिरी म्हणजे आत्महत्याच, समारंभपूर्वक केलेली आत्महत्या ! एखाद्यात्या हातून अपमानकारक कृत्य झाल्यास त्याचे प्रायश्चित्त म्हणून त्याला हाराकिरी करावी लागते. जपानच्या इतिहासात अशी अनेक उदाहरणे आहेत. हाराकिरी करणारा माणूस प्रथम स्नान करतो, नंतर नवीन वस्त्रे धारण करतो, ईश्वराचे स्मरण करतो, कंबर बांधतो आणि दोन्ही गुडघे मोडून आसन मांडतो. नंतर हातातील साडेनऊ इंच लांबीच्या जंबियाने पोटातील आतडी बाहेर उपसून प्राण समर्पण करतो. हे भीषण दृश्य लोकांस दिसू नये म्हणून मागे न पडता तो पुढील बाजूस लवंडतो ! हा एक आत्मयज्ञच.

जपानी मुलांचे पुष्कळ सण असतात. या दिवशी मुले आपले उंची रेशमी कपडे घालून मिरवितात. तिसऱ्या महिन्याच्या तिसऱ्या दिवशी मुलींचा ' बाहुल्यांचा सण ' असतो. या दिवशी घरातील निरनिराळ्या प्रकारच्या बाहुल्यांचे प्रदर्शन भरवितात. कुटुंबात मुलगी जन्माला आली की बाहुल्या जमवायला सुरुवात होते. पिढ्यानुपिढ्या जमलेल्या ह्या बाहुल्या मातीच्या, लाकडाच्या असतात. आपल्याकडील चैत्रगौरीच्या आराशीप्रमाणे या बाहुल्यांच्या पुढे निरनिराळ्या प्रकारचे खाद्य पदार्थ ठेवतात. पाचव्या महिन्याच्या पाचव्या दिवशी मुलांचा ' निशाणांचा सण ' येतो. याला ' कार्पचा सण ' असेही म्हणतात. कार्प हा बळकट व मोठा मासा आहे. प्रत्येक घरापुढे एक खांब रोवला जाऊन त्याच्या टोकाला कागदाचे मोठे मासे तयार करून निशाणाप्रमाणें फडफडत ठेवतात; जितके मुलगे तितके मासे ! मासे जसे प्रवाहाच्या विरुद्ध दिशेलाही पोहत जातात तसे माणसानेही प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढला पाहिजे या विचारसरणीचे मासे हे प्रतीक होत.

मंदिरे आणि चहाची दुकाने यांचे साहचर्य जपानात विशेष आहे.

चहाची दुकाने ही एक करमणुकीची ठिकाणे असतात. येथील सुंदर सुंदर पोषाख केलेल्या मुली गिऱ्हाइकांशी अतिशय अदबीने वागतात.

जपानी जीवन कागदमय आहे ! यांची घरे कागदाची, पेय पिण्याचे कप कागदाचे, दिवे कागदाचे, हातरुमाल कागदाचे, टोप्या कागदाच्या, छत्र्या कागदाच्या, रेनकोटही कागदाचे ! अशा कितीतरी बाबतींत हे लोक कागदाचा उपयोग करतात. कागदाचे साठ प्रकार यांच्याकडे आहेत. जी गोष्ट कागदाची तीच कथा बांबूंची. घरांच्या चौकटी बांबूंच्या, बांबूच्या झाडांची पाने छपरांकरिता; थाळ्या, पेट्या, फुलदाण्या, पंखे, छत्र्या अशा सुमारे पाचपन्नास वस्तूंकरिता बांबूचा उपयोग हे लोक करतात.

जपानमधील निक्को या ठिकाणासंबंधी अशी म्हण आहे की, ‘ निक्को पाहिल्याशिवाय केक्को (सुंदर) म्हणू नये. ’ येथील बुद्धमंदिराने जगप्रसिद्धी मिळविली आहे. हे मंदिर वास्तुकलेचे व सोनेरी लाखेचा आणि लाकडावरील नक्षीकामाचा उत्कृष्ट नमुना आहे. येथील लाकडावरील कोरीव कामात तीन माकडांची चित्रे आहेत. त्यांपैकी एकाने डोळ्यावर हात धरलेले, दुसऱ्याने तोंडावर व तिसऱ्याने कानावर ! कशाकरिता हे ? तर माणसाने अंमगल पाहू नये, अमंगल बोलू नये आणि अमंगल ऐकू नये हे तत्त्वज्ञान शिकविण्याकरिता. या तत्त्वज्ञानी माकडांनी जगप्रसिद्धी मिळविली आहे. आपल्याकडे सुद्धा अशी चित्रे बाजारात आली आहेत.

● ● ●

३. चिनी लोक

जगातील प्राचीन देशांत हिंदुस्थानप्रमाणे चीन देशाची गणना करतात. हल्लीची सुधारलेली राष्ट्रे ज्या वेळी मागासलेली होती त्या काळी चीन देश विद्या आणि कलाकौशल्य यांत अग्रेसर होता. बंदुकीची दारू, शोभेची दारू, होकायंत्र, छापण्याची कला इ. बऱ्याच गोष्टी पाश्चात्त्यांच्या पूर्वी चिन्यांना माहीत होत्या ! पण चिन्यांची पुराणप्रियता पाश्चात्त्यांच्या बरोबरीने पुढे सरसावण्यास नडली.

चिनी लोकांना आज ' आपले बांधव ' म्हणण्यास मन कचरते ही गोष्ट खरी. त्यांनी भारताशी बेइमानीपणा करून भांडण उकरून काढले आहे. तरी सुद्धा भारताने चीनची मैत्री तोडून टाकलेली नाही ! परराष्ट्रीय धोरणात भारत उदारपणा दाखवीत आहे. भारताची आणि चीनची सांस्कृतिक परंपरा फार जुनी आणि मोठी असून अनेक बाबतींत बरेच साम्य आढळून येते. विशाल दृष्टिकोणातून भारत त्यांना बांधवच समजतो.

चिनी लोकांची भाषा आणि लिपी आपल्याला वैचित्र्यपूर्ण अशी वाटते. चिनी भाषा चित्रमय आहे. आपल्या भाषेत जसे वर्ण आहेत तसे त्यांच्या भाषेत नव्हते. पण सन १९१९ मध्ये विद्वानांच्या परिषदेत नवीन मूळाक्षरे निश्चित करण्यात आली. त्यांच्या भाषेत आता ३९ मूळाक्षरे आहेत. भाषेचा हा क्रान्तिकारक बदल शिक्षणाची प्रगती झपाट्याने होण्यास चांगलाच उपकारक ठरला आहे. वृद्ध माणसांनीही ही मूळाक्षरे शिकण्यास सुरुवात केली. चीनच्या प्रांतांतून अनेक बोलीभाषा आहेत. पण पेकिंगची बोलीभाषा ही सरकारमान्य म्हणून राष्ट्रीय भाषा समजली गेली आहे. या एका भाषेमुळे भाषेची समस्या ह्या देशात नाही.

चिनी वाङ्मय अतिशय प्राचीन आणि समृद्ध असे आहे. कन्फ्युशियस हा चिनी तत्त्ववेत्ता आणि नीतिशास्त्रज्ञ खिस्तपूर्व सहाव्या शतकात होऊन

गेला. याचे ग्रंथ आज उपलब्ध आहेत. चिनी वाङ्मय विपुल आणि विविध विषयांवरचे आहे. त्यात तत्त्वज्ञान अर्थशास्त्र, मुद्रणकला, शेतकी, वैद्यक, भविष्यज्ञान, चित्रकला, संगीतशास्त्र, ज्योतिषशास्त्र इ. विषयांचा समावेश आहे. ते संकलित करण्याचे कार्य कन्फ्युशियसने केले, म्हणून याला चिनी साहित्याचा जनक म्हणतात. ज्ञानकोश किंवा विश्वकोश तयार करण्याचे प्रचंड कार्य सन १४०८ मध्ये प्रथमतः चिन्यांची केले ! हा कोश तयार करण्यास २२०० विद्वान अनेक वर्षे खपत होते ! याची पृष्ठसंख्या ९,१७,४८० इतकी भरेल !

चीनमध्ये तीन धर्मपंथ प्रचलित आहेत. खिस्तपूर्व सहाव्या शतकात विस्कळित झालेल्या राजकीय सत्तेचे व्यवस्थापन करण्याच्या उद्देशाने कन्फ्युशियस या तत्त्ववेत्त्याने एका धार्मिक पंथाची नव्याने प्रस्थापना केली. समाजात जागृती निर्माण केली, त्याला दिलासा दिला. हा कन्फ्युशियसचा धर्म. याच वेळी लाओत्सु या तत्त्वज्ञान्याने आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रसार सुरू केला. याच्या पंथाला ' ताऊ ' धर्म म्हणतात. ताऊ याचा अर्थ मार्ग, वाट– जीवात्म्याचा निसर्गात विलीन होऊन जाण्याचा मार्ग. याही धर्माला अनुयायी मिळाले. काही राजे त्याचे पुरस्कर्ते बनले. पण पुढे बौद्ध धर्माची लाट प्रचंड वेगाने चीनमध्ये शिरली आणि चोहोकडे पसरून स्थिर झाली.

आजच्या चीनमध्ये साम्यवादी सत्ता प्रस्थापित झाल्याने धर्म हा विषय तेथे नाहीच. तरी पण चीन हा बौद्ध धर्मीच देश गणला जातो. तेथे ठिकठिकाणी बौद्ध मंदिरे आहेत. प्रत्येकाला आपल्या धार्मिक विचारानुसार वागण्याची पूर्ण मोकळीक आहे. कित्येक बौद्ध मंदिरांचा रुग्णालये, सरकारी कचेऱ्या इत्यादीकरिता उपयोग करण्यात येत आहे. शिल्पकलेचे नमुने म्हणून ती मंदिरे सुरक्षित ठेवली आहेत. एका मंदिरातील बुद्धमूर्ती जवळजवळ ७२ फूट उंचीची असून ती एकाच काष्ठातून कोरली आहे असे म्हणतात.

गोमातेविषयीची पूज्य भावना आपल्याइतकीच चिनी लोकांत आहे. अर्थात हे लोक गोमांस खात नाहीत हे उघडच आहे. चिनी कायद्यात गोवध हा भयंकर गुन्हा मानून त्याला कडक शासन ठेवले आहे.

चिनी लोकांचे हस्तकौशल्य विशेष वाखाणण्यासारखे असते. उत्कृष्ट रेशमी कापड, भरजरीचे नक्षीदार काम, चिनी अथवा पांढऱ्या मातीची भांडी, लाखी रंगाचे काम, काचा, बांगड्या, हस्तीदंतांवरील नक्षीची कामे चीनमध्ये जितकी सुबक व मुबलक होतात तितकी ती अन्यत्र कोठेच होत नाहीत. चीनचे फटाके हिंदुस्थानात कित्येक वर्षे येत होते. हे फटाके तेथे यंत्रसामग्रीविना हाताने बनविलेले असत; शिवाय मुबलक आणि स्वस्त.

सामान्यपणे चिनी लोकांची राहणी साधी. ते अतिशय कष्टाळू असून काटकपणा, सोशिकपणा, चिवटपणा आणि शारीरिक मजबूतपणा ही त्यांची वैशिष्ट्ये म्हणून सांगता येतील. ३०० पौंड चहाचे ओझे पाठीवर घेऊन कामकरी भराभर डोंगर चढून जातात. तसेच २०० पौंड वजनाची तुळई पाठीवर उभी बांधून चिनी हमाल १० मैलांपर्यंत सहजतेने नेऊ शकतो. त्यांच्याबरोबर कित्येक वेळा जनावरेही या कामी टिकाव धरीत नाहीत !

पेकिंगमध्ये ‘ अठरा नरकांचे देवालय ’ म्हणून एक मोठे मंदिर आहे. या देवळात दुष्कृत्यांचे प्रकार आणि त्यांबद्दल मिळणारी ‘ बक्षिसे ’ यांची भेसूर चित्रे रंगविलेली आहेत.. आज ही चित्रे तेथे आहेत किंवा नाहीत हे सांगता येत नाही. पण निदान होती ही गोष्ट खरी. लोकांना अनीतीपासून आणि पापाचरणापासून परावृत्त करण्याचा हा एक मार्ग आहे.

चीनची लोकसंख्या अफाट असल्याने कित्येक गरीब कुटुंबे पाण्यातील बोटींवरच राहतात ! सर्व व्यवहार, सर्व आयुष्य बोटींवरच. यांची मुले चालण्याच्या अगोदर पोहायला लागतात !

चीन हा शेतप्रधान देश आहे. येथील लोकांचा मुख्य व्यवसाय शेतीचा. शेतीच्या कामात हे लोक आपल्याकडील कोकणी शेतकऱ्यांप्रमाणेच कुशल असतात. उन्हातान्हात मेहनत करून जमिनीची मशागत करतात आणि उत्पन्न काढतात. यांच्या चेहऱ्यावर औदासीन्य बिलकूल दिसणार नाही. वृत्ती समाधानी आणि आनंदी. भात, चहा, कापूस, सोयाबीन यांचे पीक येथे भरपूर होते. येथील रेशमाचे उत्पन्न हे वैशिष्ट्य आहे. चायना सिल्क म्हणून त्याला जगप्रसिद्धी आहे. हा धंदा येथे कमीत कमी ३–४ हजार वर्षांपूर्वीचा आहे ! एके काळी जगातील रेशमाचा अर्धा व्यापार एकट्या चीनचा असे ! चहाचाही व्यवसाय आणि व्यापार येथे मोठ्या प्रमाणावर चालतो.

भात व मासे हे या लोकांचे मुख्य खाद्य. उत्तरेकडील लोक भाताऐवजी गहू खातात. ही दोन्ही पिके येथे भरपूर होतात. भात व गहू यांच्या जोडीला मासे, अंडी व भाज्या हे पदार्थ असतातच. चिनी लोक पाली, उंदीर, घुशी, झुरळे, साप इ. पदार्थ खातात ! सणाच्या दिवशी अशा प्राण्यांचा उपयोग खाण्याच्या पदार्थांत करतात.

चिनी लोकांची मासे पकडण्याची एक युक्ती पाहा. ' कॉर्मोरंट ' हा एक आपल्याकडील घुबडासारखा पक्षी आहे. बरेचसे पक्षी बरोबर घेऊन मासे पकडण्याकरिता चिनी लोक नदीत जातात. तेथे गेल्यावर ते पक्षी



मासे दिसताक्षणीच पाण्यात बुडी मारून त्यांना चोचीत पकडतात व मालकाला आणून देतात. पक्षाने पकडलेले मासे गट्ट करून टाकू नयेत म्हणून त्याच्या मानेभोवती घट्ट बसेल असे एक कडे घालतात. त्यामुळे त्याला मासे गिळता येत नाहीत, हीच त्यांची युक्ती. पण बरेचसे मासे पकडून झाल्यावर त्यापक्षाला त्याच्या मानेभोवतीचे कडे काढून काही मासे खावयास देतात.

चिन्यांना अफूचे विलक्षण व्यसन. त्यामुळे पूर्वी अफूचा चोरटा व्यापार येथे फार मोठ्या प्रमाणावर चालत असे. सरकारने अफूविरुद्ध कायदे केले तरी व्यसनाधीन मनुष्य चोरूनमारून अफू ओढल्याशिवाय राहात नाही.

चीनचे प्राचीन शोध तेथील लोकांच्या कल्पकतेची व बुद्धिमत्तेची साक्ष सहजपणे पटवितात. छापण्याची कला इ. स. पूर्वी २०० वर्षे येथील लोकांनी शोधून काढली ! होकायंत्राचा शोध इ. स. पूर्व १००० वर्षे


चीनने केला ! बंदुकीची दारू ही त्यांच्याच डोक्यातील कल्पना ! चीनच्या एका राणीने किड्यांपासून मिळणाऱ्या रेशमाचा शोध केला. तसेच कागद करण्याची कृती, कालमापक घड्याळे तसेच ज्योतिषशास्त्र, नौकाशास्त्र यांचे ज्ञान चीनने दिले. मग चीन मागासलेला कसा म्हणावयाचा ? त्याची पुराणप्रियता त्याच्या प्रगतीच्या आड येऊन इतके शोध लावूनही शेकडो वर्षे तो तसाच राहिला. पाश्चात्त्यांच्या यांत्रिक युगाचा मागोवा त्याने घेतला नाही. आज मात्र राज्यक्रांतीनंतर साम्यवादी सत्ता प्रस्थापित होऊन ॲटमबॉम्बच्या निर्मितीपर्यंत त्याने मजल मारली आहे. रशियाची आर्थिक मदत आणि तांत्रिक मार्गदर्शन ह्या गोष्टी मुख्यतः कारणीभूत आहेत, ही गोष्ट सत्य.

जगातील नऊ आश्चर्यांत चीनच्या प्रचंड भिंतीचा समावेश होतो. उत्तरेकडून होणाऱ्या तार्तरी टोळ्यांचा उपद्रव टाळण्याकरिता पश्चिम-पूर्व अशी प्रचंडा भिंत चिन्यांनी बांधली. ही भिंत बांधण्यास त्यांनी इ. स. पूर्व २०० व्या वर्षी सुरुवात केली. हिची लांबी १५०० मैल असून उंची स्थलपरत्वे २० ते ४० फुटांपर्यंत आहे. तिची रुंदीही बरीच आहे, काही ठिकाणी हिच्यावरून चार मोटारगाड्या सहज जाऊ शकतात. डोंगराळ भाग, नद्या, दऱ्या, जंगले आणि कडक थंडी यांचे भयंकर अडथळे असूनही या भिंतीची मानवनिर्मित कारागिरी पूर्ण झालेली आहे ! हिच्या बांधणीस लागलेला कालावधी, साहित्य आणि मनुष्यबळ यांची कल्पनाच केलेली बरी. अशा तऱ्हेची प्रचंड भिंत जगात अन्यत्र कोठेच आढणार नाही.

काही विशिष्ट चालीरीती – (१) चिनी लोकांत निळ्या रंगाचे विशेष महत्त्व मानले आहे, तो शुभदायक समजला जातो. चिनी लोक पांढरा रंग अशुभ समजून पांढरा पोषाख अमंगल प्रसंगी घालतात. (२) त्यांच्या जेवणाच्या पद्धतीनुसार हे लोक जेवताना पक्वान्नाच्या पदार्थाने सुरुवात करतात. (३) उन्हाळ्यात आपण थंड पेय घेतो, हे लोक उष्ण पेये पितात. (४) घराची सुरुवात पायापासून न करता छपरापासून करतात ! (५) आपण जुनी वर्तमानपत्रे रद्दी म्हणून विकून टाकतो—माल बांधण्याकरिता, चिनी मनुष्य वर्तमानपत्राच्या कागदात काहीही गुंडाळून देणार नाही. हे वाङ्मय तो देवाइतके पूज्य मानतो. (६) गायन-वादनाचे जलसे

आपण शुभप्रसंगी योजतो. त्यांच्यात लग्नविधी, बारसे आणि दफनविधी (!) या वेळीही ते केले जातात. (७) यांच्यात पूल कधी सरळ बांधीत नाहीत. नागमोडी बांधतात ! तसेच घराच्या पारंब्यांची टोके मागे वळविलेली असतात, सरळ असत नाहीत. कारण काय, तर भुताखेतांना सरळ वाटेने भरकन जाता येते, वाकड्या वाटेला ती अडतात– आणि अडावीच म्हणून.

चीनमधील देवळांची रचना वैशिष्ट्यपूर्ण अशी वाटेल. आपल्याकडील देवळांचे शिल्प भव्य वाटले तरी तऱ्हा अगदीच वेगळी. यांच्या देवळांना चिंचोळे घुमट किंवा गोपुरे वगैरे काही नसतात तर त्यांच्या छपरांच्या कडा वर स्वर्गाकडे वळविलेल्या ! परमेश्वराचा भक्त तृषार्त दृष्टीने आकाशाकडे डोळे लावून ईश्वराच्या कृपेची याचना करतो, अशी दृष्टी त्यात प्रतीकात्मक आहे.



निरनिराळ्या प्रकारच्या गाड्या तुम्ही पाहिल्या असतील, पण एकचाकी गाडी तुम्ही नक्की पाहिलेली नसेल. एकचाकी गाड्या चीनमध्ये आहेत. चाकाच्या दोन्ही बाजूंवर बसण्याची सोय केलेली असते. प्रत्येक बाजूवर २–३ मुले–माणसे सहज बसू शकतात. ही गाडी मनुष्य लोटीत नेतो. मनुष्याने ओढण्याच्या रिक्षा तर चीनमध्ये सर्रास आहेत. हे हलके व सुटसुटीत असे वाहन आहे, पण ते माणसाने ओढावयाचे ! अशा रिक्शातून जाण्यास आपण तर निश्चित संकोचून जाऊ.



यांच्यात प्रेते जाळण्याची पद्धत नसून ती पुरण्याची पद्धत आहे. दफनाची पेटी मिरवणुकीने स्मशानात नेतात, या शवपेटीत कागदी पैसे, कागदी कपडे, गाडी-घोडा इ. जिनसा ठेवल्या जातात ! हेतु काय, तर परलोकचा प्रवास सुखकर व्हावा हा ! मिरवणुकीबरोबर वाजंत्री असतात (!) व भुतेखेते दूर पळून जावीत म्हणून दारूचे आवाजही काढतात ! तसेच त्यांच्या तुष्ट्यर्थ त्यांच्या नावाने कागदी नाणी चोहोकडे फेकतात ! हेतु हा की, ती वेचण्यात ती भुते गुंतली जावीत आणि अंत्ययात्रा शेवटपर्यंत नीट पोहोचावी. यांच्यात अशौच म्हणजे सुतक तीन वर्षे पाळतात !

चिनी लोकांचे कपडे व पोषाख मोठे झगझगीत, भारी किमतीचे आणि भव्य असे असतात. स्त्रियांचा व पुरुषांचा पोषाख सामान्यपणे सारखाच. स्त्रियांचा अंगरखा थोडा आखुड असतो. चिन्यांची विजार मात्र झोळण्याइतक्या घोळाची आणि जरा तोकडी असते. विशेष म्हणजे त्यांच्या कपड्यांचा रंग निळा, हा त्यांना फार प्रिय. श्रीमंत लोक निळ्या रंगाचे रेशमी कपडे करतात, गरीब लोक खादीचे करतात. त्यांच्या पायातले बूटही तुम्हांला चमत्कारिक दिसतील. चामड्याच्या कमतरतेमुळे ते कापडाचे आणि घरीच बनविलेले असतात. पण आता पोषाखातही मोठी क्रांती झाली आहे. स्त्रिया आता झगे न घालता पुरुषांप्रमाणेच कोट–पाटलोण घालतात आणि क्रांतिसूचक वैशिष्ट्य म्हणजे कामगार आणि अधिकारी, तसेच गरीब

व श्रीमंत या सर्वांचे पोषाख सारखेच ! पोषाखावरून दिसून येणारा भेद-भाव आज या देशात नष्ट झाला आहे; समतेचे वातावरण !

स्त्रियांची केशरचना विशिष्ट पद्धतीची असल्याने व ती वरच्यावर तशी करणे कष्टाचे असते म्हणून निजताना स्त्रिया आपले डोके विटेच्या तुकड्यावर किंवा लाकडाच्या विशिष्ट तऱ्हेच्या ओंडक्यावर ठेवून निजतात; थोडे अवघडल्यासारखे होणारच, पण हा त्रास त्या पत्करतात. स्त्रियांचे पाऊल लहान असणे हे सौंदर्याचे लक्षण मानले जाते. तसेच ह्यांची नखे लांब असणे ही ऐश्वर्याची खूण समजतात ! पावले लहान ठेवण्याकरिता मात्र त्यांना ती लाकडी जोड्यात किंवा कापडात गुंडाळून घट्ट बांधून ठेवावी लागतात, यामुळे त्यांना दुःख मात्र सहन करावे लागते.

चिनी लोकांची लिहिण्याची आणि वाचण्याची तऱ्हा आपल्याला चमत्कारिक वाटेल. उजवीकडून डावीकडे ते वाचीत जातात! विषयाचा मथळा पानाच्या खाली आणि टीप वगैरे पानाच्या वर असते ! आपल्या पद्धतीने पुस्तकाचे जे शेवटले पान ते त्यांच्यात पहिले ! हीच गोष्ट होकायंत्राची. सामान्यपणे होकायंत्रातील काटा उत्तर दिशा दाखवितो; पण यांच्या होकायंत्रात दक्षिणेकडच्या बाजूस खूण केलेली असते.

पतंग उडविण्याची हौस लहान-थोरांत सारखीच असते. यातील धोरण मात्र जरा वेगळे आहे. नवव्या महिन्याचा नववा दिवस अमंगल समजलेला आहे. या दिवशी पतंगाच्या साहाय्याने भूत-पिशाच्यांना दूर पिटाळून लावणे हा त्यातील उद्देश. यांचे पतंग वैशिष्ट्यपूर्ण असून त्यांच्या-सारखे पतंग अन्यत्र कोठेच पाहावयास मिळणार नाहीत. निरनिराळ्या पाकोळ्या, पक्षी, मासे यांचे विविध आकार पतंगांना दिलेले असतात. तसेच ते रंगीबेरंगी असल्याने त्यांची शोभा विशेष दिसते.

चिनी मुले वर्षारंभाच्या दिवसाची आपल्या दिवाळीच्या सणाप्रमाणे आतुरतेने वाट बघतात. आपली दिवाळी तीन-चार दिवस असते; पण यांचा हा सण दोन आठवड्यांपर्यंत पाळला जातो ! या सणात चिनी मुले खूप दारू उडवितात. प्रत्येक घराच्या दारावर दार भरून जाईल एवढा मोठा फटाक्यांचा सर लावतात आणि मग देतात पेटवून ! मुले आदल्या रात्री जागून खूप मजा करतात. मध्यरात्री ओलांडली की, झाले नवे वर्ष सुरू.

देवळातून घंटा वाजू लागतात. फटाक्यांचा कडकड आवाज आणि घंटांचा घणघण आवाज ऐकून भुते वगैरे पळून जातात अशी यांच्यात समजूत आहे. या वर्षारंभाचे आणखी महत्त्व असे की, या दिवशी सर्व चिनी मुलांची व प्रौढांचीही वये वाढतात ! मग कोणाचे जन्म केव्हाही होवोत ! सर्वांचे वाढदिवस एकाच दिवशी !

चीनची क्रांती म्हटली की, सन्यत्सेनचे स्मरण झालेच पाहिजे. ‘ चिनी स्वातंत्र्याचा जनक ’ म्हणून त्याला संबोधण्यात येते. सन १९११ मध्ये चीनवर शेकडो वर्षे चालत आलेली जुलमी मांचू राजवट त्याने बंड पुकारून मोठ्या धैर्याने, धीराने उखडून टाकली ! त्याने ‘ क्यू ओ मिन् टांग ’ म्हणजे चिनी राष्ट्रीय पक्ष या नावाचा मोठा स्वराज्यसंघ स्थापन केला. चँग कै शेक याने या संघातूनच नवे लष्कर तयार केले. सन्यत्सेनने आपले मृत्युपत्र मृत्युशय्येवर पडले असताना तोंडाने सांगितले. या मृत्युपत्राला धर्मग्रंथाप्रमाणे लोक मान देत. पुढे कालांतराने दक्षिण चीन व उत्तर चीन यांमधील राजकीय पक्षात बेबनाव सुरू झाला आणि चीनमध्ये मोठी क्रान्ती होऊन चँग कै शेक याला चीनची मुख्य भूमी सोडून जवळच्या फोर्मोसा बेटात आश्रय घ्यावा लागला. ही घटना सन १९४९ मध्ये होऊन तो अमेरिकेच्या आश्रयाने अद्याप तेथेच आहे.

१ ऑक्टोबर १९४९ या दिवशी चीनमध्ये ‘ जनता राज्या ’ची मुहूर्तमेढ झाली. चीन साम्यवादी (कम्युनिस्ट) म्हणजे ‘ लाल ’ बनला. या क्रांतीची सूत्रे माओ-त्से-तुंग याच्याकडे असल्याने लाल चीनच्या पहिल्या अध्यक्षाचा मान त्याला मिळणे योग्य व तो त्याला मिळाला. माओ हा चीनचा सर्वाधिकारी झाला. सर्वांत जास्त विभूतिपूजा त्याची होत होती. (पण आज सन १९६७ मध्ये ?) चौ-एन्-लाय हा नव्या चीनचा मुख्य प्रधान व परराष्ट्रमंत्री झाला. हा माओच्या बरोबरीने चिनी क्रांतीच्या आद्य प्रवर्तकांपैकी एक होता. याला फ्रेंच, रशियन, इंग्लिश इ. भाषा चांगल्या अवगत आहेत. अध्यक्षापेक्षा याचीच ओळख जगाला अधिक आहे. चौ-एन-लाय व नेहरू यांची भारतातील राजकीय स्वरूपाची भेट पाश्चात्त्यांना आव्हानात्मकच होती. इतके तिचे महत्त्व त्या वेळी होते. या ऐतिहासिक भेटीतूनच ‘ पंचशील ’ योजना बाहेर पडली होती. पण हाय ! आज चीनने

पंचशीलची तत्त्वे धुडकावून लावून भारताला दगा दिला आहे, सहजीवनाचे तत्त्व त्याने उधळून लावले आहे.

पंडित नेहरूंनी साम्यवादी चीनला भेट देऊन तेथील सामाजिक व राजकीय स्थित्यंतरे आणि घडामोडी यांचे चिंतन केले. पण पंडितजी म्हणतात, " ... चीनमध्ये असताना आमचा देश कमी प्रतीचा आहे हे मला **कधीही वाटले नाही**...माझ्या देशातील पुष्कळ गोष्टींबद्दल मला अभिमान वाटतो. ... जर तुम्ही अत्याचारी व विध्वंसक उपाय योजले तर तुमचा दर्जा खाली जातो; आजच्यापेक्षाही खाली जाईल...म्हणून मी कम्युनिस्टांचा मार्ग अव्यवहार्य म्हणून टाकून देतो !... "

साम्यवादी चीनमध्ये स्त्रियांनी आपल्या कर्तृत्वाने मानाचे स्थान मिळविले आहे. पुरुषांच्या बरोबरीने त्या राजकीय व औद्योगिक क्षेत्रांत चमकत आहेत. स्त्रिया स्वत: शिक्षणसंस्था, कारखाने, गिरण्या, दुकाने चालवीत आहेत. आगबोटी चालविणाऱ्या कर्णधार महिला आहेत, तशा आगगाड्या चालविणाऱ्या एंजिन-ड्रायव्हरही आहेत ! निरनिराळ्या प्रकारचे यांत्रिक व तांत्रिक शिक्षण घेण्याची त्यांची जिद्द कौतुकास्पद आहे. स्त्रियांनी चालविलेली पहिली गाडी पाहण्याकरिता स्टेशनकडे लोकांची रीघ लागली होती. या प्रसंगी महिला संघटनेच्या अध्यक्षा उद्गारल्या, ' आजचा दिवस इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल...स्त्रिया प्रथमच आगगाडी चालविणार आहेत...हे फक्त नव्या चीनमध्येच होऊ शकेल... '

चीनमध्ये क्रांती होण्यापूर्वी तेथील जनता बेबंदशाहीमुळे गांजून गेली होती, त्रस्त होऊन गेली होती. क्रांतीनंतर मात्र सामान्य जनतेने सुटकेचे नि:श्वास सोडले. नव्या राजवटीचे तिने निष्ठेने स्वागत केले. गरीब जनतेला कष्टाचे काही वाटत नाही, कष्ट खूप करण्याची त्यांची तयारी असते; पण अन्न–वस्त्र–आसरा निर्वेधपणे मिळावा एवढीच त्यांची अपेक्षा असते. नव्या राजवटीने या गोष्टी गांजलेल्या जनतेला दिल्या, जनता सुखी झाली.

चीनमध्ये भिकारी दिसत नाही ! सर्वांना त्यांच्या कुवतीनुसार कामधंदा पुरविला गेला आहे. शेकडो मूलोद्योगांची कल्पना कार्यवाहीत आणून फुकट जाणाऱ्या मानवी शक्तीचा भरपूर उपयोग करून घेण्यात आल्यामुळे उत्पादनवाढीला चांगली मदत झाली आहे.

आणखी एका गोष्टीचा आवर्जून विचार केला पाहिजे. पूर्वी चीनमध्ये वेश्यांची वस्ती ठिकठिकाणी असे. बिचाऱ्या बायकांची खरेदी-विक्री होण्याचे बाजार चालत ! आता नव्या राजवटीत कायद्याने ते बंद करण्यात आले आहेत. नव्या समाजरचनेमुळे चीनचा आज संपूर्णपणे कायापालट झालेला दिसून येतो. विशेषतः खालच्या वर्गातील सारी जनता विधायक कार्यात काया-वाचा-मनाने मग्न झालेली आहे. यामुळे चिनी जनतेची नैतिक पातळी उंचावलेली दिसते.

शेतकरी-वर्ग हा चीनचा कणा. शेतकरी निश्चित, कर्जमुक्त आणि सुखी तर देश ताठ उभा ! साम्यवादी चीनने साम्यवादी तत्त्वांवर जमिनीची विभागणी करून सामुदायिक शेतीची यशस्वी योजना आखून उत्पादन वाढविले. शेतकरी सावकारी पाशातून मुक्त झाला, त्याला आवश्यक धान्य मिळू लागले. सत्ता प्राप्त होताच चीनने ही क्रांती प्रथम केली.

चीनमध्ये साम्यवादी लोकांनी शस्त्राच्या जोरावर जी मोठी क्रांती घडवून आणली (सन १९४९) तिला रशियाचे मार्गदर्शन पूर्णपणे लाभले होते. रशियाने चीनला आर्थिक मदत तर खूप केलीच, शिवाय यंत्रज्ञ व तंत्रज्ञ मोठ्या संख्येने पुरविले. शेकडो गिरण्या व कारखाने उभारण्यास तसेच राज्यघटना तयार करण्यास रशियाची भरीव मदत झालेली आहे. याबाबत चीन रशियाविषयी कृतज्ञता व्यक्त करीत होता. पण आज (सन १९६६–६७) केवळ तात्त्विक विरोधामुळे रशियावर कडक आणि बोचक टीका करण्यास चीन उद्युक्त झाला आहे. रशिया मात्र अजून तरी आत्मसंयमन करण्याचा शक्यतो प्रयत्न करीत आहे.

चिनी प्रवाश्यांनी हिंदुस्थानात प्रवास करून ठिकठिकाणची सुरस वर्णने आणि इतिहास लिहून ठेवला आहे. इतिहासलेखकांना त्या वृत्तान्तांचा चांगला उपयोग झाला आहे. फा हॅन इ. स. ३९९ मध्ये हिंदुस्थानात आला आणि १२–१३ वर्षे उत्तर हिंदुस्थानात हिंडला होता. हुएनचांग सन ६२९ ते ६४५ म्हणजे सोळा वर्षे उत्तर व दक्षिण हिंदुस्थानात फिरला आणि त्याने सूक्ष्म निरीक्षण करून कित्येक गोष्टींचे यथार्थ वर्णन लिहून ठेवले. हा स्वतः विद्वान होता. परत जाताना त्याने शेकडो धर्मग्रंथ व बौद्ध पंडित आपल्याबरोबर नेले होते. इट्सिंग हा ६७१ ते ६९५

पर्यंत म्हणजे २५ वर्षे भारतात होता. याने भारतातील नालंद विद्यापीठात बौद्ध धर्माचे अध्ययन करून परत जाताना त्याने ४०० संस्कृत ग्रंथ बरोबर नेले होते !

शिक्षितांचे ' पुनर्शिक्षण ' म्हणजे त्यांच्यावरील नवे संस्कार. राज्यक्रान्ती आणि त्यानुसार नव्याने तयार केलेली राज्यघटना, नवीन राजकीय विचारसरणी, साम्यवादावर उभारलेली समाजरचना इ. विषयांचे ज्ञान व त्यांतील तत्त्वे शिक्षितांना समजावून देण्याकरिता अनेक शिक्षण-केंद्रे नव्या चीनमध्ये स्थापण्यात आली. पूर्वीच्या शिक्षणाने घडलेल्या मानसिक घडणीचे नूतनीकरण करण्याकरिता ' बौद्धिकां 'ची जरुरी आहेच. माध्यामिक आणि उच्च शिक्षणाच्या संस्था, विद्यापीठे, महाविद्यालये तसेच कामगारांच्या, तरुणांच्या संघटना इ. ठिकाणी नियमितपणे बौद्धिकांची सोय करण्यात आली.

नव्या चीनला विवाहविषयक नवा कायदा करावा लागला. पूर्वी वधू-वरांना कोणत्याच बाबतीत स्वातंत्र्य नव्हते. बहुपत्नीकत्व रूढ होते, विधवा-विवाह, काडीमोड यांना मान्यता नव्हती. नव्या कायद्यातील कलमे— (१) दोघांना निवडीबाबत पूर्ण मोकळीक, (२) आवडीनुसार कोणत्याही क्षेत्रात काम करण्याची मोकळीक. (३) काडीमोड घेण्याचा दोघांना हक्क व जरूर वाटल्यास पुन्हा वैवाहिक जीवन सुरू करण्याची सवलत. (४) मुलीचे वय १८ व पुरुषाचे वय २० ही लग्नाची मर्यादा ठरविण्यात आली. (५) कौटुंबिक संपत्तीवर दोघांचा सारखाच हक्क.

बहुपत्नीकत्वाची एक अजब तऱ्हा चीनमध्ये होती. तिला चिनी भाषेत ' चिएन तिओ ' असे नाव आहे. एकच मनुष्य अनेक कुटुंबांत दत्तक म्हणून जातो !! अर्थात त्या कुटुंबात संततीकरिता म्हणून या दत्तकाला जितक्या कुटुंबांत दत्तक गेला असेल तितक्या बायका त्याला कराव्याच लागत !!! असा प्रकार बहुधा अन्यत्र कोठेच आढळत नसेल. खरोखर धन्य आहे कल्पकतेची !

साम्यवादी चीनमध्ये प्रवास आणि स्थित्यंतराचे प्रत्यक्ष निरीक्षण करून आलेल्या थोर लोकांनी पुढील माहिती सांगितली––

(१) जमिनीचे वाटप योग्य तऱ्हेने होऊन कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळतो. अन्न-वस्त्राची त्यांना विवंचना नाही. (२) हजारो भिकाऱ्यांना कामधंदा देण्यात आल्याने चीनमध्ये भिकारी नाही. त्यांची लाचारी थांबून समाजाचे ते उपयुक्त घटक बनले. (३) स्त्रियांची विटंबना कायद्याने थांबली. वेश्यागृहांचे ९० टक्के उच्चाटन झाले. (४) कौटुंबिक स्त्रियांची व मुलींची कुचंबणा थांबली. (५) आर्थिक विषमता कमी होण्याच्या दृष्टीने क्रांतिकारक बदल झालेले दिसले. पगाराचे धोरण दोन पद्धतींनी—चलनी नाण्यांत किंवा अन्नवस्त्रादी नित्याच्या गरजांच्या स्वरूपात. पगारांच्या प्रमाणात शक्य तितका समतोलपणा. जास्तीत जास्त पगार ७०० रुपये ! माओ त्से तुंग यांचा पगार सुमारे सातशेच रुपये ! ! (६) पोषाखातील क्रान्ती—सर्वांचा पोषाख निळ्या रंगाच्या साध्या कापडाचा. उच्च पदस्थ व कनिष्ठ नोकर पोषाखावरून ओळखणे कठीण ! (७) चीनमध्ये मोटारींचे प्रमाण फारच कमी. मोठेमोठे अधिकारी रिक्शांमधून जा-ये करतात. रिक्शा भरपूर. (८) प्रत्येकाला धर्माप्रमाणे वागण्याची मोकळीक. राज्यघटनेत धर्माला स्थान नाही.

शांघाय हे चीनचे मुख्य औद्योगिक आणि व्यापारी ठिकाण व बंदर, पण या गजबजलेल्या शहरावर तहान्वये आधिपत्य परक्यांचे ! कित्येक वर्षे येथील परक्यांच्या सुखसोयींकरिता म्हणून मोठमोठाली उपाहारगृहे, अभ्यागतगृहे तसेच जुगारीचे अड्डे, वेश्यागृहे इ. करमणुकीच्या साधनांनी गजबलेले हे शहर असे. परक्या श्रीमान लोकांच्या चैनीचे हे शहर. इतकेच नव्हे तर येथील टेलीफोन, वीज, ट्रामगाड्या, बसगाड्या परक्यांच्या मालकीच्या ! शांघायमधील काही भागात तर चिन्यांना मज्जाव ! ! शांघायला परके लोक ‘ पूर्वेकडील पॅरिस ’ म्हणत. पण १९४९ नंतर नव्या चीनने एका रात्रीत ७०० पैकी २०० उपाहारगृहे तडकाफडकी बंद करून टाकली ! १७७ पैकी १६६ सोन्या-चांदीच्या व्यापाऱ्यांना धंदा बंद करावयास लावला ! परक्या जहाजांना बंदरातून हाकून लावण्यात आले ! अशा रीतीने नव्या चीनने शांघायमधील शिरजोर समाज ढवळून काढला आणि परक्यांचे प्रस्थ पार मोडून काढले.

• • •

४. नेपाळी लोक

गुरख्यांचे नाव तुम्ही ऐकले असेल, त्यांना कदाचित पाहिलेही असेल. या गुरख्यांचा देश नेपाळ. हा देश आपल्या भारताच्या उत्तर सरहद्दीवर आहे. याचे वैशिष्ट्य असे की, याचा भूप्रदेश सर्वश्रेष्ठ अशा हिमालयाच्या उतरणीवर असून डोंगर-दऱ्या यांनी व्याप्त असा आहे. उंचीवरून सपाटीकडे वेगाने धावणाऱ्या नद्या आणि प्रचंड धबधबे यांचे येथे वैपुल्य आढळून येते. वीजनिर्मितीकडे यांचा उपयोग करून घेण्यात आला आहे. नेपाळातील मोठमोठे पहाड, बर्फाच्छादित शिखरे, नद्यांची खोरी, अरण्ये व सुपीक दऱ्या इत्यादींनी नेपाळच्या सृष्टिसौंदर्यात चांगलीच भर घातली आहे. नेपाळला आणखी भूषणभूत गोष्ट म्हणजे हिमालयाची बर्फाच्छादित उत्तुंग शिखरे ! जगातील सर्वांत उंच गिरिशिखर मौंट एव्हरेस्ट हे नेपाळच्या उत्तर सरहद्दीवर असून जगातील गिर्यारोहकांचे ते आकर्षण बनले आहे.

नेपाळमधील ' तराई ' हा एक दलदलीचा प्रदेश असून तेथे गवत खूप उंच म्हणजे १२-१५ फुटांपर्यंत वाढते ! या गवताळ प्रदेशात हत्तींचे कळप सहज गडप होतात. येथील हत्तींना गोळी घालून ठार न मारता त्यांना पकडावे असा नियम आहे. येथील जंगलही खूप दाट असून सिंहासारख्या वन्य पशूंचे ते वसतिस्थान आहे. अर्थात हे दोन्ही विभाग मनुष्यवस्तीस निरुपयोगी आहेत. या तराईच्या भागातून जाताना प्रवाश्यांकरिता दर दोन मैलांवर पाण्याचे हौद बांधलेले आहेत. तराईच्या भागातून नेपाळात धान्य वगैरे नेण्यासाठी वाटेतल्या पहाडी मुलखात आकाशगामी रज्जुमार्ग (Aerial Rope-way) तयार करण्यात आले आहेत.

हिंदू राजा असलेले संपूर्ण स्वतंत्र राज्य म्हणजे नेपाळ. याचा प्राचीन इतिहास फारसा उपलब्ध नाही, तरी पण लिच्छवी व मल्ल या राजवंशांतील राजांनी अनेक शतके नेपाळवर राज्य केले आणि त्यानंतर गुरखे राजे आले. आजही गुरख्यांचाच राजा तेथे राज्य करीत आहे.

गुरखा हा नेपाळातील एक जिल्हा आहे. येथे राहणाऱ्यांना गुरखे म्हणतात. हे गुरखे लोक रजपूत लोकांचे वंशज मानण्यात येतात. पूर्वी मुसलमानांनी राजस्थानमधील अनेक संस्थाने खालसा करण्याच्या उद्देशाने त्यांवर स्वाऱ्या करून राजपुतांचा छळवाद मांडला. तेव्हा तेथील काही राजपूत लोक या छळाला कंटाळून दूरच्या नेपाळमधील गुरखा प्रांतासारख्या डोंगराळ भागाच्या आश्रयाला जाऊन राहिले. हे अर्थात पुढे गुरखेच झाले. पण यांच्यात राजपूत वीरांचे रक्त होते. या गुरखे लोकांचा एक सरदार नरभूपाल याने नेपाळ देश आक्रमण केला, पण काही भागात त्याला माघार घ्यावी लागली. याचा महत्त्वाकांक्षी मुलगा पृथ्वीनारायण याने काही संस्थानांतील मल्ल राजांचा उच्छेद करून सबंध देशाची राजसत्ता आपल्या हाती घेतली आणि नेपाळच्या सिंहासनावर तो अधिष्ठित झाला. हेच गुरखे घराणे अद्याप तेथे राज्य करीत आहे.

गुरखा शब्दाची व्युत्पत्ती गोरक्षक या शब्दापासून झाली असावी, असे मानतात. गोरक्षक म्हणजे गायीचे रक्षण करणारा. नेपाळमध्ये गाय ही अतिशय पवित्र मानली गेली आहे. तिच्या हत्येला येथे सक्त मनाई आहे. हत्या करणारास देहान्ताची शिक्षा देत. दुसरी व्युत्पत्ती नेपाळमधील गोरखनाथ या साधूच्या नावावरून लावतात. नेपाळातील गुरखा नावाच्या जिल्ह्याचे मुख्य शहर गुरखा हेच आहे.

नेपाळातून तिबेटात जाण्याकरिता जे मार्ग म्हणजे खिंडी किंवा घाट आहेत ते अतिशय उंचीवरचे असून तेथे दळणवळण फार कष्टाचे असते. हे मार्ग बहुधा बर्फाने आच्छादलेले असतात. या घाटांच्या तोंडाशी या दोन देशांत व्यापार चालतो. नेवारी जातीचे लोक व्यापारी कामात अधिक वाकबगार आहेत.

नेवारी लोक लोखंड, तांबे, पितळ व कासे यांची भांडी करतात. भांडी तयार करण्याचे पुष्कळ कारखाने असून तेथे मोठमोठ्या घंटाही तयार करतात. येथे एक प्रकारच्या वृक्षाच्या सालीपासून कागद तयार करतात. हे कागद मजबूत व टिकाऊ असतात. त्यांचा पुष्कळ कामात उपयोग होतो.

नेपाळच्या डोंगराळ भागात शेतीचे उत्पन्न बेताचेच असणार हे उघड आहे. तरी पण चिंचोळ्या सपाटीच्या सुपीक भागातून तांदुळाचे पीक काढले जाते. येथे पाण्याची कमतरता कधीच नसते. नेपाळातील बहुतके जमिनीत ऋतुपरत्वे तीन पेरण्या करतात आणि विविध उत्पन्ने काढतात. तांदुळाच्या खालोखाल गहू, ऊस, कापूस, अफू, तंबाखू यांची पिके काढली जातात. तसेच पहाडी प्रदेशात फळफळावळ आणि भाजीपाला भरपूर होतो. जंगल भागातील वृक्षांची विविधता असून देवदार वृक्षाला व्यापारी महत्त्व विशेष आहे.

नेपाळातील सर्व लोकांचे मुख्य अन्न तांदूळ. ब्राह्मणांशिवाय येथील बहुतेक लोक पक्के मांसाहारी आहेत. हे लोक शिकारीचे मोठे शौकी असून शिकारीत मारलेल्या रानडुकरे, हरणे, ससे इ. प्राण्यांचे मांस मोठ्या आवडीने खातात. कित्येक हौशी लोक रानडुकरांचे बच्चे पाळून त्यांना चांगले खायला-प्यायला घालून धष्टपुष्ट करतात. येथील मगर व गुरंग या अशा जाती आहेत की, त्यांपैकी मगर लोक डुकराचे मांस खातात, पण म्हैस, रेडा यांचे मांस ते खाणार नाहीत. याच्याउलट गुरंग जातीचे लोक रेड्यांच्या मांसाचे फार भोक्ते, पण डुकराच्या मांसाला ते स्पर्शसुद्धा करणार नाहीत ! गरीब लोक मात्र पैशाच्या अभावी मुख्यतः शाकाहारी आहेत.

नेवारी लोक पक्के दारूबाज आहेत. गहू व तांदूळ यांपासून ते दारू तयार करतात, हिला ' रुक्सी ' म्हणतात. ही फारशी मादक नसते. सामान्य लोकांचे हे आवडते पेय आहे. हे पेय ते घरी तयार करतात. पण विशेष म्हणजे उच्चवर्णीय लोक दारूला स्पर्शसुद्धा करत नाहीत ! आणि एखादा जर मद्यपान करून रस्त्यात पडलेला आढळला तर त्यास जातिबहिष्कृत करण्यात येते ! अलीकडे मात्र इंग्रजी सुधारणा येथे प्रसृत होण्याबरोबर व्हिस्की, ब्रँडी, शाम्पेन इ. मादक पेयांचा प्रसार होत आहे.

सामान्यपणे सर्व नेपाळी लोक चहा पितात. पण यांचा चहा आपल्या-पेक्षा पुष्कळच वेगळ्या प्रकारचा असतो. हे तिबेटातून चहा आणतात. यांच्यांत चहाचे दोन प्रकार आहेत. एक प्रकार—दालचिनी, लिंबाचा रस व इतर मसाल्याचे पदार्थ घालून चहा उकळावयाचा ! दुसरा प्रकार—

चहा चांगला उकळून त्यात साखर व तूप घालून मग तो पितात! तिसरा प्रकार म्हणजे हे लोक चहाचे एक विशिष्ट पक्कान्नही करतात! आपल्याला यांपैकी कोणताच प्रकार आवडणार नाही.

नेपाळी लोकांत अनेक स्त्रियांशी लग्न करण्याची सर्रास चाल आहे, एवढेच नव्हे तर ती एक भूषणाची आणि प्रतिष्ठेची गोष्ट समजतात! श्रीमंत लोकांच्या कित्येक बायका असतात; पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे येथे विधवाविवाह मात्र होत नाहीत. सतीची चाल या देशात होती, पण त्यावर अधिकाधिक बंधने घालून तिचे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न झाला, उदा. ज्या स्त्रीस मुलगा असेल तिला सती जाण्यास बंदी असे. पण पुढे ही चाल अजिबात बंद झाली.

गुरखे लोकांत बायकोच्या चालचलणुकीसंबंधी संशय आला तर तिला भयंकर शासन भोगावे लागते. तसेच बाहेरख्याली पुरुष जर स्त्रीच्या पातिव्रत्याचा भंग करील तर अशा माणसाला पकडून आणून त्या स्त्रीचा नवरा आपल्या कुकरीने त्याला छाटून टाकतो! व्यभिचारामुळे आपल्या समाजाची फार अवनती होत आहे, हे पाहून जंगबहादूरने याबाबत कडक कायदे केले.

नेवारी लोकांची विवाहपद्धती गुरखे लोकांच्याहून अगदी भिन्न आहे. यांच्या पद्धतीनुसार बाल्यावस्थेत असतानाच मुलीचा श्रीफळाबरोबर विवाह लावला जातो! या पद्धतीमुळे त्यांच्यात स्त्रीला वैधव्य कधीच येत नाही आणि कुंकू पुसावे लागत नाही! मुलगी वयात आल्यानंतर तिची वडील माणसे एखादा चांगला वर शोधून काढून तिचे त्याच्याशी लग्न लावून देतात. पण या नवरा-बायकोचे पुढे पटत नसल्यास स्त्रीला काडीमोड करून घेता येतो. काडीमोड पद्धत मात्र मजेशीर आहे. वधू आपल्या नवऱ्याच्या उशीखाली एक सुपारी ठेवून त्याला सोडचिठ्ठी देते आणि निघून जाते! या पद्धतीत अलीकडे कायद्याने सुधारणा करून काडीमोडीची पद्धत इतकी सोपी ठेवली नाही.

नेपाळ देश अनेक छोट्या-मोठ्या डोंगरांच्या ओळींनी विभागला गेला असल्याने येथील डोंगरभागात अनेक पहाडी जातीचे लोक राहतात. हेच नेपाळातील मूळचे रहिवासी. यांच्या जाती अनेक असल्या तरी त्यांतील

पुढील जाती प्रमुख होत—नेवार लोक, मगर, गुरंग तसेच लिम्बू, किराती, लेप्चा इ. आणि राजपुतान्यातून येथे येऊन राहिलेले गुरखे लोक. या गुरखे लोकांचा जो ब्राह्मण उपाध्याय त्याला सर्व जातींत मोठा मान असतो. या सर्व जातींत गुरखे लोक श्रेष्ठ समजले जातात. या देशात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार वर्णांचे लोक आहेत. येथे ब्राह्मणांना मोठा मान आहे. यांना शिरच्छेदाची शिक्षा माफ असते. यांना भयंकर गुन्ह्याची शिक्षा म्हणजे जन्मभर कारावासाची.

नेपाळी लोकांच्या पोषाखपद्धतीत रंगांचे वैशिष्ट्य आहे. नीटनेटकेपणात गुरखा लोकांची प्रसिद्धी आहे. यांचा नेहमीचा पोशाख म्हणजे अंगात निळ्या रंगाचे कुडते, कमरेखाली निळ्या रंगाचा पायजमा आणि निळे शिरस्त्राण! कमरेभोवती कित्येक हात लांबीचा निळा कमरबंध गुंडाळून त्यात एक खंजीरवजा हत्यार लटकावून दिलेले असते. या खंजिरास नेपाळात ‘कुकरी’ म्हणतात. थंडीच्या दिवसांतही गुरखे लोक हेच कपडे घालतात, परंतु त्यांच्या आतील बाजूने कापूस लावून घेतलेला असतो! श्रीमंत लोक पायजम्याचा आतील भाग बकऱ्याच्या केसांनी मढवून घेतात! आणि डोक्याला चित्रविचित्र रंगाचे कापड घेऊन त्याच्या तुकड्यांची टोपी बनवून ती घालतात!



नेवारी लोक धोतर नेसतात किंवा विजारीही घालतात. थंडीच्या दिवसांत जाड सुताचे किंवा लोकरीचे पायजमे घालतात.

येथील सर्व जातीच्या स्त्रिया एक प्रकारचा चुण्या पाडलेला घागरा वापरतात. याचा पुढील भाग जमिनीवर लोळण्याइतका लांब असतो, मागचा त्या मानाने आखूड. राजघराण्यातील किंवा श्रीमंत बायकांच्या घागऱ्याला ६०–७० गज लांबीचे कापड लागते! यांना दागिन्यांची

तशीच फुलांची फार आवड असते. सुवासिक फुलांचा यांना फार षोक. सणावारी ह्या स्त्रिया इतकी फुले घालतात की, डोक्यावर एखादे फुलझाड फुलले आहे की काय असा भास होतो !

नेपाळच्या राजघराण्यातील लोकांचा पोषाख भारी किमतीचा आणि मौल्यवान असतो. पोषाख भारी रेशमी कापडाचा असून हिरे व मोती यांची त्यावर जडण असते ! प्रत्येकाने तलवार धारण केलीच पाहिजे असा नियम आहे. नेपाळचे माजी पराक्रमी प्रधान राणा जंगबहादूर यांच्या मुगुटाची किंमत दीड लाख रुपये होती !

येथील सैन्यात गुरखे लोकांचा भरणा अधिक आहे, शौर्य, शिस्त आणि पराक्रम यांविषयी त्यांची जगभर ख्याती आहे. गुरखा पलटणींनी आपल्या शौर्याची आणि पराक्रमाची प्रचीती अनेक वेळा आणून दिली आहे. नेपाळी सैन्याने इंग्रजांना साहाय्य केल्याबद्दल इंग्रज सरकारने काही डोंगरी तोफा मित्रत्वाचे चिन्ह म्हणून नेपाळ सरकारला बहाल केल्या आहेत.

नेपाळात म्हणजे आपल्या देशाच्या उत्तर सीमेवरील देशात गुलामांची चाल होती हे वाचून तुम्हांला आश्चर्य वाटेल, पण वस्तुस्थिती तशी होती. मध्यमवर्गीय लोक घरकामासाठी पैसे देऊन दास-दासी विकत घेत ! त्यांची किंमत १५० ते २०० रुपयांपर्यंत असे. हे जरी गुलाम असले तरी आफ्रिकेतील गुलामांप्रमाणे यांचा छळ होत नसे, एवढेच नव्हे तर त्यांना प्रेमाने वागविण्यात येई. नेपाळचे मुख्य प्रधान सर चंद्र समशेर जंग यांनी ज्या काही सुधारणा अमलात आणल्या त्यांत गुलामगिरीचा नायनाट ही एक महत्त्वाची होती. मुक्त झालेल्या गुलामांच्या उन्नतीसाठी त्यांनी कायदे केले.

येथील लोकांची देवादिकांवर अलोट भक्ती असल्याने तेथे असंख्य देवालये आहेत. त्यामुळे यात्रांची व उत्सवांची संख्याही तशीच मोठी असते. त्यांतील काही महत्त्वाचे उत्सव–(१) मत्स्येंद्रनाथ ही नेपाळची राष्ट्रदेवता गणली आहे. हिचे मोठे देवालय भोगमती या ठिकाणी असून त्यात महादेवाचे लिंग आहे. नेपाळी वर्षाच्या पहिल्या दिवशी म्हणजे वैशाख शु. प्रतिपदेस याचा उत्सव सुरू होतो. या दिवशी नेपाळच्या राजाची तरवार देवाच्या पायपाशी ठेवून देवाची पूजा करतात नंतर शृंगारलेल्या रथातून

देवाच्या मूर्तीची मिरवणूक काढतात. ही मूर्ती एका कांबळ्यात गुंडाळलेली असून लोकांच्या दर्शनार्थ ते कांबळे ठिकठिकाणी बाजूला करतात. यातील उद्देश एवढाच की, देव जसा एका कांबळ्यावर संतुष्ट राहतो तसे लोकांनीही मिळेल त्यात संतुष्ट राहावे हा असतो. या उत्सवाला 'गुडदी झाडा' असे म्हणतात. (२) वज्रयोगिनी यात्रा– या देवीची मूर्ती एका खाटेवर ठेवून तिची मिरवणूक काढतात. ही मुख्यतः बौद्धधर्मीय लोकांकडून साजरी केली जाते. (३) बोन्राह किंवा बांडा यात्रा– बौद्धधर्मीय नेवार जातीचे पुरोहित श्रावण शु. ८ व भाद्रपद शु. १३ या दोन दिवशी यजमानांच्या घरी भिक्षेस जातात. या पुरोहित लोकांचे वंशज आपला निर्वाह भिक्षावृत्तीवर चालवीत याच्या स्मृत्यर्थ हे पुरोहित भिक्षावृत्तीचे अवलंबन करतात ! या दोन दिवसांची त्यांची भिक्षा वर्षभर पुरण्याइतकी भरते ! ! (४) नागपंचमी– नाग आणि गरुड यांच्या युद्धाचे स्मारक म्हणून हा सण साजरा करतात. (५) इंद्रयात्रा– हा उत्सव भाद्रपद व. ११ पासून आठ दिवस चालू असतो. गुरखे लोकांचा राजा पृथ्वीनारायण याने काटमांडू शहरात आपल्या सैन्यासह याच दिवशी प्रवेश केला आणि गादी बळकावली. (६) किचापूजा– हा नेवारी लोकांचा सण. कार्तिक व. १ ला सर्व नेवारी लोक कुत्र्यांची पूजा करतात ! त्यांना फुलांच्या माळा घालतात ! तसेच दुर्गापूजा, रथयात्रा, भाईपूजा (भाऊबीज), पिशाच चतुर्दशी इ. अनेक सण व उत्सव साजरे करून खाद्यपदार्थांवर ताव मारण्यात आणि मुख्यतः नाचरंग आणि मद्यपान करण्यात हे लोक दंग असतात.

इंग्रजांबरोबर झालेल्या लढाईमुळे तहाच्या अटीनुसार (सन १८१६) इंग्रजांच्या 'रेसिडेंट'ला काटमांडू येथे राहू देण्याची अट नेपाळला मान्य करावी लागली. अशा रीतीने इंग्रजांचा शिरकाव नेपाळात झाला. पुढील काळात एक अल्पवयी राजा गादीवर आला असताना सेनापती भीमसेन थापा हा प्रधान होता आणि ह्याच्याच वेळेपासून खरी राजसत्ता प्रधानाच्या हाती जाण्यास सुरुवात झाली. राजा नामधारी बनला आणि हीच प्रथा सुरू होऊन ती आजतागायत चालू आहे. भीमसेन थापा या मुख्य प्रधानाच्या हाती सर्व राज्यसूत्रे वीस वर्षे होती ! या प्रधानकीच्या जागेचे

वैशिष्ट्य असे की, मुख्य प्रधानाची गादी एकाच कुटुंबात वंशपरंपरेने चालत असते ! आणखी विशेष म्हणजे सैन्यातील सर्वश्रेष्ठ अधिकारी मुख्य प्रधानाच्याच कुटुंबातील असतात ! !

पुढे मध्यंतरी काही कारस्थाने होऊन सर जंगबहाद्दर याने राजसत्ता आपल्या हाती घेतली. इंग्लंडात जाणारा हाच पहिला नेपाळी होय. याने इंग्रजास मदत करून त्यांची मैत्री संपादन केली. याचे पारितोषिक म्हणून इंग्रजांनी तराईचा बराच मोठा भाग नेपाळ सरकारास परत केला.

नेपाळात मुख्य प्रधानाच्या हाती ' करीन ती पूर्व ' अशी सर्व सत्ता ! राजसत्ता नामधारी का होईना सिंहासनावरील राजास मोठा मान दिला जातो, नाणीही त्याच्याच नावाने पाडली जातात. नेपाळच्या महाराजास ' हिज मॅजेस्टी ' ही संपूर्ण स्वातंत्र्यसूचक अशी सर्वश्रेष्ठ सन्मानसूचक पदवी असून तिला साजेशी २१ तोफांची सलामी देण्यात येते. मोठमोठ्या व्यक्तींच्या आगमनाची सूचना देण्याची पद्धत खरोखरच आपल्याला अभिनव वाटेल. बँडवर वाजविलेल्या निरनिराळ्या रागांतील सुरावटींवरून कोणती व्यक्ती येत आहे हे समजू शकते ! व्यक्तिसूचक सलामीची अशा तऱ्हेची ही पद्धती अन्यत्र क्वचितच आढळेल.

नेपाळची राजधानी काटमांडू शहर याची रचना खड्गाकार आहे. याचे पूर्वीचे नाव मंजुश्री देवाने वसविले म्हणून ' मंजुपट्टण ' होते असे म्हणतात. पण जुन्या हस्तलिखितांवरून त्याचे प्राचीन नाव कान्तिपूर असेही समजतात. या शहरातील मुख्य राजवाड्यासमोर जी जुनी लाकडाची घरे होती त्यास नेवारी लोक ' काष्ठमंडप ' असे म्हणत. याचे रूपान्तर काटमांडूत झाले. या शहराला पूर्वकाळी ३२ वेशी होत्या ! या वेशींना लागून वसलेल्या ३२ पेठा मात्र अद्याप जशाच्या तशाच आहेत. तेथील सैन्याच्या कवायतीच्या मोठ्या मैदानात सर जंगबहादूर यांची सोन्याचा मुलामा चढविलेली मूर्ती आहे. भीमसेन थापा या एका पूर्वकालीन सेनापतीने ' थरारा ' या नावाचा एक उंच दगडी खांब उभारला आहे. याची उंची २५० फूट असून वर शिखरावर जाण्यास आतून जिना आहे.

कीर्तिपूर हे एके काळचे राजधानीचे शहर. येथील किल्ला दुर्भेद्य आहे. हा किल्ला सर करण्यास लोकांनी तीव्र विरोध केल्यामुळे राजा पृथ्वी-

नारायण याने विश्वासघाताने हा किल्ला व शहर हस्तगत करून तेथील सर्व लोकांना त्यांची नाके कापण्याची शिक्षा दिली; व ती तात्रडतोब अमलात आणली ! तीस वर्षांनंतर नाक कापलेले कित्येक लोक एका इंग्रजी योद्ध्याने पाहिले असे त्याने लिहून ठेवले आहे. या घटनेवरूनच या शहराला ' नासकाटापूर ' असेही म्हणतात !

नेपाळातील पशुपती व गोकर्ण ही प्रसिद्ध तीर्थक्षेत्रे असून आपल्या देशातील लोक फार पूर्वीपासून येथील यात्रा करीत आहेत. पशुपतिनाथाच्या मंदिरात चतुर्मुख शिवलिंग असून शिवरात्रीला येथे मोठी यात्रा भरते. भारताच्या सर्व भागांतून हजारो लोक येथे जमा होतात.

हिंदू व बौद्ध या दोन्ही धर्मांचे लोक नेपाळात आहेत. पण हे दोन्ही लोक एकमेकांचे आचारविचार पाळतात. बरेच नेवारी व सर्व गुरखे हिंदू आहेत. हिंदुस्थानातील बिहार, बंगाल प्रांतांतील बौद्ध लोक मुसलमानांच्या उच्छेदाला कंटाळून नेपाळमध्ये आले आणि येथे त्यांनी सुखाने वास्तव्य केले. यांनी येथे पुष्कळ मठ बांधले. एकट्या काटमांडूत ३०० हून आधिक मठ आहेत ! हिंदूंत जसे ब्राह्मण श्रेष्ठ तसे बौद्धांत ' बांडे ' श्रेष्ठ गणले जातात. नेपाळी लोक स्वभावतःच फार धार्मिक प्रवृत्तीचे आहेत. या लोकांचा ब्राह्मणांवर फार विश्वास आणि भक्ती. कोणावर काही संकट आले किंवा कोणी आजारी पडला तर त्या वेळी ब्राह्मणभोजन घालण्याची चाल आहे ! येथील पुरोहित किंवा उपाध्याय वर्ग सुखाने उपजीविका करीत आहेत.

प्राचीन काळी नेपाळात क्षुल्लक अपराधाबद्दल माणसास त्याचे हात, पाय, नाक, कान इ. अवयव कापून टाकण्याची कडक शिक्षा दिली जाई. पण पुढे या कडक शिक्षांचे कायदे रद्द करण्यात आले. गाय व मनुष्य यांची हत्या करणारांना शिरच्छेदाची शिक्षा ठेवली होती, पण आता त्याऐवजी कडक शिक्षा मात्र ठेवली आहे. फाशीच्या शिक्षेतून फक्त ब्राह्मण व स्त्रिया यांचा अपवाद केला आहे ! ब्राह्मणांना तुरुंगवास घडला तर त्यांना जात व जातिगौरव यांना मुकावे लागते.

' पर्वतीय ' ही नेपाळातील लोकांची मातृभाषा, सरकारी कामकाज याच भाषेतून चालते. येथील मूळचे रहिवासी नेवारी भाषा बोलतात. या भाषेचे तिबेटी भाषेशी बरेच साम्य असल्याने हे मूळचे नेवारी मंगोलियन

वंशातील असावेत असा तर्क करण्यात येतो या दोन प्रमुख भाषांशिवाय आणखीही अनेक भाषा प्रचारात आहेत, त्यांपैकी काही–तिबेटी, सेर्पा, गुरंग, मगार इ.

जगात गिर्यारोहक म्हणून ज्याने नाव कमावले त्या शेर्पा तेनसिंग नोर्के याने २९ मे १९५३ रोजी जगातील अत्युच्च शिखर जे मौंट एव्हरेस्ट ह्यावर नेपाळ व भारत या देशांचे ध्वज फडकवून फार मोठा पराक्रम केला. नेपाळच्या महाराजांनी त्याला 'नेपाळ तारा' ही पदवी आणि १०,००० रुपयांचे पारितोषिक देऊन गौरव केला. भारत सरकारनेही सुवर्णपदक देऊन त्याचा मोठा मान केला.

● ● ●

५. तिबेटी लोक

तिबेट हा एक जगातील अपूर्व देश आहे. हा सर्व पठारी प्रदेश असून त्याची उंची १६,५०० फूट म्हणजे ४ सह्याद्री एकावर एक उभे केले असता जेवढी उंची होईल तेवढी आहे ! ह्याच्याइतका उंच देश जगात दुसरा नाही ! म्हणूनच याला जगाच्या छपरावर वसलेला देश असे म्हणतात.

भारतीयांच्या दृष्टीने विचार करता महाभारतात आणि अन्यत्र ज्याची रसभरित वर्णने आढळतात तो कैलास पर्वत आणि मानस सरोवर याच देशात आहेत. भारतीय लोकांना यात्रेच्या निमित्ताने या देशात जावे लागते.

तिबेटला ' भू-लोकींचा स्वर्ग ' असे म्हणतात. तिबेट हा मूळचा आर्य लोकांचा प्रदेश. या देशाचे त्या वेळचे नाव ' त्रिविष्टप ' असे असून त्याचेच पुढे तिबेट हे रूपांतर झाले.

तिबेटचा प्राचीन इतिहास फारसा उपलब्ध नाही. तिबेटी लोक मंगोलियन जातीचे आहेत. हे चिनी लोकांप्रमाणेच दिसतात. ब्रह्मी व आर्य लोकांशी शरीरसंबंध घडल्यामुळे शारीरिक ठेवणीत पुढे थोडा फरक पडत गेला. तिबेटी लोकांची नाके जरा वर उचललेली दिसतात. त्यांचे चेहरे पसरट असून गालांची हाडे वर आलेली असतात. लोकांची उंची फार नसते, पण शरीराने मात्र बळकट आणि दणकट असतात.

मानस सरोवराचे आणि एकंदर भोवतालच्या भागाचे सृष्टिसौंदर्य अत्यंत आल्हाददायक असे आहे. याच सरोवराच्या आसपास राजहंस नावाचे पक्षी पुष्कळ आढळतात. दिसण्यात हे अतिशय सुंदर असून वर्णाने शुभ्र असतात. याच भागातून भारतातील गंगा, सिंधू, सतलज, ब्रह्मपुत्रा, चीन देशातील हो-हँग-हो, यांगत्सिकँग इ. नद्यांचा उगम होऊन त्या मानवी जीवन संपन्न आणि समृद्ध करण्याकरिता त्या त्या देशात वाहतात.

तिबेट हा अगदी जगावेगळा देश आहे असे म्हटले तरी चालेल. कारणे काहीही असोत, परक्यांना विशेषत: पाश्चात्त्य लोकांना तिबेटात येण्यास सक्त मनाई असे. परवानगीशिवाय देशात येण्याचा कायदा कोणी मोडल्यास त्याचे हाल करीत असत. या कायद्यामुळे तिबेटी लोकांत सुधारणेचे वारे शिरणे शक्य नव्हते, त्यामुळे हे लोक अतिशय मागासलेले राहिले.

येथील हवा अतिशय थंड असल्याने डोंगरभाग बर्फाच्छादित असतो. मोठाले वृक्ष येथे नाहीतच. वनस्पतींची विविधता नाही. पाण्याची कमतरता मात्र येथे नाही. ठिकठिकाणी लहान-मोठी सरोवरे आहेत. हिमगिरीच्या पाण्याने ही बनलेली आणि भरलेली असतात. म्हणून याला ' सरोवरांचा प्रदेश ' असे यथार्थतेने म्हटले जाते.

गुरांचे कळप पाळणे हा येथील लोकांचा धंदा. मेंढे, बकरी व याक हे येथील प्राणी. **याक** हा बैलाच्या जातीचा प्राणी असून त्याच्या अंगावर लांब व दाट केस असतात. यामुळे त्याचे कडक थंडीपासून निसर्गत:च संरक्षण होऊ शकते. वाळवंटातील लोकांना जसा उंट तसा या बर्फमय डोंगराळ भागावर याक. तिबेट हेच यांचे घर. डोंगरावरील अडचणीच्या अरुंद मार्गातून हा प्राणी बिनधोकपणे



जाऊ शकतो. याला नदीनाल्यांतून पोहता येते. प्राणी बळकट असल्यामुळे मुख्यत: डोंगराळ भागात वाहतुकीचे एकमेव साधन. ओझे वाहण्यास याचा चांगला उपयोग होतो. हरणे तुम्ही पाहिली असाल, पण तिबेटच्या मृगाचे वैशिष्ट्य म्हणजे हे कस्तुरी मृग असतात. यांचे घ्राणेंद्रिय तीक्ष्ण असून यांच्या अंगावर भरपूर व दाट केस असतात. यांचे कळपच्या कळप हिमालयाच्या चढणीवर आढळतात. नर-मृगांच्या पोटाखाली बेंबीजवळ

पिशवी असते. तीत काळसर, चिकट व सुगंधमय कस्तुरी असते. कस्तुरीचा सुगंध चटकन चोहोकडे दरवळतो.

तिबेट्यांची घरे चिनी किंवा ब्रह्मी लोकांच्या घरांप्रमाणेच असतात. हे बौद्धधर्मीय लोक. बौद्ध मंदिरे येथे पुष्कळ असून लहान गावातही एखादे मंदिर असतेच.

येथील लोकांना कडक थंडीमुळे लोकरीचे कपडे वापरावे लागतात. मेंढ्यांपासून यांना मांसाप्रमाणे लोकरही भरपूर मिळते. केसाळ कातडी शालीसारखी अंगावर गुंडाळतात. सर्व अंग झाकून घेण्याच्या दृष्टीने त्यांचे झगे पायघोळ असतात. एका अंगरख्याने थंडी भागली नाही तर एकावर एक असे अनेक झगे चढवितात ! डोक्यालाही घालण्याकरिता तसल्याच कातड्याची टोपी तयार करतात, वाऱ्याने ती उडून जाऊ नये म्हणून तिला गळ्याखालून बंदांनी बांधून टाकण्याची व्यवस्था असते. कमरेभोवती एक लोकरीचा पट्टा बांधतात व त्यात जरूर त्या वस्तू अडकवून ठेवतात. यांचे बूट पिवळ्या किंवा तांबड्या रंगांच्या कातड्याचे असतात, त्यांनी गुडघ्यापर्यंतचा भाग ते झाकतात.

लहान मुलामुलींना दागिन्यांची आवड असल्यास आश्चर्य नाही. पण मोठे लोक देखील अंगावर दागिने घालतात. गळ्यात मण्यांच्या माळा आणि कानात भिकबाळ्या. यांच्या भिकबाळ्या इतक्या जड असतात की, त्यांचे वजन कानाला झेपावे म्हणून त्यांना दोरी बांधून तिचे एक टोक डोक्यावरील केसात अडकवितात !

येथील शेतीच्या उत्पन्नात सातू हे मुख्य धान्य. त्याच्या खालोखाल शक्य त्या ठिकाणी भात. हे लोक मांस खातात. पण यांचे कसाईखाने गावापासून दूर असतात. प्राण्यांची हत्या अन्यत्र कोठेही करावयाची नाही असा सक्त कायदा आहे. हे बौद्धधर्मीचे लोक यज्ञातील हिंसेप्रमाणे मंत्र वगैरे म्हणून शास्त्रोक्त पद्धतीने प्राण्याला मारतात ! त्याचे मांस पवित्र समजून ते खातात. हे मांसाहारी असल्याने शरीराने बळकट असतात, स्त्रियाही सशक्त असतात.

हे लोक खूप चहा पितात. पण यांचा चहा आपल्या इकडच्याप्रमाणे नसतो. पाण्यात चहा घालून तो दोन तासभर कढवितात, त्यात नंतर मीठ व लोणी घालतात ! नंतर हे मिश्रण कढवून व घुसळून पितात. चहा

पितात आणि त्याच्या मागून दारू पितात! यांच्या चहाला ‘ सोलच्या ’ म्हणतात.

या लोकांत स्वच्छतेकडे फारसे लक्ष नसते. कडक थंडीमुळे स्नान तर कित्येक दिवस ते करीत नाहीत! त्यांचे कपडेही मळकटच असतात. तिबेटी लोक बौद्ध धर्माचे असून त्यांच्या धर्मगुरूला ‘ लामा ’ म्हणतात. सर्वश्रेष्ठ गुरूला ‘ दलाई लामा ’ अशी संज्ञा आहे. या लामांना समाजात विशेष मान असतो. दलाई लामाचे वास्तव्य ल्हासा येथे असते, हेच तिबेटच्या राजधानीचे शहर. हे अतिशय जुनाट शहर असून नवीन पद्धतीच्या इमारती येथे दिसत नाहीत. येथील शाक्य मुनींचे मंदिर मात्र भव्य आहे.

येथील राज्यव्यवस्था जरा जगावेगळीच आहे. येथील बौद्ध धर्मगुरूंकडेच राजकीय सत्ता असते. भिक्षुवर्गच राजसत्ता चालवितो. राजकीय सत्ता धर्मगुरूत केंद्रित झाल्याची उदाहरणे क्वचितच आढळतील. दलाई लामा हाच धार्मिक व राजकीय सत्ताधीश. तिबेटातील राजकीय परिस्थिती चिन्यांनी धोकादायक बनविल्यामुळे तिबेटच्या दलाई लामाचे वास्तव्य हल्ली भारतात आहे.

तिबेटातील ‘ शिराळशेटी पद्धती ’ ऐकून तुम्हाला आश्चर्यच वाटेल. वर्षाच्या आरंभी तीन आठवडेपर्यंत येथील राजकीय सत्ता दोन निवडक भिक्षूंच्या हाती सुपूर्त केलेली असते! या काळात दलाई लामा निरधिकार असतात! शिराळशेट भिक्षू ‘ आपला हात आणि जगन्नाथ ’ या न्यायाने वागल्यास आश्चर्य कसले? अशी पद्धत जगाच्या पाठीवर आज तरी क्वचितच आढळेल.

दलाई लामाच्या पश्चात त्याच्या तोंडावळ्यासारखे एखादे मूल शोधून काढून त्याला दलाई लामा बनविण्याच्या दृष्टीने गादीवर बसवितात! अर्थात भिक्षुवर्ग राजसत्ता चालवितो.

तिबेटात लोकराज्य म्हणजे धर्माचे राज्य असल्यामुळे या देशात पगारी अशा मोठ्या सैन्याची गरज भासली नाही. पण चीनच्या स्वारीचा अनेक वेळा धोका निर्माण होई. या संकटाला तोंड देण्याकरिता सैन्याची उभारणी करणे तिबेटला क्रमप्राप्त झाले. पण या सैन्यातील लढवय्ये म्हणजे भिक्षूच! पद्धतशीर शिक्षणाची व्यवस्था येथे नाही. आधुनिक शस्त्रास्त्रांची यांना

कित्येक दिवस माहिती नव्हती. दगडधोंडे, लाठी, काठ्या ही त्यांची आयुधे ! अलीकडे मात्र तरवारी, बंदुका यांचा उपयोग होऊ लागला आहे.

धर्मप्रधान राजकीय सत्ता असल्याने तिबेटात न्यायकोर्टें व तुरुंग वगैरे काही नाही, पण पूर्वी गुन्हेगारांना त्यांचे डोळे काढणे किंवा त्यांचे हातपाय तोडणे अशांसारख्या कडक शिक्षा होत. पण अलीकडे हे शिक्षेचे प्रकार बंद करण्यात आले असून केवळ फटके मारणे किंवा हद्दपारी करणे अशा सौम्य शिक्षांचा अवलंब केला जातो.

येथील लुटारू लोकांतदेखील धार्मिक भावनेने सहानुभूतीचा ओलावा आढळतो. भिक्षूंच्या मालाची लूट करताना त्यांना तीन दिवसपर्यंत पुरेल इतक्या अन्नाचा साठा ठेवून बाकीच्या मालाची लूट करण्यास ते मोकळे होतात !

तिबेटात कर भरण्याची पद्धत अगदीच वेगळी आहे. आपल्या इकडे कर पैशाच्या रूपाने भरतात. तिबेटात मालाच्या रूपाने ! त्यामुळे तिबेटचा खजिना म्हणजे धान्याचे व इतर विविध मालाचे कोठारच ! त्यात गहू, सातू, पीठ लोणी, फळे इ. जिनसा असतात. यामुळे कर घेण्याच्या कचेरीस ' लामाचे स्वयंपाकघर ' असे म्हटले जाते ! तसेच त्या खजिन्यात लोकर, रेशीम, कापड इ. जिनसाही जमा होत असतात !

खजिना जर अशा वस्तूंनी भरलेला तर नोकरांचे पगारही मालाच्या रूपात होणे स्वाभाविकच आहे.

आपण मित्रांची गाठ पडली म्हणजे नमस्कार किंवा हस्तांदोलन किंवा नुसते हास्य करून पुढे चालू लागतो. तिबेटात मित्रामित्रांची गाठ पडली असता ते आपापल्या जिभा तोंडाबाहेर लांब काढतात ! जीभ बाहेर काढून ' कसे काय ? ' असे सुचविण्याचा त्यांचा हेतू असतो.

तसेच धर्मगुरू जेव्हा आशीर्वाद वगैरे देतात तेव्हा त्यांच्या अनेक तऱ्हा दृष्टीस पडतात. ज्या योग्यतेचा भक्त असेल त्यावर आशीर्वाद देण्याचा प्रकार असतो, त्यांचे प्रकार असे—डोक्यास डोके लावून आशीर्वाद दिला जातो. तसेच दोन्ही हात पुढे करून किंवा एकच हात पुढे करून आशीर्वाद देतात. याचा आणखी प्रकार म्हणजे धर्मगुरू आपल्या काठीचे

टोक भक्ताच्या डोक्यावर लावून आशीर्वाद देतात, या प्रकाराचा अवलंब फक्त अत्यंत श्रेष्ठ लामाच करतात.

आपल्याकडे जप मोजण्याचे मुख्य साधन म्हणजे मण्यांची माळ, पण जप मात्र तोंडाने म्हटला जातो. तिबेटी भिक्षूची जलद आणि खूप वेळा जप करण्याची पद्धत अगदीच वेगळी आहे. जपाचा मंत्र लिहिलेला कागद एका नळकांड्यात घालून ते नळकांडे म्हणजे 'प्रार्थना चक्र' एक सारखे जलद फिरवतात. या यंत्रामुळे तोंडाची वटवट वाचते! अशा रीतीने चक्राच्या फेऱ्यांवरून जपाची मोजदाद होते! पापे नाहीसा करणारा हा जपमंत्र सामान्यपणे 'ॐ मणि पद्मेहूम' हा असतो. निरनिराळ्या मंत्रांचे किंवा प्रार्थनेचे कागद या यंत्रात घालता–काढता येतात. रस्त्यातून हिंडताना देखील भिक्षुलोक हातात प्रार्थनाचक्र धरतात आणि फिरवतात! ही यंत्रे लहान-मोठी असून ती पितळेची किंवा कथलाची केलेली असतात.



तिबेटी लोकांतील लग्नपद्धती आपल्याला विचित्र वाटतील. येथे स्त्रियांचे प्रमाण कमी असल्याने 'द्रौपदी-विवाहां'ची चाल पडली असावी. दोन-तीन भाऊ असले तर तीन भावांत एकच बायको करतात! किंवा एक स्त्री निरनिराळ्या दोन-तीन पुरुषांशी संगनमत करून लग्न लावू शकते! किंवा दोन-तीन बहिणी एकच नवरा करू शकतात! लग्नाचे बंधन म्हणजे बहीण-भाऊ किंवा चुलत भाऊ-बहीण यांच्यात मात्र लग्ने होत नाहीत. तिबेटी कौटुंबिक जीवनात स्त्रियांना अधिक मान असतो. यांच्यातील स्त्रिया शरीरबांध्याने बळकट असतात.

या लोकांची बोली भाषा आणि लिहिण्याची भाषा यांत फार अंतर आहे. तिबेटी वाङ्मय हे मुख्यत: धार्मिक स्वरूपाचे आहे. या भाषेचे व्याकरण सितुलामा या श्रेष्ठ वैय्याकरणाने तयार केले आहे. मिलरासपाची हजारो गीते असून वीर पुत्रांचे वर्णन करणारे केसर हे महाकाव्य आहे.

तिबेटच्या काही प्रमुख ऐतिहासिक घटना—

सन १२४३ मध्ये चीनच्या कुब्लाईखानाने तिबेटचा पूर्व भाग जिंकून घेतला. पुढे त्याने तेथे बौद्ध धर्माची दीक्षा घेतली ! त्यानंतर सर्व तिबेट प्रदेश त्याने शाक्य पंडितांना देऊन टाकला.

सन १७२० मध्ये चीनने हा देश जिंकून तेथे दलाई लामाचे राज्य स्थापिले.

सन १९२४ मध्ये ब्रिगेडियर जनरल जॉर्ज पेरिस याने पेकिंग ते ल्हासापर्यंत पायी प्रवास केला. याच साली एका फ्रेंच विदुषीने तिबेटात असताना तिबेटी पुस्तके व जुने कागदपत्र गोळा केले.

तिबेटशी व्यापारी धोरणाबाबत ब्रिटन व रशिया या दोन देशात फार चढाओढ चाले.

आजच्या घटकेला चीनने आपले वर्चस्व तिबेटवर गाजवून तिबेटी जनतेला ' दे माय धरणी ठाय ' करून सोडले आहे. तिबेटी जनता आज संत्रस्त स्थितीत असून जवळजवळ गुलामगिरीचे जीवन जगत आहे ! या देशाचे धार्मिक व राजकीय श्रेष्ठ अधिकारी दलाई लामा यांनी सध्या भारताचा आश्रय घेतला आहे. येथे राहून आक्रमक चिन्यांच्या हातून देशाच्या मुक्ततेचा विचार करीत आहेत.

• • •

६. ब्रह्मी लोक


ब्रह्मदेशाच्या राजकीय इतिहासाचा विचार करता १४ ते १९ व्या शतकापर्यंत या देशावर तलैंग व आवा वंशांतील राजांची सत्ता होती. पण पुढे शेवटचे राजे ब्रिटिशांची लढाई करण्यात गुंतले आणि त्यांनी आपल्या देशावरील स्वामित्व गमावले. सन १८८६ मध्ये ब्रिटिशांनी ब्रह्मदेश हस्तगत करून हिंदुस्थानशी जोडून टाकला. अशा रीतीने ब्रह्मदेशावर हिंदुस्थानच्या गव्हर्नर-जनरलची सत्ता सुरू झाली. सन १९२३ पासून पुढे ब्रह्मदेशावर स्वतंत्र गव्हर्नर नेमण्यात येऊ लागला. सन १९३७ मध्ये या देशाची हिंदुस्थानशी फारकत करून तो देश स्वतंत्र करण्यात आला.

ब्रह्मी लोकांनी हिंदुस्थानच्या लोकांप्रमाणे पूर्ण स्वातंत्र्य मिळविण्याकरिता अनेक चळवळी केल्या आणि शेवटी आपल्याप्रमाणेच ब्रह्मदेशाला ४ जानेवारी, १९४८ रोजी स्वातंत्र्य मिळाले. पण दैवदुर्विलास असा की, स्वातंत्र्याकरिता ज्याचे संघटनात्मक चातुर्य आणि धुरिणत्व कारणीभूत झाले त्या सॉग खान या ३२ वर्षे वयाच्या ब्रह्मदेशाच्या भाग्यविधात्याचा स्वातंत्र्य प्राप्त होताच खून झाला ! !

ब्रह्मदेशाशी आपला संबंध फार प्राचीन काळापासूनचा आहे. भारतीय संस्कृतीची छाप ब्रह्मी जीवनावर निरनिराळ्या स्वरूपांत पडलेली आजही आढळते. इ. सनाच्या पाचव्या शतकात हिंदी लोक प्रथम ब्रह्मदेशात गेले. बौद्ध धर्माचा प्रसार, व्यापारी वाढ आणि इतर उद्योग-धंदे यांच्या निमित्ताने भारतीय लोक ब्रह्मदेशात स्थायिक झाले. त्यांनी तेथे आपले प्रस्थ चांगलेच वाढविले. पण या सर्वांचा परिणाम असा की, ब्रह्मी लोकांनी हिंदी लोकांना घालवून देण्याची उघडउघड भाषा सुरू केली होती.

ब्रह्मी लोक मंगोलियन व मलाई यांच्या मिश्रणाने झालेले आहेत. यांचा धर्म बौद्ध. बुद्ध मंदिरांना ' पॅगोडा ' म्हणतात. यांची रचना व बांधणी

आपल्याकडील देवळांपेक्षा अगदी निराळी असते. यांच्या मंदिरांत



बुद्धाच्या मूर्ती असतात. ही देवळे रस्तोरस्ती आणि खेडोपाडी दृष्टीस पडतात.

येथील मठ म्हणजे शाळाच. मुले जरा मोठी झाली की ती या मठांच्या शाळांत जातात. मठांतील भिक्षू यांना लेखन, वाचन शिकवितात. पण विशेष म्हणजे शिस्त, आज्ञाधारकपणा यांचे बाळकडू त्यांना येथे मिळते. धार्मिक प्रवृत्तीची जोपासना येथेच होते. मठाधिकाऱ्यांना ‘ पुंगी ’ म्हणतात. मठांतील भिक्षू आपल्याकडील संन्याशांप्रमाणे डोक्यावरील सर्व केस काढून टाकतात. यांचा पोषाख म्हणजे पिवळ्या रंगाचा झगा आणि हातात एक मण्यांची माळ. उदरनिर्वाहाकरिता हे भिक्षू घरोघर भिक्षे-करिता जातात, पण भिक्षा मिळाल्यानंतर भिक्षा घालणाराचे आभार वगैरे

ते मानीत नाहीत ! यातील धोरण असे की, भिक्षा घेणाऱ्यापेक्षा ती देणाराच अधिक धन्य समजला जातो, दानाची संधी त्याला मिळाली ! बौद्ध भिक्षूंचे जीवन साधे असून ते कर्मठ असतात. धार्मिक व लौकिक शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होण्याचे श्रेय पुंगी लोकांनाच द्यावे लागेल. केवळ अन्नवस्त्राच्या मोबदल्यात हे मोठे सामाजिक कार्य ते करीत असतात. प्रत्येक शुभ प्रसंगी धर्मगुरूंच्या आशीर्वादासाठी प्रत्येकजण उत्सुक असतो.

मुली या मठांत जात नाहीत. पण मोठमोठ्या शहरांतून यांच्याकरिता शाळा आहेत. या शाळांतून मुलींना लेखन, वाचन तर शिकवितातच, पण विशेष म्हणजे शिवण्याटिपण्याचे व विणण्याचे काम त्यांना येथे शिकविले जाते. कुटुंबातील सर्व मंडळींना लागणारे कापड तयार करण्याचे काम मुख्यत: ब्रह्मी स्त्रिया व मुली यांनाच करावे लागते.

यांच्यात वाढदिवसाच्या दिवशी बुद्ध भिक्षूंना मुद्दाम भोजनाचे आमंत्रण देतात. यांच्या बसण्याच्या सतरंज्यांवर तांबड्या व हिरव्या गुलाबांच्या फुलांच्या आकृत्या काढलेल्या असतात. त्यांना देण्याकरिता म्हणून भेटीच्या वस्तू मांडून ठेवतात. त्यांत धार्मिक पुस्तके, चट्या, मेणबत्त्या आणि विशेष म्हणजे झाडू व पिकदाणी ! अर्थात या साऱ्या त्यांना उपयोगी पडणाऱ्याच वस्तू असतात.

ब्रह्मी लोकांचा वर्षारंभ दि. १३ एप्रिलच्या सुमारास येतो. या दिवसाचे तंत्र म्हणजे केस धुणे ! मुले व मोठाली माणसे सुद्धा एकमेकांच्या डोक्यावर, अंगावर पाणी उडवितात ! आपल्याकडील रंगपंचमीच ती.

काही लोकांची घरे नद्यांच्या काठी असतात. पूर येऊन घरात पाणी शिरू नये म्हणून यांची घरे जमिनीत खांब पुरून तळापासून काही उंचीवर बांधलेली असतात. अशी घरे फक्त एक मजलीच असतात, कारण दुसऱ्या मजल्यावरून चालणे म्हणजे खालच्या मजल्यावरील लोकांच्या डोक्यावर नाचल्याप्रमाणे होते, अशी यांची समजूत आहे !

ब्रह्मदेशाला निसर्गाचा वरदहस्त मिळाला आहे. जीवनाला लागणाऱ्या आवश्यक गोष्टी निसर्गाकडून त्यांना भरपूर प्रमाणात मिळाल्या असल्या-कारणाने यांच्या आयुष्यात ‘ जीवनार्थ झगडा ’ असा नाही. त्यामुळे त्यांची

उपभोगवृत्ती बळावणे स्वाभाविक आहे. उंची वस्त्रे परिधान करणे, ऐषारामात व करमणुकीत काळ घालविणे आणि ' जीवन ही फुलबाग ' समजून मनुष्याचा कल सुखासीन वृत्तीकडे झुकलेला असल्यात नवल नाही. त्यांच्या स्वच्छंदी वृत्तीचे द्योतक म्हणजे त्यांचा हसरा चेहरा, आनंदी वृत्ती आणि याच वृत्तीचे द्योतक म्हणून की काय पिसारा पसरून नाचणाऱ्या मोराची राष्ट्रीय पक्षी म्हणून निवड करण्यात आली असावी असे मनात येते.

या देशातील लोकांत सर्रास अंगावर गोंदून घेण्याची विलक्षण चाल आहे. ब्रह्मी मुलगा दहा वर्षांचा झाला की, त्याच्या अंगावर व पायांवर गोंदून घेतात. गोंदून घेते वेळी मुलांना पुष्कळच दुःख सोसावे लागते आणि हे दुःख सोसण्यात ही मुले धैर्य दाखवितात ! या वेळी रडणारा मुलगा भित्रा समजला जातो. गोंदून घेण्याचा एक महत्त्वाचा विधीच समजला जातो. पुरुषांच्या मांडीवर व बायकांच्या चेहऱ्यावर गोंदताना निरनिराळ्या प्रकारच्या सुंदर आकृत्या काढल्या जातात.

आपल्याकडील उपनयन किंवा मौंजीबंधन या विधीप्रमाणे ब्रह्मी मुलांचाही एक विधी असतो. प्रत्येक पालक आपल्या मुलाचा हा विधी समारंभपूर्वक आणि शक्य तितक्या हौसेने, डामडौलाने करतो. या समारंभाच्या दिवशी घरासमोर एक मोठा तंबू ठोकण्यात येतो, तेथे निमंत्रित लोक जमतात आणि त्यांना मोठी मेजवानी देण्यात येते. मुलाची पांढऱ्या घोड्यावरून मिरवणूक काढतात. नंतर त्याच्या डोक्यावरील सगळे केस कापले जातात आणि स्नानानंतर त्याला पिवळे वस्त्र धारण करावयास देतात. दुसरे दिवशी बौद्ध भिक्षूंच्या समवेत खाली मान घातलेला आणि हातात भिक्षापात्र घेतलेला मुलगा आईपुढे येतो; तेव्हा आई त्याला ' भिक्षू ' समजून अभिवादन करते ! तिला धन्यता वाटते.

मुली दहा-बारा वर्षांच्या झाल्या की, त्यांचे कान टोचण्याचा मोठा समारंभ करतात.

यांच्यात लग्नविधीचे अवडंबर नसते. लग्न हा एक सामाजिक करार असून त्याला धार्मिक किंवा कायदेशीर स्वरूप असे काहीही नसते. देणे-घेणे, मानपान, हुंडा इत्यादींचा विचार यांच्या लग्नात नसतो. वधू-वरांची परस्परपसंती आणि प्रेम यालाच केवळ महत्त्व असते. वडील मंडळींची

अनुमती आणि सल्ला घेऊन शुभ दिवशी मुलीच्या घरी विवाह-समारंभ साजरा केला जातो. लग्नानंतर नवरा नवरीच्या घरी काही काळ राहावयास जातो व पुढे तो स्वतंत्र बिऱ्हाड थाटतो. बालविवाह यांच्यात मुळीच नसतो. लग्नाची जबाबदारी अशी आई-वडिलांवर नसतेच.

येथील कित्येक गोरे लोक ब्रह्मी स्त्रियांशी लग्न करून स्थायिक होतात! ब्रह्मी स्त्रियांशी लग्न केलेल्या मुसलमानांची संख्या तर खूपच आहे. या दोन जमातींत रोटी-बेटी व्यवहार सर्रास चालतो.

सामान्यपणे ब्रह्मी पुरुष जरी चैनी वृत्तीकडे झुकलेले असले तरी ब्रह्मी स्त्रिया मात्र हुषार, व्यवहारदक्ष असतात. घरात आणि दारात म्हणजे दाराबाहेर यांचे वर्चस्व कोणाच्याही दृष्टीस सहज पडते. पूर्वेकडील देशांत ब्रह्मी स्त्रियांना फार स्वातंत्र्य आहे. बाजारहाट त्याच करतात, दुकानावर बहुतकरून स्त्रियाच असतात. आणि नवरे? घरी स्वयंपाक करतात! मुले संभाळतात! आणि वेळ पडल्यास बायकोचे जेवण दुकानावर पोचते करतात!

कायद्याने आणि रूढीने संपत्तीची वाटणी, व्यवसाय, काडीमोड इ. बाबतींत स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क असले आणि त्या अगदी मोकळेपणाने समाजात वावरत असल्या तरी त्यांनी आपले स्त्रीत्व सोडलेले नाही! स्वतःचे घर संभाळून कौटुंबिक जीवन सुखी करण्याकडे त्यांचे दुर्लक्ष नाही, ही गोष्ट मात्र लक्षात ठेवणे जरूर आहे. त्या अगदी विनयशील असतात.

येथील स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण शे. ४० च्या वर असून उच्च शिक्षण घेऊन कायदा, वैद्यकीय व शिक्षण इ. क्षेत्रांत त्यांनी पदार्पण केलेले आहे.

ब्रह्मी लोक मृताबद्दल विशेष आदर दाखवितात. पांढऱ्या छताच्या मंडपात मृताचा देह एक किंवा अधिकही दिवस ठेवण्यात येतो. अंत्यसंस्काराची तयारी होत असते. या काळात नातेवाईक आणि मित्रमंडळी यांना भोजन देण्यात येते, आणि विशेष गोष्ट म्हणजे रात्रंदिवस वाद्यांचे सूर सुरू असतात! अंत्ययात्रेचे स्वरूप श्रीमंतांत आणि गरीबांतही शक्य तितके भव्य असते! मृताच्या आत्म्याला शांती लाभावी म्हणून धर्मगुरूंना काही भारी वस्तू भेट म्हणून दिल्या जातात. या खर्चाकरिता गरीब लोकांना शेजारपाजारी मदत करतात!

ब्रह्मी लोक हे स्वभावतः लढाऊ वृत्तीचे नाहीत. पण नैतिक धैर्य मात्र यांच्यात विशेष आढळते. एकदा दोन ब्रह्मी लोकांनी निशेच्या धुंदीत रस्त्यात प्रथम भेटेल त्याचा निकाल लावावयाचा असे ठरविले ! प्रथम त्यांना एक कुत्रे दिसले, पण ते अंधारात निसटले. पुढे त्यांना एक म्हातारी बाई आढळली. प्रतिज्ञेनुसार त्यांनी तिला निःशंकपणे कापून काढले ! त्यांच्यावर खटला भरण्यात आला. कोर्टाला त्यांनी सरळ सांगितले, "आम्ही प्रतिज्ञा केली होती, त्याप्रमाणे आम्ही केले, तसे करणे भागच होते !" कोर्टाने त्यांना फाशीची शिक्षा दिली. ती त्यांनी निमुटपणे स्वीकारली.

या लोकांची क्रीडासक्ती विशेष आहे. खेळात ते एकदा रममाण झाले की त्यांना कशाचेही भान राहणार नाही. कोंबड्यांची झुंज, तट्टांच्या आणि बोटींच्या शर्यतींत ते एकदा रमले की रमले. या शर्यतीवर ते पुष्कळ पैसा खर्च करतात. अशी एकदा गोष्ट घडली की, नदीचा बांध फुटून पाणी सैरावैरा चौहोकडे पसरू लागले. एका ब्रह्मी माणसाच्या घराच्या छपरापर्यंत पाणी चढले, त्याची बायको छपरावर जाऊन बसली ! पण हा ब्रह्मी माणूस 'ही दैवी घटना' असे म्हणून खुशाल आपली छोटी बोट जोराने वल्हविण्यात मग्न झाला होता ! त्याला शर्यतीत भाग घ्यावयाचा होता.

ब्रह्मी लोकांचे मुख्य अन्न भात व भाताचे निरनिराळे पदार्थ. त्याच्या जोडीला आंबट-गोड सार. तूप खाण्याची यांच्यात पद्धत नाही, तसेच पोळी-भाकरीही नाही. लहान मुलांना पहिल्या दिवसापासून भात देतात, अर्थात हा अगदी मऊमऊ असतो, आई स्वतः चावून चावून तो आणखी मऊ करते. ब्रह्मी लोकांत त्यांच्या धर्मानुसार मांस हे अगदी वर्ज्य. यातील अहिंसेचे तत्त्व इतक्या पराकोटीला नेले जाते की, कित्येक वेळा ते गाईच्या धारासुद्धा काढीत नाहीत ! मासे मात्र हे लोक खातात ! एकाने मासे पकडणाऱ्या ब्रह्मी कोळ्याला विचारले, "तुमच्या धर्मानुसार मासे तुम्ही कसे मारता ?" यावर त्या कोळ्याने धूर्तपणाने उत्तर दिले, "मासे आम्ही मारत नाही, ते खुळे आमच्या जाळ्यात येतात आणि कालांतराने मरतात !" जेवावयास हे सर्व लोक कोंडाळे करून एका छोट्या टेबलाभोवती बसतात. आपण मांडी घालून बसतो, हे लोक उकिडवे बसतात.

'भाताच्या कांड्या' हे येथील वैशिष्ट्य आहे. हिरवट अशा पोकळ

बांबूत विशिष्ट जातीचे तांदूळ व पाणी घालून त्या बांबूचे तोंड बंद करतात व तो विस्तवात ठेवून देतात ! काही वेळाने हा बांबू जळू लागला असे दिसताच भात चांगला शिजला असे ओळखून तो काढून घेतात. नंतर बांबू फोडून लांबट कांडयांच्या आकारात चांगला शिजलेला भात मिळतो ! अशा भाताच्या कांड्या बाजारात विकायला येतात !

या लोकांना सुपारी खाऊन ती चघळण्याची फार सवय आहे. घरी येणाऱ्या माणसापुढे प्रथमतः ते पानाचा डबा आणि चहाचा पेला ठेवतील; मग बोलण्यास सुरुवात. यांचे दुसरे व्यसन म्हणजे चिरूट ओढण्याचे. पुरुषांचे चिरूट कणसाएवढे जाड आणि गोल असतात. आपल्याला कदाचित आश्चर्य वाटेल, पण पुरुषांप्रमाणे स्त्रियांमध्येही चिरूट ओढण्याचा मोठा षोक असतो ! कदाचित हा अधिक स्वातंत्र्याचा परिणाम असावा. आपल्या-कडील स्त्रिया अद्याप सिगरेट वगैरे ओढीत नाहीत.

ब्रह्मी लोकांत जातिभेद मुळीच नाही. तत्त्वतः सगळ्यांचा सामाजिक दर्जा सारखाच. अधिकारपरत्वे मात्र सामाजिक दर्जात थोडाफार फरक पडेल तेवढाच. निरनिराळ्या धर्मांचे अनुयायी आणि भिन्न भाषी लोक यांच्यात निःशंकपणे रोटी आणि बेटी-व्यवहार होऊ शकतो.

कलेचा आविष्कार या लोकांत फारसा आढळत नाही. वाङ्मयाच्या क्षेत्रात कोणा साहित्यिकाचा नाव घेण्याजोगा असा प्रसिद्ध ग्रंथ नाहीच. चित्रकला तर त्यांच्यात नाहीच म्हटले तरी चालेल. गायनकला अविकसित स्वरूपात थोडीफार आढळते. पण याच्या उलट त्यांचे रेशमी वस्त्र अतिशय सुंदर असते. तसेच त्यावरील कलाकुसरीचे काम तर उत्कृष्ट असते. तसेच हस्तिदंती व लाकडी कोरीव काम, लाखेची भांडी, चांदीच्या नक्षीदार वस्तू हे लोक तयार करतात.

ब्रह्मी लोकांचा धर्मावरील विश्वास त्यांनी ठिकाठिकाणी बांधलेल्या पॅगोडांवरून स्पष्ट दिसून येतो. येथील पॅगोडांच्या संख्येवरून देशाला ' पॅगोडांचा देश ' असे म्हटले जाते. तसेच ठिकाठिकाणी स्तूप उभारलेले दिसतात. स्तूप बांधण्याने बौद्ध माणसाला पुण्य लागते अशी समजूत त्याच्या मुळाशी आहे. प्रत्येक ब्रह्मी काही काळ तरी मठात ' भिक्षू '

म्हणून राहिलेला असतो आणि तेथील शिस्तीचे धडे घेतलेला असतो. ब्रह्मी जीवनातील ही एक आवश्यक बाब गणली जाते.

रंगूनमधील श्वेडेगॉन पॅगोडा हे या देशातील मोठे आकर्षण आहे. हे जगद्विख्यात मंदिर एका उंच टेकडीवर आहे. पूजेचा एक भाग म्हणून सोन्याचा पातळ वर्ख डिंक लावून मूर्तीला तो कोठेही चिकटवितात ! या पॅगोडाचे शिखर सोन्याचा मुलामा दिलेल्या पत्र्याने मढविलेले असल्यामुळे ते चांगलेच चकाकते. याला सोन्याचे देऊळ म्हणतात. तेथील एका स्तंभाच्या टोकावर रत्नजडित छत्री आहे ! त्या रत्नांची किंमत कित्येक लाख रुपये होईल ! हिचा आकार घंटेसारखा असून त्याचे शिखर ३६० फूट उंच आहे ! येथील एका ग्रंथालयात ताडपत्र्यांच्या पोथ्या आहेत. त्यावरील अक्षरे लाल व सोनेरी रंगात कोरलेली आहेत !

ब्रह्मी स्त्री-पुरुषांचे पोषाख सामान्यपणे सारखेच असतात. पुरुष मात्र डोक्याला एक रेशमी वस्त्र गुंडाळतो. दोघेही अंगात एक कुडते व कमरे-भोवती लुंगी गुंडाळतात. लुंगी ही रंगीत रेशमाची असते. स्त्रियांच्या लुंगीवर मात्र विविध कलाकृती केलेली असते. ब्रह्मी स्त्रियांचे केशरचनेचे विविध प्रकार आहेत. सामान्यपणे भरघोस केसांचा पिळलेला अंबाडा त्यांच्या डोक्यावर असतो ! अंबाड्यात एक फूल आणि हस्तिदंती कंगवा हा असावयाचाच. गळ्या-भोवती किंवा खांद्यावर लपेटलेले रंगीत रेशमी वस्त्र, छोटी रंगीत सुबक छत्री, छोटा पंखा, पायात मखमलीच्या चपला इ. गोष्टी तसेच त्यांची मोहक चाल आणि मधुर भाषण त्यांचे आकर्षण वाढविण्यास कारणीभूत होतात. रत्नजडित अलंकार हा दिमाखाचा भाग नसून त्यांच्या पोषाखाचाच एक आवश्यक भाग समजला जातो. गरीब कामकरी मुलींना त्या घरात कामाकरिता



येताच सोन्याची साखळी किंवा बांगड्या लगेच घालवयास देतात ! किती छान पद्धत !

या देशात निरनिराळ्या तऱ्हेची वाहने असली तरी तुम्हाला गमतीचे वाटणारे वाहन म्हणजे ' टम्-टम् ' ! ही छोटीशी कुत्र्यांनी ओढण्याची गाडी असते ! येथील बहुतेक सर्व रहिवाश्यांच्या स्वतःच्या गाड्या किंवा वाहने असतात. पण बाहेरून येणाऱ्या प्रवाशांना मात्र फक्त चारचाकी गाडी असते. तिला ' टिक्का घारी ' म्हणतात. या गाडीची तट्टे लहान दिसतात, पण ती फार चपळ असतात.

मोठमोठ्या घंटांचे आकर्षण या लोकांना विशेष दिसते. श्वेडेगॉन पॅगोडातील घंटेचे वजन ४० टन आहे ! दुसऱ्या ठिकाणच्या एका घंटेचे वजन जवळजवळ ८० टन ! आणि घंटेच्या तोंडाचा व्यास तर १६ फूट ! यांचे आवाज मधुर नसतात. पण पॅगोडांच्या छताला ज्या बारीक बारीक असंख्य घंटा अडकविलेल्या असतात त्या वाऱ्याने हलू लागल्या की त्यांतून मात्र मंजुळ ध्वनी कानी पडतो. बारक्या घंटांचेही येथे वैशिष्ट्यच आहे.

येथील दाट जंगलातील हत्तींचा माणसाने चांगला उपयोग करून घेतला आहे. हत्ती हा शहाणा प्राणी आहे. मोठमोठे आणि अवजड असे टीक वृक्षांचे ओंडके वाहून नेणे किंवा ते नीट रीतीने एकावर एक रचून ठेवणे या कामाला हत्तींचा चांगला उपयोग होतो. काम करीत असलेल्या हत्तींच्या हालचाली खरोखर मनोवेधक आणि उद्बोधक वाटतात. दुसऱ्या महायुद्धापूर्वी २०,००० पाळीव हत्ती या कार्यात गुंतलेले होते !

मंडाले शहर हे ब्रह्मी राजांची कित्येक वर्षे राजधानी होती ! येथे थिबा राजाचा किल्ला आहे. या थिबा राजाला कैद करून आपल्या देशातील रत्नागिरीत ब्रिटिशांनी आणून ठेवले होते, आणि योगायोग असा की, रत्नागिरी जन्मस्थान असलेल्या टिळकांना ब्रिटिश सरकारने गुन्हेगार ठरवून मंडाले येथे आणून ठेवले ! लोकमान्यांनी आपला 'गीतारहस्य' हा सुप्रसिद्ध ग्रंथ येथील तुरुंगात लिहिला.

रंगून हे या देशाचे मुख्य शहर व गजबजलेले बंदर. मुंबईप्रमाणेच रंगूनचे महत्त्व आहे. पण मुंबईपेक्षा रंगून बहुभाषी ठिकाण असून पौर्वात्य ५–६ भाषांचे हे केंद्र आहे. या ठिकाणी भारतातील बंगाल, गुजरात

विभागातील पुष्कळ लोक असून मुसलमान, सिंहली, जपानी व चिनी यांचा भरणा खूप आहे. या ठिकाणी कदाचित ब्रह्मी लोकांचेच प्रमाण कमी आढळेल ! पाश्चात्त्य सुधारणेचे वारे येथे पसरलेले असले तरी इंग्लिश भाषेला येथे प्राधान्य नाही. बहुरंगी व बहुढंगी आणि सधन असे हे शहर आहे. येथील बहुतेक बाजारपेठा परक्यांनी काबीज केलेल्या ! जणू काही ब्रह्मी लोकच येथे परके ! ब्रह्मी लोकांची वस्ती गर्दीच्या आणि गजबजलेल्या भागापासून दूरच्या भागात, श्वेडेगॉन पॅगोडाच्या निवांत भागात आहे.

रंगूनमधील काही रस्त्यांचे वैशिष्ट्य ऐकून तुम्हाला आश्चर्य वाटेल, ते रबराचे आहेत ! आपल्याकडे अजून असे रस्ते नाहीत. अशा रस्त्यांचा फायदा म्हणजे रस्त्यांवर धूळ नाही, चिखल नाही आणि गाड्यांचा खडखडाट नाही. शिवाय रिक्शा ओढणाऱ्या माणसांना असे रस्ते सुखाचे.

पेगू शहरात भगवान बुद्धाची मूर्ती अतिभव्य असून ती ‘ सिंहशय्या ’ या आसनात आहे. ही ज्या ओट्यावर आहे त्याची रुंदी ८ फूट असून लांबी ३५० फूट आहे ! मूर्तीही साधारपणे इतक्या लांबीची असून ती प्रमाणबद्ध आणि मोहक आहे. चेहऱ्यावरील स्मित स्पष्ट दिसू शकते. एवढी प्रचंड मूर्ती जगात असेल की नाही याबद्दल शंका वाटते.

ब्रह्मदेशाची आर्थिक घडी नीट बसायला त्याची निर्यात प्रामुख्याने कारणीभूत आहे. रॉकेल, तांदूळ, टीक यांनाच व्यापारी महत्त्व विशेष आहे, या जिनसांची निर्यात फार मोठ्या प्रमाणावर होते. देश लहान, लोकसंख्या मर्यादित त्यामुळे ब्रह्मी लोक सुखी आणि समृद्ध आहेत.

सन १९४१–४२ मध्ये जपानने ब्रह्मदेशावर स्वारी केली. रंगूनवर प्रचंड विमानहल्ले चढविले. यांत २००० वर ब्रह्मी ठार झाले ! जपान्यांनी सुमारे एक वर्षाच्या अवधीत ब्रह्मदेशात अनन्वित प्रकार केले ! घरेदारे लुटली, अन्नधान्याची लूटमार केली, तरुण स्त्रियांवर अमानुष अत्याचार केले, शेकडो लोकांना गोळ्या घालून ठार केले ! थोडक्यात त्यांनी माणुसकीचीच होळी केली ! याचा बदला जपानला पुढे लवकरच चांगला मिळाला. ॲटमबॉम्बने जपानला दीर्घकाळ लक्षात राहील असा जोराचा धक्का दिला आणि जेरीस आणले. त्याचा उन्माद नाहीसा केला.

● ● ●

७. सिंहली लोक

लंकेतील रावणाचे राज्य, रावणाने केलेले सीतेचे हरण, राम-रावण युद्ध, वानरांची मदत, सीतेची मुक्तता इ. पौराणिक कथाभाग तुम्हांला माहीत आहेच. या पौराणिक काळातून ऐतिहासिक कालखंडात शिरावयाचे म्हटले तरी अडीच हजार वर्षे मागे गेले पाहिजे. खिस्तपूर्व पाचव्या शतकात वंग म्हणजे बंगालचा राजा सिंहबाहू याचा मुलगा विजय याने आपल्या सातशे अनुयायांसह या बेटात प्रवेश केला. येथील मूळच्या वेद्द लोकांना मागे हटवून तेथे त्याने आपले राज्य स्थापून अनेक वर्षे राज्य केले. लंकेचा हाच पहिला आर्य राजा होय. या विजय राजाचा वंश येथे ८०० वर्षांपर्यंत चालला ! विजय राजाच्या सिंहली वंशावरून येथील बेटाला सिंहल द्वीप व लोकांना सिंहली असे नाव रूढ झाले.

सिंहली या शब्दाचे युरोपियन लोकांनी अपभ्रष्ट रूप करून सिलोन असे नाव पाडले. आज तेच नाव रूढ आहे. सिलोन बेट भारतातील धनुष्कोडीपासून अवघ्या बावीस मैलांवर आहे.

सिलोनच्या सविस्तर इतिहासाला आधारभूत असणारा ग्रंथ म्हणजे पाली भाषेतील ‘ महावंस ’ हा ग्रंथ होय. पाली ग्रंथांचे आगर आज सिंहल द्वीपच आहे. यात अडीच हजार वर्षांचा इतिहास व त्या काळातील राजवंश इत्यादींची माहिती मिळू शकते. महावंस व चूलवंस या दोन ग्रंथांत १७५ राजांची हकीकत दिली आहे. या ग्रंथांना एकाने तर ‘ दोन ऐतिहासिक आणि अद्वितीय ग्रंथ ’ म्हणून गौरविले आहे. इतक्या दीर्घ कालखंडाचा इतिहास सांगणारा हा ग्रंथ अपूर्व असा गणला जातो. त्याचबरोबर या ग्रंथात बौद्ध धर्माची महती त्याचा प्रसार यांसंबंधीची माहिती बौद्धधर्मीय भिक्षूंनी लिहून ठेवली आहे. इतिहाससंशोधकांनी यातील मजकुराची कित्येक शिलालेखांच्या आधारे छाननी करून ऐतिहासिक घटनांची निश्चिती केली आहे.

सिलोनमध्ये बौद्ध धर्माचा प्रसार ख्रिस्ताब्दपूर्व काळात होऊन तो तेथे चांगलाच रुजला. बौद्ध सार्वभौम अशोक राजाचा मुलगा महेंद्र याच्या उपदेशाने सारे सिंहली लोक बौद्ध धर्माचे बनले. याचे मुख्य कारण त्या काळी या धर्माच्या प्रसाराला यत्किंचितही विरोध झाला नाही. या देशात आजतागायत हाच धर्म जिवंत आणि प्रचलित असा आहे. येथे बौद्धांचे विहार, स्तूप, मंदिरे सबंध देशभर उभारलेली आढळतात. बुद्धाच्या लहान-मोठ्या प्रतिमा तर असंख्य आहेत.

पुढे १६ व्या शतकापासून या देशात पोर्तुगाज, डच आणि इंग्रज यांच्या प्रभावी प्रवेशामुळे आणि दीर्घकालीन अमलामुळे ख्रिश्चन धर्माचा खुशीने आणि काही सक्तीने प्रसार चांगलाच झाला. एवढेच नव्हे तर ख्रिश्चन संस्कृतीने येथील लोकांचे सामाजिक जीवन अगदी भारून टाकले.

येथील राजांनी निरनिराळ्या कारणांनी राजधानीची ठिकाणे अनेक वेळा बदललेली आहेत. त्यांपैकी अनुराद्धपूर, पोलन्नरुवा, कँडी ही प्रमुख होत. अनुराद्धपूर, ही अतिप्राचीन आणि दीर्घकालीन म्हणजे सुमारे १४०० वर्षे राजधानी होती ! या शहराचे प्राचीन वैभव नष्ट झाल्यावर कित्येक शतकांपर्यंत येथे नुसती जंगलवाढ होत गेली. कालांतराने या शहराचे अस्तित्वही लोक विसरून गेले ! अलीकडे उत्खननात या शहराचे मौल्यवान अवशेष उपलब्ध होत आहेत.

दुसरी राजधानी पोलन्नरुवा याचीही अशीच अवस्था झाली. तामीळ राजांनी लंकेवर स्वारी करून ही राजधानी वसविली. पुष्कळ वर्षे राज्य करून त्यांनी याचे वैभव इतके वाढविले की, तिला ' प्रतिअमरावती ' असे लोक म्हणत ! पण कालाच्या ओघात हे शहर ' गडप ' झाले. येथील उत्खननात याच्या वैभवाच्या खाणाखुणा निदर्शनास येत आहेत. येथे २५ टनांची एक लेखयुक्त शिला आढळली आहे ! तिला ' गलपोत ' म्हणजे दगडी पोथी असे म्हणतात ! विशेष गोष्ट म्हणजे येथे भगवान बुद्धाची पहुडलेल्या अवस्थेत ४५ फूट लांबीची प्रचंड मूर्ती आढळली आहे !

कँडी शहराचे महत्त्व आणि वैभव आगळेच आहे. हे राजधानीचे शहर १५ व्या शतकात वसविले गेले. येथे बुद्धाचे दंत-मंदिर आहे. हा दात

कलिंग देशाहून या देशात आणला गेला असे म्हणतात. या दाताची लांबी अडीच इंच असल्यामुळे हा माणसाचा नसावा असे अनेकांचे मत आहे. काही असले तरी श्रद्धायुक्त भावनेने याचे पावित्र्य लक्षात घेऊन त्याचे रक्षण अत्यंत कसोशीने केले आहे. ह्या दाताचे एकात एक बसणाऱ्या अशा सात पेट्यांतून रक्षण केले आहे. या सर्व पेट्या सोन्याच्या असून त्या रत्नजडित आहेत. दरसाल ऑगस्टमध्ये उत्सवाने या पेटीची मिरवणूक निघते, लाखो लोक शेजारच्या बौद्धधर्मीय देशांतून याच्या दर्शनाचा लाभ घेण्याकरिता येतात. तेथून जवळच बांधलेली देवळे द्राविडी पद्धतीची असून त्यांची शिल्पकला आणि नक्षीकाम प्रेक्षणीय आहे. तेथील काही मूर्तीत कित्येक रत्ने आहेत ! एका देवळात तर सोन्याचे पिंपळाचे झाड बनविलेले असून त्याची पाने खऱ्या पाचूंची बनविलेली आहेत. ' लंकेत सोन्याच्या विटा ' असे म्हणत, याचा प्रत्यय येणे कठीण नाही. भारतातील एका शिक्षणाधिकाऱ्याने काढलेले उद्गार पाहा—' लंकेत सोन्याच्या विटा ही पौराणिक कल्पना खोटी नाही...रत्ने व मोत्ये यांची निपज विचारात घेतली नाही तरी चहा, रबर, प्लंबॅगो, कोको, सुपारी, नारळ, दालचिनी, क्विनिन इ. पदार्थ म्हणजे सिलोनमधील अक्षय संपत्तीचा झरा होय... " सिलोनची ही नैसर्गिक संपत्ती आहे.

कँडी शहराचे ऐतिहासिक महत्त्व म्हणजे सन १८१५ मध्ये येथील शेवटचा राजा विक्रम राजसिंह याला इंग्रजांच्या हातावर राज्याचे दान करून राजसंन्यास घ्यावा लागला ! येथील दंत-देवालय व अनुराधापूर येथील ' पिंपळाचा पार ' ही यात्रास्थाने बनली आहेत.

बौद्ध लोकांना पिंपळाच्या झाडाचे विशेष महत्त्व वाटते. त्याचे कारण असे की बुद्धगयेस पिंपळाच्या झाडाखाली ध्यानस्थ असताना गौतम बुद्धांस 'ज्ञान' झाले म्हणून या वृक्षाला विशेष महत्त्व. तो अतिशय पवित्र मानला गेला आहे. या ऐतिहासिक पिंपळाची एक फांदी खि. पू. तिसऱ्या शतकात अनुराद्धपुरात नेऊन लावली, म्हणून येथील पिंपळाच्या पाराचे महत्त्व. येथील पिंपळाचे पान श्रद्धायुक्त अंतःकरणाने प्रसाद म्हणून यात्रेकरू घेऊन जातात. हा ' प्रसाद ' मिळण्यास वशिलाही लावावा लागतो ! सिलोनमध्ये चौकाचौकांतून पिंपळाचे वृक्ष आढळतात.

सिंहली लोकांच्या आयुष्याचे ध्येय भारतीयांप्रमाणे आध्यात्मिक स्वरूपाचे आहे. त्यामुळे त्यांच्या व आपल्या संस्कृतीत साम्य पुष्कळच आहे. बौद्ध मंदिरांप्रमाणे हिंदूंची शंकरादी देवालयेही सिलोनमध्ये आहेत.

श्रीपाद शिखर हे सिलोनच्या मध्य डोंगराळ भागावर उंचच उंच होत गेलेले शंकूसारखे ७२६० फूट उंचीचे शिखर आहे. याचे वैशिष्ट्य असे की, येथे ४-५ फूट लांब व १॥–२ फूट रुंद असलेली पावलाची ओबड-धोबड आकृती आहे. असे सांगतात की, गौतम बुद्ध सिलोनमध्ये तीनदा येऊन गेले आणि तिसऱ्या खेपेस त्यांनी आपल्या पावलाची प्रतिमा उमटविली! अर्थात ही श्रद्धा व भावना दृढमूल झाली की त्याचे पावित्र्य वाढून ते यात्रास्थान बनल्यास नवल कसले!


या ठिकाणचे वैशिष्ट्य असे की, ख्रिश्चन लोक, हिंदू लोक आणि मुसलमान लोकही पावलाची प्रतिमा आपल्याच उपास्य दैवतेची आहे असे आवर्जून समजतात. ख्रिस्ती लोक थॉमस नावाच्या साधूच्या पावलाची प्रतिमा मानतात. मुसलमान लोक या प्रतिमेला आदामच्या पावलाची खूण समजतात. बुद्धधर्मीय तर ते बुद्धाचेच पाऊल समजतात. थोडक्यात म्हणजे हे एकच ठिकाण हिंदू, बौद्ध, मुसलमान व ख्रिस्ती अशा चार धर्मीयांचे क्षेत्रस्थान बनले आहे! अशी घटना अन्यत्र क्वचितच आढळेल. हे शिखर चढून जाण्यास कठीण आहे. या पावलावरील देवळाचा ताबा मात्र बौद्ध भिक्षूंकडे असून येथील सारी व्यवस्था तेच पाहतात.

रावण आपली सापत्न माता जी कनिया हिच्याकडे मनात अनिष्ट हेतू बाळगून निघाला होता. त्याला या गोष्टीपासून परावृत्त करण्याकरिता श्रीविष्णूंनी बुद्धाचे रूप घेऊन वाटेतच कनिया निवर्तल्याची बातमी सांगितली. तेव्हा वाटेतच तिचे उत्तरकार्य करून अर्घ्योदक द्यावे असे त्याने ठरविले. पण त्याकरिता पाणी पाहिजे म्हणून त्याने आपला बाण जमिनीवर मारला आणि तेथे गरम पाण्याचा झरा निर्माण झाला! हाच पुढे 'कनिया झरा' या नावाने ओळखला जाऊ लागला.

सिंहली लोकांव्यतिरिक्त सिलोनमध्ये हिंदू व ख्रिश्चन लोकांची वस्ती मोठी आहे. येथील आदिवासी म्हणजे वेद्द लोक हे ठेंगू असून वर्णाने काळे आहेत, यांची संख्या झपाट्याने घटत आहे. पुढे तामीळ लोक बहुसंख्येने

येथे आले आणि उत्तर भागात स्थायिक झाले. तसेच अरब लोक व्यापार करण्याच्या उद्देशाने कित्येक शतकांपूर्वी येथे आले आणि स्थायिक झाले, यांना मूर म्हणतात. नंतर पोर्तुगीज, डच, ब्रिटिश इ. खिश्चन धर्माचे लोक आले. त्यांनीही काही काळ येथे अंमल चालविला. या लोकांनी विशेषत: पोर्तुगीज व डच यांनी येथे स्थायिक होण्याच्या दृष्टीने एतद्देशीय स्त्रियांशी लग्ने केली. यांच्या संततीस म्हणजे मिश्र लोकांना ' बर्गर्स ' असे नाव आहे.

सिलोन हा भरपूर पावसाचा देश असल्याने त्यातील काही भाग जंगल-



व्याप्त आहे. शिकारी लोकांची येथे चांगली सोय होते. येथे रानटी रेडे फार आहेत, पण त्यांची शिकार करण्यास परवानगी मिळत नाही. रानडुकरे सर्वत्र आढळतात. तसेच हरणे, वाघ इ. श्वापदे येथे आहेत. दाट जंगलात

हत्तीचे मोठाले कळप आढळतात. एकेका कळपात शंभरपर्यंतही हत्ती असतात. सिलोनच्या नैसर्गिक संपत्तीत हत्तींची गणना करण्यास काहीच हरकत नाही. येथून हत्ती व हस्तिदंत यांची आयात हिंदुस्थानात मोठ्या प्रमाणावर होत असे.

सिलोनमध्ये प्रचंड गिरण्या-कारखाने उभारलेले नसले तरी सिंहली लोकांच्या व्यवसायांत विविधता बरीच आहे. भारतीयांप्रमाणे सिंहली लोक शेतीवर आपली उपजीविका करतात. येथील उत्पन्नांत तांदूळ, नारळ, चहा, कॉफी, सुपारी, रबर, दालचिनी, कोको, सिंकोना यांचा प्रामुख्याने उल्लेख केला पाहिजे. यांपैकी काहींना व्यापारी महत्त्व विशेष आहे. किनाऱ्यावर मच्छीमारीच्या व्यवसायात कित्येल लोक गुंतलेले आहेत. समुद्रात खोल बुड्या मारून मोत्यांचे शिंपले गोळा करण्याचे काम मानारच्या आखातात प्राचीन काळापासून चालू आहे. तामीळ आणि मूर पाणबुड्यांची या धंद्यातील कमाई चांगली होते. जगाला मोत्यांचा पुरवठा करण्यात सिलोन अग्रणी होता. मसाल्याच्या पदार्थांतील दालचिनीमुळे सिलोनवर पाश्चात्त्यांची आक्रमणे झाली. येथील दालचिनी श्रेष्ठ प्रकारची मानली जाते. काही लोक खनिज संपत्तीचे उत्पादन करण्यात गुंतलेले आहेत. येथील प्लंबॅगो धातूचे उत्पादन वैशिष्ट्यपूर्ण आहे. याच्या १७५ च्या वर खाणी चालू आहेत ! पेन्सिलींकरिता या धातूचा उपयोग होतो. हिरे, माणके, पाच, सफायर, गोमेद इ. नाना तऱ्हांच्या वजनदार रत्नांची पैदास होते; रत्नपूर हे ठिकाण यथार्थ नामाचे आहे.

सिलोनच्या विशिष्ट आणि विविध उत्पन्नांवरून त्याला चहाचा बाग, मसाल्याचे बेट, नारळाचे आगर, मोत्यांचे आगर, रत्नांची खाण इ. नामाभिधाने प्राप्त झाली आहेत. वनश्रीचे माहेरघर म्हणूनही त्याची ख्याती आहेच.

कँडीजवळील पॅराडेनिया येथील बाग ही एक येथील मोठे आकर्षण आहे. ही बाग अतिशय मोठी असून त्यात लवंगा, वेलदोडे, जायफळ, मिरी, सिंकोना, दालचिनी इ. विविध प्रकारची झाडे असून फुलझाडे, ताडवृक्ष, बांबू यांचीही झाडे तेथे आहेत. 'राक्षसी बांबू 'हा एक बांबूचा प्रकार असून त्याची वाढ एका रात्रीत दोन फुटांनी होते ! ताडपत्राचे पान

इतके मोठे असते की, त्याच्या खाली २०–२५ माणसे सहज राहू शकतात ! वनस्पतींच्या शास्त्राच्या अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना ही बाग म्हणजे विस्तीर्ण असे ' उघडे पुस्तक ' होय.

येथील खडक-किल्ला हे एक नैसर्गिक प्रेक्षणीय ठिकाण आहे. याला शिगिरी किंवा सिगिरीया म्हणतात, बहुधा सिंहगिरीचे हे रूपांतर असावे. या स्थानाचे वैशिष्ट्य असे की, एका टेकडीवर ४०० फूट उंचीचा सरळच्या सरळ असा एक खडक आहे. एका बाजूने वर जाण्यास अत्यंत कठीण अशी वाट असून बाकीच्या तिन्ही बाजू अगदी सरळ कापल्या-सारख्या दिसतात. हेच नैसर्गिक दृश्य कुतूहलजनक आहे. वर एक दगडाचे सिंहासन असून हे ठिकाण काही काळ एका पितृघातकी राजाचे राजधानीचे ठिकाण होते. येथे मोठाले हौद असून उत्तम प्रकारची लेणी आहेत. लेण्यांतील रंगीत काम आजही नव्याप्रमाणे भासते.

सिंहली लोकांचे मुख्य अन्न भात. भाताबरोबर खोबरे आणि मासे खाण्याची विशेष चाल आहे. हे बौद्ध धर्माचे असूनही मांसाहारी आहेत ! ' हे कसे काय ? ' यावर एका भिक्षूने गंभीरपणाने उत्तर दिले, ' आम्ही मांस खातो हे खरे, पण ते खाण्याला शास्त्राची मनाई नाही, कारण ' अदिट्ठं, असुतं, अपरियांच्यातं खादितुमुर्हति ' असे शास्त्रवचन आहे ! " याचा अर्थ, जनावर मारताना पाहिले नाही, कोणी कोणते मारले हे ऐकले नाही, जनावर मारलेले समजले नाही—असे हे त्यांचे समर्थन !

सिलोनच्या किनाऱ्यावर नारळाच्या व इतर ताडवृक्षांच्या विस्तीर्ण बागा पसरलेल्या आहेत. हे सर्व प्रकारचे ताडवृक्ष येथील लोकांना अनेक तऱ्हांनी उपयोगी पडतात. नारळाचे खोबरे, खोबऱ्याचे तेल, पानांचे झाप, काथ्याची दोरखंडे, केरसुण्या, तसेच पानांच्या चिरफळ्या करून त्यांच्या टोपल्या, चटया, छत्र्या, पंखे इत्यादींना व्यापारी महत्त्व आहे. कुटुंबातील मंडळींना घरगुती काम मिळते. पालमिरा ताडपत्रांचा लिहिण्याकरिता उपयोग होतो ! तामीळ लोक या ताडवृक्षाचे ८०० विविध उपयोग सांगतात. त्याला ते कल्पवृक्षच समजतात.

सिलोनमध्ये कडक थंडी अशी नसते, त्यामुळे गरम कपड्यांची यांना फारशी जरुरी भासत नाही. कित्येक वेळा येथील उष्मा असह्य होतो,

म्हणून लंकेत ठिकठिकाणी स्नानगृहे व पुष्करिणी पुष्कळ आहेत. सामान्य सिंहली पुरुष कमरेभोवती छोटे धोतर गुंडाळतो, अंगात जाकीट किंवा कुडते घालतो व त्यावर उपरणे घेतो. डोक्यावर मात्र काहीच घालीत नाही. स्त्रिया अंगात जाकीट घालून लुगडे नेसतात. स्त्री-पुरुषांच्या केसांची ठेवण सामान्यपणे सारखीच. डोक्यावरील केसांत वाटोळा कंगवा असतो. पाश्चात्त्य पद्धतीचा पोषाख करण्याकडे लोकांची प्रवृत्ती झुकत आहे. या प्रवृत्तीला अनुसरून सभ्य पोषाख म्हणजे बूट-कोट पाटलोण. कपाळावर भस्माचे पट्टे कायम ठेवून साहेबी पोषाखात ते हिंडतात ! पाश्चात्त्य संस्कृती आणि हिंदू संस्कृती यांचे एक विलक्षण मिश्रण या लोकांत आढळते.



खिश्चन लोकांचे अनुकरण करून येथील लोक टेबलावर जेवतात. कधी कधी बशांच्या ऐवजी केळीची पाने टेबलावर मांडतात ! या लोकांत सोवळेओवळे व विटाळ यांच्या कल्पना हिंदुस्थानच्या मानाने बहुतेक नाहीतच. बालविवाह यांच्यात नाहीत. प्रेमविवाहाची चाल रूढ होत आहे. पुष्कळ हिंदू लोकांची नावे पोर्तुगीज किंवा डच आहेत. उदा. डोनाल्ड अभयाशिखर.

भारताच्या मानाने सिलोनमध्ये साक्षरतेचा आणि शिक्षणाचा चांगलाच प्रसार झालेला आहे. येथील बौद्ध-भिक्षु विहारांतून प्राथमिक शिक्षणाचे कार्य करीत. त्यामुळे शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होण्यास चांगलीच मदत झाली. पुढे पाश्चात्त्यांनीही शिक्षणाच्या प्रसारास भरीव हातभार लावला आहे.

येथे प्राथमिक व दुय्यम शिक्षण तामीळ व सिंहली या दोन्ही भाषांतून दिले जाते. हे सर्व शिक्षण मोफत आहे. येथील साक्षरतेचे प्रमाण ७० टक्क्यांपेक्षा अधिक आहे. ज्या वेळी सिलोनमध्ये विद्यापीठाची स्थापना झालेली नव्हती त्या काळात विद्यार्थी लंडन, केंब्रिजच्या परीक्षांस बसत. उच्च शिक्षणसंस्था लंडन विश्वविद्यालयास जोडलेल्या असत. सिलोन विद्यापीठाची स्थापना नुकतीच झाली आहे. सिंहली लोकांची नित्य व्यवहाराची भाषा सिंहली, पारमार्थिक ग्रंथांची भाषा पाली आणि शास्त्र ग्रंथांची भाषा संस्कृत.

सिंहली लोकांच्या खालोखाल येथे प्राचीन काळी मद्रास भागातून आलेल्या तामीळ लोकांचा भरणा आहे. पुष्कळसे तामीळ लोक—स्त्री, पुरुष आणि मुले सुद्धा —चहाच्या मळ्यांतून काम करतात. सिलोनमधील बहुतेक मळे युरोपिअन लोकांच्या मालकीचे आहेत. ९० टक्के भांडवल त्यांचे. यांत काम करणाऱ्या मजुरांची स्थिती मात्र तितकी सुखाची नाही. अलीकडे मळेवाल्यांवर काही बंधने घालून मजुरांच्या सुखसोईकडे लक्ष दिले जात आहे.

अलीकडे येथे मजुरीकरिता आणि अन्य कार्याकरिता येणाऱ्या तामिळां-सारख्या परस्थांच्या राष्ट्रीयत्वाचा प्रश्न विवाद्य ठरत आहे.

सिलोन देशात आरंभापासून गव्हर्नरचा अधिकार चाले; पण हा गव्हर्नर तडक लंडनमधील वसाहतीच्या सेक्रेटरीला जबाबदार असे. पुढे सन १९४८ मध्ये आपल्या प्रमाणेच सिलोनला पूर्ण स्वातंत्र्य मिळाले.

आपल्या देशाचे प्रधान मंत्रिपद जसे आज वडिलांच्या पश्चात त्यांची कन्या इंदिरा गांधी यांना मिळाले आहे, तसेच लंकेचे प्रधान मंत्रिपद श्रीमती बंदरनायके यांनी आपल्या पतीच्या पश्चात भूषविले.

कोलंबो हे सिलोनचे मुख्य शहर असून आंतरराष्ट्रीय महत्त्वाचे बंदर आहे. मुंबईप्रमाणे नानाधर्मीयांचे आणि नाना देशच्या लोकांचे हे ठिकाण बनले आहे. याला छोटी मुंबईच म्हटले तरी चालेल. कोलंबो येथे गोड्या पाण्याचे एक मोठे तळे असून त्याच्या मध्यभागी एक छोटेसे बेट आहे. या बेटावर डच लोक कैदी ठेवीत! आता मात्र लहानशा पुलाने त्याचे 'बेटत्व' नाहीसे केले आहे.

● ● ●

८. इंडोनेशियाचे लोक

इंडोनेशिया हा एकसंधी असा प्रांत नसून अनेक तुटक तुटक बेटांचा डच वर्चस्वाखालील राजकीय विभाग आहे. हा विभाग विषुववृत्तीय भागात लांबट आकाराने पसरलेला असून त्यात सुमारे ३००० लहान-मोठी बेटे समाविष्ट आहेत. त्यांत जावा, सुमात्रा, सेलेबीज, मोल्युकाज, बाली, बोर्नीओ, सुंडा इ. प्रमुख बेटे होत. ही सारी बेटे डोंगराळ प्रदेशांनी व्यात असून पूर्वीच्या काळी ज्वालामुखीतून बाहेर पडलेल्या लाव्हा रसाने भोवतालचा प्रदेश सुपीक झाला आहे.

येथे होणाऱ्या विपुल मसाल्यांच्या पदार्थांचा फायदेशीर व्यापार करण्यात पोर्तुगीज, डच, फ्रेंच, इंग्रज व्यापाऱ्यांत चढाओढ सुरू झाली. येथील मसाल्याचे पदार्थ म्हणजे मुख्यतः मिरी, लवंगा, दालचिनी, मिरची इ. होत. त्यामुळे या बेटांना ‘ मसाल्याची बेटे ’ म्हणून पाश्चात्त्यांनी संबोधण्यास सुरुवात केली.

निसर्गसौंदर्याचा वरदहस्त असलेल्या या बेटांवरील वस्ती खूपच जुनी म्हणजे ५००० वर्षांपूर्वीची आहे. असे म्हणतात की, चीनच्या युनान प्रांतातून समुद्रमार्गे लोक येथे आले आणि किनाऱ्याकिनाऱ्याने त्यांनी वस्ती केली. या बेटांवरील ही पहिली वसाहत होय. मच्छीमारीचा व्यवसाय करून हे लोक आपली उपजीविका करीत. कालांतराने दळणवळण वाढून ते अंतर्गत प्रदेशात शिरू लागले आणि त्यांनी शेती करावयास सुरुवात केली. या वसाहतवाल्यांनी आपली स्वतःची अशी स्वतंत्र संस्कृती निर्माण केली. शिकारीकरिता त्यांनी प्रथम दगडाची हत्यारे तयार केली. सुतार-कामही त्यांनी हस्तगत केले, लाकडावर नक्षीकाम ते करू लागले. मातीची भांडी त्यांना तयार करता येऊ लागली. पुढेपुढे त्यांनी शेतीचे उत्पन्न काढण्यास सुरुवात केली, तांदुळाचे उत्पन्न ते काढू लागले.

पुढे २५०० वर्षांनी दुसरे वसाहतवाले या बेटांवर आले. हे लोक युनानी लोकांपेक्षा अधिक सुधारलेले होते. त्यांना धातूंचा उपयोग करता येत असे. ते लोखंडाची हत्यारे तयार करीत. कालांतराने या दोन्ही वसाहतवाल्यांच्या एकमेकांच्या संपर्कातून एक वेगळी संस्कृती उदयास आली.

ख्रिस्ताब्द-आरंभापासून भारतातील कलिंग देशातून हिंदू वसाहतवाले प्रथमतः जावा बेटात येऊ लागले. या हिंदूंनी तेथील लोकांत हिंदू संस्कृती व हिंदुधर्म यांचा प्रसार सुरू केला. हे हिंदू लोक तेथील मूळच्या लोकांपेक्षा अधिक सुधारलेले असल्याने त्यांनी सर्व बेटांवर हिंदू राज्ये निर्माण केली!

रामायण–महाभारत इ. काव्ये येथील लोकांनी आत्मसात केली. हिंदू शिल्पकलेचा प्रसार होऊन हिंदू देवतांची प्रचंड मंदिरे उभारण्यात आली. बोरोबुदूरचे प्रचंड देवालय हे हिंदू संस्कृतीचे उत्कृष्ट द्योतक गणले जाते. प्राचीन मंदिरांचे भग्न अवशेष आजही पाहावयास सापडतात.

जावा बेट एके काळी पूर्ण हिंदु-राज्य होते. जावाची शिल्पकला, चालीरीती, लोककथा इत्यादींवरून हिंदू संस्कृती अनेक शतके तेथे नांदत होती! पुढे मुसलमानांनी तेथे पाय रोवल्यावर आणि सत्ता काबीज केल्यावर अनेक हिंदूंना मुसलमान धर्माची दीक्षा घ्यावी लागली! तरीसुद्धा ते गुप्तपणे हिंदू देवतांची आराधना करीत! बहुसंख्यांक लोक जरी इस्लाम-धर्मीय बनलेले असले तरी त्यांच्या दैनंदिन आहारविहार, वागणूक, विधी व संस्कार इ. बाबतींत हिंदुत्वाची छाप स्पष्टपणे दिसून येते! जावा बेटात लक्ष्मी, शिव, गणपती इ. देवतांची असंख्य मंदिरे हिंदू संस्कृतीची साक्ष देण्यास पुरेशी आहेत. देवळांच्या भिंती दगडांच्या असून त्यांवर महाभारतातील अनेक प्रसंगांचे उत्कृष्ट खोदकाम केलेले आहे. त्यांतील लढायांची चित्रे तर ‘ जिवंत ’ वाटतात. तेथील मातरम् प्रांतात ‘ हजारी ’ म्हणून एक देवस्थान आहे. तेथे एके ठिकाणी एक हजार देवळे आहेत! नावाची सार्थकता लक्षात येईलच.

इसवी सनाच्या पहिल्या व दुसऱ्या शतकांत हिंदूंच्या मागोमाग बौद्ध भिक्षू धर्मप्रसारार्थ या बेटावर उतरले. सहाव्या शतकापर्यंत बहुतेक सर्व लोक बौद्धधर्मीय बनले. येथील प्राचीन इंडोनेशिअन संस्कृती व हिंदु-बौद्ध

संस्कृती यांच्या संगमातून एक नवी संस्कृती निर्माण झाली. सुमात्रा बेटावरील श्रीविजय या सुंदर नगरीत एका राज्याची स्थापना होऊन त्याचा विस्तार खूपच वाढला. श्रीविजय साम्राज्यात बोर्नीओ, सेलीबस, जावा आणि दूरवरच्या फिलिपाईन्स इ. बेटांचा समावेश होता. इतकेच नव्हे तर चीनचा कँटन शहराजवळील भाग व हिंदुस्थानचा दक्षिणेकडील भाग यांवर श्रीविजयची सत्ता होती ! जहाजे बांधणे हा श्रीविजयच्या जनतेचा प्रमुख धंदा होता. केवळ प्रबळ आरमाराच्या जोरावर श्रीविजयने आपल्या साम्राज्याची उभारणी केली होती. हे साम्राज्य चौदाव्या शतकापर्यंत टिकले होते.

जावा बेटात पूर्व किनाऱ्यावर प्रजापहित हे छोटे पण प्रभावशील असे हिंदु-राज्य होते. हे राज्य जिंकण्याची श्रीविजयच्या सेनेने पराकाष्ठा केली, पण या राज्याने त्याला दाद दिली नाही आणि आपले स्वतंत्र अस्तित्व टिकविले. इतकेच नव्हे तर पुढे श्रींविजयवर आक्रमणे करून शेवटी सन १३७७ मध्ये त्याचा पूर्ण पाडाव केला. प्रजापहित हे छोटे राज्य असून ते त्या काळी पुढारलेले होते असे म्हणण्यास हरकत नाही. राज्यात वसाहतखाते, व्यापारखाते, आरोग्यखाते, अंतर्गत व्यवस्थाखाते इ. खातेविभागणी होती. दोन न्यायाधीश व सात दुय्यम न्यायाधीश यांचे एक सर्वश्रेष्ठ न्यायालयही होते. या राज्याला मोठमोठी बंदरे असून त्यांतून फार मोठ्या प्रमाणावर व्यापार चाले. राजधानीच्या शहराच्या मध्यभागी श्रीशंकराचे भव्य देवालय होते. या राज्यात दगडाची बांधलेली अशी ५०० पेक्षा जास्त देवालये होती. ही देवळे बांधण्याकरिता हिंदुस्थानातून आणलेल्या उत्कृष्ट शिल्पज्ञांची नियुक्ती झालेली होती. पण पुढे या साम्राज्यावर संकटपरंपरा कोसळल्यामुळे शेवटी मलाक्काच्या मुसलमान सुलतानाच्या ताब्यात गेले !

प्राचीन काळापासून अरब व्यापाऱ्यांचा इंडोनेशियाशी व्यापारी संबंध सुरू होता. याच व्यापाऱ्यांनी हिंदु-राज्ये कमजोर होताच स्वतःची राज्ये स्थापून इंडोनेशियात मुस्लीम धर्माचा प्रसार केला. बेटांवरील काही राजांनीच मुसलमान धर्म स्वीकारल्यामुळे धर्मप्रसाराचे कार्य अतिशय सुलभ झाले.

१७ व्या शतकापर्यंत इंडोनेशियातील ९० टक्के लोक मुसलमान बनलेले होते. उरलेल्या फक्त १० टक्क्यांत हिंदू व ख्रिश्चन यांचा समावेश होतो. थोडक्यात, येथील हिंदू संस्कृती नामशेष झाली.

अरब व्यापाऱ्यांप्रमाणेच युरोपिअन व्यापारी इंडोनेशियाकडे व्यापारी-दृष्ट्या आकर्षिले गेले. प्रथमतः पोर्तुगीज व्यापारी या बेटांवर उतरले. त्यांच्यामागून फ्रेंच, नंतर डच व शेवटी इंग्रजही आले. केवळ व्यापार त्यांनी केला असता तर ठीक होते. पण व्यापारी मिषाने त्यांच्यात धर्म-प्रसार करून सत्ता काबीज करण्याचा त्यांचा गुप्त उद्देश हलके हलके उघडकीस येऊ लागला. इंडोनेशिअन हे सारे मुस्लीम धर्माचे, त्यांनी पोर्तुगीजांच्या धर्मप्रसाराची मोहीम त्यांच्यावर धर्मयुद्ध पुकारून कटाक्षाने मोडून काढली. पोर्तुगीजांचा पूर्ण पाडाव होऊन त्यांची या बेटांवरून हकालपट्टी करण्यात आली.

पोर्तुगीजांच्या उदाहरणावरून डच लोक सावध झाले. त्यांनी केवळ व्यापारी धोरण ठेवून अनेक व्यापारी सवलती मिळविल्या. पण कालांतराने डच लोकांना सर्व व्यापार ताब्यात घेण्याची आणि सत्तेची हाव सुटली. मुसल-मान राजांनी डचांशी धर्मयुद्ध पुकारले, कडवा विरोध केला. पण शेवटी डचांनी आपली सत्ता इंडोनेशिआवर स्थिर करण्याचा प्रयत्न केला. अधूनमधून चकमकी सुरू होत्याच.

डच लोकांचे व्यापारी धोरण पराकाष्ठेचे स्वार्थी बनल्यामुळे आणि प्रजेवर जुलमी बंधने घातल्यामुळे इंडोनेशियाचे व्यापारी व शेतकरी यांचा संताप वाढत गेला. असंतोषाचा भडका उडण्यास वेळ लागला नाही. जनता संत्रस्त झाली, दरिद्री बनली. सत्तर टक्के लोक छोटी भाताची खाचरे आणि शिकार यांवर उदरनिर्वाह करून बांबूच्या झोपड्यांतून राहू लागले !

इंडोनेशिअन लोक डचांपासून स्वातंत्र्य मिळविण्याकरिता प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होते. कामगारसंघटना, हरताळ, संप, राष्ट्रीय सेनेची उभारणी, चकमकी, गुप्त संघटना इ. सर्व साधनांची सिद्धता होऊन डचांशी दोन हात करण्यास इंडोनेशिअन जनता एकजुटीने सिद्ध झाली.

दुसऱ्या महायुद्धात सन १९४२ मध्ये जपान्यांनी इंडोनेशियावर स्वारी करून डचांचा पराभवं केला, पण इंडोनेशिया काही काळ जपानच्या अमलाखाली आला !

सन १९४५ मध्ये जपानचा धुव्वा उडाला आणि त्याला शरणागती पत्करावी लागली. जपान्यांची अगणित युद्धसामग्री ' पीपल्स आर्मी 'च्या हातात पडली ! डचांचा पराभव आणि जपानची शरणागती या अनुकूल परि-



स्थितीचा फायदा इंडोनेशिअन पुढाऱ्यांनी चांगलाच घेतला. डॉ. सुकार्णो, त्यांचे सहकारी व राष्ट्रीय सेना यांनी सर्व सत्ता आपल्या हातात घेतली आणि १७ ऑगस्ट, १९४५ रोजी स्वतंत्र प्रजासत्ताकाची घोषण केली !

या पहिल्या प्रजासत्ताकाचे अध्यक्ष म्हणून डॉ. सुकार्णो यांना निवडण्यात आले व डॉ. महंमद हाटा यांची उपाध्यक्षपदी निवड झाली. या प्रजासत्ताकास निरनिराळ्या राजकीय संघटनांनी पाठिंबा दिला. इतकेच नव्हे तर डच्च लष्करातील इंडोनेशिअन अधिकाऱ्यांनी आपला पाठिंबा जाहीर केला.

चाळीस वर्षे इंडोनेशिअन जनतेने चालविलेली राष्ट्रीय चळवळ फलद्रूप होऊन प्रजासत्ताक राज्याची स्थापना तेथे झाली. या राज्यपद्धतीला अनुसरून काही घोषणा करण्यात आल्या—संघटना, स्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य, सभा-स्वातंत्र्य, शिक्षणाचा हक्क, उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण, हितकारक अर्थ-व्यवस्था इ. याच वेळी तांबडा व पांढरा रंग असलेला राष्ट्रध्वज व ' इंडोनेशिया राया ' हे राष्ट्रगीत व इंडोनेशिअन ही राष्ट्रभाषा या गोष्टी

ठरविण्यात आल्या. बटाव्हिया ही प्रजासत्ताकाची पहिली राजधानी ठरविण्यात आली होती, पण पुढे सुरक्षिततेच्या दृष्टीने जकार्ता हे ठिकाण निश्चित करण्यात आले. जावामधील हे मध्यवर्ती ठिकाण असून ते लोह-मार्गांचे केंद्र आहे. या शहरात नुकतीच तीन विद्यापीठे स्थापन झाली आहेत.

स्वातंत्र्य संग्रामातील काही थोर राष्ट्रवादी व्यक्ती—

(१) डॉ. सुकार्णो—इंडोनेशियाच्या स्वातंत्र्यसंग्रामातील अत्यंत धोरणी असे अध्वर्यू. जन्म १९०१. बांडुंग विश्वविद्यालयाचे पदवीधर. वयाच्या २५ व्या वर्षी राजकारणास सुरुवात. राष्ट्रीय चळवळीची उभारणी. भारताच्या धर्तीवर सुकार्णोंनी असहकाराची चळवळ उभारली. जपान्यांनी इंडो-नेशियावर ताबा मिळविल्यावर यांची तुरुंगातून सुटका. काही धोरणाने आणि विशिष्ट संकेताने त्यांनी जपान्यांशी सहकार्य केले आणि त्याचबरोबर सन १९४५ मध्ये स्वतंत्र प्रजासत्ताकाची घोषणा केली. इंडोनेशियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष.

(२) डॉ. हाटा—जन्म १९०२. हॉलंडमध्ये डॉक्टरेटकरिता अभ्यास, येथेच विद्यार्थ्यांच्या संघटनेची उभारणी. सन १९२७ मध्ये ब्रुसेल्स येथे साम्राज्यशाही परिषदेस हे उपस्थित राहिले. येथेच पं. जवाहरलाल नेहरूंशी ओळख. मायदेशी परतल्यावर डच सरकारने त्यांना अटक करून तुरुंगवासाची शिक्षा दिली. राजकारण व अर्थशास्त्र यांवर ग्रंथलेखन. पंतप्रधान पं. जवाहरलाल यांची गुप्तपणे भेट.

(३) डॉ. शहरीर—जन्म १९०८. घरची गरिबी, हुषार विद्यार्थी म्हणून अनेक शिष्यवृत्त्या. सन १९३१ ला हॉलंडमध्ये उच्च शिक्षणाकरिता प्रयाण. परत आल्यावर एका राष्ट्रीय पक्षाची स्थापना, मजूर चळवळीचे नेतृत्व, पण पुढे अटक आणि .दीर्घकालीन तुरुंगवास. स्वातंत्र्यघोषणेनंतर मुख्य मंत्रिपद, वय अवघे ३७ वर्षांचे !

(४) डॉ. अमीर सुजाफुद्दीन—जन्म १९०७. हॉलंडमध्ये कायद्याची डॉक्टरेट पदवी. किसानांच्या संघटनेची उभारणी करून राष्ट्रकार्यास सुरुवात. जपानची सत्ता प्रस्थापित झाल्यावर क्रान्तीसाठी भूमिगत संघटना पण लगेच तुरुंगवास, देहान्ताची शिक्षा ! पण सुकार्णोंच्या मध्यस्थीने ती रद्द

पुढे संरक्षणखात्याचे मंत्रिपद. वक्तृत्वपटुता, या बाबतीत डॉ. सुकार्णोंच्या खालोखाल यांचाच क्रम.

लष्करी सत्ता प्रस्थापित करणारे जनरल सुहार्तो हे आज इंडोनेशियाचे पंतप्रधान झाले आहेत.

स्वातंत्र्याची जाहीर घोषणा आणि प्रजासत्ताक सरकारची स्थापना झाल्यानंतरही डचांची कटकट पूर्णपणे नाहीशी झालेली नव्हती ! जगातील बहुतेक सर्व राष्ट्रांनी या नव्या प्रजासत्ताकास मान्यता दिली. या प्रजासत्ताकाने जगातील प्रमुख देशांच्या राजधानीत वकिलाती स्थापन केल्या. ' युनो ' मध्ये त्याला स्थान मिळाले. तरीसुद्धा डचांची इंडोनेशियावर स्वामित्व गाजविण्याची आणि पूर्ववैभव प्राप्त करून घेण्याची इच्छा नष्ट झालेली नव्हती. पण जगाच्या विरोधामुळे जळफळ करण्यापलीकडे डच काहीच करू शकत नव्हते.

तरीपण डचांनी एकदा चोहोबाजूंनी हल्ला चढवून जकार्ता काबीज करून पुढाऱ्यांना स्थानबद्ध करून टाकले ! याचा गवगवा फार झाला. भारत व पाकिस्तान यांनी डचांच्या वैमानिक वाहतुकीस बंदी घातली. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांनी डच आक्रमणाचा प्रश्न सुरक्षा समितीत नेला आणि विशेष म्हणजे पं. जवाहरलाल नेहरूंनी डचांच्या साम्राज्यशाही आक्रमणाचा कडाडून निषेध करण्यासाठी दिल्लीला आशियायी राष्ट्रांची एक परिषद बोलाविली, यात १९ राष्ट्रांनी भाग घेतला ! स्वातंत्र्याकरिता धडपड करणाऱ्या देशाला भारताने अशी भरीव मदत केली. या परिषदेनंतर डचांची बरीच नालस्ती झाली आणि शेवटी त्यांना प्रजासत्ताक इंडोनेशियाबरोबर वाटाघाटी कराव्या लागल्या.

आपली आर्थिक परिस्थिती सुधारण्याकरिता इंडोनेशियाच्या सरकारने जपान्यांनी उद्ध्वस्त केलेले कारखाने पुन्हा उभारले, साखरेचे कारखाने दुरुस्त करून त्यांचे उत्पादन पूर्ववत सुरू केले. सन १९४८ मध्ये क्विनाइनच्या कारखाना नव्यानेच सुरू केला. मिठाचे उत्पादन वाढविले. कापसाचे उत्पादन वाढवून कापडाची आयात बरीच कमी केली. शेतकऱ्यांना केवळ पावसावर अवलंबून राहावे लागू नये म्हणून अनेक धरणांच्या योजना कार्यवाहीत आणल्या. छोट्या बोटी बांधण्याचे कारखाने सुरू केले. जवळ-

जवळच्या छोट्या बेटांशी दळणवळण ठेवण्याच्या दृष्टीने अशा बोटींची गरज भासते. इंडोशियाच्या निर्यात मालांत प्रामुख्याने रबर, खनिज तेल, जस्त, साखर इ. पदार्थ येतात.

स्वातंत्र्यानंतर शिक्षणक्षेत्रातही अनेक सुधारणा केल्या. डच आमदानीत येथे एकही विद्यापीठ नव्हते. नव्या सरकारने तीन विद्यापीठांची स्थापना केली. तांत्रिक शिक्षण व लष्करी शिक्षणाच्या शाळा काढल्या. साक्षरता-प्रसार प्राथमिक व दुय्यम शिक्षणाकरिता शेकडोंनी शाळा स्थापना केल्या. विशेष म्हणजे प्रौढ व सर्वसाधारण जनतेस राजकारण, अर्थशास्त्र व समाजशास्त्र यांचे प्राथमिक ज्ञान तरी व्हावे म्हणून अल्पमुदतीचे वर्ग सुरू करण्यात आले ! या योजना स्वातंत्र्यानंतरच शक्य झाल्या.

प्रजासत्ताकाने धडाडीने आणि धूर्ततेने स्थलांतराची एक विशेष योजना अमलात आणली. जावा बेट दाट लोकवस्तीने अतिशय गजबजलेले होते, जागांची टंचाई तीव्रतेने वाढत होती. पण त्या मानाने सुमात्रा बेटावर तुरळक वस्ती होती, म्हणून जावामधून २० लाख लोकांचे सुमात्रात स्थलांतर करण्यात आले ! यात गैरसोय कोणाचीच नसून उलट सोय मात्र चांगली झाली. जावामधील जागांचा प्रश्न सुटला आणि सुमात्रातील मजुरांच्या गरजेचा प्रश्न सुटला ! शेतीच्या आणि औद्योगिक उत्पादनाच्या दृष्टीने जावा बेटालाच फार महत्त्व प्राप्त झाले आहे. दळणवळणाच्या सोयी आणि साधने याच बेटावर मोठ्या प्रमाणावर आढळून येतात.

जावा बेटाचे प्राचीन नाव ' यवद्वीप ' होते. यव म्हणजे तांदुळ. तांदुळाच्या भरपूर उत्पादनावरून त्याला हे नाव पडले असावे. या बेटाचे विमानातून विहंगमावलोकन केले तर सबंध बेट म्हणजे भाताचे एक प्रचंड खाचर असेच दृश्य दिसेल ! भाताचे पीक हे केवळ चरितार्थाचे साधन नसून येथील लोकांच्या संपत्तीचे आणि वैभवाचे मोजमाप करण्याचे मापन आहे. तांदुळ हे त्यांचे सर्वस्व. येथील शेतकरी भाताखेरीज उसाचे भरघोस पीक काढतात. जावाच्या साखरेला जगप्रसिद्धी आहे. पण अलीकडे देशोदेशी साखरेचे कारखाने निघत असल्याने येथील साखरेची मागणी थोडी कमी झाली आहे.

जावाची जावानी भाषा खरी, पण तीत निम्म्यापेक्षा अधिक संस्कृत व संस्कृतोद्भव शब्दांचा भरणा आहे ! या भाषेत सहा स्वर व फक्त वीस व्यंजने आहेत आणि बंगालीप्रमाणे 'अ' ऐवजी 'ओ' उच्चारला जातो. जावानी भाषेतील काही शब्द पाहा—आगमो (धर्म), देसो (देश), नगरी (शहर), जयो (जय), भास्करो (सूर्य) इ.

जावा बेटाचे वैशिष्ट्य असे की, याच्या किनाऱ्यावर हजारो सुसरींची जणू काही वसाहतच आहे ! नवखा मनुष्य हमखास या मगरींच्या भक्ष्यस्थानी अचूक पडावयाचाच. जावा सरकारने या सुसरींचा संहार करण्यासाठी मोठमोठी बक्षिसे लावली होती. मलायाच्या लोकांनी बक्षिसाच्या आशेने हजारो सुसरी मारल्या. पण जावाच्या मूळच्या लोकां-पैकी एकही बक्षिसाच्या मोहात गुंतला नाही ! याचे कारण सुसर हे त्यांचे मोठे दैवत मानले जाते ! सुसरीला हे लोक आपले पूर्वज समजतात ! यांच्यात अशी भावना आहे की, मेलेली माणसे सुसरीच्या रूपात पुनर्जन्म घेतात ! आणि म्हणून कोणीही त्यांना धक्का लावण्यास धजत नाही. उलट त्यांना त्यांचे खाद्य मोठ्या भक्तिभावाने दिले जाते. तसेच घरात कोणताही समारंभ असो, त्यात सुसरींचा हविर्भाग असावयाचाच !

इंडोनेशिअन लोकांचे विविध उद्योगधंदे आहेत. येथील शेतकरी सुपीक जमिनीतून विविध उत्पन्ने काढतात. तांदुळ, मका, नारळ, तंबाखू, कापूस, ऊस, चहा, कॉफी, सिंकोना, कोको, सागो इ. जगातील एकंदर सिंकोनाच्या उत्पादनाच्या सुमारे ९० टक्के उत्पादन एकट्या जावामध्ये होते ! सिंकोना-पासून कोयनेल तयार करतात. येथील जंगलसंपत्तीत एबनी, चंदन, डिंक, रबर यांचा समावेश होतो. ही संपत्ती गोळा करण्यात कित्येक लोक गुंतलेले असतात. सुंद द्वीपसमूहातील तर एका बेटाला ' चंदनी बेट ' अशी संज्ञा आहे. ही चंदनाची झाडे पाश्चात्त्य व्यापाऱ्यांचे विशेष आकर्षण होते. खनिज संपत्तीचे उत्पादन करण्याचा व्यवसाय काही लोकांना मिळाला आहे. इंडोनेशिआतील एकंदर खनिज तेलाच्या ८० टक्के तेल एकट्या सुमात्रा बेटात मिळते. तेलशुद्धिकरणाचा एक मोठा कारखाना येथे उभारण्यात आला आहे. कोळसा, मीठ, बॉक्साईट, जस्त यांचेही उत्पादन येथे होते. कापडाचा उद्योग मोठ्या प्रमाणावर चालतो. रबरी मालाचा मोठा कारखाना

मोटारींचा कारखाना, बाटा कंपनीचा पादत्राणे बनविण्याचा कारखाना, कागदाच्या गिरण्या इ. मोठमोठाले कारखाने अस्तित्वात आले आहेत. चिनी मातीची भांडी, काचेच्या वस्तू, कौले, रासायनिक खते इत्यादींच्या निर्मितीत कितीतरी लोक गुंतलेले आहेत.

येथील काही शहरांचे महत्त्व—**जकार्ता**–जावाचे बंदर व मुख्य शहर, इंडोनेशियाची राजधानी समजण्यात येते. विश्वविद्यालय. प्रभावी ध्वनिक्षेपण-केंद्र, लोहमार्ग, जलमार्ग, आकाशमार्ग यांचे केंद्र. व्यापारी महत्त्व. **बांडुंग**–याला जागतिक महत्त्व येण्याचे कारण की, येथे सन १९५५ मध्ये ३० आफ्रो–आशियाई देशांच्या प्रतिनिधींची महत्त्वाची बैठक भरली होती. पंचशील तत्त्वांबरोबरच ' युनो 'ची तत्त्वे अंतर्भूत असलेला दहा कलमी जाहीरनामा या बांडुंग परिषदेत सर्वसंमत झाला. हा महत्त्वाचा जाहीरनामा हेच या परिषदेचे वैशिष्ट्य.

● ● ●

१. मलेशियातील लोक

मलेशिया हे कोणत्याही एका देशाचे नाव नसून ते काही देश किंवा राज्ये मिळून बनलल्या एका संघराज्याचे नाव आहे. याची निर्मिती सन १९६३ मध्ये जाहीर करण्यात आली. या संघराज्यात सिंगापूर, कालिमंतानमधील साबा (उत्तर बोर्नीओ) व सारावाक आणि मलायातील सर्व छोटी छोटी राज्ये यांचा समावेश करण्यात आला आहे. हे संघराज्य स्थापन करण्यात मलेशियाचे पहिले पंतप्रधान टुंकू अबदुल रहमान यांचे परिश्रम विशेष कारणीभूत झाले.



हे संघराज्य स्थापन होऊ नये म्हणून इंडोनेशिया आणि फिलिपाईन या दोन राज्यांनी संयुक्त आघाडी उघडून आपला तीव्र विरोध दर्शविला, पण हे संघराज्य स्थापन झाले आणि आश्चर्याची गोष्ट अशी की, अल्पावधीतच मलेशियाचे पंतप्रधान व सिंगापूरचे मुख्य मंत्री यांच्यात गुप्त करार होऊन सिंगापूर संघराज्यातून फुटल्याची खळबळजनक घटना सन १९६५ मध्ये घडली ! या घटनेला संघराज्याच्या विधानसभेने मान्यताही दिली !

सिंगापूर संघराज्यातून फुटून स्वतंत्र झाल्याच्या घटनेने इंग्लंड, ऑस्ट्रेलिया देशांना चांगलाच आश्चर्याचा धक्का बसला! पण सिंगापूरच्या भौगोलिक स्थानामुळे त्याला प्राप्त झालेले राजकीय महत्त्व ओळखून ब्रिटिश कॉमनवेल्थमध्ये सिंगापूरला एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून मानाचे स्थान देण्यात आले. सिंगापूरने इंग्लंडशी आणि मलेशियाशीं सलोख्याचे संबंध राखण्याचे ठरविले.

मलायी लोक—मलायातील छोट्या छोट्या राज्यांचे राजे व प्रजा हिंदुधर्मीय होती. उत्तर मलायामध्ये आढळून आलेल्या अवशेषांवरून या भागात हिंदी संस्कृतीचा चांगलाच पगडा बसलेला आढळून येतो. मलायाच्या दक्षिणेकडील इंडोनेशियातील सुमात्रा-जावा येथील हिंदू राजे आणि त्यांची हिंदू संस्कृती यांचे वर्चस्व मलायाच्या भागावर आढळून आल्यास आश्चर्य नाही. या लोकांच्या भाषेचे नाव मलयू. या भाषेवर संस्कृत भाषेचा चांगला परिणाम झालेला आढळतो. पुढे अरबी व्यापाऱ्यांच्या संपर्काने त्यांच्या भाषेचाही परिणाम मलयू भाषेवर झालेला आहे. तरी पण मूळच्या मलयू भाषेचे अवशेष नष्ट झालेले नाहीत. रोजच्या व्यवहारातील भाषेत मलयू भाषेचे मूळ स्वरूप आढळून येतेच.

मलयू भाषेच्या साहित्यात स्वतंत्र अशी ग्रंथरचना फारशी नाही. मलायी लोकांत ‘ पान्तुन ’ नावाच्या सुभाषितांसारख्या श्लोकांचा प्रचार फार आहे. ‘ चरित्र ’ अथवा हिकायत हे बहुधा गद्यग्रंथ आहेत. या चरित्रात मलायी लोकांत प्रचलित असलेल्या पौराणिक कथा, ऐतिहासिक दंत-कथा इ. विषय असतात. ‘ हिकायत पिंडव ’ म्हणजे पांडवांची कथा. तसेच अरबी भाषेतून रूपांतर करून घेतलेल्या कथा लोकप्रिय आहेत—‘ हिकायत अमिर हुमदा ’, ‘ हिकायत राजा खैबर ’ इ. कुराणाचे मलयू भाषेत भाषांतर झाले आहे. काही ऐतिहासिक ग्रंथ—‘ हिकायत राजा बंग्सु ’ यात मलायी राजवंशाचा इतिहास आहे असे म्हणतात. ‘ हिकायत मलाका सारखे ऐतिहासक ग्रंथ पुष्कळ आहेत.

पण पुढे मलाक्काच्या राजघराण्याने मुस्लीम धर्माची दीक्षा घेऊन इस्लामी धर्माचा प्रसार करण्याचेही कार्य केले. हल्लीचे मलायी लोक सुनी पंथाचे मुसलमान होत.

मलाक्का आणि मलाक्काच्या सामुद्रधुनीचे भौगोलिकदृष्ट्या आणि व्यापारीदृष्ट्या महत्त्व लक्षात घेऊन पोर्तुगीजांच्या अल्बुकर्कने सन १५११ मध्ये मलाक्कावर स्वारी करून ते राज्य हस्तगत केले. अर्थात यामुळे त्यांचे युरोप-आशियातील व्यापारी वर्चस्व वाढत गेले; पण कालांतराने पोर्तुगीजांची राजकीय सत्ता आणि नाविक सामर्थ्य कमजोर होऊ लागताच टपलेल्या डच लोकांनी व्यापारी क्षेत्रात आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यास सुरुवात केली. याही सत्तेचा ऱ्हास सुरू होताच ब्रिटिश सत्तेने या भागात आपले घोडे दामटले आणि धूर्ततेने सगळा मलाया, सिंगापूरसह आपल्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष वर्चस्वाखाली आणला.



मलायातील अत्यंत फायदेशीर असे व्यापारी महत्त्वाचे जिन्नस म्हणजे रबर आणि जस्त. जगातील एकंदर रबराच्या उत्पादनापैकी सुमारे ३२

टक्के उत्पादन एकट्या मलायात होते! लागवडीखाली असलेल्या जमिनी-पैकी जवळजवळ ६२ टक्के जमीन केवळ रबरासाठी उपयोगात आणली आहे. पण अलीकडे कृत्रिम रबरामुळे या व्यवसायावर काहीसा परिणाम होणे स्वाभाविक आहे. जस्ताचे उत्पादन जगाच्या उत्पादनाच्या ३३ टक्के एकट्या मलायात होते!

शेतीच्या उत्पन्नांत तांदुळ हे महत्त्वाचे असून त्याच्या खालोखाल नारळ आणि मसाल्याचे पदार्थ यांचा क्रम लागतो. जंगलातील विविध उत्पन्नांत वेत व बांबू यांचा प्रामुख्याने उल्लेख करावयास हवा. नित्योपयोगी पडणारे सामान या वेतांपासून बनवितात. तसेच बांबूंचे लहान लहान तराफे करून त्यांचा उपयोग नद्यांतून वाहतुकीसाठी करतात. येथील दाट जंगलांत हत्तींचे कळपच्या कळप आढळतात.

मलायात ब्रिटिशांनी व्यापारीदृष्ट्या सोईस्कर असे पुष्कळसे लोहमार्ग व सडका नव्याने तयार केल्या. या भागात स्थिरता प्राप्त होण्याच्या दृष्टीने सिंगापूरचे लष्करीदृष्ट्या महत्त्व लक्षात घेऊन तेथे कोट्यवधी रुपये खर्च करून बळकट आरमारी तळ ब्रिटिशांनी उभारला.

दुसऱ्या महायुद्धात मलायाचा ताबा काही काळ जपान्यांच्या हाती गेला होता; पण पुढे जपान शरण आल्यावर ब्रिटिशांनी पुन्हा तो भाग आपल्या ताब्यात आणला. यानंतर मात्र सुरक्षिततेच्या धोरणासाठी मलाया द्वीप-कल्पातील सर्व लहान-मोठ्या राज्यांचे एक संघराज्य निर्माण करण्यात आले.

मलायी लोकांचे मुख्य अन्न भात व मासे. अंगावर हे लोक सैलसा अंगरखा घालून पायात विजार घालतात, डोक्याला फेटा बांधतात अगर टोपी घालतात. जवळ 'क्रिस' हे छोट्या जंबियासारखे हत्यार बाळगतात. एकंदरीत हे लोक आदरशील, स्वाभिमानी पण जरा आळशी आणि सुखोपभोगप्रिय असे आहेत. हे लोक फार जुवेबाज असून या व्यवहारात प्रामाणिकपणाची कल्पना ते फारशी बाळगीत नाहीत.

मलायाचे हवामान आणि पाऊस वनस्पति जीवनाला पोषक असल्याने मोठमोठाले वृक्ष आणि दाट गवत येथे आढळते. शेतीच्या व्यवसायाबरोबर जंगलतोड हा येथील लोकांचा व्यवसाय आहे. तसेच खाणकामातही काही लोक गुंतलेले आहेत. मलायाला भरपूर समुद्रसान्निध्य लाभल्याने कित्येक

लोक मासेमारीच्या व्यवसायात गुंतलेले असतात. हजारो टन मासळी दरसाल गोळा केली जाते.

मलायाचा व्यापार मुख्यत: पेनांग, मलाक्का व सिंगापूर या बंदरांतून चालतो. देशाच्या अंतर्गत भागात अगदी उत्तरेकडील भागापर्यंत लोहमार्ग तयार करण्यात आलेले आहेत. निर्यात मालात पहिला क्रमांक रबराचा लागतो. जस्त हाही तितकाच महत्त्वाचा निर्यात-पदार्थ आहे. या निर्यातीवर देशाची अर्थव्यवस्था अवलंबून आहे. किमती लाकूड, मासळी व तांदुळ यांपासूनही अर्थोत्पादन होते. निर्यातीचे प्रमाण अधिक असल्याने देशाची आर्थिक सुस्थिती लक्षात येईल.

मलायाच्या राजकीय क्षेत्रात टुंकू अब्दुल रहमान यांचे स्थान फार उच्च असून मलाया संघराज्याचे पंतप्रधान व मलेशिया संघराज्याचे मुख्य प्रधान या दोन्ही पदांचा मान त्यांना मिळाला. यांचा जन्म सन १९०३ मध्ये एका राजघराण्यात झाला. शालेय शिक्षण मलायातच पुरे करून ते नंतर इंग्लंडला गेले. तेथे पदवी-परीक्षा व बॅरिस्टरची परीक्षा उत्तीर्ण होऊन देशाच्या सेवेकरिता मायदेशी परतले. त्यांनी अनेक मंत्रिपदे व राजकीय पक्षांची अध्यक्षपदे भूषविली आहेत. यांच्या मुत्सद्देगिरीची ख्याती पाश्चिमात्य देशांत पसरून तेथील राष्ट्रांकडून मानाच्या पदव्याही त्यांना मिळाल्या आहेत.

सारावाक—मलेशिया संघराज्याचा एक घटक. या राज्यात मूळच्या व मागासलेल्या लोकांचे प्रमाण जवळजवळ ५० टक्के असून २७ टक्के चिनी, १८ टक्के मलायी लोक आहेत.

जेम्स ब्रुक हा या राज्याचा राजा कसा झाला ही एक मजेशीर कथा आहे. एका मलायी सुलतानाच्या आधिपत्याखाली असलेल्या या सारावाकमध्ये बंड उद्‌भवले. याच वेळी जेम्स ब्रुक हा कर्मधर्मसंयोगाने सारावाकमध्ये आला. त्याच्या नेतृत्वाखाली सारावाकच्या जनतेने सुलतानाचे बंड मोडून काढले. म्हणून या जनतेने ब्रुकबद्दल कृतज्ञता आणि आदर व्यक्त करण्याच्या उद्देशाने त्यालाच आपला राजा करून त्याला राज्याभिषेकही केला ! जेम्स ब्रुक याचा जन्म भारतात झाला. पुढे इंग्लंडमध्ये त्याने शिक्षण घेतल्यावर ईस्ट इंडिया कंपनीच्या सैन्यात प्रवेश मिळविला व तेथेच लष्करी शिक्षण

घेतले. एका लढाईत भयंकर जखमी झाल्याने तो इंग्लंडला परत गेला. पुढे चीनला जाण्याच्या उद्देशाने तो प्रवासास निघाला. सन १८३८ च्या सुमारास तो सारावाकमध्ये आला. येथे त्याने आपल्या सौजन्यपूर्ण वागणुकीने लोकांच्या मनावर चांगलीच छाप पाडली. याचाच परिणाम म्हणजे लोकांनी त्याला आपला पुढारी करून शेवटी राजेपद बहाल केले ! अर्थात हे पद प्राप्त होताच त्याने राज्यात अनेक सुधारणा घडवून आणल्या. पहिली गोष्ट म्हणजे त्याने गुलामांची पद्धत बंद केली. चाचेगिरी करणाऱ्या लोकांचा पूर्ण बंदोबस्त करून प्रजेला निश्चिंत केले. एकंदरीत याची २५-३० वर्षांची कारकीर्द प्रजेला अत्यंत सुखावह झाली. जवळपासच्या जहागीरदारांचा पाडाव करून राज्याचा विस्तारही खूपच वाढविला. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी जपानने जेव्हा या भागावर मुसंडी मारली तेव्हा मात्र येथील लोकांना खूपच छळ सोसावा लागला. जपान्यांची ही रीतच होती. पण जपानच्या पराभवानंतर सारावाक पुन्हा निश्चिंत झाला.

येथील लोक शेती करतात. तांदुळ हे सर्वांत महत्त्वाचे पीक, त्याशिवाय मसाल्याचे पदार्थ, साबूदाणा आणि रबर यांचेही उत्पादन केले जाते.

विशेष म्हणजे खनिज तेलाचे उत्पादन व त्याची निर्यात यांमुळे मिळणाऱ्या पैशावर देशाची आर्थिक स्थिरता अवलंबून आहे. या तेलव्यवसायात कित्येक लोक गुंतलेले आहेत. जंगलातील लाकूडतोड करणे हाही काही लोकांचा उद्योग आहे. येथे मच्छीमारीचा उद्योग मोठ्या प्रमाणावर चालतो. हा उद्योग प्रामुख्याने मलायी व चिनी लोकांच्या हाती आहे.

या राज्याच्या राजधानीचे शहर कुशिंग हे असून याच ठिकाणी ब्रुकला राज्याभिषेक झाला. या शहराची लोकसंख्या पाऊण लाख असून त्यात चिन्यांचे प्रमाण जास्त आहे.

साबा—या राज्याचे जुने नाव उत्तर बोर्नीओ. हा छोटा देश ब्रिटिशांच्या आधिपत्याखाली होता. सन १९६३ मध्ये हा प्रांत मलेशिया संघराज्याचा सभासद झाल्याने त्याचे स्वतंत्र राज्य निर्माण झाले. येथील उत्पन्नांत रबराच्या उत्पादनाचे विशेष आकर्षण आहे. ३०-३५हजार टन वजनाचे रबर येथून निर्यात होते. दुसरा व्यापारी जिन्नस म्हणजे जंगलातील लाकूड. या

जिनसांच्या निर्यातीमुळे देशाची आर्थिक बाजू बळकट झालेली आहे. इतर निर्यात मालात तंबाखू, ताग, खोबरे इ. जिन्नस येतात. तिन्ही बाजूंनी समुद्रसान्निध्य लाभल्याने मच्छीमारीचा व्यवसाय फायदेशीर ठरत आहे. बारा महिने पाऊस पडणाऱ्या या देशात शेतीचा प्रमुख व्यवसाय असतोच. या भातशेतीवर लोकांचा उदरनिर्वाह होतो.

सिंगापूर—मलेशिया संघराज्याचा आरंभीचा सभासद. पण थोड्याच कालावधीत संघराज्यातून मुत्सद्देगिरीने बाहेर पडून पूर्ण स्वातंत्र्य उपभोगणारे हे अगदी छोटेसे राज्य आहे. या राज्याने मलेशियाशी तसेच ब्रिटिशांशी अगदी सलोख्याचे संबंध ठेवले आहेत. मलाया द्वीपकल्पाच्या दक्षिणेस जोहोरच्या सामुद्रधुनीने अलग झालेले सिंगापूर हे एक बेट आहे. पण ही सामुद्रधुनी खूपच अरुंद असल्याने सिंगापूर बेट हे पुलांनी मलायाशी जोडण्यात आले आहे. एका पुलावरील लोहमार्गाने सिंगापूर व मलाया यांच्यात दळणवळण सुरू असते. भौगोलिकदृष्ट्या, लष्करीदृष्ट्या व व्यापारीदृष्ट्या सिंगापूरचे महत्त्व लक्षात घेऊन सन १९२१ मध्ये सिंगापूरला भरभक्कम असा आरमारी तळ ब्रिटिशांनी उभारला. जिब्राल्टरचे किंवा सुएझचे जे महत्त्व तेच सिंगापूरचे. पूर्वेकडील व्यापाराच्या जागतिक जलमार्गावरील मोक्याचे ठिकाण म्हणून त्याचे महत्त्व.

सिंगापूरच्या लोकसंख्येत निम्म्याहून अधिक लोक चिनी आहेत. त्यांच्या खालोखाल मलायी लोक, नंतर भारतीय, नंतर युरोपिअन व इतर असे क्रमांक लागतात.

सिंगापूरचे मुख्य प्रधान लीकुआन यू हे जन्माने चिनी असूनही साम्यवादी नाहीत. समाजवादाचा मात्र हिरीरीने पुरस्कार करतात. यांचे उच्च शिक्षण इंग्लंडमध्ये झाले. केंब्रिजची एम्. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर ते परतले आणि राजकारणात त्यांनी पदार्पण केले. मलेशियाच्या संघराज्याच्या निर्मितीस यांचे प्रयत्न कारणीभूत झाले आहेत.

• • •

१० इंडोचायनामधील लोक

'इंडो' म्हणजे भारत. भारत व चीन यांच्यामधील प्रदेश. इंडोचायना हे नाव पाच निरनिराळ्या पण जवळजवळच्या देशांच्या समूहाला दिले जाते. यात थायलंड, लाओस, कंबोडिया, उत्तर व दाक्षिण व्हिएटनाम यांचा समावेश होतो.

इंग्रजांनी फ्रेंचाची भारतातून हकालपट्टी केल्यावर फ्रेंचांनी आपला मोर्चा पूर्वेकडे वळविला आणि इंडोचायनामधील सर्व देशांवर क्रमाक्रमाने आपली सत्ता प्रस्थापित केली.

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी जर्मनीने फ्रान्सचा पराभव केला, त्यामुळे इंडोचायनामधील त्यांची पकड कमी होऊन त्यातील देश मोकळे झाले. त्या देशांतील लोकांची माहिती मिळवू.

थाय लोक— या लोकांचा देश थायलंड. पाश्चात्त्यांनी या देशाला पूर्वी सयाम असे नाव दिले होते. पण सन १९४९ मध्ये त्याचे योग्य नामांतर होऊन थायलंड हे नाव रूढ झाले आहे.

इंडोचायनामधील हा देश विस्ताराने जरा मोठा आहे. फार पूर्वी या देशात दोन मुख्य जमाती-थाय लोक व लाओ लोक-यांचे स्वतंत्रपणे वास्तव्य असे. पण चीनच्या कुब्लाईखान या मोंगल बादशहाने या भागावर स्वारी केल्याने या दोन जमाती पश्चिमेकडे सरकल्या. नंतर तेथील छोट्या राज्यांनी एकत्रित होऊन राज्यविस्तार वाढविला. या थाय राजांनी अधिक विस्तार करण्याच्या लालसेने कंबोडिया, लाओस या राज्यांवर आक्रमणे केली आणि तेथे आपले वर्चस्व स्थापले. थाय लोकांचे हे वैभव पाहून शेजारच्या ब्रह्मी लोकांनी थायी राज्यावर आक्रमणे सुरू केली. पण थाय लोकांनी आपली बाजू चांगलीच सरसावली.

पुढे पोर्तुगीज, डच, इंग्लिश लोकांशी यांचा संबंध येऊन व्यापारीदृष्ट्या बोलणी होत. नंतर १९ व्या शतकाच्या अखेरीस थायलंडने जपान, रशिया या देशांशी मैत्रीचे आणि व्यापारी तह केले.

तरी पण पश्चिमेकडून इंग्रजी सत्ता व पूर्वेकडून फ्रेंच सत्ता यांच्या कैचीत हा देश सापडल्यामुळे थायलंडला लाभावी तशी शांतता लाभली नाही. पण सुदैवाने इंग्लंड व फ्रान्स यांनी एक तह करून थायलंडच्या स्वतंत्र अस्तित्वास मान्यता दिली.

सन १९२५ मध्ये थायलंडमध्ये काही स्वातंत्र्यवादी लोकांनी बंडाचा यशस्वी उठाव केला. याचा परिणाम असा की, राजे प्रजाधिपोक यांना गादी सोडावी लागली. या राज्यक्रान्तीनंतर कायदेमंडळाची तात्पुरती व्यवस्था करण्यात आली.

पुढे लवकरच दुसरे महायुद्ध सुरू झाल्याने थायलंडनेही आपला फ्रेंचांनी लुबाडलेला भाग परत मिळविण्यासाठी प्रयत्न केले व त्यांना तो मिळालाही. या वेळी थायलंडने जपानशी दोस्ती केल्याने इंग्लंड–अमेरिकेशी अर्थातच शत्रुत्वाचे नाते निर्माण झाले. तरी पण अमेरिकेने थायलंडशी मित्रत्वाचे नाते चालूच ठेवले! थायलंडची जपानशी दोस्ती दिखाऊ असल्याने थायलंडने जपानी सैन्याला आपल्या देशातून मलायाकडे जाण्यास काही कारणे काढून खळखळ केली. जपानने लगोलग थायलंडवर हल्ला चढविला आणि आपले वर्चस्व स्थापले. पण यामुळे थायलंडचे स्वातंत्र्य मात्र नष्ट झाले!

पण पुढे जपानचा पराभव झाल्यावर थायलंडने इंग्लंड-अमेरिकेशी जाहीर केलेले शत्रुत्व संपविले! आणि पुढे थायलंड हा राष्ट्रसंघाचा सभासद झाला. तरीपण देशातच अशांततेचे वातावरण दाट पसरलेले होते. राजे पदच्युत होत आणि सत्ताधाऱ्यांना देशांतर करावे लागे.

थायलंडमधील जनता ९५% थाईवंशीय आहे. उरलेल्या परकीयांत चिनी लोकांचा भरणा आहे. परकीयांबद्दल थाई जनता अतिशय जागरूक असून चिन्यांबद्दल तर त्यांच्या मनात तिटकारा उत्पन्न झाला आहे.

येथील बहुसंख्य लोक बौद्धधर्मीय असून ते आपल्या धर्मगुरूंना फार मानतात. कोणतेही धार्मिक कृत्य या धर्मगुरूंशिवाय होत नाही. मनुष्यप्राणी


आणि ईश्वर यांच्या मधला धर्मगुरू हा मध्यस्थ समजला गेल्याकारणाने त्याच्या हाती काही सत्ता केंद्रित झाली आहे. थायलंडचा राजा सर्व धार्मिक गुरुंत श्रेष्ठ समजला जातो ! बौद्ध मंदिरातून पाली भाषेतील ग्रंथांचे पठण सतत चालू असते.

थाई लोकांची भाषा चिनी भाषेप्रमाणेच असून तीच सर्वत्र वापरात आहे. ब्रह्मदेशातल्याप्रमाणेच येथील प्राथमिक शिक्षण धर्मगुरूंच्या हाती असून बौद्ध मंदिरातच हे धर्मगुरू शिक्षण देतात. शिक्षण आणि धर्म यांचा हा परस्परसंबंध अजूनही फारसा दुरावलेला नाही. राष्ट्रीयदृष्ट्या शिक्षणाची थोडी फारकत झालेली असली तरी शाळांतून शिक्षकाचे काम धर्मगुरूच करतात. त्यामुळे या देशात शिक्षणाचा फैलाव चांगलाच झाला आहे. प्राथमिक शिक्षण ७ ते १४ वयाच्या मुलामुलींना, तसेच माध्यमिक शिक्षणाच्या पहिल्या तीन वर्षांचेही शिक्षण सक्तीचे करण्यात आले आहे. तांत्रिक व यांत्रिक शिक्षणाची सोय माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण-क्रमात झाली आहे. २१ ते ३० वयांमधील नागरिकांनी दोन वर्षे लष्करी शिक्षण घेतलेच पाहिजे असे ठरविण्यात आले आहे.

थायलंडला मान्सूनचे हवामान असल्याने तेथे ४० ते १०० इंचांपर्यंत पाऊस पडतो. देशाच्या मध्य मैदानाचा प्रदेश भातखाचरांनीच व्याप्त आहे. भाताचे उत्पन्न विपुल. त्याच्या खालोखाल तंबाखू, ऊस, मका, तीळ, इ. पिके होतात. डोंगराळ भागातील टीक वृक्षाच्या लाकडाला व्यापारी महत्त्व आहे. दक्षिणेकडील चिंचोळ्या भागात टंगस्टन, शिसे, कोळसा इ. खनिजे सापडतात. या भागात नारळ व रबर यांचेही भरपूर उत्पन्न मिळते.

चाओफ्राया हे नदीचे नाव असून हीच या देशातील मोठी नदी असून ती अतिशय पवित्र मानली जाते, ही त्यांची ' गंगामाई '. हिच्या दोन्ही काठांवरील विस्तृत आणि अतिशय सुपीक मैदानी भागात भाताचे भरपूर पीक निघते. तसेच मच्छीमारीच्या व्यवसायाला ही नदी अतिशय उपयुक्त आहे. हिच्या मुखाजवळील बँकॉक हे एक वैशिष्ट्यपूर्ण शहर असून आपल्याकडील श्रीनगरप्रमाणे पाण्यावरच वसले आहे. पुष्कळ कुटुंबे पाण्यावरील तरत्या घरांत राहतात. काही लोकांचे सारे आयुष्य पाण्यावरच

जाते. नद्यांच्या पाण्यावर बांबूचे किंवा लाकडांचे ताफे बांधून त्यांवर




सोईस्कर अशी छोटी घरे बांधतात म्हणून त्यांना तरती घरे म्हणतात!



या तरत्या घरांना लहान लहान टोपलीच्या आकाराच्या होड्या अडकविलेल्या असतात. यांतून मुले सहलीला जातात. बँकॉक हे या राज्याचे मुख्य शहर आणि बंदर आहे. येथून लोहमार्गाचे अंतर्भागात अनेक फाटे फुटतात. येथील सर्व लोहमार्ग मीटर गेजचे आहेत.

तरत्यां घरांपासून दूरच्या दलदलीच्या प्रदेशातील घरे मात्र वेगळ्यां प्रकारची असतात. ब्रह्मदेशातील घरांप्रमाणे जमिनीत खांब पुरून किंवा

बांबू रोवून यांवर जमिनीपासून दोन-चार हात उंचीवर घरे बांधलेली



असतात ! उंचीवरच्या घरांना नद्यांच्या पुरापासून त्रास होत नाही.

या लोकांच्या जेवणात भात हा तर मुख्य पदार्थ असतोच, त्याच्या जोडीला मासेही असतातच.

थायलंडमधील ८५ टक्के लोक शेतीच्या निरनिराळ्या कामांत गुंतलेले आहेत. जेणेकरून शेतीचे व विशेषत:-तांदुळाचे उत्पन्न वाढेल असे प्रयत्न जारीने सुरू आहेत—सशास्त्र पद्धतीने जमिनीची मशागत, आधुनिक पद्धतींचा अवलंब, पाटबंधाऱ्यांच्या योजना. या व्यवसायांतील मध्यस्थांची म्हणजेच मुख्यत: चिन्यांची उचलबांगडी करण्यात आली.

शेती, जंगलतोड, खाणकाम व मच्छीमार हेच येथील लोकांचे प्रमुख व्यवसाय होत. या देशात मोठ्या प्रमाणावर चालणारे उद्योगधंदे किंवा कारखाने नाहीत म्हटले तरी चालेल. सिमेंटचा एक फार मोठा कारखाना असून अलीकडे कापड-गिरण्या व तागाच्या गिरण्या निघाल्या आहेत.

देशाच्या संरक्षणाकरिता खडे सैन्य, राखीव सैन्य तसेच आरमार आणि वायुदल यांची सिद्धता केली आहे. संरक्षणमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली संरक्षण मंडळ असून त्यात तीन संरक्षणदलाचे प्रमुख अधिकारी असतात. सन १९५४ मध्ये एक लष्करी कायदा केलेला आहे. २१ ते ३० वर्षे वयाच्या प्रत्येक नागरिकाने संरक्षणाच्या कोणत्या तरी शाखेत सक्तीने दोन वर्षे नोकरी केलीच पाहिजे, पुढे सहा वर्षे राखीव व नंतर दहा वर्षे इच्छेनुसार लष्करी सेवेत घालवावयाची अशी योजना आहे. सर्व प्रकारच्या लष्करी शिक्षणाची सोय तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.

थायलंडमध्ये राजसत्ता आहे. ती अर्थात साधारणपणे इंग्लंडच्या राजसत्तेप्रमाणे मर्यादित असून राजेसाहेबांना सल्ला देण्याकरिता विधानसभा आणि मंत्रिमंडळही असते. थायलंडच्या नजीकच्या राज्यांतून लोकशाहीचा जोरदार प्रसार होत असताना थायलंडमध्ये मर्यादित का होईना राजसत्ता आहे, ही हल्लीच्या काळात विशेष गोष्ट वाटते. अर्थात याचे श्रेय राजाच्या धोरणी वागणुकीला द्यावे लागेल.

बँकॉक हे राजधानीचे शहर असून त्याच्या जवळपास निरनिराळ्या ज्ञानशाखांची अशी पाच विश्वविद्यालये आहेत. हे शहर नाना जातींच्या व नाना देशांतील लोकांनी गजबलेले आहे. यात चिन्यांचे प्रमाण अवास्तव असून त्यांनी जीवनाच्या बहुतेक सर्व क्षेत्रांत आपले वर्चस्व वाढविले आहे! या गोष्टीची स्थानिक लोकांना खंत वाटून त्यांनी 'थायलंड थायी लोकांकरिता' अशी मोहीम सुरू केली आहे.

लाओस— इंडोचीनमधील थायलंडच्या पूर्वेकडील देश. हा छोटा देश असला तरी त्याचे स्वतंत्र असे राज्य होते. लाओ लोक हे थाय किंवा शान जातीची एक पोटजात आहे. हे सर्व लोक बौद्ध धर्माचे आहेत. बाकीचे इंडोनेशिअन वंशातील असून त्यांच्यात अनेक जाती आहेत. या सर्व मागासलेल्या असून त्यांतील लोक टोळ्याटोळ्यांनी लाओसच्या डोंगराळ भागात राहतात.

लाओसमध्ये ११ ते १३ व्या शतकापर्यंत ख्मेर लोकांचे राज्य होते. १४ व्या शतकात स्थानिक लोकांचे राज्य झाले. पण ब्रह्मी लोकांनी त्यावर

हल्ले सुरू केले. पुढे लाओस राज्याचे दोन भाग झाले. उत्तरेकडील भागाची लूआन प्रवांग ही राजधानी असून दक्षिण भागाची व्हीएनटीएन ही राजधानी झाली. राज्याचे हे दोन विभाग झाले तरी राज्याला शांतता मुळीच लाभली नाही. फ्रेंचांच्या सल्ल्यानुसार लाओस राज्याची एक घटना तयार करण्यात आली. उत्तरेकडील भागाच्या राजाला दक्षिणेकडील राज्याने मान्यता दिल्याने दोन्ही भागांचा राजा एकच झाला ! काही वर्षे लोटल्या-नंतर सन १९५३ मध्ये उत्तर व्हिएटनामच्या साम्यवादी सरकारने लाओस-वर स्वारी करून ईशान्य भागात ' पॅथे लाओ ' या नव्या नावाने एक राजकीय सत्ता निर्माण केली. या घटनेचे पुढारीपण सुफानो वाँग या एका राजघराण्यातील माणसाकडे होते. याच माणसाला पूर्वी साम्यवादी धोरणामुळे हद्दपार केले होते.

सन १९५९ मध्ये काहीतरी कुरापत काढून पॅथे लाओच्या फौजांनी ईशान्य भागात लाओसवर चढाई सुरू केली. याच वेळी लाओसचा लष्करी अधिकारी जनरल फौमी याने अस्तित्वात असलेल्या नव्या पक्षाच्या सरकारला राजीनामा द्यावयास लावले.

थोड्याच अवधीत सुवन्न फौम या राजपुत्राने पॅथे लाओच्या पुढाऱ्याशी संगनमत करून स्वत: मंत्रिमंडळ बनविले; पण हीच गोष्ट त्याच पक्षातील पुढारी जनरल फोई यांना रुचली नाही. त्यांनी लष्कराच्या साहाय्याने सन १९६० मध्ये व्हिएनटीएन हस्तगत करून सुवन्न फौम यांना देशत्याग करण्यास लावले. अशाच उलथापालथी काही काळ सुरू होत्या.

सन १९६१ मध्ये देशात शांतता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने इंग्लंड व रशिया या देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांनी सर्वपक्षीय परिषद बोलाविली. लगोलग जिनिव्हा येथे चौदा राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी शांतता स्थापन होण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले. याची फलनिष्पत्ती अशी की, देशातील तीन प्रमुख पक्षांचे पुढारी–सुवन्न फौम, बौन औम आणि पॅथे लाओचे सुफानो वाँग–यांनी एकत्र येऊन वाटाघाटी केल्या. त्यानंतर सर्वांच्या विचाराने एक राष्ट्रीय सरकार स्थापन झाले.

लाओसच्या घटनेनुसार राजा हाच सर्वश्रेष्ठ लष्करी अधिकारी आणि धर्मगुरूही असतो. मुख्य प्रधानाची नेमणूक राजाच करतो.

लाओस हा ८५ टक्के डोंगराळ प्रदेश असून उरलेल्या १५ टक्के जमिनीतून पीक काढले जाते. मेकाँग नदीचे खोरे अतिशय सुपीक असून येथे पावसाचीही कमतरता नाही. येथे भाताचे भरपूर उत्पादन होते, त्याच्या खालोखाल मका, नंतर तंबाखू, चहा, दालचिनी, सिंकोना इ. पिके काढली जातात. अफूचेही उत्पादन येथे होते.

खनिज संपत्ती येथे अगदीच बेताची असल्यामुळे औद्योगिक दृष्टीने हा देश मागासलेलाच म्हणावा लागेल. विजेची निर्मिती डोंगराळ भागाच्या अनुकूलतेमुळे अलीकडेच होऊ लागली आहे.

डोंगराळ भागात दळवणवळणाच्या सोयी अगदीच तोकड्या आहेत. लोहमार्ग तर नाहीतच !

लुआंग प्रबांग हे राजधानीचे आणि व्हिएनटीएन ही येथील महत्त्वाची शहरे होत.

कंबोडिया— हा इंडोचीनमधील दक्षिणेकडचा देश. याची कांबुजा व कांबोज अशी नावे होती. एका चिनी लेखकाने या देशाला तेथील लोक ' कं–फुकी ' असे म्हणत, असे लिहिले आहे. याच नावावरून त्याचे वर्णान्तर होऊन कांबोझ हे नाव रूढ झाले.

फार प्राचीन काळी म्हणजे पहिल्या शतकात भारतातून पुष्कळसे लोक येथे वसाहतीकरिता येऊन स्थायिक झाले. येथील मूळचे लोक मागासलेले होते. तेव्हा येथे आलेल्या हिंदूंना स्वतःचे राज्य स्थापणे सोपे गेले. हे हिंदू लोक व येथील मूळचे लोक यांच्या मिश्र संततीस ' ख्मेर ' असे नाव आहे. या ख्मेर लोकांचे साम्राज्य पुढे फारच विस्तारले. त्यामुळे या देशात हिंदी संस्कृतीचा चांगलाच प्रसार होऊन ती दृढमूल झालेली होती. येथे मोठमोठाल्या हिंदी देवालयांचे अवशेष सापडतात. यांमध्ये लोकांच्या हस्तकौशल्याचे आणि कलानैपुण्याचे पुरावे उपलब्ध आहेत. कांबोज किंवा कंबोडिया देशात वैभव प्राप्त होण्यास ८ ते १२ व्या शतकापर्यंत आलेले हिंदू लोकच कारणीभूत आहेत.

पुढील काळात सयामी किंवा थायी लोक, अन्नामी लोक आणि चिनी लोक यांच्या स्वाऱ्यांमुळे ख्मेरांच्या साम्राज्यास उतरती कळा लागली.

१९ व्या शतकात फ्रेंचांचे वर्चस्व इंडोचायनाच्या भागात चांगलेच वाढले. कंबोडिया त्याला अर्थातच अपवाद नव्हता. फ्रेंचांचे स्वामित्व त्यालाही मान्य करावे लागले.

पुढे दुसऱ्या महायुद्धात जर्मनीने फ्रेंचांचा फ्रान्स देश काबीज केला होता. ही परिस्थिती लक्षात घेऊन कंबोडियाच्या जनतेने स्वातंत्र्यप्राप्ती-करिता प्रयत्न सुरू केले. या चळवळीला हा काळ अतिशय अनुकूल होता. जर्मनीचा पाडाव झाल्यावर फ्रेंचांनी परत मिळालेल्या देशांना अधिकाधिक राजकीय हक्क देण्याचे कबूल केले. पण कंबोडियाची जनता आणि राजे नरोडम सिंहनूक यांच्यात तेढ निर्माण होऊन शेवटी राजेसाहेबांना जवळ-च्या थायलंडमध्ये पळून जावे लागले !

सन १९५६ मध्ये कंबोडियाच्या लोकसभेने फ्रेचांचे वर्चस्व झुगारून स्वातंत्र्याचा ठराव संमत केला.

हिंदुधर्म कंबोडियात बराच काळपर्यंत प्रचलित असल्यामुळे आजही तेथे त्याचे अनेक अवशेष दृष्टीस पडतात. अंकोरयोम या त्या वेळच्या राज-धानीच्या शहरी बांधलेले ' अंकोरवात ' हे देवालय, तसेच मूर्ती, लिंगे इत्यादींचे अवशेष येथे आढळतात. येथे शैवसंप्रदायी लोक अद्याप कमी नाहीत. त्यांना ' चाम ' अशी संज्ञा आहे.

हिंदूंच्या मागोमाग बौद्धधर्मियांनी आपल्या धर्माचा येथे जोरदार प्रसार केला. कंबोडिअन लोक इतरांप्रमाणे बौद्ध संप्रदायी झाले तरी शिव व विष्णू यांची उपासना ते करतात ! अहिंसेचे व्रत ते कडक रीतीने पाळत नाहीत. त्यांचे धार्मिक विधी हिंदू लोकांप्रमाणेच आहेत. धार्मिक पुरोहितांचे प्राबल्य येथे विशेष असून सर्व धार्मिक विधी त्यांच्याचमार्फत होत अस-तात. यांचे धर्मग्रंथ पाली भाषेत आहेत.

कंबोडियाची स्वाभाविक रचना वैशिष्ट्यपूर्ण अशी आहे. भोवताली डोंगराळ प्रदेश असून मधला भाग सपाट मैदानाचा पण खोलगट असा आहे. या मैदानाला ' टोनले सॅप 'चे मैदान म्हणतात. हा खोलगट मैदानी

भाग पूर्वीच्या काळी सयामच्या आखाताचा भाग असावा असे शास्त्रज्ञांचे मत आहे. भूगर्भातील खळबळीमुळे भूपृष्ठावर अनेक फेरफार होत असतात, त्यातलाच हा प्रकार. या समजुतीला मैदानाच्या मध्यभागी असलेल्या मोठ्या सरोवराने पुष्टी मिळते. या सरोवरालाही 'टोनले सॅप' असेच नाव आहे. हा प्रदेश नैर्ऋत्य मान्सून वाऱ्यांच्या मार्गात असल्याने येथे भरपूर पाऊस पडतो आणि सरोवर नद्यांनी आणलेल्या पाण्याने तुडुंब भरून जाते. पाण्याची पातळी ४०–५० फुटांनी चढते! आणि सरोवराचे क्षेत्र ३०० चौ. मैलांपर्यंत पसरते.

या लोकांचा मुख्य धंदा शेतीचा. विस्तृत मैदानी आणि सुपीक प्रदेश, भरपूर पाऊस आणि उष्णता यांमुळे येथे भाताचे पीक मोठ्या प्रमाणावर होते. इतर उत्पन्नात मका व रबर तसेच ऊस, तंबाखू, वेलदोडे इ. महत्त्वाची पिके होत. मिऱ्यांची मोठ्या प्रमाणावरील लागवड हे येथील वैशिष्ट्य. चहा, कॉफीही येथे होते. येथील शेतकरी ऋतुमानाप्रमाणे वर्षातून तीन-तीन पिके काढतात. त्यामुळे येथे धान्याची समृद्धी आहे.

या देशाला भरपूर समुद्रकिनारा आणि गोड्या पाण्याचे विस्तृत सरोवर लाभल्याने शेतीच्या खालोखाल २५–३० हजार लोक मच्छीमारीच्या व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह करतात.

डोंगराळ भागातील जंगलसंपत्ती विपुल असून त्याला व्यापारी महत्त्व आहे. जंगलातील लाकूडतोडीच्या व्यवसायात पुष्कळ लोक गुंतलेले आहेत.

पण कारखान्यांच्या वाढीला आवश्यक लागणाऱ्या खनिजांचा—कोळसा व लोखंड याचा—अभाव तीव्रतेने भासतो. तरीपण छोटे उद्योगधंदे सुरू करण्यात आले आहेत. त्यांत प्रामुख्याने सिगारेट्स्, आगकाड्याच्या पेट्या, दारू, कागद, चामडी इ. उद्योगांचा उल्लेख करता येईल. देशाचा औद्योगिक विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने नवीन उद्योगांच्या योजना तयार होत आहेत.

नाम पेह हे राजधानीचे शहर असून ते समुद्रापासून १७० मैल दूर आहे; पण मेकाँग नदीच्या पात्रातून छोट्यामोठ्या आगबोटी नाम पेह-पर्यंत जा-ये करू शकतात. त्यामुळे या शहराचा बंदर म्हणूनही चांगला

उपयोग होतो. त्याला व्यापारी महत्त्व प्राप्त झाले आहे. या बंदरातून काळी मिरी, मासळी, तांदुळ, मका इ. माल निर्यात होतो.

कंबोडिया हा छोटा देश असूनही त्याने आपल्या परीने संरक्षणाच्या दृष्टीने सैन्य, आरमार व विमानदल यांची व्यवस्था केली आहे. यातही एकंदर ३०–३५ हजार लोकांचा समावेश आहे. या देशाजवळ १००–१२५ विमाने आहेत. काळाबरोबर चालून आपल्या देशाची सर्वांगीण प्रगती घडवून आणण्याची जिद्द स्वतंत्र राष्ट्राला असणे स्वाभाविक आहे.

या देशाचे एका वेळचे राजे नरोडम (नरोत्तम) सिंहनुक यांनी राजेपद सोडल्यावर देशाला पूर्ण स्वातंत्र्य प्राप्त होताच लोकसत्ताक राज्याचे ते पंतप्रधान झाले.

या लोकांचे मुख्य अन्न भात व त्याच्या जोडीला मासळी असतेच. विशेष गोष्ट म्हणजे कांबोजी लोकांना मादक पेये पिण्याची फार आवड. ही पेये निरनिराळ्या प्रकारची असत. काकवीपासून ' रम ' सारखी दारू ते तयार करीत.

येथील पुष्कळशी नगरे तटबंदीची असत. या तटबंदीच्या काही भिंती इतक्या रुंद असत की त्यांवर झाडांच्या रांगा लावीत ! प्राचीन काळच्या एका राजधानीचा विस्तार सात मैलांचा असून त्याच्या भोवती खंदक आणि तटबंदी होती. ! आत शिरण्याकरिता केलेल्या पुलांवर एकेका बाजूला ५४ दगडी राक्षसांच्या मूर्ती बसविलेल्या होत्या ! पूल कमानींवर बांधलेले असून कमानींना नवतोंडी नागांचा आकार दिलेला होता ! दरवाजांवर बुद्धाचे मोठमोठे दगडी पुतळे असून त्यांना पाच-पाच तोंडे होती !

टेकडीवरील एका देवळासमोर दोन सोन्याचा मुलामा दिलेल्या सिंहांच्या मूर्ती होत्या. सिंहाच्या आकृतीवरून बुद्धाच्या शाक्य सिंह या नावाचा बोध होतो. म्हणून अशोकाने बांधलेल्या स्तूपांवर सिंहाच्या मूर्ती बसविलेल्या असतात, त्यांना सिंहस्तंभ म्हणतात.

पूर्वीच्या काळी राज्यातील अधिकाऱ्यांचा दर्जा त्यांच्या मानमरातबावरून ओळखता येत असे. मानमरातबाचा प्रकार पालखीचा मान, भोयांचा

पोषाख, छत्र व त्यांचे दांडे आणि छत्रांची संख्या इ. गोष्टींवर अवलंबून असे. अगदी वरच्या दोन दर्जाच्याच अधिकाऱ्यांना पालखीचा मान असे. छत्रांचे दांडे सोनेरी, रुपेरी असून त्यांची संख्याही त्यावरच अवलंबून असे. चार छत्रांचा मानकरी हा सर्वश्रेष्ठ व एक छत्राचा कनिष्ठ. छत्राच्या प्रकारांवरून अधिकाऱ्यांचा दर्जा दर्शविण्याची पद्धत ही कांबोजी लोकांतच विशेष असते. बौद्ध भिक्षूंना छत्रांचा मान होता आणि त्यावरूनच त्यांना ' तलपतिन् ' असे उपपद लावीत असत.

व्हिएटनाम— इंडोचीनच्या अगदी पूर्वेकडील लांबट आकाराचा हा देश आहे. फार प्राचीन काळी आताच्या उत्तर व्हिएटनामच्या भागात इंडोनेशियातील ' चाम ' या जमातीची सत्ता होती. पुढे दुसऱ्या शतकात हिंदू संस्कृतीचा प्रसार सुरू झाला आणि ती त्या भागात चांगली रुजलीही. चाम लोक हे उत्तम दर्यावर्दी असून मसाल्याचे जिन्नस, लाकूड, हस्तिदंत इ. वस्तूंचा ते व्यापार करीत. यांची सत्ता या भागात हजार–बाराशे वर्षे अव्याहत चालू होती. कालांतराने चीनने हा भाग आपल्या हुकमतीत आणला. त्याला ' अन्नाम ' किंवा दक्षिणचा सुभा असे वेगळे नाव दिले. येथील चिनी राजवटीमुळे हिंदू संस्कृतीला उतरती कळा लागली आणि चिनी संस्कृतीचा प्रसार होऊ लागला. या अन्नामी लोकांनी चिनी जू झुगारून देण्याचा अनेक वेळा अयशस्वी प्रयत्न केला, पण शेवटी हा प्रयत्न यशस्वी झाला. अन्नाम प्रांत स्वतंत्र झाल्यावर त्याला ' व्हिएटनाम ' म्हणण्यात येऊ लागले.

पुढे या राज्यात वारसासंबंधी तंटे निर्माण होऊन संघर्ष सतत चालू राहिला. या परिस्थितीचा फायदा घेऊन फ्रेंचांनी हा सर्व प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली आणला.

दुसऱ्या महायुद्धानंतर येथून फ्रेंचांना आपले चंबूगवाळे आवरावे लागले. जिनेव्हा येथे इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स तसेच रशिया, चीन इ. राष्ट्रांच्या पुढाऱ्यांनी लाओस व कंबोडिया या देशांच्या प्रतिनिधींबरोबर विचार-विनिमय करून व्हिएटनामचे विभाजन पक्के केले. २१ जुलै १९५४ रोजी



वरील सर्व राष्ट्रांनी ठराव करून उत्तर व्हिएटनामवर साम्यवादी मतप्रणालीचे व दक्षिण व्हिएटनामवर लोकशाही पद्धतीचे राज्य असावे असे ठरविले.

साम्यवादी उत्तर व्हिएटनामचे साम्यवादी पुढारी डॉ. हो चि मिन्ह हे पहिले राष्ट्राध्यक्ष झाले. आता या राष्ट्राला रशिया चीन, इ. साम्यवादी देशांनी भरपूर मदतीची आश्वासने आणि मदत दिली. हॅनोई हे या राज्याचे मुख्य शहर.

दक्षिण व्हिएटनाममध्ये लोकशाही राज्यपद्धतीनुसार राजे बाओदाई यांना दूर सारून लोकांनी मुख्य प्रधान एंगो दिन दियेम यांना राष्ट्राध्यक्षपदाचा मान दिला. यांनी लगेच दक्षिण व्हिएटनाम हे स्वतंत्र प्रजासत्ताक झाल्याची घोषणा केली. अध्यक्ष होताच सर्व लष्करी सत्ता त्यांनी एकत्र केली, आणि देशातील क्रांतिकारक साम्यवाद्यांचा पक्का बंदोबस्त केला. दोन्ही भागांचे एकीकरण करण्याचा प्रश्न त्याने निर्धाराने डावलला आणि खरी लोकशाही प्रस्थापित केली. या नव्या राज्याला इंग्लंड, अमेरिका या लोकशाही राष्ट्रांनी सर्व तऱ्हेची मदत देण्याची आश्वासने देऊन त्याप्रमाणे ती दिलीही. व्हिएटनामचे विभाजन पक्के झाले. सायगाव हे या राज्याचे मुख्य शहर.

उत्तर व्हिएटनाम किंवा साम्यवादी प्रजासत्ताक— या राज्यात ८५ टक्के व्हिएटनामी असून उरलेले मागास लोक डोंगराळ भागात वास्तव्य करून आहेत. हजारो चिनी लोक येथील विविध क्षेत्रांत आणि उद्योधंद्यांत गुंतलेले असून त्यांचा वरचष्मा तेथे स्पष्टपणे दिसून येतो.

हा देश कृषिप्रधान असून तेथील मुख्य उत्पन्न भाताचे आहे. या उत्पादनाच्या बाबतीत हा देश स्वयंपूर्ण आहे. इतर उत्पादनात ऊस, मका, कापूस, चहा, तंबाखू इ. पिके काढली जातात. शेतीच्या व्यवसाया-खेरीज पुष्कळ लोक निरनिराळ्या प्रकारच्या कारखान्यात गुंतले आहेत. सिमेंट, कापड, साखर, काड्याच्या पेट्या, सिगारेट्स्, काच, होजिअरी, विजेचे दिवे, उपकरणे इ. विविध उद्योगधंदे चिनी आणि इतर साम्य-वाद्यांच्या मदतीने उभारलेले आहेत. है फाँग हे येथील उत्कृष्ट आणि गजबजलेले बंदर आहे.

या छोट्या राष्ट्राने मदत आणि कर्जाऊ रकमा घेऊन देशाच्या औद्योगिक वाढीकरिता पंचवार्षिक योजना तयार केली आहे.

व्हिएटनामच्या राजकारणाचे सूत्रधार डॉ. हो चि मिन्ह यांनी घरची गरिबी असूनही फ्रान्समध्ये जाऊन देशाच्या स्वातंत्र्याकरिता तेथे एक साप्ताहिक चालविले आणि एक संघटनाही उभारली. रशिया व चीन देशांचा दौरा आटपून ते थायलंडमध्ये आले. पण त्यांच्या साम्यवादी प्रचा-राला आणि चळवळीला अपेक्षित पाठिंबा मिळू शकला नाही. थाय सर-कारने त्यांची उचलबांगडी करून त्यांना हाँगकाँगला पाठवून दिले. दुसऱ्या महायुद्धानंतर डॉ. हो चि मिन्ह यांनी सबंध इंडोचायना स्वतंत्र होण्या-करिता म्हणजे त्यांच्या दृष्टीने साम्यवादी होण्याकरिता संग्रामाची संघटना उभारली. या संघटनेला ' व्हिएट मिन्ह ' असे नाव आहे. इंडोचीनमधील लाओस, कंबोडिया, दक्षिण व्हिएटनाम या राज्यात साम्यवाद रुजविण्याच्या उद्देशाने गनिमी काव्याने असंतोष निर्माण करण्याचे कार्य त्यांनी सुरू केले.

दक्षिण व्हिएटनाम— या देशाचा उत्तर भाग डोंगराळ असून दक्षिण प्रदेशातच फक्त मैदानी भाग आहे. हा मैदानी भाग मेकाँग नदीच्या मुखाजवळील विस्तृत असा त्रिभूज प्रदेश असला तरी तो फारच मर्यादित आहे. हाच तेवढा शेतीच्या उत्पन्नाला विशेष उपयोगी पडणारा असा भाग आहे.

या राज्यातील बहुसंख्य लोक प्रामुख्याने बौद्धधर्मीय असून ते लाओ पंथाचे आहेत.

मान्सून हवामान असणाऱ्या या प्रदेशातील लोकांचा प्रमुख धंदा शेतीचा आहे, तांदळाचे पीक भरपूर. चहा, कॉफी, सिंकोना, तंबाखू, दालचिनी, ऊस, नारळ इ. इतर पिके होत. रबर आणि दालचिनी ही विशेष महत्त्वाची आहेत, येथील दुसरा मोठा उद्योग म्हणजे मच्छीमारीचा. लोकांच्या खाण्यात मासळी विशेष येत असल्यामुळे त्याच्या उत्पादनात पुष्कळ लोक गुंतलेले आहेत.

खनिज संपत्ती या देशात विशेष नसल्यामुळे येथे मोठमोठाले कारखाने किंवा उद्योगधंदे असू शकत नाहीत. तरी पण पाश्चात्त्यांच्या मदतीने काही कारखान्यांची उभारणी होऊ घातली आहे. कापडगिरण्या, तागाच्या गिरण्या, दारू गाळण्याचे कारखाने तसेच कागद, सिमेंट, साखर, यांचे उद्योग काही प्रमाणात सुरू झालेले आहेत.

काही मागासलेल्या जमाती डोंगराळ भागात वास्तव्य करून आहेत.

हे राज्य प्रजासत्ताक बनल्यावर त्याचे पहिले राष्ट्राध्यक्ष एंगो दिन दियेम हे होत. पुढे अनेक लष्करी क्रान्त्या होऊन सत्ता निरनिराळ्या लष्करी अधिकाऱ्यांच्या हातात जाई.

आज (सन १९६७) उत्तर व दक्षिण व्हिएटनाममध्ये संघर्ष चालू आहे. दोन्ही देशांत संरक्षणाच्या आणि आक्रमणाच्या योजनांप्रीत्यर्थ आर्थिक सामर्थ्य आणि मनुष्यबळ खर्ची होत आहे. दोन्ही देशांजवळ खडे सैन्य, नाविक दल आणि विमानदल असून त्यांत लाखो लोक गुंतलेले आहेत. हे दोन्ही देश छोटे असले तरी तरी त्यांचे पाठीराखे बलवान राष्ट्रे आहेत. उत्तर व्हिएटनाम या साम्यवादी राष्ट्राला रशिया, चीन इ. राष्ट्रांचे प्रोत्साहन असून दक्षिण व्हिएटनामला अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्राची सर्व तऱ्हेची मदत मिळत आहे.

हा लढा आता वस्तुतः जगातील सामर्थ्यवान अशा लोकशाही आणि साम्यवादी राष्ट्रांचा बनला आहे, पण बिचारी व्हिएटनामी जनता मात्र भरडून निघत आहे. या युद्धाबाबत अमेरिकन सरकारला अमेरिकन जनता विरोध दर्शवीत आहे. पण अमेरिकेने हा प्रतिष्ठेचा प्रश्न बनविला आहे.

● ● ●

११. ज्यू अथवा यहुदी लोक

ज्यू लोकांचा देश इस्राएल. विस्ताराने हा अतिशय लहान असून जगातील स्वतंत्र राष्ट्रांत हे अगदीच छोटे राष्ट्र आहे. इस्राएल देश मूळ पॅलेस्टाइनचा पश्चिम भाग असून पूर्व भागात अरबांची सत्ता आहे.

आज (सन १९६७) इस्राएल आणि इजिप्त यांच्यात युद्ध सुरू असून युद्धजन्य परिस्थिती कायम आहे.

पॅलेस्टाइन ही ज्यू लोकांची जन्मभूमी किंवा पितृभूमी, पण त्यांच्या दुर्दैवाने जवळपासच्या प्रबळ देशांनी आक्रमणे करून ज्यूंना देशांतर करावयास लावले. बिचारे ज्यू वाट सापडेल त्या देशात जाऊन तेथे स्थायिक होण्याचा प्रयत्न करू लागले.

गॅलिलीचा समुद्र व जॉर्डन नदीचे दोन्ही तटाक यांच्या परिसरांना धार्मिक आणि राजकीय महत्त्व प्राप्त होऊन तो भाग असंख्य राजकीय घडामोडींनी विख्यात झालेला आहे. जॉर्डनच्या पाण्यानेच योगी योहान याने येशूला धर्मदीक्षा दिली आणि याच भागात येशू ख्रिस्ताचा संचार होऊन त्याच्या अवतारलीला घडलेल्या आहेत. याच्या स्पर्शाने पावन झालेल्या विहिरी, तळी, वास्तू आणि प्रार्थनामंदिरे जगातील कोट्यवधी लोकांची श्रद्धास्थाने बनलेली आहेत. ज्यू लोकांच्या डेव्हिड सालोमन या विख्यात राजाने उभारलेले जेरुसलेम हे ठिकाण येशूच्या बलिदानाने श्रद्धेय स्थान बनल्यास आश्चर्य नाही. तसेच इस्लामचा प्रवर्तक महंमद पैगंबर याचेही स्वर्गारोहण येथेच घडले. तेव्हा ख्रिश्चन व मुसलमान लोकांचे जेरुसलेम हे धर्मक्षेत्र बनले आहे. जेरुसलेमच्या नजीकची ' झिऑन ' टेकडी तर जगातील सर्व यहुदी धर्माच्या लोकांच्या राजकीय व धार्मिक शक्तींचे केंद्र बनली. येथील पुरातन मंदिराचे पवित्र अवशेष ही त्यांची स्फूर्तिस्थाने होत.

ज्यू लोकांना यहुदी तसेच हिब्रू असेही म्हणतात. ज्यू लोकांचा इतिहास

४००० वर्षांचा प्राचीन असून त्यांच्या भागाला ‘ कनान ’ असे नाव होते. नंतर रोमन लोकांनी त्याला पॅलेस्टाइन हे नाव दिले.

ज्यू लोक अरब लोकांप्रमाणेच आपल्या वंशाचा आदिपुरुष ‘ सेम ’ समजतात. त्यावरूनच त्यांना सेमिटिकवंशीय म्हणतात. या वंशाचे लोक उंच बांध्याचे, सरळ नाकाचे आणि गौर वर्णाचे असतात. तेव्हा ज्यू व अरब यांच्यात नंतर खूप फरक पडत गेले तरी काही गोष्टींत साम्य आढळते. सेमिटिक संस्कृती अतिशय प्राचीन असून खगोलशास्त्र आणि वर्णमाला यांच्या बाबतींत हे लोक फार पुढारलेले होते.

हिब्रू लोकांचा मूळ पुरुष आब्राहम याचाच विस्तारलेला वंशवेल म्हणजे आज जगभर पसरलेला यहुदी किंवा ज्यू समाज होय. आब्राहम या दैवी पुरुषाला पॅलेस्टाइनमध्ये जाऊन वस्ती करण्याची परमेश्वरी प्रेरणा झाली. याच घटनेमुळे पॅलेस्टाइनला ‘ईश्वरदत्त भूमी’ (Promised land) असेही म्हणतात. अब्राहामला एक मुलगा व दोन नातू होते, त्यांपैकी एकाचे नाव जॅकोब होते. कनान भागात दुष्काळ पडल्यामुळे जॅकोबला आपल्या विस्तारलेल्या कुटुंबासह आणि शेळ्या-मेंढ्यांच्या कळपासह इजिप्त-मध्ये जावे लागले. इजिप्तमध्ये आलेल्या जॅकोबलाच ‘ इस्राएल ’ असे म्हणत. याच नावावरून त्याच्या वंशजांना इस्राएल किंवा इस्रलाएट असे म्हणण्यात येऊ लागले.


कालांतराने इजिप्तमधील सेमाइट राजवट कोसळल्याने इस्राएल लोकांचे दैव फिरले आणि त्यांना गुलामांचे जीवन जगावे लागले! या लोकांच्या लोकसंख्येवर बंधन घालण्याच्या दृष्टीने कुटुंबातील पहिले मूल नदीत बुडवून टाकण्याची राजाज्ञा झाली! असेच एक मूल नदीत तरंगत असलेले पाहून तेथे स्नानाकरिता गेलेल्या राजकन्येने त्याला वाचविले. त्या मुलाला ‘ मोझेस ’ असे म्हणण्यात येऊ लागले. मोझेसचा अर्थ ‘ बाहेर काढलेला ’ (या ठिकाणी पाण्याच्या बाहेर काढलेला) असा आहे.

मोझेस मोठा झाल्यावर आपल्या मेंढ्यांचे कळप पाळीत असता सिनाई पर्वतावर जाळ दिसू लागला आणि त्यातून त्याला आकाशवाणी ऐकू आली, ‘ तू या माझ्या इस्राएलच्या लेकरांना घेऊन बाहेर पड. ’ मोझेसने आपल्या अलौकिक नेतृत्वाच्या जोरावर ज्यू समाजाला गुलामागिरीच्या

दास्यातून मुक्त केले. ही अपूर्व घटना खि. पू. १२६६ मध्ये म्हणजे सुमारे ३००० वर्षांपूर्वीची आहे. या घटनेमुळे मोझेस महत्पदास चढला. त्याने आपल्या संघटित समाजाला दहा आदेश दिले. त्यांतील काही—यहोवा हा तुमचा देव, त्याने तुम्हाला इजिप्तमधून बाहेर पडण्याचा मार्ग दाखविला, त्याच्याशिवाय दुसरा देव मानू नका. प्रार्थनेचा दिवस (शनिवार) लक्षात ठेवा. चोरी, व्याभिचार व मनुष्यहत्या करू नका इ. ज्यू समाजाने मोझेसला देवासमान मानले.

गुलामगिरीच्या बंधनातून मुक्त झाल्यानंतर इस्राएली टोळ्यांनी निमओसाड प्रदेशात संघटितपणे वास्तव्य करून आपले सांस्कृतिक जीवचांगलेच सुधारले आणि भूमातेची निःसीम सेवा करून वाळवंटी भागाचे नंदनवन बनविण्याकरिता भगीरथ प्रयत्न सुरू केले. ' घाम गाळून भाकरी मिळवा, ' या बायबलमधील वचनाचा अक्षरशः अंगीकार केला. त्यांनी आपला देश ' दुधा—मधाचा देश ' बनविला.

ज्यूंच्या जेरुसलेम या राजकीय महत्त्वाच्या आणि झिओन टेकडीवर



उभारलेल्या एकमेव धर्मक्षेत्राची नासधूस परक्या आक्रमकांनी इतक्या वेळा केली की, तिला इतिहासात तोड नाही. पण ज्यूंनी त्याची वरच्यावर

उभारणी करून धर्मावरील आपला दृढ विश्वास परक्यांच्या निदर्शनास आणलेला आहे. जेरुसलेम हे ज्यूंचे सर्वस्व. प्रार्थना करताना हे लोक जेरुसलेमकडे तोंड करतात. तेथील भंगलेल्या मंदिराची सतत स्मृती व्हावी म्हणून मंदिराच्या पडक्या भिंतींचे हृदयविदारक चित्र हे लोक घरात ठळक ठिकाणी लावून ठेवीत. या चित्रावर ' दुःखित भिंत ' (Wailing wall) असे अन्वर्थक शीर्षक असते.

' बायबल ' मधील जुना करार ज्यू लोकांचा एकमेव पवित्र ग्रंथ. हा हिब्रू भाषेतच लिहिलेला आहे. हा एक प्रकारे ऐतिहासिक ग्रंथ आहे. ज्यू राजांच्या आणि द्रष्टे लोकांच्या जीवनातील विचारांचे धन यात साठविलेले आहे, शेकडो वर्षांच्या कालखंडातील हे संग्रहित धन आहे. सीरिया प्रांतातील बायब्लोस बंदरातील लव्हाळ्यांपासून बनविलेल्या कागदाला ' बायब्लिऑन् ' म्हणत आणि या कागदावर लिहिले गेलेले म्हणून ' बायबल ' हे नाव त्या ग्रंथाला प्राप्त झाले. बायबलचे तीन खंड आहेत. त्यांपैकी पहिला खंड ' तोरा ' (Torah). हा विशेष महत्त्वाचा समजला जातो. बायबलच्या हस्तलिखित पोथ्या ज्यूंच्या घराघरातून मोठ्या भक्तिभावाने वाचल्या जात. ज्यू दिगंतरी पांगले तरी त्यांनी बायबलचा तारक आणि प्रेरक असा अमोलिक ठेवा सतत बाळगला आहे. बेन गुरियान म्हणतो, " ...तो केवळ ग्रंथ नव्हता...त्यात आमचे स्वत्वच सामावलेले होते...त्याच्या रूपाने आमच्या जिवाभावाचा स्वदेशच आम्ही बरोबर नेला होता... "

ज्यूंच्या देशावर असंख्य वेळा आक्रमणे होऊन त्यांची कत्तल आणि ससेहोलपट चालू होती. या धुमश्चक्रीत यश आणि अपयश, स्वातंत्र्य आणि पारतंत्र्य यांचे चक्र सतत फिरत होते. पण ज्यू लोकांची चिकाटी, शौर्य, सहनशीलता आणि मातृभूमीचे प्रेम इ. गुणांची परिसीमा आढळते. खरोखर या जगात ज्यूंच्या इतका छळ कोणाचाच झालेला नसेल. अवमानित जीवन आणि सामुदायिक हत्याकांड यांची हकीकत अंगावर शहारे आणणारी आहे. त्यांच्या देशात त्यांना बंदी ! असंख्य ज्यूंना मायभूमी सोडून हजारो मैल दूरवरच्या देशांत जाऊन वास्तव्य करावे लागले. शरीराने ते दूर गेले तरी मायभूमी आणि जेरुसलेम यांचा विसर त्यांना कधीच पडला नाही. केवळ आत्मिक बळाच्या जोरावर भविष्यकाळाकडे आशेने नजर लावून

हे लोक कित्येक शतके म्हणजे शेकडो वर्षे आपले जीवन जगत होते. त्यांची दीर्घकालीन तपश्चर्या आणि असीम बलिदान अगदीच निष्फळ ठरले नाही. सन १९१७ मध्ये आशेचा अंधुक किरण त्यांना दिसला; आणि १९४८ मध्ये स्वातंत्र्यसूर्याने त्यांना दर्शन दिले. 'तुजसाठि मरण ते जनन। तुजवीण जनन ते मरण...' अशा विचाराने भारावून गेलेल्या असंख्य ज्यूंचे हौतात्म्य कारणी लागले.

ज्यूंच्या अनन्वित छळाचे थोडे दिग्दर्शन—

सन १३५ मध्ये रोमन लोकांनी बळाच्या जोरावर ज्यू लोकांना त्यांच्या देशातून हाकलून दिले.! 'असूनि खास मालक घरचा, चोर म्हणति त्याला' अशी त्यांची स्थिती झाली. आसरा मिळेपर्यंत देशोदेशी त्यांना पायपीट करावी लागली! रोमन साम्राज्यात जेथे त्यांना आश्रय मिळाला तो गुलाम म्हणून! जेथे तेथे लाचारीचे आणि विटंबनेचे जीवन! सन १३५ पासून सन १९४८ पर्यंत त्यांचा सर्व देशात छळ, छळ आणि छळच! येशू ख्रिस्ताला सुळावर चढविणाऱ्या ज्यूंचा ख्रिश्चन लोकांनी छळ सुरू केला. पण या सगळ्या जमातीचा छळ किती वर्षे, याला मर्यादाच उरली नाही. त्यांच्या सामुदायिक कत्तली, प्रार्थनामंदिरांच्या जाळपोळी, राबी, बायका-पुरुष-मुले यांना मनसोक्त मारपीट, घरादारांची लूट इ. प्रकार रशिया, पोलंड, जर्मनी इ. देशांत सर्रास सुरू होते. इटली वगैरे देशातून 'घेटो' अशा नावांनी त्यांच्या स्वतंत्र वस्त्या ओळखल्या जात. धर्मद्वेष, वर्ण-द्वेष व वृत्तिद्वेष अशा तीन द्वेषांतून 'घेटो' अस्तित्वात आले. घेटो म्हणजे कोंडवाडेच! संकुचित जागे भोवती भिंती आणि आत असंख्य ज्यूंचे दाटी-वाटीचे वास्तव्य! रात्री या 'कोंडवाड्या' बाहेर पडण्यास प्रतिबंध! छातीवर पिवळ्या कापडाचे एक चिन्ह लावण्याची सक्ती! शिक्षण घेण्यालाही ज्यू मुलांवर बंधने! त्यांच्या बसण्याच्या जागा वेगळ्या!

थोडक्यात, त्यांच्या छळांचे प्रकार मानवजातीला कलंक लावणारे होते, यात शंका नाही. लव्हाळ्यांप्रमाणे संकटांचा महापूर आला की, वाकावयाचे आणि ओसरला की पुन्हा उभे राहावयाचे असे धोरण त्यांना स्वीकारावे लागे. 'Sufference is the badge of all our tribe' म्हणजे 'हाल सोसणे हीच आमच्या जमातीची निशाणी' हे शेक्सपिअरने शायलॉकच्या

तोंडी घातलेले उद्गार खरोखरच अन्वर्थक म्हणावे लागतात. अगदी अलीकडे म्हणजे दुसऱ्या महायुद्धाच्या काळात तर जर्मनीच्या हिटलरने जनमेजयाच्या सर्पसत्राप्रमाणे ज्यूंचे सर्वस्व हरण करून त्यांचे हत्यांकांड निर्घृणपणे सुरू केले होते! आणि शेवटी हिटलरने काय मिळवले! तर आपल्या पितृभूमीचा छेद आणि उच्छेद!

यहुदी धर्मातील 'सबाथ'ची कल्पना ही विशेष गोष्ट आहे. शुक्रवारच्या संध्याकाळपासून शनिवारच्या सूर्यास्तापर्यंतच्या काळाला 'सबाथ' म्हणतात. सबाथ म्हणजे बिनकामाचा दिवस. माणसे तर सुट्टी घेतातच, पण गाई, बैल, गाढवे यांनाही कामापासून सुट्टी देण्याची प्रथा आहे! या दिवशी संध्याकाळी मेणबत्त्या लावून सामुदायिक प्रार्थना करतात आणि विधिपूर्वक मदिराप्राशन आणि मिष्टान्नाचे भोजन करतात. पण हे खाद्य पदार्थ गार असतात, याचे कारण चुलीलाही सुट्टी! दर सहा वर्षांनी एक वर्ष जमिनीलाही विश्रांती देण्यात यावी ही कल्पना त्यांच्या धर्मग्रंथांनी पुरस्कारलेली आहे.

देव शुद्ध भावाचा भुकेला असल्याचे उदाहरण म्हणून पुढील गोष्ट सांगतात— एक मनुष्य प्रार्थना मंदिरात सणाच्या दिवशी हिब्रू मूळाक्षरे आळवून आळवून म्हणत होता! 'ही काय निरर्थक बडबड चालू आहे?' म्हणून एकाने पृच्छा केली, त्यावर त्याने सहजपणे आणि हसत उत्तर दिले, 'मी काय म्हणतो ते देवाला नेमके कळेल.' या उद्गारात त्याची आर्तता आणि भावनेचा ओलावा स्पष्ट दिसतो.

ज्यूंचे काही सण— 'रोशहाशशाना' सण पृथ्वीच्या उत्पत्तीचा आणि आदामच्या न्यायाचा दिवस म्हणून साजरा करतात. या दिवशी भाकरी मधात बुडवून खातात. दुसरा 'योम किप्पूर' हा प्रायश्चित्ताचा दिवस उपवासात आणि दीर्घ प्रार्थनेत घालवितात. 'हान्नुका' हा सण सीरियाच्या सैन्याच्या पाडावाची स्मृती म्हणून आपल्या दीपोत्सवाप्रमाणे आनंदात साजरा केला जातो. थोडक्यात, यांचे काही सण धार्मिक स्वरूपाचे व काही ऐतिहासिक घटनांच्या स्मृतीचे असे आहेत.

जीवनोपयोगी कोणताही धंदा श्रेष्ठ व कनिष्ठ नसतो; ही कल्पना सर्व थरांतील लोकात दृढमूल झालेली आहे. यांच्यातील एक राबी आकिबा

हा लाकडे गोळा करून त्यावर उदरनिर्वाह करी ! जोशुआ याचा कोळसे पाडण्याचा धंदा असे ! जगद्विख्यात तत्त्ववेत्ता स्पिनोझा हा काचा घासून त्या गुळगुळीत बनविण्याचा उद्योग करून पोट भरी ! निवृत्त झाल्यावर पंतप्रधान बेन गुरियान यांनी मेंढ्यांचे केस कातरण्याचे काम आनंदाने स्वीकारले होते !

युरोपातील बहुतेक देशांत आणि अमेरिकेतही ज्यू लोकांचे वास्तव्य होते. जेथे जातील तेथे त्यांनी व्यापार सुरू केला, सावकारी केली व पैसाही खूप मिळविला. पण याहीपेक्षा त्यांनी आपल्या प्रखर बुद्धीची अलौकिक चमक संशोधनादी कार्यांत दाखविली. कित्येक ज्यू संशोधक नोबेल पारितोषिकाचे मानकरी झाले आहेत. जगद्विख्यात आइन्स्टाइन हा ज्यू होता. पहिल्या महायुद्धाच्या वेळी (सन १९१४–१९१८) डॉ. वाइझमन या ज्यू शास्त्रज्ञाने ॲसिटोनच्या शोधाने इंग्लंडला चांगलेच साहाय्य केले होते. याची जाणीव ठेवून सन १९१७ मध्ये ज्यू 'चे भवितव्य उज्ज्वल करणारी घोषणा इंग्लंडच्या पंतप्रधानांनी केली आणि पॅलेस्टाइनमध्ये ज्यूंचे राष्ट्रीय स्थान प्रस्थापित करण्याला मान्यता दिली. पुढे अमेरिकेचाही याला दुजोरा मिळाला.

ज्यूंना न पटणारी पॅलेस्टाइनची फाळणी होऊन ज्यू व अरब यांची दोन स्वतंत्र राज्ये स्थापन झाली. तरी पण ज्यूंना स्वातंत्र्य व स्वतंत्र राज्य प्राप्त झाल्याचा आनंद होताच. १४ मे, १९४८ रोजी इस्राएलचे स्वतंत्र राज्य अस्तित्वात आले आणि ज्याने तन-मन-धन खर्च करून हे राज्य निर्माण होण्यास जिवाचे रान केले त्या डॉ. वाइझमन यांना पहिले अध्यक्ष निवडण्यात आले आणि बेन गुरियन हे पहिले पंतप्रधान बनले.



डॉ. वाइझमन

अमेरिकेने या नवीन राज्याला मान्यता देण्याचा निर्णय जाहीर केला. पुढल्याच वर्षी इस्राएल राष्ट्रसंघाचा सभासदही झाला.

परदेशात असताना ज्यूंना परिस्थितीला नसून ख्रिश्चन धर्माची दीक्षा घ्यावी लागली. तरी सुद्धा त्यांनी आपले ' सब्राथ 'चे कुलाचार चालूच ठेवले. सार्वजनिक जीवनात वावरताना बदललेले ख्रिश्चन नाव लावावयाचे आणि घरात मात्र पूर्वीच्या हिब्रू नावांनी परस्परांना हाक मारावयाची ! ख्रिश्चन असल्याचे नाटक त्यांना बरोबर वठवावे लागे. डुकराचे मांस त्यांना निषिद्ध असूनही सार्वजनिक प्रसंगी ते खात ! स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पूर्वीची नावे त्यांनी राजरोसपणे सुरू केली.

हिब्रू ही राष्ट्रभाषा, सात मेणबत्त्या पाजळण्याची समई किंवा दीप (Menorah) हे राष्ट्राचे बोधचिन्ह आणि राजा डेव्हिडचे चिन्ह असणारा राष्ट्रध्वज आणि प्रेरक राष्ट्रगीत इ. गोष्टी निश्चित करण्यात आल्या.

शिक्षणाचे महत्त्व त्यांना आधिक्याने पटलेले होते. जरूर पडल्यास कर्ज काढावे पण आपल्या मुलीचे लग्न विद्वान पंडिताशी लावावे अशी त्यांची प्रवृत्ती असे. ज्यू लोकांना कुशाग्रबुद्धीचे वरदान होते असे म्हटले तरी चालेल. त्यांची बौद्धिक क्षेत्रातील विलक्षण प्रगती पाहून बर्नार्ड शॉ म्हणतात, ' They were born educated ' – हे अभिजात ज्ञानी व सुशिक्षित आहेत.

ज्यू लोकांची भाषा हिब्रू. इस्राएलमध्ये नव्याने येणाऱ्यांकरिता हिब्रू भाषा शिकविण्याचे वर्ग गावोगावी सुरू करण्यात आले. वृत्तपत्रे व नभोवाणी यांचाही उपयोग भाषेच्या शिक्षणाकरिता करण्यात येऊ लागला. शब्दकोश तयार झाले. शब्दसंपदा वाढविण्यात आली. एकट्या बेन येहुद या ज्यूने हिब्रू कोशाचे बरेच मोठे खंड प्रसिद्ध केले ! यात त्याने हिब्रू शब्दांची व्युत्पत्ती व त्याचे इंग्लिश, फ्रेंच, जर्मन भाषेतील प्रतिशब्द दिले आहेत ! आणि अशा रीतीने हिब्रू भाषेची राजभाषेच्या उच्च सिंहासनावर प्रतिष्ठापना झाली.

ज्यू समाजाने सर्व क्षेत्रांत मोठ्या झपाट्याने प्रगती केली. संशोधन आणि प्रयोग यांच्या जोरावर अपार कष्ट करून पडीक जमिनीची सुपीक जमीन करून अन्नधान्यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर सुरू केले. सूर्यकिरणांच्या विपुल

शक्तीचा उपयोग करण्याचे प्रयोग त्यांनी यशस्वी केले आहेत. शेळ्या-मेंढ्यांचे सामुहिक दोहन यांत्रिक पद्धतीने सुरू केले. फॉस्फरिक ॲसिड स्वस्तात बनविण्याची पद्धत त्यांनी शोधून काढली. इस्राएली शास्त्रज्ञांनी काळाला अनुसरून अग्निबाण बनविले, अणुभट्टीही उभारली आणि अणुध्वस्र बनविण्याची शक्यता निर्माण केली.

पॅलेस्टाइनमध्ये ' किबुट्झ ' हा एक वैशिष्ट्यपूर्ण अशा सामुहिक जीवनाचा महान प्रयोग सुरू झालेला होता. यातील मुख्य उद्देश सामाजिक विषमता काढून सर्वांना सुखाचे जीवन प्राप्त व्हावे हा होता. यात श्रमाची प्रतिष्ठा वाढून वैयक्तिक प्रगतीचे अनेक मार्ग दृष्टिपथात येतात, यात सक्तीचा भाग नाही. यातील प्रेरणा मातृभूमीच्या उत्कट प्रेमाची आहे. एकेका किबुट्झमध्ये १०० ते १५०० पर्यंत स्त्री-पुरुष असतात. प्रत्येकाला ८-९ तास काम करावे लागते. येथे स्वयंपाक, धुलाई, शेतकाम, भोजन, करमणूक इ. सर्व गोष्टी सामुहिक पद्धतीनेच होत असतात. किबुट्झमध्ये विवाहितांना सहकुटुंब प्रवेश मिळतो.

' हिस्ताद्रुत ' ही या देशातील प्रचंड आणि प्रभावी कामगार संघटना सन १९२० मध्ये स्थापन झाली. हिचे साडेपाच लाख सभासद असून राष्ट्रीय जीवनाची अंगोपांगे व्यापणारी आणि विधायक कार्य करणारी अशी ही संस्था आहे. हिच्या ३०-३५ शाखा असून त्या देशभर पसरलेल्या आहेत. कामगारांचे जीवन सुसह्य करणे आणि सुख-सोईंचा विचार करून प्रगतीचे मार्ग आखणे हे या संघटनेचे ध्येय आहे.

' मोशाव ' हाही एक सामुहिक जीवनाचा नवीन प्रकार सुरू होऊन त्याचा प्रसारही खूप झाला. कष्ट करण्याला सगळेच तयार, आपखुशीने. मग विविध क्षेत्रांतील उद्योगधंद्यांची वाढ झपाट्याने सुरू झाली. सर्व प्रकारची उत्पन्ने आणि उत्पादने वाढली. राष्ट्रप्रेमाची आंतरिक प्रेरणा जबरदस्त म्हणून या छोट्या राष्ट्राने सर्व क्षेत्रात कौतुकास्पद प्रगती करून दाखविली.

येशू हा ज्यूच; पण त्याने ज्यू समाजात बोकाळलेल्या दांभिकपणावर कडक टीका केली. मंदिरांची अवहेलना त्याला पाहवेना. अशा उद्विग्न स्थितीत ' देवाचे मंदिर मोडावयास व ते पुन्हा तीन दिवसांत बांधावयास

मी तयार आहे,' असे उद्गार काढल्यावर धार्मिक लोक खवळले त्यांनी त्याच्यावर पाखंडी दर्पोक्ती केल्याचा आरोप करून खटला भरला; आणि शेवटी त्याला शिक्षा देण्याचे ठरविले. पण त्याला वधस्तंभावर खिळवून ज्यूंनी ठार मारले की रोमन लोकांनी हे कृत्य केले हा वादाचा प्रश्न आहे. आमच्यात अशा रीतीने ठार मारण्याचा प्रकार नाहीच, असे ज्यूंचे म्हणणे आहे. खरे-खोटे परमेश्वर जाणे, पण ख्रिश्चन लोकांच्या दृष्टिकोणातून एका शुद्ध-चरित व साधुवृत्तीच्या धर्मसुधारकास आणि ज्याच्यामुळे पुढे नवीन धर्माची प्रतिष्ठापना झाली, त्या येशूच्या अंगाला खिळे ठोकून ठार मारले, अशा या भयंकर कृत्यामुळे ज्यूंविषयी ख्रिश्चन लोकांत मनस्वी चीड आणि संताप उद्‌भुत होणे स्वाभाविक आहे.

अरब व ज्यू दोघेही सेमेटिक वंशातले असल्यामुळे त्यांच्यात काही बाबतींत साम्य आढळून येणे स्वाभाविक आहे. अरबी लिपीप्रमाणे ज्यूंची हिब्रू लिपी लिहिताना उजवीकडून डावीकडे लिहिण्याची पद्धती आहे. लिपी-प्रमाणे दोघांच्या भाषेतही साम्य आहे. दोघांच्यात मृत्यूनंतर शव पुरण्याची प्रथा आहे. याला भौगोलिक परिस्थिती करणीभूत म्हणावी लागेल. वाळवंटी भागातून शेळ्यामेंढ्यांचे कळप घेऊन हिंडणाऱ्या लोकांना मृताची व्यवस्था लावण्याचा एकच मार्ग असतो. वाळूत खड्डा खणावयाचा व त्यात मृत देह ठेवून त्यावर वाळू सारखी करावयाची म्हणजे झाले. नाहीतर तेथे लाकडे कशी मिळावयाची ? आणखी विशेष म्हणजे 'सुन्ता' करण्याची प्रथा दोन्ही जमातींत आहे. ज्यू लोकांत आठव्या दिवशी 'सुन्ता' करतात, पण मुसलमानांत ती पुढे करतात. मुस्लीमांच्या कुराणात पुष्कळशा गोष्टी बायबलमधील गोष्टींना अनुसरून दिलेल्या आढळतात.

ज्यू लोकांत सांघिक प्रार्थनेला विशेष महत्त्व आहे, आणि हीच प्रथा पुढे ख्रिश्चन व मुसलमान समाजात रूढ झाली. सांघिक प्रार्थनेच्या वेळी किमान दहा लोक तरी असावेत, असा दंडक आहे. हे एवढे लोक हुकमी मिळावेत म्हणून एकाने आपल्या पदरच्या दहा गुलामांना मुक्त करून आपल्याबरोबर प्रार्थनेला बसविले ! प्रार्थना करताना हे लोक जेरुसलेमकडे तोंड करतात.

साठ लक्ष ज्यूंना जर्मनीत निष्ठुरपणे कंठस्नान घालणाऱ्या अडॉल्फ आइकमनला सन १९६० मध्ये अर्जेंटिनामधून मोठ्या शिताफीने पकडून आणण्याचा विक्रम ज्यूंनी केला. जगाच्या धमक्यांची आणि निषेधाची पर्वा न करता ज्यूंनी त्याला फासावर चढविले.

ज्यू लोकांत दुर्दम्य आशावाद आढळतो. १८०० वर्षे अनान्वित छळ सोसून उज्ज्वल भविष्यकाळावर दृष्टी स्थिरावून ते काळ कंठीत होते. आपण स्वतंत्र होणार, आपल्या देशात जाऊन आपण देशाचे नंदनवन करणार हा ध्यास प्रत्येक ज्यूने धरला होता. त्यांचा आत्मविश्वास काळाच्या ओघात बळावत चाललेला होता. ज्यू मनुष्य कोठेही आणि कितीही दूर असो, ध्यानी, मनी व स्वप्नी जेरुसलेम आणि झिऑन टेकडी यांचा सतत विचार आणि स्मरण ! या विचारसरणीला मूर्त स्वरूप देण्याकरिता डॉ. वाइझमन यांनी ' झिऑन 'च्या प्रेरक नावाने सन १८९७ मध्ये ' झिऑन कॉंग्रेस 'ची स्थापना केली. पण या कॉंग्रेसची अधिवेशने परक्या देशात भरत ! सुरवंटाचे रूपांतर जसे सुंदर फुलपाखरात होते, तसे इतक्या वर्षांनंतर गुलामगिरीचे रूपांतर स्वातंत्र्यात झाले आणि हाच स्वतंत्र इस्राएल देश.

ज्यू लोकांची कोणत्याही बाबतीतील जिद्द खरोखर वाखाणण्यासारखी आहे. आपले संस्कृतिसंरक्षण करण्याच्या दृष्टीने ' तालमुद ' नावाचा एक फार मोठा ग्रंथ त्यांनी तयार केला. त्याला ज्ञानकोश म्हटले तरी चालेल. समाजातील श्रेष्ठ विचारवंत व पंडित यांनी सांगितलेल्या आख्यायिका व दंतकथा यांचा संग्रह तयार केला. यात इतिहास, लोकवाङ्मय, वैद्यक, प्राणिशास्त्र, भूगोल, नीतिशिक्षण, खगोलशास्त्र, विज्ञान, तर्कशास्त्र, इ. अनेक विषयांची माहिती दिली आहे. या ग्रंथरचनेची कामगिरी ज्यूडा आकिबा व मेइयर यांनी पार पाडली.

या छोट्या देशात लोकांच्या सामाजिक स्वास्थ्याकडे खूपच लक्ष दिलेले आढळते, काही योजना पाहा— (१) राष्ट्रीय इन्शुअरन्स योजना सक्तीची, (२) प्रत्येक कामकऱ्याला निवृत्तिवेतनाची योजना, हे वेतन अवलंबी माणसांनुसार दिले जाते ! (३) मुलांच्या पोषक अन्नाकडे अधिक लक्ष, (४) कोणत्याही कारणाने काम करू न शकणाऱ्या कामगारांची

व्यवस्था, (५) ‘ वृद्धांची खेडी ’ ही नवीन योजना कार्यवाहीत आलेली आहे.

वर्तमानपत्रांची संख्या या छोट्या देशात सकाळची २० व दुपारची दोन अशी आहे. त्यांतील पुष्कळशी हिब्रू भाषेत असली तरी काही अरबी, इंग्लिश, फ्रेंच, जर्मन, हंगेरियन भाषेत प्रसिद्ध होतात. साक्षरतेचा प्रसार या देशात खूपच असून विद्यासंपादनाची आवड यांच्यात आधिक्याने आहे. हिब्रू विश्वविद्यालय हे शास्त्रीय विषयांचे पहिले विश्वविद्यालय सन १९२५ मध्ये स्थापन होऊन त्यात अनेक विद्याशाखा आहेत. ‘ वाइझमन इन्स्टिटयूट ऑफ सायन्स ’ ही सन १९४९ मध्ये वाइझमननेच स्थापन केली. देशाच्या औद्योगिक विकासाला शास्त्रांचे ज्ञान आवश्यक आहे ही त्याची ठाम समजूत होती.

●●●

१२. इराकी लोक

इराकी जनता प्रामुख्याने निरनिराळ्या पंथांच्या अरबांची असून हे सारे मुस्लिम धर्माचे आहेत. इराकचे पूर्वीचे नाव मेसापोटेमिया होते. याचा अर्थ दोन नद्यांमधील प्रदेश. या दोन नद्या म्हणजे तैग्रिस व युफ्राटिस. या नद्यांमुळे येथील भाग अतिशय सुपीक होता. या भागात एके काळी मोठमोठी साम्राज्ये नांदली. याच भागात बाबिलोनियाचे प्राचीन साम्राज्य होते. उन्नत अशा मानवी समाजाला यथच सुरुवात झाली असे म्हणतात.



बाबिलोनियाची संस्कृती अतिप्राचीन समजली जाते. येथे अनेक संस्कृत्या उदयास आल्या आणि त्यांचे अवशेषात्मक भाग आजही पाहावयास मिळतात.

हल्ली विसाव्या शतकात येथील तेलाच्या विपुल साठ्यांमुळे इराकला आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त होऊन त्यावर वर्चस्व गाजविण्याची निरनिराळ्या प्रबळ राष्ट्रांत चढाओढ सुरू होऊन अनेक गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण झाले. पहिल्या महायुद्धापूर्वीच्या (सन १९१४) काळात हा तुर्क लोकांचा प्रांत होता. पण पुढे सन १९१८ नंतर या भागाचा राज्यकरभार ब्रिटिशांकडे आला. ब्रिटिशांनी याला स्वतंत्र राष्ट्र बनविले तरी राज्यसूत्रे मोठ्या धूर्ततेने त्यांनी

आपल्याच हातात ठेवली. ! येथील बहुसंख्य लोक अरब असून त्यांनी ब्रिटिशांच्या राजनैतिक कारवाया हाणून पाडण्याकरिता अनेक बंडे उभारली, पण ती यशस्वी झाली नाहीत. सन १९५८ च्या १४ जुलैला इराकी लोकांनी एकजुटीने आणि धडाडीने पुन्हा एकदा उठाव केला आणि या वेळी मात्र त्यांना यशःश्रीने माळ घातली. या उठावाचे नेतृत्व अब्दुल सलम महंमद अरिफ यांच्याकडे होते. याने सर्व सत्ता आपल्या हाती घेऊन प्रजासत्ताक राज्यपद्धतीची स्थापना केली, आणि अध्यक्षपद भूषविण्याचा पहिला मान मिळविला.

इतर अरब राज्यांप्रमाणेच इराकचीही साक्षरतेच्या बाबतीतील स्थिती होती. पण नव्या इराकी सरकारने शिक्षणाच्या सर्व क्षेत्रांत प्रगतीची पावले उचलण्याचे ठरविले. प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्यात आले, दुय्यम शिक्षणही मोफत देण्याची योजना आखण्यात आली. प्राथमिक शिक्षणाचा सहा वर्षांचा अभ्यासक्रम पुरा झाल्यानंतर परीक्षा होई. या परीक्षेनंतर माध्यमिक शिक्षण तीन वर्षांचे आणि त्यानंतर महाविद्यालयीन शिक्षणाच्या तयारीकरिता आणखी दोन वर्षांचा अभ्यासक्रम अशी योजना आहे. विशेष म्हणजे इराकमध्ये उच्च शिक्षण मोफत आहे. मुलीं- मध्येही शिक्षणाचा प्रसार होत आहे. बगदादचे विश्वविद्यालय जुने असून प्राचीन काळापासून ते विद्येचे आणि ज्ञानप्रसाराचे महत्त्वाचे केंद्र होते. अलीकडे मोसल व बसरा येथे विश्वविद्यालये स्थापन झाली आहेत. बगदाद विश्वविद्यालयात सन १९६५-६६ साली २४,००० विद्यार्थी असून त्यांपैकी ७००० मुली होत्या ! सामाजिक शिक्षण व सामाजिक स्वास्थ्य यांकडेही सरकारने लक्ष पुरवून वृद्धांकरिता निवासस्थाने तसेच आंधळ्यांकरिता व मानसिक विकृतीच्या लोकांकरिता संस्था स्थापन केल्या. शेतकऱ्यांकरिता शेतीविषयक ज्ञान रेडिओवरून दररोज प्रसारित करण्यात येते.

तसेच लष्करी सामर्थ्य वाढविण्याकरिता लष्करी शिक्षणाच्या उत्तम संस्था सरकारने निर्माण केल्या आहेत. अठरा वर्षे वयाच्या प्रत्येक तरुणाने दोन वर्षे लष्करी सेवेत घालविली पाहिजेत असा नियम केला आहे.

अरबांची छोटी-मोठी स्वतंत्र राष्ट्रे आहेत; पण साम्राज्यशाहीविरुद्ध लढण्याकरिता ' संयुक्त अरब संघा 'ची स्थापना नुकतीच झाली असून

तिचे नेतृत्व इजिप्तच्या अध्यक्ष नासेर यांजकडे जाते. इराक हा संघाचा घटक झाल्यापासून त्यालाही सामर्थ्य प्राप्त झाले आहे. ' संघे शक्तिः ' या तत्त्वाला अनुसरून ' सारे अरब म्हणजे एक राष्ट्र ' आणि ' आफ्रिकेतील मोरोक्को-पासून कुवैतपर्यंतचे अरब म्हणजे एक विशाल कुटुंबच ! ' अशी घोषणा आरेफ या इराकच्या अध्यक्षाने केली.

तेलाचे उत्पादन करण्यात जगातील देशांत इराकची प्रामुख्याने गणना होते. इराकमधील तेलाच्या अस्तित्वाची जाणीव फार प्राचीन काळापासून आहे. पण तेलाच्या पद्धतशीर उत्पादनाला सन १९१४ पासून सुरुवात झाली असे म्हणण्यास हरकत नाही. इराकच्या आर्थिक व्यवस्थेला तेलाने चांगलाच भरीव हातभार लावला आहे, किंबहुना ती तेलावरच उभी आहे असे म्हटले तरी चालेल. तेलाच्याच पैशावर पाटबंधाऱ्यांचे प्रकल्प आणि औद्योगिक विकासाच्या योजना कार्यवाहीत आणणे शक्य झाले आहे. सन १९६४ मध्ये नव्यानेच ' इराकी नॅशनल ऑइल कंपनी 'ची स्थापना होऊन तिच्यामार्फत तेलसंबंधीचा सारा धंदा सुरू करण्याचे ठरविले. यामुळे परक्या कंपन्यांचे महत्त्व आणि वर्चस्व कमी होऊन गेले.

तेल ही अरब राष्ट्रांना दैवी देणगी मिळाली आहे, त्यामुळे तेलगरजू राष्ट्रांच्या नाड्या आखडण्याची संधी अरबांना प्राप्त झाली आहे. सन १९२७ मध्ये किर्कुक शहराजवळ प्रथमतः तेलाची विहीर लागली. तसेच बसरा येथेही तेलाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होऊ लागले. इराकमध्ये तेलाचे साठे विपुल आणि विस्तृत आहेत, असे तज्ज्ञांचे मत आहे.

तैग्रीस व युफ्राटिस नद्यांच्या सुपीक खोऱ्यांत कालव्यांच्या पाण्यावर शेती केली जाते. क्रांतीनंतर शेतकऱ्यांच्या गरजा, विशेषतः आर्थिक गरजांकडे विशेष लक्ष पुरविण्यात आले. शेतीच्या उत्पन्नांत गहू, बार्ली तसेच तांदुळ, मका, तीळ, तंबाखू, कापूस इ. पिके काढतात. येथील खजुराचे उत्पन्न मोठ्या प्रमाणावर होते. जगातील उत्पन्नापैकी ७५% खजूर बसऱ्याच्या आसपास होतो. खजुराच्या दोनशे जाती येथे होतात ! येथील लोक खजुराचे निरनिराळे प्रकार करून खातात.

तैग्रीस नदीवर मोसल येथे बांधलेला तलाव शेतीला आणि औद्योगिक विकासाला अत्यंत उपयोगी झाला आहे. येथे वीजकेंद्र आहे. आणखी दोन तलावांच्या योजना हीदिया व हिमरीन येथे लवकरच कार्यवाहीत येणार आहेत.

येथील काही लोक उंट, घोडे, मेंढ्या यांचे कळप पाळून भटक्या वृत्तीने राहणारे आहेत. हे लोक उत्तम घोड्यांची निपज करतात.

इराकमध्ये अतिप्राचीन म्हणजे ४००० वर्षांपूर्वीच्या संस्कृतीची स्मृती जागृत होते. येथील उत्खननात आढळलेल्या अवशेषांवरून त्या काळची कला वास्तुशिल्प, लेखन-लिपी इ. गोष्टींवर लख्ख प्रकाश पडतो. लेखन-कला, हे बाबिलोनिअन संशोधन समजले जाते. या लेखनलिपीचे अवशेष आजही पाहावयास मिळतात. बॅबेलचा मनोरा हे येथील एक मोठे आश्चर्य असले तरी त्याचे अवशेष आज फारसे उपलब्ध नाहीत, तरीपण त्याची माहिती तेथील विटांवरील खोदलेल्या मजकुरावरून आणि नंतरच्या इतिहास-कारांनी लिहून ठेवलेल्या मजकुरावरून होऊ शकते.

येथील झुलती बाग आणि त्यावर खेळविलेल्या पाण्याची योजना ही त्या काळच्या स्थापत्यशास्त्राचा उत्कृष्ट नमुना समजला जातो. ही बाग नेबुचाडनेझर या राजाने आपल्या पत्नीकरिता तयार केली होती. नेबुचाडनेझर याने आपल्या ४० वर्षांच्या कारकीर्दीत बाबिलोनचे वैशिष्ट्य व वैभव इतके वाढविले की, जगातील आश्चर्यांत बाबिलोनची गणना होऊ लागली.

बगदाद या राजधानीच्या शहराचे आकर्षण विशेष आहे. हे अतिशय प्राचीन शहर असून येथे आधुनिक शहरातील दृश्ये पाहावयास मिळतात. प्राचीन व अर्वाचीन यांचा संगम येथे आढळतो. येथील मशीद व तिचे सोनेरी मनोरे, जगातील अत्यंत प्राचीन विद्यापीठ तसेच ज्याने हे शहर वसविले त्या अब्बासिद खलिफाचा राजवाडा ही येथील प्रेक्षणीय ठिकाणे होत. बगदाद म्हटले की, हरून-अल-रशीदच्या 'अरेबियन नाइट्स'च्या गोष्टींची स्मृती जागृत होते. तसेच येथील वस्तु-संग्रहालय जगात प्रसिद्ध आहे. येथील वीस दालनांतून एक लाख वर्षांच्या मानवी इतिहासाचे दर्शन घडते !

बसरा हे तैग्रीस व युफ्राटिस नद्यांच्या संगमावरील उत्कृष्ट बंदर असून लोहमार्ग, मोटार-मार्ग व विमानमार्ग यांचे केंद्र बनले आहे. येथूनच इराकचा व्यापार चालतो. हल्ली याला आधुनिक शहराचे स्वरूप प्राप्त झाले आहे. मोसल येथील समृद्ध तेलाच्या खाणींमुळे या शहराला फार महत्त्व प्राप्त झाले आहे. या तेलामुळेच आंतरराष्ट्रीय संघर्ष वाढले गेले.

इराकमधील पवित्र ठिकाणांत नेजेफ, करबेला, समारा यांचा समावेश होतो. अलीचे प्रेत नेजेफ येथे पुरले असून त्याचा मुलगा हुसेन हा करबेला येथे पुरला गेला. शियापंथीय लोक या ठिकाणांना भक्तिभावाने भेट देतात.

● ● ●

१३. अरब लोक

यांचा देश अरबस्थान. हे द्वीपकल्प असून ते आशिया खंडाच्या नैर्ऋत्येस आहे. अरबांची संस्कृती आणि त्यांचे साम्राज्य एके काळी युरोपमधील स्पेन देशापर्यंत आणि आफ्रिकेच्या उत्तर किनारी भागात पसरलेले होते. ते फार काळ जरी टिकले नसले तरी अरबी संस्कृतीचे अवशेष आणि ठसे काही भागांत कायमचे उमटलेले आढळतात. रसायनशास्त्र, बीजगणित इ. काही शास्त्रे युरोपिअन लोक प्रथम अरबांपासून शिकले !

कंटक, काटक आणि शूर अशी त्यांची ख्याती इतिहासात आहे. जवळजवळ अर्धे युरोप खंड त्यांनी जिंकले होते ! मुसलमानी धर्माचा प्रसार अरब लोकांनीच केला.

इ. सनाच्या पाचव्या व सहाव्या शतकांत मक्का शहरी कुरेश घराण्याकडे राजसत्ता होती. कुरेश हा शब्द ' कर्श ' या शब्दापासून झालेला आहे. कर्श हे समुद्रातील एका धिप्पाड प्राण्याचे नाव असून तो सर्व प्राण्यांना अंकित करणारा मानला जातो. यावरूनच इतर सर्व कुळांना अंकित करणारे कुळ म्हणून यातील लोकांना कुरेश म्हटले जाते. मक्का शहराचे व्यापारी महत्त्व वाढवून त्याला वैभव प्राप्त करून देण्यात या लोकांचा मोठा वाटा आहे.

आपल्याला आश्चर्य वाटणारी गोष्ट म्हणजे मक्केतील काबा मंदिरात मूर्तिपूजा होत असे. या काळी येथील सारे लोक मूर्तिपूजक होते. मूर्तिपूजेचा सार्वत्रिक प्रसार पाहून महंमदाचे मन अगदी विषण्ण होई. मूर्तिपूजेविरुद्ध त्याने बंडाचे निशाण उभारले आणि नव्या धर्ममतांचा प्रसार करण्याचे ठरविले. अर्थात याला कुरेशी लोकांनी पुष्कळ विरोध केला, त्याचा छळ सुरू केला, मक्केत राहणे त्याला कठीण वाटू लागले आणि म्हणून त्याने मदिना येथे प्रयाण केले आणि तेथून त्याने नवीन धर्मप्रसाराचे कार्य धडाडीने आणि

हिरीरीने सुरू केले. याने नव्या धर्माला ‘ इस्लाम ’ असे नाव दिले. याचे मुख्य तत्त्व असे, ‘ परमेश्वर एक आहे आणि तोच नित्य आहे, त्याच्यासारखा जगात दुसरा कोणी नाही. ’ इस्लाम या शब्दाचा अर्थ, ‘ परमेश्वरी इच्छेस मान तुकविणे’ असा आहे.

इस्लामी धर्माचा संस्थापक महंमद पैगंबर याने प्रत्येक मुसलमानाला काही कर्तव्ये सांगितली आहेत— दररोज पाच वेळा प्रार्थना, रमझान महिन्यातील तीस दिवस उपवास, ‘ जकात ’ म्हणजे गोरगरिबांना अन्नदान व वस्त्रदान आणि मक्केची यात्रा.

कुराण हा मुसलमानांचा पवित्र ग्रंथ. महंमद पैगंबराला परमेश्वरी प्रेरणेने जी वचने स्फुरली ती कुराणात ग्रथित केली आहेत. सांसारिक, सामाजिक, धार्मिक व राजकीय बाबतींत कुराणाकडून लोकांना मार्गदर्शन होते; असा हा सर्वसंग्राहक पवित्र ग्रंथ आहे.

अरबस्तानात उंच पर्वत नाहीत, मोठी नदी नाही, पावसाचे नाव नाही ! देशाचा पाऊण हिस्सा भूभाग वाळवंटी प्रदेशांनी व्याप्त आहे. पण त्याच्या भौगोलिक स्थानामुळे आणि तेथील तेलाच्या उत्पादनामुळे त्याला राजकीय महत्त्व मात्र चांगलेच प्राप्त झाले आहे.

अरब लोकांत मुख्य जाती दोन— अरब आणि बिडुइन. किनाऱ्यानजीकच्या भागातील लोकवस्ती स्थिर स्वरूपाची असते. पण बाकीचा भाग सगळा वाळवंटी असल्यामुळे या भागातील लोक आपल्या गुरांच्या कळपासह चारा-पाणी जेथे आढळेल तेथे जातात आणि तो संपेपर्यंत तेथेच वास्तव्य करतात. अशा रीतीने फिरस्त्या किंवा भटक्या वृत्तीने राहणाऱ्या लोकांना ‘ बिडुइन ’ म्हणतात. या लोकांजवळ मेंढ्या, बकऱ्या व उंट यांचे मोठाले कळप असतात. उंटांची पैदास हा त्यांचा मुख्य धंदा. उंट हा त्यांना सर्वतोपरी उपयोगी पडणारा प्राणी आहे. याच्या शरीराची ठेवण निसर्गतःच अशी आहे की, त्याने एकदा भरपूर पाणी पिऊन घेतले की ८–८ दिवस त्याला ते पुरविता येते ! पायाचे तळवे अगदी सपाट असल्याने वाळवंटातून चालणे त्याला कठीण पडत नाही. वारंवार स्थलांतर करणाऱ्या बिडुइन लोकांना अफाट आणि भयाण अशा वालुकामय प्रदेशातून प्रवास करताना

इमानी उंटांचे साहाय्य चांगलेच होते. ‘ वाळवंटातील जहाज ’ म्हणून त्याची महती गाइली जाते. उंटावर त्यांचे चांगलेच प्रेम असते.



फिरस्ते अरब टोळ्या करून राहतात. यांच्यात जाति-जमातीनुसार अनेक टोळ्या बनलेल्या असतात. प्रत्येक जमातींत अनेक कुटुंबे असून ही सारी एकजुटीने राहतात व स्थलांतर करतात. या जमातींची एकेक टोळी अतिशय प्रबळ असते या संघटित शक्तीला तोंड देणे सोपे नसते. प्रत्येक टोळी आपल्या नायकाचा निवड करते. हा नायक म्हणजे त्यांचा ‘ शेख ’, याच्या हुकमतीत सर्वांना राहावे लागते.

अरबस्तान हे राष्ट्र निरनिराळ्या टोळ्यांचे बनलेले आहे. प्राचीन काळीसुद्धा या सबंध देशावर राज्य करणारा असा एक राजा कधीच नव्हता ! त्यामुळे एकसंधी राज्यव्यवस्था कठीणच. या देशात छोटी छोटी अनेक संस्थाने म्हणजेच छोटी राज्ये असल्याने त्यांच्यात सत्तास्पर्धा सतत चालू असे आणि बंडाळी माजे. त्यांच्या सरहद्दी कधीच निश्चित झालेल्या नसल्यामुळे येथे अनेक राज्यकर्ती घराणी उदयास आली आणि लयास गेली.

अरबस्तानच्या अर्वाचीन इतिहासाला वाहाबी चळवळीपासून (इ. स. १७४२) सुरुवात झाली. या चळवळीचा प्रवर्तक महमद इब्न अबदुल वहाब हा होता. अरबस्तानला ‘ सौदी अरबस्तान ’ असे म्हणण्यात येते. सन १९०२ मध्ये इब्न सौद याने रियाध हे महत्त्वाचे शहर काबीज करून नेज्द प्रांतावर आपली सत्ता प्रस्थापित केली. या वेळेपासून येथे

सौदी नावाला महत्त्व चढून सौदी राजांच्या वर्चस्वामुळे या देशाला सौदी अरबस्तान असे म्हणण्यात येऊ लागले. पहिल्या महायुद्धानंतर देशाला बरीच स्थिरता लाभली. इब्न सौद हा हिजाझ आणि नेज्द या राज्यांचा राजा म्हणून मान्यता मिळाली.

येथील राजाकडे राजकीय आणि धार्मिक सर्वाधिकार असतात ! त्याला सल्ला देण्याकरिता एक मंत्रिमंडळ असते. तरी पण विशेष गोष्ट म्हणजे राजघराण्यातील प्रमुख व्यक्तींचे राजकारणातील वर्चस्व सर्वस्वी कमी झालेले नाही, त्यांपैकी पुष्कळसे लोक पदाधिकारी असतात.

या देशाच्या निशाणाचा रंग हिरवा आणि त्यावर जिहादचे प्रतीक म्हणून पांढऱ्या चकचकीत तलवारीचे चित्र. पुढे विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात वाहाबी टोळीचा प्रमुख अमीर इब्न साऊद याला अरबस्तानात शांतता आणि सुव्यवस्था राखण्याबद्दल मदत म्हणून ब्रिटिश सरकार दर-साल ६०,००० पौंड देत असे ! अरबस्तानात वर्चस्व मिळविण्याकरिता ब्रिटिशांनी प्रयत्न केले, पण त्यांना अपेक्षेप्रमाणे यश आले नाही.

अरबस्तानातील तेलाच्या उत्पादनाला राजकीय महत्त्व प्राप्त झाल्याने अमेरिकेने मात्र मोठ्या कौशल्याने अनेक सवलती मिळवून 'अरेबिअन-अमेरिकन ऑइल कंपनी' (आरामको) या नावाची संस्था स्थापन केली. देशाच्या पूर्वभागात ४०-४२ हजार चौरस मैलांच्या टापूत तेलाचे उत्पादन करण्याचे हक्क अमेरिकेने मिळविले. तेथे लाखो रुपयांचे भांडवल गुंतवून तेलाच्या विहिरी खोदणे, तेल शुद्ध करणे, तेलाचे नळ टाकणे इ. कामे अंगावर घेऊन खूप फायदा मिळविला आणि अरबस्तानलाही भरपूर आर्थिक फायदा करून दिला. त्यामुळे अर्थातच अरबस्तानच्या आर्थिक व्यवस्थेला चांगलीच बळकटी आली आणि अनेक क्षेत्रांत या देशाला प्रगती करता आली. लोहमार्गांची वाढ झाली, मोटारींकरिता डांबरी रस्ते तयार झाले, शिक्षणाच्या सोयी वाढल्या, पाश्चिमात्यांच्या विविध क्षेत्रांतील सुधा-रणांचे दर्शन घडले आणि विशेष म्हणजे अरबांना कामधंदा मिळाला. अनेक खालच्या दर्जाच्या फिरस्त्या अरबांनी आपल्या जीवनाला स्थिरता आणली. थोडक्यात, सौदी अरेबियाच्या जनतेच्या जीवनात 'आरामको' ही

इष्ट अशी क्रान्ती घडवून आणणारी आणि देशाच्या एकंदर वैभवात भर घालणारी संस्था ठरली.

पण उच्चवर्णीय फिरस्ती कुटुंबे मात्र येथील बदलत्या परिस्थितीने बिलकुल बिथरली नाहीत. हे लोक मोठे मानी. अफाट वाळवंटी भागात हे लोक आपले भटके जीवन सुखाने जगत आहेत. मेंढ्या, बकऱ्या, उंट यांचे मोठाले कळप ही त्यांची संपत्ती. जीवनाला लागणाऱ्या आवश्यक अशा साऱ्या म्हणजे अन्न-वस्त्र-आसरा या गोष्टी त्यांना या प्राण्यांपासून मिळतात.

या राज्यात वाहाबी जमातीचे मोठे वजन आहे. सरकारी कारभारात आणि शासनविषयक धोरणात यांच्या शब्दाला आणि मार्गदर्शनाला फार किंमत आहे. राजाने वहाबी उलेमाच्या मर्जीविरुद्ध देशात ध्वानिक्षेपण केंद्र उभारले; पण त्याला उलेमांच्या विरोधाची दखल घ्यावी लागली. तो म्हणाला, ' ज्या अर्थी कुराणात रेडिओचा उल्लेख नाही त्या अर्थी रेडिओच्या उपयोगाला अल्लाचा विरोध होता हे गृहीत धरणे योग्य नाही. ' तसेच रेडिओवर कुराणाचा काही भाग प्रसारित करण्याची आज्ञा त्याने दिली आणि विरोधकांना सवाल टाकला, ' परमेश्वराची वचने प्रसारित करण्यात वाईट काय आहे ? ' यावरून एक गोष्ट लक्षात येईल की, राजाला देखील या नवीन गोष्टीचे समर्थन करावे लागले !

साक्षरतेच्या प्रसाराकडे या देशात कोणाचेच फारसे लक्ष गेले नाही. साक्षरतेचे प्रमाण शे. ६-७ पेक्षा अधिक नाही, म्हणजे शे. ९३–९४ लोक निरक्षर ! आणि जे शिक्षण दिले जाई ते सारे इस्लाम धर्मानुसार केवळ धार्मिक म्हणजे मुख्यतः कुराणाचे पठण आणि पाठांतर; तेव्हा कुराण पढण्याच्या शाळा एखाद्या माशिदीत किंवा जवळपास असावयाच्या. कुराण-पाठांतराला अधिक महत्त्व. लिहिणे-वाचणे शिकण्याला दुय्यम स्थान !

पण अलीकडे म्हणजे सन १९३० पासून सरकारने प्राथमिक व दुय्यम शिक्षणाच्या शाळा स्थापन करून अभ्यासक्रम निश्चित केला आहे. सार्वजनिक शिक्षण मोफत देण्याची व्यवस्था आहे. सरकारच्या शिक्षणप्रसाराच्या कार्याला ' आरामको 'नेही प्राथमिक शिक्षणाच्या शाळा बांधून हातभार लावलेला आहे. पण येथे प्राथमिक शिक्षण आपल्याकडच्याप्रमाणे सक्तीचे नाही.

सन १९५७ पर्यंत येथे स्वतंत्र विद्यापीठ नव्हते! सत्तावन साली रियाध या राजधानीच्या ठिकाणी ‘ सौदी अरेबिअन युनिव्हर्सिटी’च्या स्थापनेची राजाकडून घोषणा करण्यात आली.


सरकार शिक्षणप्रसाराच्या योजनांना प्रोत्साहन देत असले तरी या नवीन शिक्षणाला वाहाबी उलेमांचा तीव्र विरोध असल्यामुळे सरकारला या क्षेत्रात काळजीपूर्वक पावले टाकावी लागतात. शिक्षणाकरिता परदेशी गेलेल्या विद्यार्थ्यांना सरकारी मदतही देण्यात आली; पण वाहाबी उलेमा व पुराणमतवाद्यांच्या विरोधामुळे परदेशी गेलेल्या विद्यार्थ्यांना परत बोलावण्याची पाळी सरकारवर आली !

सौदी अरेबियात बौद्धिक क्षेत्रात अगर कलेच्या विकासाला फारच कमी प्रोत्साहन मिळत गेले. लोकांची गरिबी, निरक्षरता, राजकीय अस्थिरता आणि बहुसंख्य लोकांची फिरस्ती अवस्था इ. कारणे या परिस्थितीला सांगितली जातात. येथे सार्वजनिक नाटकगृह किंवा चित्रपटगृहही नाही ! श्रीमंत सौदी लोक आणि ‘ आरामको ’चे लोक यांच्याकरिता चित्रपट दाखविण्याची खाजगी व्यवस्था आहे. कट्टर वाहाबी धर्मानुसार यांना सार्वजनिकरीत्या स्थान नाही.

अशिक्षित फिरस्ते आणि खेडेगावचे लोक यांच्या करमणुकीचे साधन म्हणजे गप्पा आणि गोष्टी ! या लोकांजवळ पिढ्यानुपिढ्या वाढत जाणारा गोष्टींचा साठा भरपूर असतो. रमझानच्या उपवासाच्या काळात गोष्टींचे कार्यक्रम चांगले रंगतात आणि श्रोतृवर्गही चांगला जमलेला असतो.

सौदी अरबांच्या जीवनात नैतिक मूल्यांचा विचार करता धार्मिक आचरण आणि कौटुंबिक पारंपारिक व्यवस्था यांना विशेष महत्त्व असते. सर्व सत्ताधारी परमेश्वराला शरण जाणे आणि इस्लामी धर्मतत्त्वांनुसार वर्तन ठेवणे यातच जीविताची सफलता मानली जाते. प्रार्थना, उपवास व दानधर्म या गोष्टींकडे प्रत्येक मुस्लिमाने कटाक्षाने लक्ष पुरविले पाहिजे असा दंडक आहे. सर्व घटना परमेश्वराधीन आहेत, त्याची इच्छा असेल तरच अंगीकृत कार्यात यश मिळेल. आपल्याकडे लीनता घेऊन परमेश्वराची इच्छा, सत्ता यांचा उल्लेख लोकांच्या नित्याच्या बोलण्याचालण्यात वारंवार होत असतो.

अरबी जीवनात कौटुंबिक प्रतिष्ठेला फार महत्त्व दिले जाते. कौटुंबिक जबाबदारी ओळखून प्रत्येकाने आपली कर्तव्ये पार पाडली पाहिजेत या गोष्टीवर अधिक भर दिला जातो. कुटुंबातील वयोवृद्ध माणसाला फार



मान असतो, त्याच्या मार्गदर्शनाला फार महत्त्व असते. यांच्यात अशी एक म्हण आहे : ' कुटुंबात वृद्ध मनुष्य नसेल तर निदान एक जुना घोडा तरी आणून ठेवा ! '

अरबस्तान हा ' पुरुषांचा देश ' ! येथे स्त्री-पुरुषांच्या समान हक्कांचा प्रश्नच उद्‌भवत नाही. पुरुष हा कुटुंबातील आणि समाजातील कर्ता मनुष्य. कुटुंबात मुलगा जन्माला येणे ही महत्त्वाची घटना समजली जाते. अरबाला मुलगा झाला तर जाहीर रीतीने त्याचा मोठा सुखसोहाळा करतात ! पति-पत्नी मुलाच्या नावाने ओळखले जातात ! उदा. ' अबू हेथाम ' म्हणजे ' हेथामचा बाप अबू ', तसेच ' उम्म हेथाम ' म्हणजे ' हेथामची आई उम्म '. मुलगा जरा मोठा झाला म्हणजे वयाच्या तीन ते सात वर्षांचा दरम्यान त्याची सुंता करतात. हा विधी म्हणजे एक सामाजिक समारंभ व्यक्तिगत किंवा सामुदायिक तऱ्हेने केला जातो. या वेळी मुलाने धैर्याने ही

छोटीशी शस्त्रक्रिया सहन करून आपण धीराचे आहोत असे दाखवावयाचे असते ! तो आणखी मोठा झाला म्हणजे त्याला धार्मिक शिक्षणाची दीक्षा कुराणातील काही भागाच्या पठणाने दिली जाते. हे पठण त्याला नित्यशः काही काळ करावे लागते.

अरब लोकांच्या गुणविशेषांत आदरातिथ्याचे स्थान फार उच्च आहे. दाराशी आलेला शत्रू असला तरी त्याचा अवमान करू नये, त्याचे आदरातिथ्य झालेच पाहिजे अशी शिकवणूक त्यांना असते. या गुणाच्या अनेक प्रसंगांचे रसभरित वर्णन त्यांच्या काव्यातून आणि कथांतून केलेले आढळते. इतर गुणविशेषांत गरिबांना करावयाचा दानधर्म, दुःखीकष्टी लोकांबद्दल सहानुभूती यांची महती विशेष गाइली आहे.

अरब लोकांना काव्य फार प्रिय. कवींचा गौरव ते मोठ्या उत्साहाने करतात. पूर्वी जत्रेच्या ठिकाणी दरसाल अनेक कवी आपापल्या कविता घेऊन येत. चांगल्या गुणी लोकांच्या पुढे हे कवी कविता वाचीत. सर्वांत श्रेष्ठ प्रतीची ठरणारी कविता रेशमाच्या कपड्यावर सोनेरी अक्षरांनी लिहीत ! आणि ती मक्का येथील प्रार्थना-मंदिरात टांगून ठेवीत ! अर्थात यामुळे कवीची कीर्ती चोहोकडे पसरे.

अरबांची धार्मिक महत्त्वाची अशी ठिकाणे म्हणजे मक्का व मदिना. मुस्लीम धर्माचा संस्थापक महंमद याचे मक्का हे जन्मस्थान म्हणून आणि नव्या धार्मिक पंथाची संघटना करण्यास त्याने मदिना येथे केलेले प्रयाण म्हणून या दोन्ही स्थळांना धार्मिक महत्त्व प्राप्त झाले. या धर्माचे लोक जगाच्या कोणत्याही भागात असले तरी जन्मात एकदा तरी मक्का-मदिनेला येतातच. ही यात्रा घडली म्हणजे जन्माची सार्थकता झाली अशी त्यांची दृढ समजूत असते.

मक्का शहराच्या मध्यभागी एक फार जुनी मशीद आहे. हिचे नाव ' काबा '. हे ठिकाण मुसलमान धर्मात पृथ्वीवरील सर्व पवित्र क्षेत्रांत श्रेष्ठ मानतात.

महंमद पैगंबराच्या पश्चात मुसलमान लोकांत ' खलिफा ' पदाविषयी वाद निर्माण होऊन शिया व सुनी हे दोन प्रमुख पंथ निर्माण झाले.

अरब लोकांत लग्नाला धार्मिक महत्त्व नसून लग्न म्हणजे एक सामाजिक करार समजला जातो. दोन वजनदार गृहस्थांच्या साक्षीने हा करार पूर्ण होतो. यांच्यात जास्तीत जास्त चार बायका करण्याची परवानगी असते; पण श्रीमंतांखेरीज अधिक बायका सहसा कोणी करीत नाही. बिडुइन जमातीत पूर्वओळखीने लग्ने होतात, पण स्थायिक लोकांत नवरा-बायकोची प्रथम तोंडओळख लग्नदिवशीच होते ! पति-पत्नीत प्रेमाचा उद्भव लग्नाआधी न होता प्रेम लग्नापासून पुढे वाढत जावे अशी यांच्यात अपेक्षा असते. जवळच्या नातेवाइकांत लग्नसंबंध जुळविण्याची यांच्यात पद्धत आहे. वयाने लहान असल्यास चुलतबहिणीशी केलेले लग्न आदर्श समजले जाते.

गुलामांची चाल यांच्यात आहे. आफ्रिकेतून गुलामांचा पुरवठा यांना होत असे. अलीकडे मात्र यांच्या आयातीला पायबंद बसला आहे. तरी पण निग्रोंची संतती येथे आहे. गुरे राखणे, घरगुती कामे करणे यांकडे गुलामांचा उपयोग केला जातो. यांना कठोरपणे मात्र वागविले जात नाही. सामाजिक दर्जा यांचा कमी असला तरी अनेक बाबतींत त्यांना मोकळीक असते. हलक्या जातीतील मुलींशी लग्न करण्याची गुलामांना परवानगी मिळते. गुलामाने महंमदी धर्माची दीक्षा घेतल्यानंतर सात वर्षांनी त्याला गुलामगिरीतून मुक्त करण्याची चाल अरब लोकांत आहे. यांना मुक्त करणे हे सत्कृत्य मानले जाते. विशेषतः वृद्ध अरब हे पुण्य जोडतात.

बिडुइन आणि स्थायिक अरबांच्या पोषाखात फारसा फरक नसतो बिडुइन लोकांत लांब केसांच्या वेण्या घालून त्या डोक्यावर गुंडाळलेल्या दिसतील. शहरी लोक वहाणांच्या ऐवजी पायात इंग्लिश पद्धतीचे बूट घालतात. सामान्यपणे सर्व पुरुषमंडळी घोट्यापर्यंत पोचणारा एक मोठा आणि लांब बाह्यांचा अंगरखा घालतात. डोक्याला एक पांढरा किंवा रंगीत मोठा फेटा गुंडाळून तो एका काळ्या जाड दोरीने बांधून टाकतात.

बिडुइन आणि स्थायिक स्त्रियांच्या पोषाखात केवळ त्यांच्या सामाजिक दर्जानुसार थोडाफार फरक असतो. वरच्या दर्जानुसार स्त्रिया त्यांच्या अंगावरील जडजवाहिरावरून ओळखता येतात. अलीकडे मात्र शहरातील काही श्रीमंत स्त्रिया पाश्चिमात्य पोषाखाचे अनुकरण करू लागल्या आहेत. पडद्यांची पद्धत मात्र यांच्यात सर्रास सुरू आहे.

अरबांचे मुख्य खाद्य म्हणजे गहू, भाजीपाला, खारका, खजूर, फळे इत्यादी. मांसाहार तर यांच्यात सर्रास आहे. मेंढी, बकरी व वेळ पडल्यास उंट यांचे मांस ते खातात. डुकराचे मांस मात्र यांच्यात निषिद्ध मानले आहे. हे लोक लोणी फार खातात. कॉफी पिण्याची चाल यांच्यात विशेष आहे. येथील वृक्षविशेषांत खजुराचे झाड हे महत्त्वाचे. याच्या अनेक जाती असून मदिना येथे शंभर प्रकारचा खजूर तयार होतो असे म्हणतात ! हिरवळीच्या जागी व अन्यत्र मिळून खजुराची लाखो झाडे येथे आहेत. दुसरे महत्त्वाचे पीक कॉफीचे. येथील मोचा कॉफी उत्कृष्ट समजली जाते, हिला व्यापारी महत्त्व आहे.



येथील लोकांच्या उद्योगधंद्यांत उंटांच्या पैदाशीचा धंदा महत्त्वाचा आहे. घोड्यांची पैदास हाही धंदा तितकाच महत्त्वाचा. अरबी घोड्यांची ख्याती जगभर आहे. पांढऱ्या रंगाच्या व मोठ्या हाडापेराच्या गाढवांची पैदास येथे करतात व ती इजिप्तला पाठवितात. मासेमारीच्या धंद्याला तेजी येण्याचा संभव आहे. मोत्यांच्या धंद्यातही काही लोक गुंतलेले आहेत. मिठाचे उत्पादन निर्यातीत थोडी भर घालते. तेलाच्या धंद्यामुळे यांचा व्यापार

इतका वाढला आहे की, या देशाची निर्यात आयातीपेक्षा पाच पटींनी अधिक आहे ! !

दळणवळणाच्या साधनांत येथे उंटालाच प्राधान्य आहे. व्यापारी माल उंटावर लादून उंटांचे तांडेच्या तांडे वालुकामय प्रदेश तुडवीत जातात. प्रवासीही यांच्या सोबतीने प्रवास करीत. अजूनही या मार्गांचा उपयोग आहे. पण काही पक्क्या सडका बांधून मर्यादित प्रमाणात मोटारींचा उपयोग होऊ लागला आहे. ' आरामको ' नेही त्यांच्या जरुरीप्रमाणे डांबरी रस्ते तयार केले आहेत. लोहमार्ग सन १९०८ पर्यंत मुळीच नव्हते. अलीकडे म्हणजे १९४७ पासून काही महत्त्वाची ठिकाणे लोहमार्गांनी जोडली आहेत. ' आरामको'ने यात लक्षावधी रुपये गुंतवून लोहमार्ग तयार केले आहेत. या मार्गांचा देशाला चांगलाच फायदा झाला आहे.

अरबस्तानची भाषा अरबी. या भाषेचे दोन मुख्य प्रकार आहेत— एक बोली व दुसरी सुसंस्कृत किंवा प्रौढ. दुसरा प्रकार कुराणातील भाषेचा. सुसंस्कृत लोक याच भाषेचा वापर करतात. वर्तमानपत्रे, रेडिओ व साहित्यिक हीच भाषा वापरतात. यांची लिहिण्याची पद्धत उर्दूप्रमाणे उजवीकडून डावीकडे असते. यांच्या वर्णमालेत २८ अक्षरे आहेत. सुशिक्षित आणि सुसंस्कृत लोकांना बोलण्याचालण्यात कुराणातील वचनांचा व सुभाषितांचा भरपूर उपयोग करण्याची सवय आहे. यांचा आवाज मोठा असतो. त्यांचे साधे बोलणे असले तरी परक्यांना ते रागावून भांडत असल्याप्रमाणे भासते !

अरबी वाङ्मयाचा आरंभ हा महंमदापूर्वी जे अरब लोक होते त्यांच्या काव्यापासून व कथांपासून होतो. ही काव्ये मुखोद्गत होऊन परंपरेने पुढे चालत. या काव्याचे विषय मृत वीरांची स्तुती हे असत. कालांतराने सार्वलौकिक विषय आढळून येऊ लागले. महंमदीय कालापूर्वी कवींना फार मान असे. दहाव्या शतकानंतर नैतिक शिक्षण व सर्वसाधारण सभ्य गृहस्थास लागणारे शिक्षण देणारे वाङ्मय तयार होत होते, याला ' अदब ' वाङ्मय म्हणत. हे गोष्टी व कविता यांच्या रूपाने असे. विशेष लक्षात

ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे आपल्याकडील ‘ पंचतंत्रा’चे अरबी भाषेत भाषांतर झाले आहे !

कागदी चलनाबरोबर चांदीची आणि सोन्याची नाणी व्यवहारात ठेवणारा सौदी अरबस्तान हा जगात एकटाच देश दिसतो. सौदी ‘ रियाल ’ हे चांदीचे नाणे असून आपल्याकडील रुपयाप्रमाणेच आहे. सौदी ‘ सॉव्हरनि ’ हे सोन्याचे नाणे ब्रिटिश सॉव्हरीनप्रमाणे आहे. पण ही नाणी पाडण्याच्या टांकसाळी अरबस्तानात नसून त्या इंग्लंड, अमेरिका, पाकिस्तान इ. देशांत आहेत !

अरब-संघाची स्थापना सन १९४५ मध्ये झाली. सौदी अरेबिया या संघाचा सभासद झालेला असला तरी संघातील सर्व सभासद–राष्ट्राशी याचे संबंध अगदीच सलोख्याचे होते असे नाही. सुएज कालव्याच्या तंट्यात सौदी अरेबियाने इजिप्तची बाजू घेऊन त्याला सक्रिय पाठिंबा दिला होता.

• • •

१४. इराणी लोक

इराणी लोक हे मूळचे आर्यन. आर्यन लोकांची एक शाखा सुमारे ४००० वर्षांपूर्वी मध्य आशियाच्या ज्या भागात स्थायिक झाली त्या भूभागाला इराण हे नाव रूढ झाले. इराण हे आर्यन शब्दाचेच रूपांतर होय. इराणी लोकांच्या अनेक जाती असून त्या सर्व आर्यन भाषाच बोलतात. यांचा पौराणिक काळ फार प्राचीन असून त्याविषयी पुरी माहिती तितकीशी मिळत नाही. येथे कित्येक छोटी-मोठी राजघराणी उदयास आली आणि विलयाला गेली.

या देशाला पर्शिया म्हणूनही संबोधले जाते. इराणच्या दक्षिण भागात ‘ फार्स ’ नावाचा एक प्रांत आहे, याचे पूर्वीचे नाव ‘ पर्सिस ’. या भागात राहणाऱ्या लोकांना पर्शियन ही संज्ञा मिळाली. पर्शियन राजांच्या प्रभावी कारकीर्दीवरून देशाला पर्शिया हे नाव पडले असे म्हणतात.

हा देश इराण व पर्शिया अशा दोन्ही नावांनी संबोधला जातो. सन १९३५ मध्ये पर्शियाचे नामांतर अधिकृतपणे इराणमध्ये झाले. सन १९४२ मध्ये इराणचे नामांतर पुन्हा पर्शियामध्ये झाले ! पुन्हा एकदा नावाचे रूपांतर होऊन आज मात्र इराण हेच नाव सर्वत्र रूढ आहे.

इराणी लोकांनी ज्याचा अभिमान बाळगावा असा काळ म्हणजे ख्रिस्तपूर्व चौथ्या-पाचव्या शतकातील अकिमिनियड घराण्यातील राजसत्तेचा. यातील सायरस, डरायस यांचा आवर्जून उल्लेख केला जातो. यानंतर अत्यंत भरभराटीचा काळ म्हणजे सन २२४ ते ६३० पर्यंतचा सुमारे ४०० वर्षांचा ! या काळात सस्सन घराण्यातील राजांनी अकिमिनियन राजांचा थोर आदर्श डोळ्यांपुढे ठेवून राज्य केले. सस्सन घराण्यातील पर्शियन राजसत्तेच्या काळाला ‘ सुवर्णयुग ’ अशी यथार्थ संज्ञा होती.

पर्शियन राजांची अंकित राष्ट्रांना वागविण्याची पद्धती खरोखर औदार्याची आणि तितकीच धोरणी होती— लढायांतून क्रूरपणा दाखवीत नसत, शहरे उद्‌ध्वस्त करून टाकीत नसत, धार्मिक छळ करीत नसत, कत्तली तर नाहीतच. उलट जित लोकांना मानाच्या आणि महत्त्वाच्या नोकऱ्यांवर नेमीत ! हे खरे ' लोकांचे राजे '.

पारशी लोकांचा धर्म झरतुष्ट्री. यांचा देव अहूर-मझ्द. प्रेषित झोरास्टर किंवा झरतुष्ट्र, धर्मग्रंथ झेंद-अवेस्था. अग्नी आणि सूर्य हीं त्यांच्या धार्मिक विश्वासाची प्रतीके होत. हा नवीन धर्म नसून तो एक धर्मपंथ होता. या पंथाची स्थापना इराणमध्ये झाली. इराणी लोक आर्यवंशीय असल्यामुळे झोरास्ट्रिअन् धर्म आणि हिंदुधर्म यांच्यात काही बाबतींत भेद असला तरी पुष्कळशा बाबतींत विलक्षण साम्य आढळते.

पर्शियन राजसत्तेला उतरती कळा लागल्यावर अरबांनी संधी साधून इराणवर जोरदार आक्रमण केले. मुसलमान खलिफांची सत्ता देशावर सुरू झाली आणि तलवारीच्या धारेवर लोकांना मुसलमान बनविण्याचा सपाटा सुरू झाला. इराण्यांना परिस्थिती पाहून नमते घेण्याशिवाय गत्यंतर नव्हते. पुष्कळांनी धर्मांतर स्वीकारले; पण जे कट्टर धर्माभिमानी होते त्यांनी पुष्कळ हाल सोसून शेवटी आश्रयार्थ हिंदुस्थानकडे धाव घेतली. त्यांना येथे निर्भयता आणि सुरक्षितपणा लाभला.

इराणमध्ये मुस्लीम धर्म स्थापन झाला तरी त्या धर्माच्या शिया व सुनी या पंथांत झगडे सुरू होऊन शियापंथीयांचे वर्चस्व येथे प्रस्थापित झाले.

इराणवर पुढे तुर्क व मोंगलांनी स्वाऱ्या करून इराणला हैराण करून सोडले. चेंगिझखानाने लोकांच्या कत्तली करून विध्वंसक धोरण स्वीकारले. होते. इराणी लोकांना त्याच्या स्वारीचा धसका अजूनही अस्वस्थ करतो हीच कथा तैमुरलंगाच्या अनन्वित कृत्यांची.

पंधराव्या शतकात सुफी किंवा सफाविद घराण्यातील शियापंथीयांनी इराणमध्ये सत्ता काबीज केली. या घराण्यातील इस्माइल हा

इराणचा पहिला शहा झाला. याने आपल्या कर्तृत्वाने लोकप्रियता मिळविली जनतेने याला ' शहा आणि साधू ' या पदवीस चढविले !

सन १९२१ च्या सुमारास इराणवर पहलवी घराण्याची सत्ता सुरू झाली. घराण्यातील रेझाखान हा सैन्यातील एक अधिकारी होता. इराणची सत्ता काबीज करून पुढे तो इराणचा रीतसर ' शहा ' बनला. इराणच्या राजकारणातून परक्यांचा हात झिडकारून टाकण्याच्या दृष्टीने रेझाशहाने निरनिराळ्या क्षेत्रांत पावले टाकण्यास सुरुवात केली. सैन्य व पोलिसदल यांची धूर्तपणाने बळकट संघटना केली. टोळीवाल्यांना निःशस्त्र करण्याचा प्रयत्न सुरू ठेवला, लोहमार्ग बांधले, रस्ते तयार केले, शाळा स्थापन केल्या, कारखाने उभारले. थोडक्यात, इराणला आधुनिक, प्रबल आणि संपन्न बनविण्याचे धोरण धडाडीने आणि खंबीरपणे अवलंबिले. प्रजेनेही काही प्रमाणात त्याला सहकार्य दिले.

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी व नंतरही ब्रिटिश, रशिया, अमेरिका इ. परक्यांच्या हस्तक्षेपाने इराणात अस्वस्थता माजली. याच काळात तेल-उत्पादनाच्या प्रश्नानेही गंभीर स्वरूप धारण केले. या काळात मुसादिक या मुख्य प्रधानाने परक्यांच्या हस्तक्षेपाबाबत आणि तेलाच्या सवलतीबाबत कठोर धोरण स्वीकारले. याने तेल-धंद्याचे एकदम राष्ट्रीयीकरण केले. ब्रिटिशांना आपल्या फायद्यावर व व्यवसायावर गदा आणणारे धोरण रुचले नाही. परस्परसंबंध दुरावले आणि ब्रिटिशांनी अबादान येथील तेल-शुद्धिकरणाचा कारखाना बंद केल्याने इराणची आर्थिक घडी चांगलीच विस्कटली. घटनात्मक पेचप्रसंग निर्माण होऊन मुसादिकने अधिक सत्तेचा वापर करून शहालाही शह देण्याचा प्रयत्न केला. याचा परिणाम असा झाला की, शहाने इराण देशाबाहेर पलायन केले ! पण लष्कराची राजनिष्ठा आणि प्रजेची उग्र निदर्शने यांमुळे मुख्य प्रधान गडगडले ! आणि इराणचे शहा विजयी मुद्रेने परतले ! देशाची आर्थिक घडी नीट बसविण्याच्या उद्देशाने शहाने ब्रिटिशांबरोबर नवे करार केले.

मुसादिक स्थानभ्रष्ट झाले तरी त्यांचे कर्तृत्व आणि देशसेवा फार मोठी होती. जनतेवर त्यांचे विशेष वजन असण्याचे कारण त्याचे हात 'स्वच्छ' असत, लाचलुचपतीने ते कधीच बरबटलेले नसत. मुसादिक आणि शहाचे

पटले नाही, तरी सुद्धा शहाने मुसादिकची देशसेवा लक्षात घेऊन त्याचे प्राण वाचविले.

इराण देश हा पठारी प्रदेश असून त्याचा पूर्व आणि मध्य भाग ओसाड, निमओसाड असा आहे. गवताळ प्रदेश विखुरलेला असून उत्तरेकडील काही भाग जंगलव्याप्त आहे. अर्वाचीन इराण पठाराच्या पश्चिम अर्धात आहे. पावसाचे मान येथे फारच कमी, मोठाल्या नद्यांचा अभाव, त्यामुळे पाण्याची टंचाई तीव्रतेने भासते. फार लांबून पाण्याचे नळ बांधून आणावे लागतात. येथील कालव्यांची योजना फार प्राचीन काळापासूनची आहे. कालव्यांना पाण्याचा पुरवठा थोडया पावसामुळे व डोंगरावरील बर्फ वितळून होतो. येथील पाण्याचे पाट झाकलेले (कॅरेझ) असतात.

पाण्याच्या दुर्भिक्षामुळे इराणी सरकार आणि श्रीमंत लोक ठिकठिकाणी स्नानगृहे व पाण्याची कारंजी उभारतात. पाण्याच्या सोईकडे सरकारला विशेष लक्ष द्यावे लागते. धनिक लोक आपला पैसा या बाबतीत खर्च करून गरिबांचा दुवा घेतात.

तसेच घरांचा प्रश्नही तितकाच कठीण. हजारो कुटुंबे एक-खोलीच्या घरात जीवन जगतात! शहरातील घरे दाटीवाटीने उभारलेली आहेत. घरभाड्याकरिता वरच्या दर्जाच्या लोकांना ३० ते ५० टक्क्यांपर्यंत पैसा खर्च करावा लागतो. शिवाय शहरी लोकांना पाणी विकत घ्यावे लागते.

विजेचा प्रसार इराणमध्ये फारच कमी आहे. उत्पादन कमी म्हणून गरज असूनही उपयोग कमी. उद्योगधंद्यांना विजेची कमतरता चांगलीच जाणवते. श्रीमंत लोकांना रेडिओ वापरणे शक्य असूनही विजेच्या अभावी त्याचा उपयोग करता येत नाही.

येथील ७५ टक्के लोक शेतीच्या आणि गुरे पाळण्याच्या कामात गुंतलेले आहेत, गहू, तांदुळ बहुतेक सर्व जिल्ह्यांत होतो. शेतीचा व्यवसाय अजून बऱ्याच भागात जुन्या पद्धतीने चालतो. त्यामुळे अन्नधान्यांच्या उत्पादनाचे प्रमाण बेताचेच राहते. द्राक्षे, जर्दाळू, बदाम, मनुका, अननस, टरबुजे इ. फळे उत्तम व विपुल होतात. सुकी फळे परदेशी रवाना होतात. तंबाखू, अफू, रेशीम यांचेही उत्पन्न चांगले होते. कापूस, व लोकर यांची निर्यात

होते. घोडे, गाढव, खेचरे यांची निपज एके काळी चांगली होत असे. गुलाब हे इराणचे वैशिष्ट्य आहे. इराणच्या आखातात मोत्यांचा व्यवसाय चालतो, पण तो पूर्वीइतका तेजीत नाही. इराणी गालीचे व शाली प्रसिद्ध आहेत. देशाच्या आर्थिक बाजूचा विचार करता मासेमारीच्या व्यवसायाला महत्त्व आहे. रशियाने या व्यवसायाबाबत इराणशी काही करार करून खूप फायदा मिळविला; पण ती मुदत संपताच इराणने या धंद्याचे राष्ट्रीयीकरण करून टाकले.

इराणी लोकांच्या जेवणात गव्हाची रोटी हा मुख्य पदार्थ असतो. त्याच्या जोडीला चहा, साखर, तूप, सुकी फळे, भाज्या इ. पदार्थ असतात. पण कास्पिअन समुद्राच्या नजीकच्या भागात लोकांचे जेवण भाताशिवाय पुरे होत नाही; पण अन्य ठिकाणी भात म्हणजे चैन समजली जाते. जेवणात साखरेचा चहा समाविष्ट असतो. मांसाहार पुष्कळ लोकांना परवडत नसला तरी आठवड्यातून एकदा तरी मांस खाण्यात येतेच. मुसलमान लोक डुकराचे मांस मात्र बिलकुल खात नाहीत, मेंढ्या व बकऱ्यांचे मांस ते खातात. दूध व मेंढीच्या दुधापासून बनविलेले एक विशिष्ट पेय ' युघर्ट ' (Yoghurt) हे लोकप्रिय पेय आहे. दिवसातून तीनदा हे लोक जेवण करतात. अनेकांनी एकाच ताटात जेवणाची चाल यांच्यात आहे. एकाच भांड्याने पाणी पितात. उष्टे हा शब्दच त्यांना माहीत नाही.

देशात पर्शियन भाषा बोलणाऱ्यांची संख्या खूप आहे. दोन-तृतीयांशापेक्षा अधिक लोक ही भाषा बोलतात. सरकारी कामकाज याच भाषेत चालते. वर्तमानपत्रे, रेडिओ यांचीही हीच भाषा असते. रेझाशहा गादीवर आल्यापासून सर्व शाळांतून ही भाषा शिकविली जाते.

मोठ्या शहरांतून सुधारलेले लोक दाढी वगैरे साफ करीत असलेले आढळले तरी सामान्यपणे ते मिशा ठेवतात. मुसलमान म्हटले की त्याला दाढी असावयाचीच हा समज इराणात पार बदललेला आहे. पण दाढी हे विशेषत: वृद्ध लोकांचे वैशिष्ट्य आहे. मुल्लांची लांब दाढी मात्र असावयाचीच.

सुधारलेल्या शहरी भागातील लोकांचा पोषाख पाश्चिमात्य लोकांप्रमाणे असतो. अशा पोषाखाचे प्रमाण वाढत आहे. तरीपण इराणी लोकांच्या विजारी किंवा चोळणे हे वैशिष्ट्यपूर्ण असतात. त्यांच्या पोषाखातील दुसरे

वैशिष्ट्य म्हणजे त्यांची वाटोळी टोपी, खेड्याच्या भागात तर ही सर्रास दिसून येईल. मुल्ला मात्र त्यांच्या लांब झग्यावरून आणि डोक्यावरील फेटा किंवा पागोट्यावरून ओळखता येतात. स्त्रियांचा पडदा किंवा बुरखा अजूनही पूर्णपणे नाहीसा झालेला नाही.

सरकारी अधिकाऱ्यांना नवीन कायद्यानुसार विलायती तऱ्हेचा आखुड कोट आणि विजारी घालाव्या लागतात. डोक्यावर मात्र पेहेलवी टोपी हवी. ही साधी गोल टोपी असून तिला अर्धचंद्र लावलेला असतो. शहरी भागात इराणी स्त्रिया सुधारणेच्या बाबतीत बिलकुल मागे नाहीत.

इराणातील निम्म्याहून अधिक लोक मुस्लीमपूर्व काळातील पर्शिअन लोकच होत. सक्तीच्या धर्मांतराने ते मुस्लीम बनले. येथील बहुसंख्य लोक शियापंथीय मुस्लीम धर्माचे आहेत. इराणचा हाच अधिकृत धर्मपंथ आहे. असे जरी असले तरी त्यांच्या जीवनात पूर्वीच्या झोरास्ट्रियन पंथाची छटा आढळतेच. देशाची भाषा पर्शिअन, देशाचे नाव पर्शिया, पर्शिअन काव्ये येथील सारे लोक गातात. थोडक्यात, पर्शिअन जीवनाचा ठसा सर्व क्षेत्रांत उमटलेला दिसतो.

इराणमध्ये साक्षरतेचे प्रमाण फारच थोडे आहे. शहरी भागात साक्षरता आणि शिक्षण वाढलेले दिसले तरी खेड्यातून लिहिता-वाचवा येणारे फक्त चार-दोन लोकच आढळतील आणि ते म्हणजे मुल्लाच. अलीकडे १९४७ मध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने सरकारने कारखानदारांवर एक बंधन घातले आहे. ते हे की, प्रत्येक कारखानदाराने आपल्या कामगारांना लिहिण्यावाचण्याचे शिक्षण देण्याकरिता स्वतंत्र वर्ग चालविले पाहिजेत.

इराणमध्ये प्राथमिक शिक्षण कायद्याने सक्तीचे केले आहे, त्याकरिता सरकारी शाळाही आहेत. पण कायद्याची अंमलबजावणी तत्परतेने होत नाही. मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन दिले जाते. माध्यमिक शिक्षण सक्तीचे नाही, पण मोफत किंवा कमी खर्चात शिक्षण देणाऱ्या शाळा स्थापन झाल्या आहेत. मुलींकरिता स्वतंत्र शाळा आहेत. झोरास्ट्रियनपंथियांच्या मुलांकरिता स्वतंत्र शाळा व महाविद्यालये आहेत. मुल्लांना शिक्षण देण्याच्या संस्था असून त्यांच्या अभ्यासक्रमात मुख्यतः कुराणातील तत्त्वांचा विषय समाविष्ट आहे. ज्यूंच्या स्वतंत्र शाळा आहेत. तेहरानमधील एका ज्यू-

शाळेला ' सायरस ' या पर्शिअन राजाचे नाव आहे. बाबिलोनच्या बंदिवासातून सायरसने ज्यूंची मुक्तता केली त्याबद्दलची ही कृतज्ञता.

वरिष्ठांना आदर दाखविण्याकरिता इराणी मनुष्य पाच-सहा फूट अंतरावर उभा राहून डोके नमते करील आणि हात जोडून किंवा बांधून उभा राहील. चेहऱ्यावरील भाव शांत ठेवून तो हलक्या आवाजात बोलेल. मित्रामित्रांची भेट मात्र गालांच्या व नंतर कपाळाच्या चुंबनाने किंवा आलिंगनाने होते. हस्तांदोलन या लोकांस फारसे माहीत नाही, शहरी जीवनात मात्र पाश्चात्त्यांच्या अनुकरणाने हस्तांदोलनाचा प्रकार वाढत आहे.

इराणच्या सैन्याचे निशाण तीनरंगी आहे–हिरवा रंग सचोटी, निष्ठा यांचा द्योतक, पांढरा रंग पावित्र्याचा आणि तांबडा शौर्याचा द्योतक. शियापंथियांचा ध्वज हिरव्या रंगाच्या रेशमी कापडाचा असतो. त्यांवर ' अल्ला, महंमद, अली ' ही अक्षरे लिहिलेली असतात. मुल्लाला कमरेला



गुंडाळण्याकरिता हिरव्या रंगाचे फडके, डोक्यावर घालण्याकरिता हिरव्याच

रंगाचे पागोटे भेट म्हणून दिले जाते. यांच्यात हिरव्या रंगाचे महत्त्व असण्याचे कारण महंमदाने याच रंगाचा वापर केला होता असे समजतात म्हणून.

इराणच्या राष्ट्रीय चिन्हात सिंह आणि सूर्य यांच्या आकृत्या असून त्यांच्याभोवती गव्हाच्या लोंब्यांची माळ काढलेली असते. ही पर्शिअन परंपरेची प्रतीके होत. सिंह हे शौर्याचे व सूर्य हे शहाणपणाचे प्रतीक मानले जाते.

हल्लीच्या शहाचे वडील रेझाशहा यांनी नेपोलिअनप्रमाणे स्वतःला राज्याभिषेक करून घेतला. स्वतःच्या पराक्रमावर आणि कर्तृत्वावर शहा– पद मिळविल्याची सूचनात्मक भावना त्याच्या मुळाशी आहे. सर्व सत्तेचे प्रतीक म्हणजे जो मुकुट तो धारण करण्यापूर्वी इराणात स्थिरता प्रस्थापित झालेली असावी अशी सदिच्छा हल्लीच्या शहाची (छायाचित्र पान १४२ वर) असल्यामुळे त्याने आज इतकी वर्षे राज्याभिषेकाचा सोहळा अधिकृतपणे करून घेतला नव्हता ! पण तो नुकताच १९६७ च्या आक्टोबरमध्ये पार पडला. या कार्यक्रमात राणीला ' राज्ञीपद ' देण्याचा सोहळा पहिल्यांदाच समाविष्ट करण्यात आला.

यांच्यात वर्षारंभाच्या सणाला सामाजिक व राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले आहे. हा सण वसंतऋतूच्या आरंभी म्हणजे २१ मार्चच्या सुमारास येतो व तो बरेच दिवस चालतो. शाळांना या वेळी सुट्टी असते. या सणात लोक आपापल्या मित्रांना भेटतात आणि भेटी वगैरे देतात. राजवाड्यात निरनिराळ्या देशांच्या वकिलांतीतील अधिकाऱ्यांना निमंत्रणे पाठवून बोलावतात आणि परदेशी अधिकाऱ्यांना राणी स्वतः सोनेरी तबकातून देण्याकरिता ठेवलेल्या भेटी नजर करते. एका खेपेला तर सुरय्या राणीने गरिबांना वाटण्याकरिता खूप कपडे जमा केले होते, यांतील पुष्कळसे कपडे ती अमेरिकेत असताना तेथेच तिने जमा केलेले होते. राणीने अर्थातच हजारो गरिबांचे दुवे घेतले.

इराणमध्ये इराणच्या सर्वश्रेष्ठ सत्ताधाऱ्याचा म्हणजे शहाचा वाढदिवसाचा समारंभ सार्वजनिकरीत्या साजरा करण्याची पद्धत फार जुनी आहे.

या दिवशी सर्व सरकारी कचेऱ्यांना सुट्टी असते. इराणात अन्य कोणाचाही वाढदिवस जाहीर रीतीने साजरा होत नाही.

मुसल्मान लोकांचे मुख्य धार्मिक सण म्हणजे रमझान व मोहोरम. रमझानच्या महिन्यात मुसलमान लोक सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत उपवास करतात. या वेळी खाणेपिणे अगदी वर्ज्य. अशा रीतीने वाचलेले अन्न-पदार्थ गरिबांना वाटून देण्याची पद्धत यांच्यात आहे. सूर्यास्तानंतर मात्र रात्री बारापर्यंत गप्पागोष्टी आणि भोजनादी कार्यक्रम मजेत चालतात. मोहोरमचा सण करून शियापंथीय मुसलमान लोक महंमदाचे नातू हसन-हुसेन यांचे हौतात्म्यनिदर्शक म्हणून गंभीर रीतीने साजरा करतात.

इराणमध्ये फ्रेंच संस्कृतीचा, चालीरीतींचा आणि भाषेचा पगडा विशेष आहे. याचे कारण असे की, नेपोलिअनने हिंदुस्थानला येण्याकरिता इराणच्या शहाशी संपर्क साधण्याकरिता वकील पाठविले होते. त्यामुळे नेपोलिअनचे नाव सर्वतोमुखी आहे. त्याची चित्रे सर्वत्र पसरली आहेत. तरुण पिढी बहुधा फ्रान्समध्येच शिकलेली आहे.

परक्यांचे वर्चस्व देशात वाढू नये याबद्दल इराण अतिशय जागरूक आहे. ब्रिटन, रशिया, अमेरिका निरनिराळ्या प्रकारांनी येथे वर्चस्व स्थापण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण त्यातल्या त्यात अमेरिकेविषयी इराणचा दृष्टिकोण विरोधात्मक नाही. याचे कारण अमेरिकेला इराणच्या कोणत्याही भूभागाची हाव नाही. रशिया व ब्रिटन मात्र इराणमध्ये वर्चस्व मिळविण्याची सतत संधी बघत असतात. त्यामुळेच इराणमध्ये या दोन राष्ट्रांबद्दल तिडीक निर्माण होणे स्वाभाविक आहे.

इराणच्या नाणे-व्यवस्थेला नीट स्वरूप देण्याचे बिकट कार्य अमेरिकेचे अर्थ-तज्ज मॉर्गन शूस्टर यांनी यशस्वीपणे पार पाडलेले आहे. याची जाणीव इराण्यांना अजूनही होत असते. सन १९२७ मध्ये इराणने 'रिआल' हे नवे नाणे सुरू केले. याचा शंभरावा हिस्सा म्हणजे 'दिनार'. शंभर रिआलचे एक पहलवी सोन्याचे नाणे आहे. पाच व दहा रिआलचे चांदीचे नाणे आहे. कागदी चलन इराण्यांना अगदी नवे भासते आणि धोक्याचेही वाटते; पण ते सन १९३० मध्ये सुरू करण्यात आले.

इराणमध्ये कौटुंबिक जीवन व प्रतिष्ठा यांना फार महत्त्व आहे. कुटुंबातील कर्त्या पुरुषाच्या आज्ञेत सर्व मंडळी असतात. कुटुंबाच्या प्रतिष्ठेला तो फार जपतो. कोणाकडून जर दुष्कर्म झाले तर सबंध कुटुंबाला कालिमा लागला असे समजतात. दारूड्या मुलाला हाकलून देतात ! एखाद्या मुलीने आपले शील बिघडविले तर तिचा त्याग करतात, किंवा तिचा भाऊ एखाद-वेळ तिला ठारही मारून टाकतो !

इस्लामी धर्मानुसार पुरुषाला जास्तीत जास्त चार बायका करण्याची परवानगी आहे. पण ही प्रथा आता मोडत चालली आहे. यांच्यात चुलत-भावाशी लग्न करण्याची पद्धत आहे. या पद्धतीमुळे आर्थिक स्थितीला बळकटी येते, कौटुंबिक सामर्थ्य वाढते आणि सुरक्षितता प्राप्त होते.

यांच्यात आणखी एक विशेष चाल आहे, ती म्हणजे ‘ तात्पुरत्या ’ किंवा ‘ मुदतबंदी ’च्या बायकोची ! सहा ते बारा महिन्यांच्या मुदतीने यांच्यात बायका करतात आणि त्याबाबतच्या करारात स्त्रीला मिळणारी रक्कम ठरविली जाते. अशा प्रकारची लग्ने अगदी धार्मिक, न्याय्य आणि नैतिक मानली जातात !

इराणी लोक कलेचे फार भोक्ते समजले जातात. जीवनाला वळण लावून ते सुसह्य करण्याचे एकमेव साधन म्हणजे त्यांची कला. कनिष्ठा-पासून वरिष्ठापर्यंत म्हणजे सर्व थरांतील लोकांत कलासक्ती आढळून येते. कलेचा आविष्कार केवळ चित्रालये किंवा पदार्थसंग्रहालये यांतच दिसून येतो असे नव्हे, तर तो घरांघरातून रोजच्या जीवनात दृष्टीस पडतो. इराणी धनगर बासरीवर सुंदर सूर काढून स्वतःचे व इतरांचे मन रिझवतो. फुलवाला देखील फुलांची रंगसंगती साधून आणि त्यांची मोहक रचना करून गुच्छ तयार करतो, रसिक दृष्टी त्यात दिसलीच पाहिजे. पर्शियातल्या बागा आणि गालीचे यांना जागतिक प्रसिद्धी आहे, कारण त्यात कलेचा विलास असतो; अनेक वेळा त्यांची रचना प्रतीकात्मक असते; म्हणजे त्याला अर्थही असतो, अर्थ लावावा लागतो, पाहणाराला ते एक प्रकारचे आव्हानच असते.

इराणी लोकांना गोष्टींचा भारी नाद. लहानापासून थोरापर्यंत सर्व लोक गोष्टी ऐकण्यात गुंग होऊन जातात. ते एक करमणुकीचे साधनच. तसेच

गप्पागोष्टींना विनोदाची फोडणी असतेच. हे लोक सहजतेने चुरचुरीत विनोद करण्यात फार कुशल आहेत. यांची चहागृहे म्हणजे गप्पागोष्टींचे अड्डे, काबाडकष्टी जीवनाला विसर पाडणारी ही ठिकाणे होत.

या लोकांचा नशिबावर पूर्ण विश्वास. असाच विश्वास ठेवणाऱ्या एका म्हाताऱ्याचे शहाणपण पाहा – शिकारीला निघण्यापूर्वी चेंगीझखानाने शहराच्या प्रवेशद्वारापुढे शंभर कैद्यांची डोकी उडविण्याचा हुकूम दिला. त्यात एका म्हाताऱ्या कैद्याने तरवारीचा वार चुकविला. त्यावर चेंगीझखान त्याला विचारतो, " अरे मूर्ख म्हाताऱ्या, शृंखलांनी जखडलेला तू, तुझी सुटका होईल अशी कशी अपेक्षा करतोस ? " त्यावर तो म्हातारा शांतपणे उद्गारला, " असे म्हणतात की, वरती फेकलेले फळ खाली जमिनीवर पोहोचण्यापूर्वी हवेत हजार गिरक्या घेते, तेव्हा थोड्या कालावधीतसुद्धा मी सुटका होण्याची एखादी घटना घडणार नाही हे कसे सांगावे ? " इतक्यात चेंगीझखानाचा घोडा जोराने मागे सरकला, त्याबरोबरच चेंगीझखान खाली कोसळला आणि मरण पावला ! कैद्याची सुटका झाली ! !

इराणी लोकांचा धर्मावर अतिशय विश्वास. गोष्ट चांगली घडो की वाईट घडो, ती अल्लाची इच्छा ! अल्ला म्हणजेच परमेश्वर. प्रत्येक बाबतीत अल्लाची करुणा भाकणे हा त्यांचा धर्म. मशीद ही त्यांची प्रार्थनेची जागा. तिचे पावित्र्य आणि तेथील सत्ता विशेष मानली जाते. त्यामुळे ते एक प्रभावी आश्रयस्थान बनले आहे. तेथे राजसत्ता कमजोर मानली जाते. एखाद्या अपराध्याने मशिदीचा आश्रय घेतला तर सरकारी सेवक त्याला तेथे पकडू शकत नाहीत !

इराणी लोक चांद्रमासीन मुस्लीम पंचांग पाळीत असले तरी नवीन वर्षारंभ मुस्लीमपूर्व काळानुसार वसंत-संपात दिनी म्हणजे मार्चच्या २१ ला साजरा करतात. याला ' नौ–रोज ' म्हणतात. छोट्याशा पेटलेल्या होळीवरून उडी मारून स्वतःला शुद्ध करून घेण्याची प्रथा यांच्यात आहे !

मुस्लीम दिनदर्शिकेत मोहरम हा पहिला महिना, याचा पहिला दिवस कोणत्याही कार्याला शुभ मानला जातो. रमझान हा नववा महिना त्यांच्या उपवासाचा. याच महिन्यात महंमदाला कुराणाची प्राप्ती झाली असे समजतात. शुक्रवार हा त्यांच्या सामुदायिक प्रार्थनेचा दिवस. यांचा नवा

दिवस सूर्यास्ताला सुरू होतो; ख्रिश्चन लोकांचा मध्यरात्री आणि आपला सूर्योदयाबरोबर.

इराणी लोक तीव्र भावनेचा आविष्कार मोठ्याने रडण्यात करतात! रडणे हे दुर्बलतेचे द्योतक नसून तीव्र भावनेचे लक्षण समजले जाते. अन्त्य-संस्काराच्या वेळी पुरुष व स्त्रिया मोठ्याने हुंदके देऊन रडतात. मशिदीत विशेष पवित्र दिवशी लोक सामुदायिकरीत्या हुसेनकरिता आणि शिया-पंथीय इतर हुतात्म्यांकरिता रडतात. रडण्याचे महत्त्व आणि त्याचे तत्त्व-ज्ञान कळण्याकरिता पर्शियात जन्म घेतला पाहिजे असे एका पर्शिअन विचारवंताने म्हटले आहे,

यांच्या देशात शक्तिसाधनेला प्राचीन काळापासून फार महत्त्व दिले आहे, काव्यबद्ध रस्तुम हा त्यांचा आदर्श. उंचनिंच, बळकट बांध्याचा आणि निधड्या छातीच्या तरुणाला ' रुस्तुम ' म्हणून संबोधले जाते. शारीरिक शक्तीचे प्रतीक म्हणून राजवाड्याकडे जाणाऱ्या सर्व रस्त्यांवर ओळीने धष्टपुष्ट बैलांचे पुतळे उभारले होते! पुरुषांची ताकद आणि स्त्रियांचे शील याला येथे फार महत्त्व आहे.

इराणी कुटुंबात एकोपा विशेष दिसून येतो. कुटुंबप्रमुखाला ' आगा ' अशी आदरसूचक संज्ञा आहे. कुटुंबात काळे गुलाम व दाया असतात. दूध पाजणाऱ्या दाईला दुसऱ्या आईप्रमाणे समजून तिच्या खाण्यापिण्याची आयुष्यभर तरतूद केलेली असते. इराणी मनुष्य गुलामाशी आणि घोड्याशी कधीही क्रूरपणे वर्तन करीत नाही. ते त्यांच्याशी प्रेमाने वागतात. एखाद्याला विपन्नावस्था प्राप्त झाली तर इराणी मनुष्य स्वतःचे कपडे विकण्यास तयार होईल, पण गुलामाला विकणार नाही!

इराणचा बुद्धिमान कवी फिर्दोसी ' शाहनामा ' नावाचे साठ हजार श्लोकांचे काव्य लिहून कीर्तिरूपे उरले आहेत. या ग्रंथात इराणचा इतिहास ग्रथित असून काव्य पूर्ण करण्यास त्याला तीस वर्षे लागली! फिर्दोसी या महाकवीपासून पर्शियाच्या राष्ट्रीय महाकाव्याच्या सुवर्णयुगाला आरंभ होतो. दुसरा एक कवी हाफीझ. या कवीने रसात्मक काव्याचे उत्कृष्ट नमुने जगात करून ठेवले आहेत. त्याच पद्धतीवर सर्व गझललेखकांनी आपली

काव्ये लिहिली. फारशी वाङ्मयात प्रेम व सुरा यांची महती आणि सौख्य वर्णन करणारी पुष्कळ काव्ये आहेत.

तेहरानचे विद्यापीठ हे एकच विश्वविद्यालय इराणमध्ये आहे. याला संलग्न असणारी महाविद्यालये इस्फहान, शिराझ, ताब्रिज येथे असून तेथे बहुतेक सर्व प्रकारच्या विद्या-शाखा आहेत. उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींचे प्रमाण अवघे ५ टक्के पडेल. उच्च शिक्षणाकरिता परदेशी जाणारे विद्यार्थी प्रामुख्याने अमेरिकेलाच जातात, सध्या अशा विद्यार्थ्यांची संख्या हजारावर जाईल.

इराणचे मुख्य शहर तेहरान. येथे जगातील बहुतेक सर्व देशांचे लोक आढळतात. इंग्लिश, फ्रेंच, अमेरिकन, रशिअन हे लोक तर आहेतच. शिवाय चीन, जपान, जर्मनी, पंजाब इ. देशांचे लोकही आढळतात. शिराझ द्राक्षे, उत्कृष्ट मद्य, गुलाबी अत्तर यांविषयी प्रसिद्ध आहे. प्रख्यात फारशी कवी सादी व हाफीज हे याच ठिकाणचे.

● ● ●

१५. अफगाण लोक

अफगाणिस्तान हा फाळणीपूर्वी हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीवरचा देश आता पाकिस्तानच्या सरहद्दीवरचा झाला. हा अतिशय डोंगराळ प्रदेश असून तेथील त्याच्या उंचीमुळे काही भाग तर हिवाळ्यात बर्फाच्छादित असतो, आणि मग उन्हाळ्यात तेथील हिमनद्या पुढे पुढे सरकू लागतात!

येथील रहिवासी दुराणी, गिलचे इ. भिन्नभिन्न जातींचे व राष्ट्रांचे असले तरी त्यांचा धर्म मुसलमानी. पण एक विशेष गोष्ट अशी की, एक हजार वर्षांपूर्वी येथे हिंदू राजांची सत्ता होती! त्याच्याही पूर्वी पुरणांतरी उल्लेखिलेले गांधार हे हल्लीचे कंदाहार होय! अंध धृतराष्ट्राची पत्नी गांधारी ही गांधारची राजकन्या होती. शिवाय अलीकडे काबूलच्या आसपास आढळणाऱ्या अवशेषांवरून इमारतींचे अवशेष, पुतळे, नाणी इ. हिंदूंच्या व बौद्धांच्या अस्तित्वाची आणि त्यांच्या सत्तेची खात्री पटवितात. एके ठिकाणी भव्य बुद्ध-मूर्ती व कोरीव लेणी आढळली आहेत. ती भग्नावस्थेत असली तरी त्यांच्या अस्तित्वाची साक्ष देण्यास समर्थ आहेत.

अफगाणिस्तानात राहणाऱ्यांना अफगाण हे नाव योग्य असले तरी ते पठाण म्हणूनही ओळखले जातात. पठाण शब्द पुक्तान या मूळ शब्दाचे हिंदुस्तानी भाषेत पठाण असे रूपांतर झाले. तसेच अफगाण या शब्दाची व्युत्पत्ती पूर्वीच्या यहुदी राजा सौल याच्या नातवाचे नाव अफगाना या नावाशी जोडतात. ही कल्पना अगदी अशक्य नाही; कारण यहुदी लोकांच्या चालीरीती आणि शारीरिक बांधा यांच्याशी अफगाणांचे साम्य आढळते. ही अफगाणांची चेहरेपट्टी, विशेषतः नाकाची रचना ज्यू लोकांशी साम्यता दर्शविते. अफगाणी स्त्रिया यहुदी लोकांच्या बायकांप्रमाणे सुंदर असतात. अवयवांची ठेवण त्यांच्याप्रमाणेच असते.

अफगाणिस्तान हा डोंगराळ प्रदेश असल्याने लहानमोठ्या डोंगरांच्या रांगा, उंच उंच शिखरे, हिमनद्या इत्यादींमुळे लोकांच्या वस्तीत कमालीचा



तुटकपणा निर्माण झाला आणि त्यामुळे येथील लोक टोळ्या करून राहतात. या टोळ्यांचा अर्थात एखादा नायक असतोच. या टोळ्यांचे जीवन पूर्णपणे स्वच्छंदीपणाचे आणि बेफिकिरीचे असते. आपापसातील भांडणे, तंटे विकोपाला सहज जाऊ शकतात, त्यांचे पर्यवसान मग मारामाऱ्या व खुनांत न झाल्यासच नवल. पठाण म्हटले की त्यांच्या खांद्यावर बंदुक ही असावयाचीच ! बंदुकीवर त्याचे बायकोपेक्षाही विलक्षण प्रेम ! नियम, कायदे हे फक्त विचारवंतांना बंधनकारक असतात. यांचे नीतिनिमय वेळेनुसार आणि प्रसंगांनुसार बदलणारे असल्याने नीतीची बंधने त्यांना

कधीच त्रास देत नाहीत. तेथील सारा समाज एकसंधी असा आढळत नाही.

अफगाण किंवा पठाण लोक तुम्ही पाहिले असालच. त्यांचा वर्ण गौर असून उंचनिंच, धिप्पाड आकारमानाचे आणि मजबूत बांध्याचे असतात. जीविताची चिंता ते कधीच बाळगीत नाहीत, बेपर्वाई त्यांच्या नसानसांतून भिनलेली आढळते. बंदुक ही त्यांची सहचारिणी ! मरणाची आणि ठार मारण्याची त्यांना कधीच भीती वाटत नाही. ते धाडशी असले तरी खुनशीपणा त्यांच्या ठिकाणी आढळतो. असे जरी असले तरी प्रेमळपणा त्यांच्या ठिकाणी नसतो असे नाही. रवींद्रनाथांच्या ' काबुलीवाला ' या कथेवरून त्यांच्या स्वभावाची ओळख पटेल. आश्चर्याची गोष्ट एवढीच की, क्रौर्य आणि मायाळूपणा यांचे साहचर्य त्यांच्या ठिकाणी असू शकते. पण त्यांचा स्वभाव एककल्ली व चंचल असल्यामुळे त्यांच्या मनोवृत्ती केव्हा बिथरतील हे सांगता येत नाही.

आदरातिथ्याविषयी हे लोक प्रसिद्ध आहेत. अतिथि-सत्कार हे त्यांचे ब्रीद असते. शत्रू जरी दारी आला तरी त्याला ते आश्रय देतील, उदारपणाने वागवतील, पण त्यांचे हे आदरातिथ्य त्यांच्या आवारापुरतेच असते !

यांची घरे विटांची असून ती सामान्यपणे एकमजलीच असतात. घराभोवती उंच भिंत असते. घरांची छपरे सपाट असून उन्हाळ्यात तेथे लोक झोपतात. येथील बहुतेक प्रत्येक खेडेगाव तटबंदीने बंदिस्त असते. टोळधाडीपासून संरक्षण हाच त्यामागील हेतू असावा.

अफगाणांच्या पोषाखातील वैशिष्ट्य म्हणजे त्यांची घोळदार आणि पुष्कळशी पोकळ अशी पांढरी पायजमावजा विजार, अंगात सदरा आणि सदऱ्यावर घट्ट बसणारे जाकीट. हे जाकीट साधे किंवा जरीचे आणि त्यावर जरुरीप्रमाणे ओव्हरकोट. डोक्यावर घट्ट बसणारी गोल टोपी आणि टोपीभोवती गुंडाळलेले निळे किंवा तांबडे पागोटे. या पागोट्याचे एक शेपूट पाठीवर सोडलेले असते. पायात खाडखाड वाजणारे मजबूत बूट आणि हातात भला मोठा दांडा ! स्त्रियांच्या पोषाखात रंगीत कापडाला विशेष महत्त्व असते, त्यावर कशिदा किंवा काही नक्षी ही असावयाचीच. पोषाखातील स्वच्छता मात्र बेताचीच, पाण्याची कमतरता हेच त्याचे कारण असावे. पाण्याची कमतरता आणि कडक थंडी यांमुळे लोकांना रोजचे स्नान नसतेच.

येथील बहुतेक पठाणांची बोली भाषा पुस्तू किंवा पक्तू. तरी पण स्थानपरत्वे तीत थोडाफार फरक पडतोच. इराणच्या बाजूकडील भागात फार्सीचे महत्त्व, तर उत्तरेच्या बाजूला तुर्की व रशिअन भाषांचा पगडा. पण येथील दरबारची भाषा मात्र पर्शिअन! व्यवहारातही हिचा उपयोग होतो.

पण विशेष म्हणजे काफिरिस्तानातील काफिरी भाषा ही अजिबात वेगळी! काफिर म्हणजे मुसलमानेतर. हे लोक ज्या भागात राहतात त्याला काफिरिस्तान म्हणतात. येथील काफीर ग्रीक वंशाचे आहेत. अलेक्झांडर हिंदुस्थानभर स्वाऱ्या करून जेव्हा परत गेला तेव्हा त्याच्या सैन्यातील लोक जे रेंगाळले व मागे राहिले ते येथेच स्थायिक झाले. हे अर्थातच मुसलमानी धर्माचे नाहीत.

अफगाण लोकांचा शेती हा मुख्य व्यवसाय असू शकत नाही. प्रदेश डोंगराळ व पावसाचे मान फारच कमी. बर्फ वितळून काही नद्यांना पाण्याचा पुरवठा होतो. या नद्यांचे पाणी पाटांनी किंवा छोट्या कालव्यांनी शेतीला पुरविले जाते. येथील कालवे जमिनीच्या खालून आणि झाकून काढलेले असतात. बाष्पीभवनाने पाणी कमी होऊ नये हा त्यातील उद्देश. लोकांच्या कल्पकतेचे कौतुकच केले पाहिजे. गरज हीच प्रेरक शक्ती आहे. अशा कालव्यांना 'कॅरेझ' म्हणतात. यांचा दुसरा महत्त्वाचा धंदा मेंढपाळीचा. मेंढ्यांचे मोठमोठे कळप पाळणे हा अनेकांचा उपजीविकेचा धंदा आहे. शेळ्या, मेंढ्या, बकरे, घोडे, उंट यांचे कळप हीच त्यांची संपत्ती.

येथील शेतीच्या उत्पन्नात तांदूळ, मका, तंबाखू, गहू ही पिके असली तरी त्यांचे उत्पादन मर्यादित राहते. धान्योत्पादनाच्या मानाने फळफळावळांचे उत्पन्न अधिक असते. येथील द्राक्षाचे मळे विस्तृत असून काबुली द्राक्षांना जगप्रसिद्धी लाभलेली आहे. सफरचंद, मोसंबी, डाळिंबे, तसेच खरबूज, टरबूज, काकड्या यांचे अमाप पीक येथे येते. जरदाळू, बदाम, पिस्ते, अक्रोड इ. विविध फळांचे उत्पादन फार मोठ्या प्रमाणावर होते. येथील फळांची विपुलता आणि विविधता इतकी आहे की काही लोक काही महिने फळांवरच राहतात! अफूची लागवड येथे होते.

अफगाण लोकांच्यां जेवणात मांस हा मुख्य पदार्थ. मांसाकरिता शेळ्या, मेंढ्या व वेळ पडल्यास उंट यांचा उपयोग करतात. मेंढ्यांच्या जातींत लठ्ठ शेपटीची मेंढी हा एक प्रकार आहे, या मेंढीला 'दुंबा' म्हणतात. हिचे मांस विशेष रुचकर असते. शेपटीतील चरबीचा उपयोग लोण्याप्रमाणे करतात. मांसाबरोबर गव्हाची जाड रोटी व तांदुळाचा 'पुलाव' म्हणजे मसालेभात हे लोक खातात. मांसयुक्त पुलाव हे त्यांचे आवडते पक्वान्न. हे लोक चहा पितात, पण तो बिनदुधाचा. चहा पिण्याकडे प्रवृत्ती अधिक. चणे-फुटाणे व मका हे त्यांचे नित्याचे आवडते खाद्य. विशेष गोष्ट म्हणजे मद्यपान यांच्यात वर्ज्य समजले जाते, असे म्हणतात.



अफगाण–पठाण सारे इस्लामी धर्माचे. त्यांचा धर्मग्रंथ कुराण; पण बहुसंख्य लोक निरक्षर किंवा अशिक्षित असल्याने ते स्वतः कुराण वाचू शकत नाहीत. त्यामुळे त्यांचे धर्माचे ज्ञान बेताचेच. यांची सारी भिस्त कुराणाचा अर्थ सांगू शकतो असे म्हणणाऱ्या मुल्लांवर ! तेव्हा मुल्ला सांगेल तो अर्थ. पण कुराणाच्या मिरवणुकीत भाग घेणे, निजताना ते उशाखाली घेणे, तसेच मशिदीत जाऊन प्रार्थना करणे आणि अल्लाच्या नावाचा सतत आणि वेळीअवेळी जप करणे इ. कर्मांत मात्र ते धार्मिक भावनेने सहभागी होतात. त्यांच्या तोंडात 'इन्शाल्ला' व 'माशा अल्ला' हे शब्दप्रयोग वारंवार येत असतात. इन्शाल्ला म्हणजे 'ईश्वराची कृपा असेल तर' व माशा अल्ला याचा अर्थ 'ईश्वराची मेहेरबानी'. साध्या प्रश्नांची उत्तरे देतानासुद्धा या आदरार्थी शब्दांची योजना केली जाते.

येथे मुल्लांचे वर्चस्व लोकांच्या कौटुंबिक जीवनात ठायीठायी दिसून येते. मुलांना शिक्षण द्यावयाचे झाल्यास मुल्लाच देणार. यांचे शिक्षण मात्र

कुराणापुरतेच मर्यादित असते. न्यायदानाचे काम काजी-मुल्लांकडेच असते. मनुष्य आजारी पडला तरी सुद्धा त्याच्या भवितव्याची काळजी करून सल्ला घेण्याकरिता अज्ञानी बहुजनसमाज मुल्लांकडेच जाणार. कौटुंबिक अडचणी निर्माण झाल्यास त्यांतून मार्ग काढण्याचे मार्गदर्शन मुल्लाच करणार. धार्मिक विधींच्या बाबतीत कुरणातील मंत्र मुल्लांशिवाय कोण म्हणणार ? हे लोक पिरांना देव समजतात. संकटमुक्त करण्याची शक्ती यांच्यात आहे, अशी यांची समजूत. जादूटोणा, शकून, ज्योतिष यांवर त्यांचा विश्वास.

पठाण लोक उत्तम लढवय्ये म्हणून गणले जातात. त्यांचे शारीरिक सामर्थ्य, त्यांच्या अंगी असलेले कमालीचे धैर्य, शौर्य, त्यांची काटक आणि सोशिक वृत्ती, त्यांची अचूक नेमबाजी, जिवावर उदार होऊन लढण्याचे धोरण इ. सैनिकाला लागणारे गुण त्यांच्या ठिकाणी निसर्गतःच वसत आहेत. घोड्यावर बसण्यात आणि गनिमी काव्याने लढण्यात त्यांच्याशी कोणी बरोबरी करू शकणार नाही. प्रत्येकजण निसर्गतःच लढवय्या !

यांच्यात गोशापद्धती असल्याने स्त्रियांची तोंडे दृष्टीस पडणे कठीण, म्हणून स्त्री-मध्यस्थाच्या वतीने यांच्यात लग्ने जमवितात. लग्नाचे ठरल्या-नंतर वरपिता म्हणतो, ‘ माझा मुलगा मी आपल्या सेवेस हजर करतो...’ यावर कन्यापिता, ‘ हा संबंध मंगलप्रद होवो...’ असे म्हणून रुकार देतो. या वेळी कुराणातील काही कलमांचे पठण होऊन मिठाई वगैरे वाटतात. प्रत्यक्ष लग्न पुढे काही दिवसांनी करतात. यांच्यात बायका विकत घेण्याची चाल आहे. वेगळ्या शब्दात नवरा मुलगा ‘ हुंडा ’ देतो. याला बाजारी स्वरूप येतेच. लग्न होईपर्यंत वधूवरांची दृष्टा-दृष्ट होत नाही ! यांच्या समाजात स्त्रीला थोडीफार प्रतिष्ठा असते.

पती मरण पावल्यानंतर स्त्रियांना पुनर्विवाह करता येतो, पण पुनर्विवाह तिने दीर असल्यास त्याच्याशीच केला पाहिजे ! याबाबत तिला निवडीची सवलत नाही, दिराचा हक्क प्रथम. बहुपत्नीकत्वाची चाल मुसलमान लोकांत आहेच.

या देशात व्यापारी दळणवळणाची साधने म्हणजे उंट, खेचरे, गाढवे, घोडे इत्यादी. डोंगराळ प्रदेशामुळे लोहमार्ग अगदी मर्यादित असून तेही मुख्यतः

लष्करीदृष्ट्या तयार केलेले आहेत. जलवाहतूक तर नाहीच. मोटारींचा उपयोग अलीकडे सुरू झाला आहे. व्यापारी माल लादलेले उंटांचे तांडेच्या तांडे निघतात. या तांड्यांबरोबरचे लोक सशस्त्र असतात.

अफगाणिस्तानात हिशेब ठेवताना आकडे मांडण्याची पद्धत अगदी वेगळीच होती. प्रत्यक्ष आकड्यांच्या ऐवजी त्या त्या आकड्याबद्दल विशिष्ट खुणांचा वा संज्ञांचा उपयोग करण्याची वहिवाट फार जुनी होती. उदा. पृथ्वी म्हणजे १, कारण दुसरी पृथ्वी नाही. तसेच धन्वंतरी २ हा अंक सुचवितो, राम म्हणजे ३, वेद म्हणजे ४ इत्यादी; पण अशा सांकेतिक संज्ञांची व खुणांची पद्धत अफगाणिस्तानचे अमीर अमानुल्ला याने पार बदलून टाकली, आणि नवीन पद्धत लोकांच्या अंगवळणी पाडली.

अमीर अमानुल्लाने देशाची सर्वांगीण प्रगती होण्याच्या दृष्टीने अनेक सुधारणा सुचविल्या, त्यांपैकी काही–(१) इस्लाम हा राजधर्म म्हणून मानला गेला तरी यहुदी, पारशी इत्यादीधर्मियांना धर्मस्वातंत्र्य मिळावे. (२) गुलामगिरी व वेठबिगार कायद्याने बंद व्हावी. (३) प्राथमिक शिक्षण सक्तीचे व सार्वत्रिक व्हावे. (४) मंत्रिमंडळ व सल्लागार मंडळ यांची स्थापना. (५) कोणासही एका वेळी एकापेक्षा अधिक बायका असू नयेत. (६) मुलींच्या लग्नाचे वय १८ व्या वर्षापर्यंत लांबवावे. (७) युरोपिअन पोषाखाचा आग्रह इत्यादी. या सर्व सुधारणा घडवून आणण्याचा त्याने प्रामाणिक प्रयत्न केला. पण अडाणी आणि काही स्वार्थी लोकांना त्या तितकाशा रुचल्या नाहीत. तरवारीच्या धारेवर त्या राबविण्याची त्याची इच्छा नसल्याने त्याने राजसंन्यास घेण्याचे ठरविले आणि तसे त्याने केलेही. थोडक्यात, तुर्कस्तानच्या केमालपाशाच्या पावलावर पाऊल टाकून देशाचा कायापालट करण्याचा त्याचा विचार होता, पण हाय !

अफगाणिस्तानातील खैबरखिंड इतिहासप्रसिद्ध असून येथे लोहमार्ग झालेला आहे. या खिंडीला लष्करीदृष्ट्या महत्त्व होते आणि आहेही. दुसरा गोमलघाट, हा मुख्यतः व्यापारी रस्ता आहे. येथेच व्यापारी मालाने लादलेले उंटांचे तांडे दृष्टीस पडतात.

राजकीयदृष्ट्या अफगाणिस्तानला महत्त्व असले तरी अफगाणी सत्तेची स्थिती चमत्कारिकच म्हणावी लागेल. उत्तरेकडून साम्यवादी रशिया व पूर्वेकडून साम्राज्यवादी ब्रिटिश यांची अफगाणिस्तानला आपल्या बाजूला ओढण्याची स्पर्धा सतत चालू असे. म्हणून रशिया व ब्रिटन आपल्या परीने अफगाणिस्तानला मदत, सवलती, हक्क वगैरे देण्याची शिकस्त करीत होते.

• • •

१६. पाकिस्तानी लोक

हिंदुस्थान खंडित होऊन भारत आणि पाकिस्तान अशी दोन स्वतंत्र राज्ये सन १९४७ मध्ये जन्मास आली. भारताने आपल्या निधर्मी राज्याची घोषणा केली. पण पाकिस्तानची उभारणी इस्लामी धर्माच्या अधिष्ठानावर झालेली आहे. अर्थातच या राज्यातील प्रजा मुसल्मान असून शासनकर्तेही मुस्लीमधर्मीयच आहेत.

पाकिस्तानच्या निर्मितीचे श्रेय त्या वेळच्या 'मुस्लीम लीग'चे अध्यक्ष बॅ. जिना यांच्याकडे जाते. केवळ राजकारण व मुत्सद्देगिरी यांवर नव्या राज्याची उभारणी आहे.

या राज्याची विशेष गोष्ट म्हणजे यात राज्याच्या विस्ताराचा सलगपणा नसून त्याचे दोन भाग एकमेकापासून फार अलग झालेले आहेत. बंगालचा पूर्वभाग म्हणजे पूर्व पाकिस्तान आणि पश्चिम पाकिस्तानात सिंध, पश्चिम पंजाब, वायव्य सरहद्दीवरील प्रांत आणि बलुचिस्तान हे भाग समाविष्ट आहेत. या दोन भागांत सुमारे १००० मैलांचे अंतर आहे! तसेच अंतर त्यांची स्वाभाविक रचना, भाषा, संस्कृती, परंपरा, चालीरीती इ. बाबतींतही आहे. त्यांचे प्रश्न निराळे, अपेक्षा वेगळ्या. मग साधर्म्य कशात? तर केवळ धर्म! दोन्ही भागांतील लोक मुस्लीम धर्माचे.

या दोन भागांच्या दूरत्वामुळे एका भागातून दुसऱ्या भागात जाण्यास समुद्र ओलांडून जावे लागते! हा लांबीचा जलमार्ग. जवळचा मार्ग म्हणजे भारतातून जाणारा विमानमार्ग, पण हा विमानमार्ग मात्र भारताच्या कृपेने! भूमीवरून मार्ग नाही, पाकिस्तानने भारताशी अगदी सलोख्याचे आणि मित्रत्वाचे संबंध ठेवले असते तर तोही मार्ग पाकिस्तानला उपलब्ध झाला असता.

पाकिस्तानचे आजचे अध्यक्ष अयुबखान हे लष्करी पेशाचे आहेत. सन



१९५१ मध्ये यांची पाकिस्तानचे सरसेनापती म्हणून नेमणूक झाली. पुढे यांचा १९५४ मध्ये संरक्षणमंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश झाला. पुढे अवघ्या चार वर्षांत म्हणजे सन १९५८ मध्ये त्यांनी पाकिस्तानात लष्करी क्रान्ती घडवून आणून ज्या अध्यक्षाने त्याला उच्चासन दिले, त्याच अध्यक्षाची त्याने उचलबांगडी करून टाकली; आणि सर्व सत्ता आपल्या हाती घेतली !

या देशातील राजकारण गुंतागुंतीचे तर खरेच, पण ते विलक्षणही म्हणावे लागेल. पहिल्या अवघ्या १० वर्षांत पाकिस्तानमध्ये ७ मुख्य प्रधान झाले ! पहिले मुख्य प्रधान लिआकत अल्ली यांचा तर खूनच झाला ! पश्चिम पाकिस्तानचे मुख्य मंत्री यांचाही खून झाला !

पाकिस्तानची राज्यघटना सन १९५६ मध्ये म्हणजे राज्यस्थापनेनंतर ९ वर्षांनी अमलात आली ! पाकिस्तानचे शेवटचे गव्हर्नर-जनरल व घटनेप्रमाणे पहिले अध्यक्ष यांचीच उचलबांगडी अवघ्या दोन वर्षांत झाली ! पाकिस्तानात आतापर्यंत फक्त एकच निवडणूक होऊ शकली ! या सर्व घटनांवरून पाकिस्तानच्या हुकुमशाही राजकारणाची कल्पना येईल.

पाकिस्तानच्या निर्मितीनंतर जे हिंदू तेथून भारतात आले त्यांत वकील, डॉक्टर्स, अध्यापक, प्राध्यापक, सधन धंदेवाले, सावकार असा सुशिक्षित वर्ग होता. त्यामुळे पाकिस्तानमध्ये एकदम अशा लोकांची पोकळी निर्माण झाली आणि बँका, विमा कंपन्या, उद्योगधंदे करणाऱ्या कंपन्या तसेच शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, दवाखाने, रुग्णालये, इत्यादींची स्थिती

अगदी चमत्कारिक आणि केविलवाणी अशी झाली. या सगळ्या व्यवसायांत बहुसंख्य हिंदूच होते. पुढे पुढे ही परिस्थिती अर्थात सुधारली.

पाकिस्तान हा शेतीप्रधान देश असून शे. ७५ लोकांचा शेती हाच व्यवसाय आहे. पूर्व पाकिस्तानात पुरेसा पाऊस पडत असल्याने आणि पश्चिम पाकिस्तानात पावसाचे मान कमी असले तरी धरणांची आणि पाटबंधाऱ्यांची चांगली सोय झालेली असल्याने शेतीला पाण्याचा तुटवडा भासत नाही.

सिंधमधील सिंधूचे खोरे अत्यंत सुपीक आहे. सिंध प्रांत ही ' सिंधूची देणगी ' यथार्थतेने म्हटले जाते. सिंधूवरील सक्करचे धरण तिच्या खोलीपेक्षा लांबीने अधिक आहे. याला खूप लांबीचे असंख्य कालवे काढलेले आहेत.

येथील शेतीच्या उत्पादनात प्रामुख्याने गहू, भात, मका, ऊस, कापूस, ताग आणि चहा यांची पिके काढली जातात. अन्नधान्यांची आयात पाकिस्तानला करावी लागतेच.

महत्त्वाच्या उद्योगधंद्यांना लागणारे लोखंड, कोळसा यांच्या खाणी फारशा नाहीत. तरी पण जळणाची सोय एका वेगळ्याच भूमिगत द्रव्याने झालेली आहे. बलुचिस्तानात सुई या ठिकाणी नैसर्गिक गॅस भरपूर प्रमाणात आढळला आहे. हा गॅस नळांच्या द्वारे कराचीपर्यंत नेण्यात आला आहे. तसेच सिल्हेट येथे आढळणारा गॅस डाक्क्याला नेण्यात येणार आहे. उद्योगधंद्यांच्या वाढीला या गॅसचा चांगला उपयोग होत आहे. पाकिस्तानला हा गॅस म्हणजे एक वरदानच !

तागाच्या बाबतीत आरंभीच्या काळात दोन्ही देशांची मजेशीर कुचंबणा झाली. भारतात तागाच्या गिरण्या होत्या, पण तागाच्या उत्पादनाचा प्रदेश पाकिस्तानात गेला ! पाकिस्तानात तागाचे उत्पन्न भरपूर, पण तेथे गिरण्यांचा अभाव ! अर्थात दोन्ही देशांनी आपापल्या उणिवा पुढे भरून काढल्या.

सुताच्या व लोकरीच्या कापडाच्या गिरण्या व जहाजे बांधण्याचा-दुरुस्तीचा व्यवसाय, डी. डी. टी.चा कारखाना, रासायनिक द्रव्ये तयार करण्याचे कारखाने यांत कित्येक लोक गुंतलेले आहेत. विशेष म्हणजे

रावळपिंडीजवळ कुर्रम केमिकल कंपनीत सॅण्टोनिन तयार होते. एवढे प्रचंड उत्पादन जगात अन्यत्र कोठेच होत नाही असे म्हणतात. दाऊदखेल येथे खताचा कारखाना व पेनिसिलिनचा कारखाना कार्यवाहीत येत आहे. रंगाचा कारखाना व सिमेंटचे कारखाने तेथेच उभारण्यात आले आहेत. पाकिस्तानची औद्योगिक प्रगती भारताच्या मानाने फारच मर्यादित असली तरी तिला गती प्राप्त झाली आहे.

पाकिस्तानात साक्षरतेचे प्रमाण सुमारे २० टक्के आहे. आरंभीच्या काळात शिक्षकाच्या व्यवसायांत हिंदूंचा भरणा जास्त असल्यामुळे व ते निघून गेल्यामुळे पाकिस्तानमधील शिक्षण बंद पडण्याची पाळी आली होती! पण पुढे हलके हलके ही परिस्थिती सुधारत गेली. शैक्षणिक संस्थांची संख्या वाढली. व्यावसायिक व उच्च शिक्षणाच्या सोयी करण्यात आल्या. पाकिस्तान हे आमच्याप्रमाणे निधर्मी राज्य नसून पूर्ण इस्लामी राष्ट्र असल्यामुळे धार्मिक शिक्षणाच्या बाबतीत पाकिस्तानच्या घटनेतच म्हटले आहे की, 'पवित्र कुराणाचे शिक्षण सक्तीचे करावे... !'

सक्करजवळ मोहेंद-जो-दारो येथील उत्खननात एका प्राचीन शहराचे अस्तित्व आढळून आले आहे. येथील संशोधनाने फार प्राचीन काळच्या म्हणजे ४।५ हजार वर्षांपूर्वीच्या संस्कृतीवर प्रकाश टाकला आहे. तेथील अवशेष आजही अभ्यासावयास सापडतात. यांच्या अभ्यासावरून त्या काळची संस्कृती श्रेष्ठ प्रकारची होती, अशी अनुमाने काढण्यात येतात.

पश्चिम पाकिस्तानी लोकांना उन्हाळा व हिवाळा हे दोन्ही ऋतू कडक असल्याने दोन तऱ्हेचे कपडे वापरावे लागतात. सिंधी शेतकरी कामाला काटक असून मांस, भाज्या, दूध व गहू हे त्याचे अन्न आहे. पंजाबी शेतकऱ्याला दूध-तूप, भाज्या, फळफळावळ भरपूर मिळते. गहू व बकऱ्याचे मांस हे त्यांच्या रोजच्या जेवणातले पदार्थ होत. पूर्व पाकिस्तानात तांदुळाचे मुख्य पीक. येथील लोकांचे भात व मासे हे मुख्य अन्न.

भारत आणि पाकिस्तान यांचे स्नेहसंबंध बिघडायला पाकिस्तानच्या मते काश्मीरचा प्रश्न हे प्रमुख कारण होय. काश्मीरचा प्रश्न काय आहे, हे प्रथमतः समजावून घेणे जरूर आहे. हिंदुस्थानच्या फाळणीच्या वेळी काश्मीर हे स्वतंत्र संस्थान होते. हे संस्थान पाकिस्तानात सक्तीने सामील

करून घेण्याच्या उद्देशाने पाकिस्तानने काश्मीरमध्ये लुटारू आणि सैन्य घुसविले ! अर्थात तेथे अशांतता माजून एकंदर परिस्थिती गंभीर होण्याची शक्यता निर्माण झाली. संस्थानाधिपती अर्थातच अस्वस्थ झाले आणि त्यांनी ताबडतोब भारतात सामील होण्याबाबत सामीलनाम्यावर सही केली आणि भारताला अगदी कळकळीची विनंती करून ताबडतोब लष्कराच्या साहाय्याची याचना केली. पण भारताने काश्मीरमधील 'प्रजा परिषद' या राजकीय पक्षाचे अध्वर्यु शेख अब्दुल्ला यांची राजाच्या विनंतीला अनुमती मिळविली आणि नंतरच भारताने सैन्य धाडले आणि गंभीर परिस्थिती आटोक्यात आणली. यात भारताची बाजू अगदी स्वच्छ आहे.

कालांतराने पाकिस्तानने अमेरिकेशी आणि इतर राष्ट्रांशी लष्करी करार केल्याने काश्मीरच्या प्रश्नाचे स्वरूप संपूर्णपणे बदलले आहे. सार्व-मताच्या द्वारा काश्मीरच्या जनतेचे मत अजमावण्याबाबत भारताने एका विशिष्ट वेळी बोलणी केली होती. त्यांचा संदर्भच ह्या लष्करी साहाय्यामुळे नष्ट झाला असे नेहरूंनी जाहीर केले.

पाकिस्तानचे भारताशी असलेले संबंध इतके चिघळले की, शेवटी पाकिस्तानने चीन, अमेरिका यांजकडून मिळालेल्या लष्करी साहित्याच्या जोरावर भारताशी लढा उभारला ! पण भारतही कच्च्या तयारीचा नव्हता. भारताचे दिवंगत पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांना अत्यंत नाखुषीने आणि नाइलाजाने पाकिस्तानचे आव्हान स्वीकारावे लागले. या लढाईत पाकिस्तानची विमाने, रणगाडे एकामागून एक निकामी होऊन पाकिस्तानला सपशेल माघार घ्यावी लागली. पाकिस्तानचे अतोनात नुकसान झाले, जनता हवालदिल झाली.

अमेरिका पाकिस्तानला जी लष्करी मदत देते ती भारताविरुद्ध लढण्या-करिता नव्हे तर साम्यवादी राष्ट्राच्या चढाऊ धोरणाला पायबंद घालण्या-करिता, असे आश्वासन अमेरिकेने भारताला दिले होते. तरी सुद्धा पाकिस्तानने लाल चीनशी लगट करून लष्करी मार्गदर्शन आणि लष्करी साहित्य घेण्यास उघडपणे सुरुवात केली. पाकिस्तानचे चीनशी सलोख्याचे संबंध असून ते स्वार्थी हेतूंकरिता वाढविण्याचे प्रयत्न सुरूच आहेत. चीनने

भारताला सतत युद्धपरिस्थितीत गुंतवून ठेवावे हा पाकिस्तानचा डाव गुप्त नाही.

'ताश्कंद करार' हा भारत आणि पाकिस्तान या दोन राष्ट्रांत काही-तरी समझोता घडवून आणण्याच्या दृष्टीने रशियाने शिकस्तीचे प्रयत्न केले. भारताचे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनी अतिशय संयम राखून करार मान्य केला. त्यांच्यावर या घटनेचा इतका ताण पडला की त्यांचे बलिदान या कराराकरिता झाले असे म्हणावे लागते. भारत आपल्या परीने कराराचे अक्षरशः कसोशीने पालन करीत आहे. पण पाकिस्तान? त्याचे डावपेच चालूच आहेत!


पाकिस्तानचे पहिले राष्ट्राध्यक्ष मेजर जनरल इस्कंदर मिर्झा यांचे पाकिस्तानमधील लोकशाहीसंबंधी विचार पाहा, ते म्हणतात, "या देशाची प्रजा भयंकर निरक्षर व मागासलेली आहे. तिला राजकारण म्हणजे काय हे कळण्याची पात्रता नाही...म्हणून या देशाला...'नियंत्रित लोकशाही'च पाहिजे..." असे उद्‌गार काढून मिर्झासाहेब पाकिस्तानचे सर्वाधिकारीच म्हणजे हुकुमशहा बनले. यांनीच अयूबना लष्करी क्रांतीचा सल्ला दिला आणि लष्करी कायद्याचे प्रमुख प्रशासक नेमले. याच अयूबने एका मध्यरात्री मिर्झांना पिस्तुल दाखवून सर्व सत्ता हाती घेतली!

देशाच्या फाळणीपूर्वीपासून वायव्य सरहद्द प्रांत फाळणीचा कट्टा विरोधक होता. पण पुढे नाइलाजाने पाकिस्तानात सामील झाला. या प्रांताचे मंत्रिमंडळ डॉ. खानसाहेब यांनी बनविले होते. पण लवकरच त्यांची राजकीय मते लक्षात घेऊन बॅ. जिनांनी त्यांना बडतर्फ केले! सात वर्षे त्यांना स्थानबद्ध करण्यात आले. पुढे ते केंद्रीय मंत्री व नंतर पश्चिम पाकिस्तानचे मुख्य मंत्री झाले, आणि पुढे त्यांचा खून झाला!

कराची हे महत्त्वाचे शहर कृत्रिम पण उत्तम बंदर बनविल्यामुळ पाकिस्तानचा व्यापार याच बंदरातून चालतो. हे आंतरराष्ट्रीय वैमानिक केंद्र आहे. लाहोर या शहराला ऐतिहासिक महत्त्व असून पाश्चात्त्य आणि पौर्वात्य विद्यांचे केंद्र आहे. येथील विद्यापीठ फार जुने आणि विख्यात आहे.

वायव्य सरहद्द प्रांत हा खरा पठाणांचा प्रांत, पण त्याला अन्वर्थक असे नाव नाही. हे पठाण लोक स्वतःला स्वतंत्र समजतात. त्यांना त्यांचे

'पख्तुनिस्तान' या नावाने स्वतंत्र राज्य हवे आहे. ही यांची मागणी फार जुनी आहे. खान अब्दुल गफारखान हे या मागणीचे कट्टर आणि कडवे पुरस्कर्ते आहेत. त्यांनी तेवढ्याकरिता 'खुदाई खितमतगार' या नावाची संस्था स्थापिली. भारताने या संस्थेला मान्यताही दिली. त्यांच्या शांततावादी धोरणामुळे त्यांना 'सरहद्द गांधी' हे नामाभिधान लाभले. त्यांच्या स्वतंत्रतेच्या मागणीमुळे त्यांना सतत तुरुंगात खितपत पडावे लागले होते.



शूर पठाण लाक पाकिस्ताना-तील मुसलमानापेक्षा अगदी वेगळे आहेत. यांच्याशी त्यांचा काहीच लागाबांधा नाही. यांच्यात आणि अफगाण लोकांत वांशिक साधर्म्ये आहेत. यांची स्वतंत्रतेची मागणी पाकिस्तानला सततची डोकेदुखी आहे. इतिहासप्रसिद्ध पेशावर शहर आणि खैबर खिंड या प्रांतात आहे.

बलुची लोक— हे बलुचिस्तानमधले. हा प्रांत रुक्ष, वैराण आणि डोंगराळ असा आहे. येथे पाण्याचे दुर्भिक्ष्य असल्यामुळे कालव्यांची योजना झाकून अशी आहे. या प्रांताचे मुख्य शहर क्वेट्टा, याच्या सभोवतालचा प्रदेश मात्र नैसर्गिक संपत्तीने समृद्ध आहे. हा फळाफुलांचा प्रदेश. कलिं-गडे, द्राक्षे, पीच, डाळिंबे तसेच गुलाबाची व इतर सुवासिक फुले येथे मुबलक आहेत. सुई या ठिकाणी आढळलेला गॅस फार मोलाचा आहे.

पूर्व बंगाल अर्थात पूर्व पाकिस्तान हा प्रांत अतिशय सुपीक असून विविध उत्पन्नांमुळे दाट लोकवस्तीचा बनला आहे. येथील भातशेती व ताग ही महत्त्वाची पिके असून बांबू, नारळ, चहा व मासे ही इतर

उत्पन्ने होत. येथील जंगलभागात हत्ती, वाघ, चित्ते, इ. प्राणी आढळतात. सुंदरबन हे वाघांचे निवासस्थान. चितगाव हे एकमेव या भागाचे गजबजलेले बंदर, ' पूर्वेकडील कराची '. डाक्का हे मुख्य ठिकाण एके काळी इस्लामी संस्कृतीचे मोठे केंद्र होते. डाक्क्याची मलमल जगभर प्रसिद्ध होती. येथील सर्व मुसलमान लोकांची भाषा बंगाली ! उर्दू ही पाकिस्तानची राष्ट्रभाषा असली तरी बंगालमध्ये सक्ती करूनही ती येथे सरकारी भाषा होऊ शकली नाही ! तो मान बंगालीला द्यावा लागला !

पूर्व पाकिस्तान अनेक कारणांमुळे स्वायत्त होण्याची भाषा बोलत आहे ! त्या धोरणाने थोडीशी चळवळही सुरू झाली आहे. पख्तुनिस्तानप्रमाणे पाकिस्तान सरकारला याही समस्येला तोंड द्यावे लागणार आहे.

• • •

१७ आशियातील रशिअन प्रजा

रशियाचा राज्यविस्तार युरोप आणि आशिया खंडांत मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे पूर्व आणि पश्चिम यांच्या संस्कृतींचा संगम किंवा मिश्रण दृष्टीस पडते. आशियाचा बहुतेक उत्तर भाग रशियाच्या आधिपत्याखाली आहे. त्यात मध्य-आशियातील उझबेग, तुर्कमेन, कझाक, किर्घीझ इ. लोकांचे विभाग असून सैबेरियातील सॅमॉइड लोकांच्या वस्तीचा अगदी उत्तरेकडील प्रदेश आहे (मंगोलिअन हेही रशिअन प्रजाजन असून त्यांचा स्वतंत्र प्रकरणात विचार केला आहे).

रशियात सन १९१७ मध्ये जी मोठी राज्यक्रान्ती झाली तिचे पर्यवसान अगदी नव्या प्रकारच्या राज्यव्यवस्थेत आणि अभिनव अशा सामाजिक रचनेत झाले.

या नव्या पद्धतीनुसार मध्य-आशियात प्रमुख पाच लोकसत्ताक राज्ये अस्तित्वात आली. ही सर्व राज्ये जवळजवळ असली तरी त्यांतील लोक भिन्न वंशांचे आणि मिश्र जातींचे असे आहेत. बहुसंख्यांक लोक सुन्नीपंथीय मुसलमान आहेत. मध्य-आशियाचा बहुतेक भाग वैराण असून यातील लोक भटक्या वृत्तीने राहतात. मेंढ्यांचे, गुरांचे, उंटांचे कळप घेऊन ठिकठिकाणच्या गवताळ भागांच्या शोधात त्यांना हिंडावे लागत असल्याने त्यांच्या टोळीत त्यांचे सामर्थ्य साठविलेले असते. कारण वेळ पडल्यास त्यांना लूटमारही करावी लागते. मेंढ्यांची, घोड्यांची, उंटांची उत्तम पैदास करणे हा यांचा व्यवसाय असतो. या प्राण्यांच्या जीवनावरच या लोकांचे जीवन सर्वस्वी अवलंबून असते. हे लोक स्वातंत्र्याचे भोक्ते असल्याने कोणाच्याही बंधनात राहणे त्यांना आवडत नाही. राज्यक्रान्तीनंतर येथील लोकांच्या जीवनात सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने आणि त्यांना स्थिर किंवा स्थायिक जीवन प्राप्त करून देण्याच्या हेतूने रशिअन

सरकारने खूप प्रयत्न केले आहेत. आरंभी साम्यवादाचे धडे यांना रुचणे कठीणच. कामगार-संघटना, सामुदायिक शेती आणि आनुषंगिक बंधने इ. नव्या गोष्टींचा स्वीकार करण्यास या लोकांचा विरोध असे. पण रशिअन तंत्राच्या जोरदार दडपणामुळे आणि रशिअन मार्गदर्शक आणि तंत्रज्ञ यांच्या झुंडींच्या आगमनामुळे स्थानिक लोकांचा विरोध कमजोर पडल्यास आश्चर्य नाही.

रशिअन सत्ताधिकाऱ्यांना नवीन साम्यवादी राज्यपद्धती या भागात राबविण्याकरिता कठोर पद्धतींचा अवलंब करावा लागला. विरोधकांची बिनबोभाट उचलबांगडी होऊन दूरच्या भागात स्थानबद्धता होई किंवा त्यांचा गुप्तपणे ' निकाल ' लागे! असली कामे गुप्तहेर किंवा पोलीस मुकाट्याने, कोणालाही कळू न देता पार पाडीत. असल्या प्रकरणांची वाच्यता नाही की चौकशी नाही! हजारो संशयित लोकांची अशा रीतीने वासलात लागत असल्याने सामान्य जनतेत भीतीचे वातावरण पसरल्यास नवल कसले?

साम्यवादी राज्यपद्धतीची काही वैशिष्ट्ये– (१) गरीब मजूरवर्ग, कामगारवर्ग, शेतकरीवर्ग आणि धनिक वर्ग यांतील आर्थिक विषमता शक्य तितकी कमी करणे; (२) शेतकरी–कामकरी वर्गाची संघटना करून सामुहिक पद्धतीने कामाचा उठाव करणे; (३) उत्पादित मालाचे वा धान्याचे एकत्रीकरण करणे; (४) प्रत्येकाने आपले ठराविक काम केलेच पाहिजे; (५) प्रत्येकाला कामाची सोय आणि कामानुसार मोबदला देणे, (६) जात-पात-धर्म यांच्यामुळे निर्माण होणारे भेदभाव नष्ट करणे, (७) धर्माचे स्तोम न माजविणे, (८) जीवनाच्या सर्व सुखसोईंचा उपभोग वा फायदा भेदाभेद न होता सर्वांना सारखाच उपलब्ध करून देणे.

मध्य-आशियातील लोक

यांत प्रामुख्याने उझबेक, तुर्कमेन, कझाक, किर्घीझ, ताडझिक इ. लोक येतात. हे सगळे लोक मुस्लीम धर्माचे आहेत. रशियाने यांची संघटना करून त्यांची स्वतंत्र लोकसत्ताक राज्ये निर्माण केली. यांना आपापल्या राज्यात स्वातंत्र्य असले तरी त्यांना मार्गदर्शन करण्याकरिता मुरलेल्या

साम्यवादी रशिअन लोकांची योजना असे. अशा लोकांची आवक या सगळ्या राज्यांतून फार मोठ्या प्रमाणावर झालेली आहे. पण यांचे ' मार्ग-दर्शन ' काही वेळा इतके विलक्षण असते की, पुष्कळांना असह्य होऊन त्यांच्यात असंतोषाचे वारे पसरते, पण हे वारे अर्थातच दबून असते. काळाच्या ओघात या नव्या राजवटीशी लोक समरस होऊन जाणार नाहीत असे नाही, त्यांना तसे व्हावेच लागेल.

(१) **उझबेक लोक**—यांची भाषा व संस्कृती पाहता हे लोक इराण-मधून आले असावेत. यांच्यातील काही लोक टोळ्या करून भटकणारे असले तरी पुष्कळसे आता स्थायिक जीवन जगत आहेत. रशिअन लोकांनी त्यांच्या मुलांकरिता नव्याने शाळा स्थापन केल्या आहेत. काही धोरणी व महत्त्वा-कांक्षी उझबेक आपली मुले नव्या शाळांतच पाठवितात. हे सारे मुस्लीम धर्माचे आहेत. यांचा पोषाख म्हणजे अंगावर एक पायघोळ असा सुती कापडाचा मोठा कोट आणि डोक्याला पांढरे पागोटे. येथील ताश्कंद, बुखारा, समरकंद, कीव्ह इ. शहरे एके काळी वैभवशाली होती. यांच्या बाजारपेठा गजबलेल्या असत. बुखारा आणि समरकंद ही मुस्लीम शिक्षणाची केंद्रे होती. बुखाऱ्याला १५० पेक्षा अधिक ' मद्रेसा ' म्हणजे शिक्षण संस्था असून दोनशे मोठ्या मशिदी होत्या ! मक्केइतके महत्त्व बुखाऱ्याला होते. बुखाऱ्याची प्रसिद्धी तेथील ' रग्ज ' बद्दल.

मुसलमान लोक बहिरी ससाणा इ. प्राण्यांना शिक्षण देऊन त्यांचा शिकारी-करिता उपयोग करीत. ताश्कंद हे मुख्य शहर असून प्रसिद्ध व्यापारी ठिकाण आहे. या शहराच्या नवीन भागात रशिअन लोकांची वस्ती अधिक आहे. येथे रस्त्यारस्त्यांतून सरबत-विक्रेते पाठीवर सरबताचा हंडा आणि हातात ग्लास घेऊन हिंडतात. रशिअन लोकांनी येथे कालवे काढून त्यांवर गव्हाचे भरपूर पीक काढण्याची सोय केली आहे. कापूसही भरपूर पिक-विला जातो. येथील शेती मात्र रशिअन पद्धतीप्रमाणे सामुदायिक तऱ्हेने केली जाते. या भागात लोहमार्ग, विमानमार्ग आणि मोटारींचे रस्ते रशिअनांच्या मदतीने तयार झाले असून पाश्चात्त्याच्या सान्निध्याने येथे सुधारणेचे वारे खेळू लागले आहे. ताश्कंद म्हटले की, भारतीयांना लालबहादूर शास्त्री यांची आठवण झाल्याशिवाय राहणार

नाही. याच भूमीत या दोन देशांतील ' थंड्या ' युद्धात राष्ट्राकरिता त्यांनी आपला देह खर्ची टाकला ! लालबहादूर शास्त्री यांचा ब्रॉंझचा पुतळा ताश्कंदच्या मेयरना नुकताच (फेब्रुवारी १९६८) भेट म्हणून देण्यात आला आहे; अर्थात तो तेथे उभारला जाईलच.

(२) **तुर्कमेन**— लोकांच्या अनेक टोळ्या हिरवळीच्या ठिकाणी वस्ती करून असल्या तरी विस्तीर्ण वैराण भागात भटक्या वृत्तीने राहतात. कायम वस्ती सामान्यपणे इराणच्या सरहद्दीनजीक आणि अमुदारिया नदीच्या काठी आढळते. येथील मुसलमान लोक डोक्यावरील सगळे केस काढतात आणि डोक्याच्या टाळूवर घट्ट बसणारी टोपी घालून त्यावर उंचट आणि मोठी केसाळ टोपी घालतात. यांच्या राज्याची उजबेकीस्तान-प्रमाणे व्हावी तितकी सुधारणा अद्याप झालेली नाही. रशिअन सत्तेला या लोकांचा तीव्र विरोध आढळतो. येथे कापसाचे उत्पन्न काढले जाते. येथील ' फर 'ची म्हणजे केसाळ लोकरीची प्रसिद्धी असून तिचे चांगले गालीचे तयार करतात. घोड्यांच्या निपजीकडे येथील लोकांचे विशेष लक्ष आहे.


(३) **कझाक लोक**— हे तुर्की वंशाचे असून यांची लोकसंख्या कझाकस्तानमध्ये फार आहे. या राज्याचा विस्तार मोठा असून कझाक लोक टोळ्या करून भटक्या वृत्तीने राहतात. यांचे तंबू आकाराने मोठे असून ते केसाळ कातड्यांचे बनविलेले असतात. मेंढ्यांचे कळप पाळून ते हिंड-तात. घोड्यांची उत्तम निपज हा त्यांचा उद्योग. घोड्यांच्या शर्यती हे त्यांच्या करमणुकीचे साधन. सामान्यपणे आनंदी वृत्ती आणि निश्चितपणा हे यांचे वैशिष्ट्य. पूर्वेकडील मोंगल लोकांशी यांचा घनिष्ठ संबंध असे. या लोकांचा रशिअन सत्तेला आणि तिच्या तंत्राला कडाडून विरोध होता. याचा परिणाम म्हणजे कित्येकांना कंठस्नान ! काहींची सक्त मजुरीच्या ठिकाणी रवानगी ! येथे रशिअन लोक आणि कझाक लोक यांचे प्रमाण सारखे होऊ पाहात होते, हेच रशिअन तंत्र. या भागात रशिअन लोकांनी शेती आणि उद्योगधंद्यांची वाढ करून आपली छाप चांगलीच बसविली. मर्यादित कझाक लोकांचे सहकार्य त्यांना मिळाले.

(४) **किर्घीज लोक**— यांचे वास्तव्य कझाक लोकांच्या सान्निध्यात असल्याने त्यांच्यात भाषा, चालीरीती इ. गोष्टींत बरेच साम्य असले तरी


यांचा प्रदेश डोंगराळ असल्याने काही बाबतींत भिन्नता आढळते. येथे होणाऱ्या गवतावर घोडे व गुरांचे कळप उत्तम रीतीने पोसले जातात. या प्राण्यांचे कळप हीच या लोकांची संपत्ती. या लोकांचे जीवन सर्वस्वी या प्राण्यांवर अवलंबून असते. किर्घीज लोकांच्या आहारात दूध, लोणी, बकरीचे व घोड्याचे मांस हे प्रामुख्याने असतात. चहाची आवड यांना फार आहे. ' कूमीस ' म्हणजे दूध आंबवून तयार केलेले पेय. हे यांचे आवडते पेय होय. गवताळ भागाच्या शोधार्थ यांना हिंडावे लागते. तंबू हीच यांची घरे. यांचे तंबू घुमटाच्या आकाराचे असतात, यांना ' युर्ट ' म्हणतात.

(५) **ताडझिक लोक**— यांचे राज्य किर्घीझ लोकांप्रमाणे डोंगराळ प्रदेशात आहे. या राज्याची सरहद्द इराणला लागून असल्याने पार्शिअन लोकांच्या काही चालीरीती ताडझिक लोकांत आढळतात; भाषेशी थोडेफार साम्य आढळते. पण हे सारे लोक मुस्लीम धर्माचे आहेत. जेथे शक्य तेथे हे लोक शेती करतात. मध्यआशियातील व्यापारात या लोकांचा हात असतो. एकंदर मध्यआशियातील इतर लोकांच्या मानाने ताडझिक लोकांचा रशियाच्या नव्या राजवटींला आणि सामुदायिक शेतीच्या पद्धतीला फारसा विरोध आढळला नाही.

(६) **सॅमॉइड लोक**— यांचे वास्तव्य अगदी उत्तरेकडील सैबेरिया प्रांतात आहे. येथील हवा अतिशय थंड असल्याने येथील लोकांना नखशिखान्त उबदार कपड्यात गुरफटून घ्यावे लागते. यांचे कपडे यांना सर्वतोपरी उपयोगी पडणाऱ्या रेनडिअरच्या कातड्याचे केलेले असतात. येथील प्राण्यांचे संरक्षण निसर्गानेच केलेले आहे. यांच्या अंगावर मऊ, उबदार, दाट आणि शुभ्र लोकर असते. उपजीविकेकरिता मासे पकडणे व शिकार करणे या उद्योगांत हे लोक गुंतलेले असतात. शिकार करण्यास लागणारी तीक्ष्ण हत्यारे जनावरांच्या हाडांची केलेली असतात. रेनडिअरचे कळप आणि शिकार करून आणलेल्या प्राण्यांची मऊ मऊ आणि केसाळ कातडी ही यांची संपत्ती. रेनडिअरपासून त्यांना दूध व मांस मिळते. शिवाय ' स्लेज ' म्हणजे बिनचाकी गाड्या ओढण्यास यांना केसाळ कुत्र्यांचाही



चांगला उपयोग होतो. या लोकांचे अन्न म्हणजे दूध, मांस व मासे. मासे



पकडण्याचे काम मोठाली मुले करतात. या लोकांची घरे बर्फाची केलेली असतात ! यांना ' इग्लू ' म्हणतात. कडक हिवाळ्यात अशा घरांतून त्यांना ऊब मिळते. उन्हाळ्यात हे लोक तंबूंत राहतात, तंबू प्राण्यांच्या कातड्यांचे केलेले असतात. मोठाल्या मुली आपल्या आईला घरकामात मदत करतात. मांस शिजविणे, कातड्यांचे व लोकरीचे कपडे शिवणे, तंबू तयार करणे इ. कामांत बायका व मुली गुंतलेल्या असतात.

सॅमॉइड लोकांच्या प्रदेशाला टंड्रा म्हणतात. या लोकांचे जीवन एकंदरीत कष्टाचेच म्हटले पाहिजे. अलीकडे सुधारलेल्या लोकांच्या सान्निध्याने यांचे जीवन सुसह्य होत आहे. टंड्राच्या दक्षिणेकडील भाग जंगलव्याप्त आहे. यातील वृक्षविशेषांना व्यापारी महत्त्व आहे.

सैबेरियाचा कायापालट—हा प्रांत रशियाच्या मध्यवर्ती केंद्रापासून खूप दूर असून त्याचा विस्तारही खूप मोठा आहे. येथील अतिथंड हवामान, दाट जंगलव्याप्त भाग आणि बाकीचा वैराण प्रदेश इ. गोष्टींमुळे रशिअन सरकारने या देशाकडे फारसे लक्ष दिले नव्हते; शिवाय अधिक भू-प्रदेशाची गरजही तीव्रतेने भासली नसावी. लांब मुदतीचे कैदी मात्र सैबेरियात पाठविले जात. पण गेल्या महायुद्धात रशियाला बहुसंख्य युद्ध-कैद्यांची काहीतरी व्यवस्था लावण्याची गरज भासू लागली, तेव्हा रशियाने या कैद्यांना सैबेरियात पाठवून सैबेरियाचा कायापालट करण्याचे ठरविले. या कामी जर्मन कैद्यांची सक्त मजुरी रशियाला चांगली फायदेशीर झाली. जंगलतोड, पाटबंधाऱ्यांच्या योगे पाणीपुरवठा, नवे रस्ते, दळण-वळणाच्या सोयी. इ. गोष्टींकडे लक्ष पुरवून शेतीचे उत्पादन वाढविण्याकडे अधिक लक्ष देण्यात आले. सैबेरियातील विविध आणि विपुल खनिजांचे उत्पादन सुरू करण्यात आले.

सैबेरियातील ५००० मैल लांबीचा लोहमार्ग हे एक मोठे आश्चर्यच आहे. याला ' ट्रान्स-सैबेरिअन ' असे नाव आहे. या मार्गाचे अनेक फाटे नंतर तयार करण्यात आले. या सगळ्या लोहमार्गांचा सैबेरियाचे मूळचे स्वरूप पालटून टाकण्यास चांगलाच उपयोग झाला आहे; आणि अलीकडे सैबेरियाला राजकीय महत्त्वही येत चालले आहे.

सैबेरियाचा कायापालट करून त्याला नवे जीवन देणाऱ्या काही घटना–

(१) नद्यांवर मोठमोठाली जलविद्युद्‌केंद्रे उभारून विजेचा भरपूर पुरवठा केला आहे. विविध कारखाने तर विजेवर चालू आहेतच, विशेष म्हणजे विजेवर आगगाड्याही धावत आहेत.

(२) अमर्याद अशा दाट जंगलांतून लाखो टन लाकडाचे उत्पादन होत आहे.

(३) हिमविच्छेदक नौकांचा संचार सुरू केला आहे.

(४) तेलाचे प्रचंड साठे आढळले आहेत, तेलशुद्धिकरणाचे कारखान उभारले जात आहेत.

(५) यांत्रिक, तांत्रिक, बौद्धिक शिक्षणाच्या अद्ययावत सोई आज उपलब्ध आहेत. विज्ञान-नगरे स्थापन होत आहेत.

(६) कोळसा, लोखंड, अभ्रक, जस्त इ. खनिजांचे प्रचंड साठे आढळत आहेत.

(७) लोखंड आणि पोलादाच्च विराट कारखाने उभारले जाऊन सैबेरियात अलीकडे औद्योगिक क्रांती घडून येत आहे.

क्रांतिपूर्व काळातील ‘ निद्रिस्त सैबेरिया ’ खडबडून जागा झाला आहे. अशक्य वाटणाऱ्या गोष्टी आज तेथे शक्य कोटीत उतरत आहेत. तेथील लोकांचे जीवन सुखी बनून जीवनमान शेकडो पटींनी उंचावलेले आहे ! ‘ कष्ट करा आणि विविध सुखे उपभोगा ’ हे येथील सूत्र आहे.

● ● ●

१८. मंगोलिअन लोक

मोंगलांच्या तेराव्या शतकातील स्वाऱ्या जगद्विख्यात आहेत. मोंगल किंवा मंगोलिअन लोकांचा देश मंगोलिया चीनच्या उत्तरेस व सैबेरियाच्या दक्षिणेस आहे. चेंगीझखान, कुब्लाईखान, तैमुरलंग यांनी हजारो मैल दूरच्या देशांवर धाडी घातल्या हे पाहून आश्चर्य वाटते. चेंगीझखान वयाच्या तेराव्या वर्षी राजा झाला ! पण त्याने विखुरलेल्या मोंगली टोळ्यांची संघटना कौशल्याने करून प्रचंड सैन्य उभारले आणि अफाट प्रदेश जिंकला ! अतिपूर्वेकडील कोरियापासून ते पश्चिमेकडे युरोपातील ऑस्ट्रिया देशापर्यंतचा भाग पादाक्रान्त केला !! या प्रदेशाची लांबी ५–६ हजार मैल आणि रुंदी तीन हजार मैलांची भरेल ! अवघ्या तीन वर्षांत अर्धे युरोप खंड त्याने जिंकले होते. याच्या प्रचंड मुसंडीपुढे नेपोलिअन अगर जगज्जेता शिकंदर यांच्या स्वाऱ्या व धडाडी फिक्की समजली जाते ! शिकंदर बादशहाप्रमाणे चेंगीझखानही इतिहासप्रसिद्ध आहे; पण त्याच्या देशाची माहिती फारच थोड्यांना आहे. पुष्कळ वेळा याच्या देशाला ‘ अज्ञात प्रांत ’ असे म्हणण्यात येई.

मंगोलिया हा एक विस्तृत पठारी प्रदेश असून त्यात गोबीच्या वाळवंटाचा समावेश आहे. या भागात गवताशिवाय फारसे काही होत नसल्याने गवतावर घोडी, मेंढ्या, उंट इ. जनावरे पोसली जात. मंगोलिअन लोकांजवळ यांचे मोठाले कळप असत. एखाद्या ठिकाणचे गवत संपुष्टात आले की या लोकांना आपल्या कळपासह दुसऱ्या गवताळ भागाकडे जावे लागते. एकंदरीत यांचे जीवन भटक्या वृत्तीचे.

या देशात घोडी पुष्कळ असल्याने लहानापासून थोरापर्यंत सारे लोक घोड्यावर बसण्यात फार पटाईत आहेत. त्यांना घोड्यावर बसण्याची इतकी सवय झालेली असते की, पायांनी चालणे त्यांना जड जाते ! घोडा हा

त्यांचा जीवाभावाचा मित्र, त्यावर त्यांचे अलोट प्रेम. आज हजारो वर्षे भटक्या मंगोलिअनांच्या जीवनाचा बराचसा काळ घोड्याच्या पाठीवर बसून व्यतीत होत आहे. जेवण पाठीवर बसून, इतकेच काय झोपही तेथेच! त्यांची गाणी घोड्यासंबंधीची. अनेक वेळा ते स्त्रीच्या सौंदर्यापेक्षा घोड्याच्या सौष्ठवपणामुळे अधिक हरखून जातात.

मंगोलिअन लोकांची उंची मध्यम, केस काळे आणि सरळ, वर्ण फिकट पिवळा किंवा पिंगट असतो. यांच्या गालांची हाडे उंचट असून नाक सरळ पण चपटे असते.

मंगोलिया प्रांत आता झपाट्याने सुधारत असून प्रत्येक क्षेत्रातील त्याची प्रगती थक्क करून सोडणारी आहे. चेंगीझखानानंतर कित्येक शतके मंगोलिअन लोकांचा भटक्या वृत्तीचा जीवनक्रम चालूच होता. पण गेल्या १५–२० वर्षांपूर्वी तेथे झालेल्या राजकीय क्रान्तीमुळे तेथील जीवन अगदी ढवळून निघाले आहे. आधुनिक जगातील सुधारणांच्या झगझगाटाने या प्रांतात प्रवेश केला आणि लोकांच्या जीवनाला स्थैर्य प्राप्त झाले. सामुदाईक आणि सहकारी तत्त्वावर आधारलेल्या नवीन जीवनक्रमाने ही किमया घडवून आणली. मागील कित्येक शतकांतील जीवनाचा रंग पार बदलून टाकला आहे. हा रंग अर्थातच ‘ लाल ’ आहे.

मंगोलिअन लोकांपूर्वी हूण लोकांचे साम्राज्य या भागात होते. तेथील थडग्यांच्या उत्खननात रेशमी वस्त्रे, चकाकणारी लाखेची भांडी इ. वस्तू आढळल्या. यांवरून हूण लोकांचा चीन, इराण इत्यादी देशांशी व्यापार चालत असे, असे दिसते. यांच्यानंतर येथे तुर्क लोक आले. तुर्क लोकांचा मोंगल लोकांशी कित्येक वर्षे झगडा चालू होता. पण शेवटी तुर्क लोक हलके हलके मोंगल लोकांतच मिसळून गेले!

येथील उत्खननात आढळणाऱ्या हत्यारांवरून आणि प्राचीन शहरांच्या अवशेषांवरून हूण लोकांच्या काळी मंगोलिअन लोक इतके मागासलेले नव्हते असे अनुमान निघते. मंगोलियात पूर्वी दहा भाषात लिखाण होत असे! कित्येक दगडांवर एकच मजकूर दोन भिन्न भाषांत कोरलेला आढळून येतो! यामुळे मजकुराचा अर्थ लावणे विद्वान संशोधकांना सुकर होई. मार्को पोलो या प्रसिद्ध प्रवाश्याने लिहून ठेवलेला मजकूर आणि त्या

काळच्या प्रवाश्यांचे लिखाण यांत मेळ बसू शकतो ही महत्त्वाची गोष्ट आहे.

मंगोलियाला ' लाल ' बनविण्यात चीन व रशिया हे दोन्ही साम्यवादी देश आपापल्यापरीने प्रयत्नांची शिकस्त करीत होते. याचे कारण अर्थातच उघड आहे. हा प्रांत दोन्ही देशांच्या सरहद्दीजवळ असल्याने दोघांनाह या प्रांतावर राजकीय वर्चस्व असावे, असे वाटणे स्वाभाविक आहे. दोघांनी चुरशीने मंगोलियाला अधिकाधिक आर्थिक, यांत्रिक, तांत्रिक मदत देण्यास सुरुवात केली. अशा धोरणाने मंगोलियाचा मात्र चांगलाच फायदा झाला.

सन १९५५ मध्ये चीनने मंगोलिअनांना मार्गदर्शन करण्याकरिता प्रथम १०,००० पर्यंत कारागीर आणि तंत्रज्ञ मंगोलियात पाठविले ! चीनचे हे धोरण बघताच रशियाने १९५७ साली मंगोलियाशी व्यापार तर वाढविलाच, शिवाय त्याला हवाई वाहतुकीची दोन केंद्रे आणि दहा लाख पौंड किमतीची औद्योगिक विकासाकरिता यंत्रसामग्री पुरविली ! आणि २५०० ट्रॅक्टर्स व ३००० ट्रक्स देण्याचे अभिवचन दिले ! या मदतीने चीन चमकला आणि पुढल्या वर्षी त्याने १० लाख पौंडांचे कर्ज दिले ! रशियाने पुन्हा याला प्रतिसाद दिला. त्याच्या पुढल्या वर्षी खुद्द चीनचे मुख्य प्रधान चौ-एन्-लाय यांनी मंगोलियाला भेट देऊन लोकर, काच इत्यादींचे कारखाने उभारण्यास भरीव आर्थिक मदत देण्याचा करार केला ! यातील आणखी मौज अशी की, ही रक्कम उभी करण्याकरिता चीनला रशियाकडून कर्ज घ्यावे लागले !!! असो. या चुरशीत रशियाची सरशी होणार हे उघड आहे.

मंगोलिया स्वतंत्रपणे इतर साम्यवादी राष्ट्रांबरोबर व्यापारी करार करू शकतो. तसेच भारत, नेपाळ, ब्रह्मदेश इ. देशांबरोबर राजनैतिक संबंध ठेवण्यास त्याने सुरुवात केली. सन १९६१ मध्ये त्याने राष्ट्रसंघात प्रवेश करून घेतला.

मंगोलियाने आपली प्रगती इतकी करून घेतली की, जेथे काहीही उगवत नव्हते तेथे त्याने गव्हाचे भरपूर पीक काढून त्यातील काही भाग निर्यात करण्याची तयारी केली ! पण मंगोलियाची खरी साधनसंपत्ती म्हणजे खनिज पदार्थ. येथे कोळसा आहे, लोखंड आहे, तांबे, शिसे, वुलफ्राम,

सोने, असबेस्टॉस, जिप्सम आणि तेल सुद्धा ! या खनिजांच्या साठ्यांची कल्पना येण्याकरिता भूगर्भशास्त्रज्ञांचे शोध चालूच आहेत.

" तुम्ही साम्यवादी लोकांकडून जशी मदत घेता तशी पाश्चात्त्यांकडून का घेत नाही ? " असा सवाल एकाने सुज्ञ मंगोलिअनला विचारला. तो लगेच उत्तरला, " 'स्पुटनिक'च्या शोधाने रशिया कितीतरी पुढे आहे !" पुढील संवाद अर्थात खुंटलाच. पण पुढे त्याने सांगितले, " जगाचे सहकार्य मिळविण्याची आमची इच्छा आहे. पण भौगोलिकदृष्ट्या आमचा देश दूर, एकाकी पडल्यासारखा आहे." त्यांचे भौगोलिक स्थान हीच त्यातील मोठी अडचण आहे. असे जरी असले तरी मंगोलियाची वकिलात आपल्या दिल्लीत आहे, ही गोष्ट त्यांच्या सदिच्छेचे प्रतीकच म्हणावे लागेल.

समाजक्रांतीपूर्वी या देशात शिक्षणाची अनास्थाच होती. शिक्षणाचे महत्त्व कळणे कठीणच होते. अर्थात याला देशाचे भौगोलिक स्थान आणि सामाजिक लोकांची मागासलेली स्थिती हीच कारणीभूत होती. आता सामाजिक स्थित्यंतरानंतर कित्येक शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे स्थापन झाली आहेत. आज ४०,००० विद्यार्थी या संस्थांतून शिक्षण घेत आहेत. शेकडो वर्षांची ज्ञानतृष्णा ते आता भागवीत आहेत असे दृश्य दिसू लागले आहे.

मंगोलियाचा उद्योगविकास झपाट्याने होत आहे. निरनिराळ्या प्रकारचे कारखाने एकाच भव्य इमारती-गटात उभारण्याचे येथील एक तंत्र आहे. या धोरणानुसार पादत्राणांचा कारखाना, ब्लँकेट्स व 'फेल्ट' बनविण्याचे कारखाने, रंगांचे कारखाने वीज-निर्मिती केंद्र इ. विविध प्रकारचे उद्योग एकत्रित इमारतीतून सुरू आहेत. येथील उद्योधंद्यांची वाढ १९४० ते १९५५ च्या अवधीत ४०० टक्क्यांनी आणि खनिज-धंद्याची वाढ तीन वर्षांत ८०० टक्क्यांनी झाली असे सांगतात ! भटक्या मंगोलिअन लोकांना स्थायिक जीवनाचा लाभ मिळाला आणि जगात त्यांचा देश 'अंधारा'तून बाहेर येऊन प्रतिष्ठेचा प्रकाश त्याला लाभला. संधी मिळाली आणि सक्रिय मार्गदर्शन लाभले की, रानटी, मागासलेल्या लोकांचा कायापालट होऊन त्यांचे रूपांतर एकदम सुधारलेल्या लोकांत होऊ शकते या सिद्धान्ताला मंगोलिअन लोकांच्या प्रगतीने पुष्टी मिळते.

आपल्याकडे संतती नियमनाचा प्रश्न चर्चिला जात आहे तर मंगोलियात लोकसंख्या वाढविण्याकरिता उत्तेजन द्यावे लागत आहे ! एक बाई मिठाईच्या कारखान्यात काम करते, ती नऊ मुलांची आई असल्यामुळे तिला एक जादा सुट्टी मिळते ! नऊ मुलांची माता म्हणून तिला ही सवलत.

येथे बहुतेक सर्व कामगारांकरिता आधुनिक पद्धतीच्या चाळी बांधण्यात आल्या आहेत. त्यांत दोन व तीन खोल्यांचे ब्लॉक्स आहेत. १५-२० वर्षांपूर्वी ' युर्ट ' मध्ये राहणाऱ्या मंगोलिअनांना अशा भिंतींच्या खोल्यांत राहावयास मिळते यातच ते खूप सुख मानतात. उन्हाळ्यात मात्र हे लोक युर्ट उभारून तेथे मजेने राहतात. हे घोडीचे दूध मनसोक्त पितात.

येथील मेंढ्या, घोडे इ. जनावरांची निगा शास्त्रीय पद्धतीने होत असल्याने त्यांची संख्या खूप वाढत आहे. माणसागणिक तीस हे प्रमाण पडते ! हे प्रमाण कोणत्याही इतर देशात आढळणार नाही. मेंढ्यांच्या लोकरीचा दर्जा बराच उंचावला आहे.

मंगोलियाचे मुख्य ठिकाण उर्गा, त्यालाच आता उलन बेटर म्हणतात. बौद्ध धर्माचा प्रसार तिबेटमधून या देशात झाला, पण आता तेथे धर्माला महत्त्व उरले नाही. उलन बेटर (उर्गा) या मुख्य शहराचे स्वरूप अवघ्या दहा वर्षांत पार पालटून गेले आहे. ज्या ठिकाणी मोटार गाडी क्वचित दिसावयाची तेथे आता त्यांच्या नियंत्रणाला रस्त्यात विजेच्या दिव्यांची सोय करावी लागली आहे ! ' युर्ट ' ऐवजी आधुनिक पद्धतीच्या इमारती मोठ्या संख्येने उभ्या आहेत. येथे रुग्णालये व आरोग्य धाम आहेत; विद्यालये, महाविद्यालये आहेत. जवळजवळ शून्यातून एवढी प्रगती झाली यावर कोणाचा विश्वासही बसणार नाही.

मंगोलिअन लोकांचा राष्ट्रीय दिन ११ जुलै असून त्या वेळी राष्ट्रीय उत्सव अतिशय उत्साहाने साजरा केला जातो. दूरदूरचे लोक राजधानीच्या शहरी जमा होतात. या लोकांचे राष्ट्रीय खेळ म्हणजे तिरंदाजी, घोड्यांच्या शर्यती आणि विशेष म्हणजे कुस्त्या. या उत्सवाची आणि खेळांच्या स्पर्धांची लोक उत्कंठेने वाट पाहात असतात. हजारो लोकांच्या झुंडीच्या झुंडी आणि रंगीबेरंगी पोषाख करून शेकडो कुस्तीगीर राजधानीच्या दिशेने

मोठ्या उत्साहाने वाटचाल करीत असतात. क्रीडांगणाच्या आसपास शेकडो तंबूंच्या ' छत्र्या ' उगवलेल्या दिसतात.

येथील स्पर्धांत कुस्त्यांचा फड हे लोकांचे सर्वांत मोठे आकर्षण. कुस्त्यांचे सामने कित्येक शतकांपासून पिढ्यानुपिढ्या चालत आलेले आहेत. विजयी कुस्तीगीरांची मालिका वैशिष्ट्यपूर्ण आहे. पहिल्या क्रमांकाच्या विजयी कुस्तीगीराला ' सिंह ' म्हणतात, दुसऱ्या क्रमांकाला ' हत्ती ' व तिसऱ्याला ' गरुड ' अशी नावे दिली जातात. सतत दोन वर्षे येणाऱ्या पहिल्या वीराला ' टीटन ' ही बहुमानाची पदवी दिली जाते. या पदव्या जाहीरपणे तेथल्या तेथे दिल्या जातात. ' सिंहा 'चा मोठा मान करतात आणि त्याला भरपूर मिठाई देतात.

कुस्त्यांच्या खालोखाल तिरंदाजीच्या परंपरा चालू आहेत. असे सांगतात की, चेंगीझखानाचे लोक तिरंदाजीत इतके पटाईत होते की भरधाव धावणाऱ्या घोड्यावरून आणि अर्ध्या-अर्ध्या मैलावरून ते नेमबाजी करीत आणि धावते हरीण अचूक टिपले जाई !

घोड्यांच्या शर्यती म्हणजे मुलांचा मूर्तिमंत उत्साह ! जवळजवळ हजार घोडेस्वार यात भाग घेतात ! आणि हे सारे घोडेस्वार ८ ते १० वया-पर्यंतचे ! हे छोटे घोडेस्वार २० मैल अंतराच्या शर्यतीत भाग घेत असतात ! असे म्हणतात की, जंगली घोड्यांना माणसाळवून त्याच्यावर स्वार होण्याचा जगात पहिला मान मंगोलिअनांचा. उत्तम घोडेस्वार म्हणून जगभर यांची ख्याती. घोड्यावरील खोगीर ही यांची निर्मिती.

वैराण किंवा गवताळ प्रदेशातून जाताना कित्येक डोंगरांच्या ओळी ओलांडून जाण्याकरिता अधूनमधून छोट्या-मोठ्या खिंडी लागतात, यांना ' ओवो ' (Obo) म्हणतात. ही जागा पवित्र समजून प्रवासी लोक या ठिकाणी काही नाणी किंवा अन्नाचा घास ठेवतात, काहीच जवळ नसेल तर ते लोक भावनेने एखादा दगड तरी ठेवतील !

येथील मंगोलिअन लोक भटके, उंचनिंच, रुबाबदार आणि शरीराने व मनानेही कणखर असतात. यांची घरे-' युर्ट '-म्हणजे एक तंबूच. याचा एक वाटोळा लाकडी सांगाडा साधारणपणे दहा फूट उंचीचा असतो. या सांगाड्यावर लोकरीच्या नमद्याचे किंवा घोंगड्यांचे एकावर एक असे

अनेक थर टाकले की झाले यांचे उबदार घर. अतिशय कल्पकतेने आणि सोईस्कर असे हे सांगाडे त्यांनी तयार केलेले असतात. ' गरज ही शोधाची जननी ' म्हणतात हेच खरे. आतल्या बाजूस नमदे उभारून खोल्यांच्या ' भिंती ' तयार करतात. असे असते यांचे तीन-चार खोल्यांचे घर. वास्तव्य संपले की अर्ध्या तासात घर ' मोडता ' येते.

हे भटके लोक अतिशय अगत्यशील असतात. पाहुण्याला प्रथम चहा आणि खव्याचा तुकडा देतात. बड्या पाहुण्याला साखरही देतात. साखर ही मात्र चैनीची गोष्ट समजली जाते. यांचा चहा चिनी चहाच्या 'वड्यां'चा केलेला असतो. पुढे केलेला चहा पिणे हे सभ्यतेचे लक्षण समजले जाते. यांच्या चहाच्या ' वड्यां'चा कधी कधी नाण्यासारखा उपयोग केला जातो. यांचे दुसरे पेय म्हणजे घोडीच्या दुधाचे ' क्युमिस ', साधारणपणे हे ताकासारखे लागते. आणखी एक पेय ' आरखी ' (Arkhi) हे मद्य पेय गव्हापासून तयार केलेले असते. मांस व त्याचे निरानिराळे प्रकार हे त्यांचे खाद्य व क्युमिस हे पेय. यांची नाणी म्हणजे ' मोंगी ' आणि 'तुग्रीक' (१०० मोंगी). पूर्वी घोडे, गाई इ. चलने होती. अजूनही ती पूर्णपणे भूतकाळात जमा झालेली नाहीत. बोली भाषेत ' बॉट ' (bot) या चलनाची किंमत एक घोडा किंवा एक गाय किंवा सात मेंढ्या किंवा दहा बकरे यांच्याएवढी आहे. दीड बॉटची किंमत एक उंट.

• • •

१९. कोरिअन लोक

या लोकांचा देश कोरिया. हा द्वीपकल्पात्मक देश रशिया, चीन व जपान यांच्या सन्निध असून जगाच्या राजकारणाचे केंद्र बनले होते !

हा छोटा देश डोंगर-पर्वत, नद्या व जंगले यांनी समृद्ध आहे. यातील हरिक पर्वत हा सर्वांत उंच असून कित्येक वर्षे चिनी वाङ्मयात आदराचे स्थान पटकावून बसला.

या देशात सलग असे मोठाले मैदानी प्रदेश नसले तरी शक्य त्या ठिकाणी चोहोकडे भाताची खाचरे दृष्टीस पडतात.

कोरियात खनिज द्रव्ये मुबलक आहेत. लोखंड, तांबे, सोने येथे भरपूर सापडते. संगमरवरी दगड तसेच काचेसाठी लागणारा स्फटिक यांसाठी हा देश अनेक शतके प्रसिद्ध आहे.

वाघ, अस्वले, चित्ते, ही जनावरे कोरियात आढळली तरी सिंह आणि हत्ती मुळीच नाहीत ! तसेच गाई-म्हशींसारखी जनावरेही नाहीत ! कोरिअन लोकांना दूध माहीत नाही !

कोरिअन लोक तुराणी वंशाचे मंगोलिअन आहेत. त्यांचा धर्म बौद्ध असून कन्फ्युशियस व शिंतो या पंथांचेही अनुयायी बरेच आहेत. सारा देश उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत भाषा, धर्म, संस्कृती व आचारविचार या दृष्टींनी एक आहे. एकत्वाची भावना या राष्ट्रात दृष्टीस पडते.

हा देश मुख्यत्वेकरून कृषिप्रधान असल्यामुळे येथील जनतेचा शतकानु-शतके शेतीचा एकमेव व्यवसाय आहे. येथे भाताचे मुख्य पीक, त्याच्या खालोखाल ज्वारी, तीळ, बार्ली, बटाटे इत्यादी पिकेही होतात. या देशाला तिन्ही बाजूंनी समुद्र असल्यामुळे शेतीच्या खालोखाल मच्छी-मारीच्या व्यवसायात लोक गुंतलेले आहेत. हा देश छोटा असला तरी खनिज संपत्तीने समृद्ध असून वीजनिर्मितीला येथील भौगोलिक परिस्थिती

अनुकूल आहे. त्यामुळे औद्योगिक क्षेत्राची वाढ होऊन कित्येक लोकांना कामधंदा मिळाला आहे.

कोरिया फार पुरातन देश असून खिस्तपूर्व काळापासून याला इतिहास आहे. असे सांगतात की, खिस्तपूर्व काळात किजा नावाचा एक थोर चिनी साधू आपल्या अनुयायांसह कोरियात शिरला आणि त्याने नव्या राज्याची स्थापना केली. सुमारे नऊशे वर्षांनंतर हे राज्य लयाला गेले. पुढे अशीच राज्ये उदायाला येऊन लयाला जात. सन ९१८ मध्ये एका सेनापतीने कोरयू येथे आपले स्वतःचे राज्य स्थापले. याची राजवट बरीच वर्षे चालली. हे राज्य संपूर्णपणे बौद्धधर्मीय असून बौद्ध भिक्षू व धर्मगुरू यांचे राज्य-कारभारात प्राबल्य असे. पण पुढे मोंगलांची स्वारी झाल्यावर ते अस्तंगत झाले.

असे सांगतात की, चीनच्या प्रचंड भिंतीचे काम चालू असता तेथील वेठबिगार टाळण्याकरिता हजारो चिनी कोरियात येऊन स्थायिक झाले. याचा परिणाम असा की, कोरियात चिनी संस्कृती, भाषा, विचार व वाङ्मय यांच्या प्रभावापुढे कोरियाचे स्वत्व लोप पावू लागले.

कालाच्या ओघात बौद्ध धर्माचा प्रभाव कमी होण्यास खिस्ती मिशनऱ्यांचे प्रयत्न कारणीभूत होऊ लागले. इ. स. १९३० च्या सुमारास कोरियात ५ लक्ष लोक खिस्ती होते ! यांनी त्यांच्या प्रचाराच्या तंत्रानुसार स्थानिक भाषेत बायबलचे भाषांतर करून ते मोफत वाटले. शिक्षणाच्या प्रसारा-करिता त्यांनी शाळा काढल्या, महाविद्यालये स्थापन केली. तसेच दवाखाने घातले, सेवाकेंद्रे उघडली.

पुढे जपान्यांच्या कारकीर्दीत मिशनऱ्यांच्या कार्याला आळा बसला. पण जपान्यांनी आपले वर्चस्व गाजविण्यास सुरुवात केली. यांनी मिशनऱ्यांच्या शाळा बंद करून जपानी भाषा व जपानचा इतिहास शिकविणाऱ्या नवीन शाळा सुरू केल्या ! कोरिआचा इतिहास सहेतुक त्यांनी दडपून टाकला. जपानी अमलाखाली कोरिअन लोकांचे अनन्वित हाल झाले. अन्यायाची आणि अत्याचारांची परमावधी झाली. बहुतेक सर्व शेतकरी छळाला त्रासून मांचुरियात व सैबेरियात गेले. थोडक्यात, कोरिअन लोकांना जपानी बनविण्यासाठी हरतऱ्हेचे प्रयत्न सुरू केले. कोरियातील भौगोलिक

नावेही बदलून जपानी नावे ठेवली ! कोरिया देशाला त्यांनी ‘ चोसेन ’ हे नाव दिले. सर्व प्रकारची पुस्तके, वर्तमानपत्रे जपानी भाषेत निघू लागली. सरकारी कामकाजात जपानी भाषेशिवाय अन्य भाषेला बंदी ! साऱ्या कोरिअन लोकांना जपानी भाषा शिकण्याखेरीज गत्यंतर उरले नाही.

पण जपान्यांनी तेथे पुष्कळ सुधारणा केल्या. अर्थात त्यांत त्यांचा स्वार्थी हेतू होताच. पाच हजार मैलांचे रस्ते तयार केले, हजार मैलांचे लोहमार्ग बांधले, कित्येक उद्योगधंदे उभारून देशाचा व्यापार खूपच वाढविला. या देशाचा तंबाखूचा व्यापार प्राचीन काळापासूनचा आहे. मलबरी वृक्षांची लागवड करून रेशमी किड्यांच्या जोपासनेला गती दिली.

परक्या व्यापारी लोकांनी कोरियात येऊन व्यापारी सवलती मागण्यास सुरुवात केली. प्रथम जपानबरोबर कोरियाने व्यापारी तह केला. नंतर अमेरिकेबरोबर मित्रत्वाचे संबंध जोडले. पुढे ग्रेट ब्रिटन, जर्मनी, इटली, रशिया इ. देशांबरोबर तहनामे झाले.

पण १९०४–५ साली झालेल्या रूसो-जपानी युद्धात जपान विजयी झाल्याने कोरिया जपानच्या अंकित झाला व पुढे १९१० मध्ये जपानने कोरियाला आपल्या साम्राज्यात सामील करून टाकले ! कोरियाचे स्वातंत्र्य अर्थातच नष्ट झाले ! सन १९०५ पासून १९४५ पर्यंत कोरिया जपानच्या पारतंत्र्यात खडतर जीवन कंठीत राहिला. पण १९४५ साली कालचक्र फिरले आणि जपानला दुसऱ्या महायुद्धात शरणागती पतकरावी लागली !

जपानचे वर्चस्व नाहीसे झाले तरी कोरिअन लोकांना शांतता लाभली नाही. कोरिया चीनला जवळ आणि रशियालाही जवळ. ही दोघांची जवळीक विशेषेकरून जपानमध्ये वास्तव्य करून राहिलेल्या अमेरिकन सैन्याला म्हणजे अमेरिकेला राजकीयदृष्ट्या अस्वस्थ करणारी वाटली.

अमेरिका हे राष्ट्र प्रबळ होतेच. रशियाने जर्मनीला लोळविल्यामुळे त्यालाही प्रबळ झाल्यासारखे वाटले. या दोघांचा सत्तेचा अभिलाषी डोळा राजकीय महत्त्व प्राप्त झालेल्या कोरियावर स्थिर झाला. यामुळे कोरियाचा प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघाकडे जाऊन चिघळत बसला.

कोरियाला स्वातंत्र्य देण्याबाबत अमेरिका, रशिया इ. सत्ताधारी आणि प्रबळ राष्ट्रांचे एकमत झाले. पण ही गोष्ट कार्यान्वित आणण्याबाबत

मतभेद निर्माण झाले, ते व्हावयाचेच होते. संरक्षणाच्या नावाखाली दोघांनी आपापली सैन्ये तेथे ठेवली. हा वाद मिटणे कठीणच. शेवटी कोरियाचे विभाजन ३८ उ. अक्षवृत्तावर होऊन रशियाने व अमेरिकेने आपले स्वार्थी हेतू काही प्रमाणात साध्य करून घेतले.

दक्षिण कोरियात अमेरिकेच्या पुरस्काराने जेव्हा लोकसत्ताक राज्यपद्धती सुरू झाली तेव्हा कोरियाचे स्वातंत्र्यवीर डॉ. सिंगमन ऱ्ही हे पहिले अध्यक्ष झाले. अमेरिकेने कोरियाच्या विनंतीला मान देऊन फक्त ५०० अधिकारी तेथे ठेवून बाकींचे सैन्य मागे घेतले. सेऊल हे दक्षिण कोरियाचे मुख्य शहर आहे. उत्तर कोरियात मात्र रशियन सत्तेने दिखाऊ ' लोकसत्ताक जनता-राज्य ' स्थापन करून या राजवटीचे नेतेपद दोन मुरब्बी कम्युनिस्ट पुढाऱ्यांना देण्यात आले. अशा रीतीने येथे कडेकोट बंदोबस्त करून रशियाने आपले सैन्य मागे घेतले. अशी व्यवस्था झाली तरी उत्तर व दक्षिण कोरियाची सरकारे सबंध कोरियावर आपला हक्क सांगतातच! थोडक्यात कोरियाचे भिजतघोंगडे आहे तसेच आहे.

डॉ. सिंगमन ऱ्ही—कोरियाच्या स्वातंत्र्याचा द्रष्टा, कट्टा देशभक्त आणि दक्षिण कोरियाचा पहिला अध्यक्ष. जितका मुत्सद्दी तितकाच विद्वान. कित्येक वर्षांचा तुरुंगवास सोसून तेथेच ' स्वातंत्र्याचा स्फुल्लिंग ' हे भावना चेतवणारे आणि जळजळीत असे पुस्तक लिहिले. पुढे अमेरिकेत जाऊन तेथे त्याने उच्च शिक्षण पुरे केले. नंतर कोरियात येऊन निःशस्त्र प्रतिकाराची चळवळ त्याने सुरू केली. पण त्याच्या जिवाला धोका निर्माण होताच तो कोरियातून हवाई बेटात निसटला, त्याला पकडण्यासाठी जपान्यांनी तीन लक्ष डॉलर्सचे बक्षीस जाहीर केले होते! पुढे परागंदा देशभक्तांनी शांघाय येथे जमण्याचे ठरविले, पण ऱ्ही उजळ माथ्याने तेथे कसा येणार? म्हणून त्याला शवपेटिकेत घालून आणले! या बैठकीत तात्पुरत्या सरकारात त्याला अध्यक्षपद देण्यात आले. पुढे २५ वर्षांनी दक्षिण कोरियाचा तो पहिला खराखुरा अध्यक्ष झाला. पुढे लवकरच उत्तर कोरियाने दक्षिण कोरियावर हल्ला चढविला. हा हल्ला मोडून काढून दोन्ही भाग एक करण्याचा निर्धार त्याने जाहीर केला होता.

●●●

२०. अंदमानमधील लोक

अंदमान म्हटले की आपल्या अंगावर काटा उभा राहतो. याचे कारणही तसेच आहे. अंदमानला दीर्घ मुदतीचे, जन्मठेपेचे असे भयंकर कैदी पाठविले जात. काळ्या पाण्याची शिक्षा झालेल्या या कैद्यांनी उर्वरित आयुष्याचे दिवस तुरुंगाच्या आवारात हालअपेष्टा सोशीत काढावेत, तेथून कधीच परतू नये अशी सामान्यपणे अपेक्षा केली जाते. अशा कैद्यांच्या जोडीला ब्रिटिश सरकारने देशाच्या स्वातंत्र्याकरिता प्राणाचे मोल देण्यास तयार असणाऱ्या राजकीय कैद्यांनाही तेथे पाठविण्याचे ठरविले होते. पण ही प्रथा सन १९२१ पासून बंद करण्यात आली.

सामान्य जनतेला अंदमानची ओळख बॅ. सावरकरांच्या शिक्षेमुळे झाली. स्वातंत्र्यवीर सावरकरांना जन्मठेपेची आणि सक्त मजुरीची शिक्षा होऊन त्यांना जेव्हा अंदमानला पाठविण्यात आले तेव्हा सारा देश हळहळला ! सावरकरांनी सक्त मजुरीच्या शिक्षेची अंतःकरणाला पीळ पाडणारी कहाणी जेव्हा सांगितली, तेव्हा अंदमानच्या तुरुंगाची ओळख सामान्य जनतेला झाली. अंदमानचे समाजिकदृष्ट्या भौगोलिक महत्त्व त्या काळी लक्षात आले नाही तरी तेव्हापासून त्याला ऐतिहासिक महत्त्व मात्र प्राप्त झाले यात शंका नाही. ' ... हा द्वीपपुंज म्हणजे हिंदुस्थानच्या पूर्व समुद्राची द्वारेच होत... ! ' अशा शब्दांत खुद्द सावरकरांनीच त्याचे महत्त्व स्पष्ट केले आहे.

पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तेथील भेसूर चित्र नष्ट झाले आणि आज अंदमान म्हणजे काही दिवस आनंदात घालविण्याचे सहलीचे ठिकाण झाले आहे, असे मोठमोठ्या लोकांनी म्हटले आहे. ' कालाय तस्मै नमः ' असेच उद्गार कोणाच्याही तोंडून निघतील.

अंदमान–निकोबार हा २००-२५० छोट्या-मोठ्या बेटांचा समुच्चय असून तो बंगालच्या उपसागरात कलकत्त्यापासून सुमारे ७८० मैल दूर आहे, यांतील सगळ्याच बेटांवर वस्ती आहे असे नाही.

निकोबार बेटावरील मूळचे रहिवासी म्हणजे आदिवासी अगदी मागासलेल्या स्थितीत जावन जगत होते. वस्त्रहीन स्थितीत यांचा संचार असे. निवाऱ्याच्या जागांतून अनेक कुटुंबांचा वावर. अंथरूण-पांघरूण म्हणजे 'आकाश मंडप आणि पृथ्वी आसन,' अशी त्यांची अवस्था. त्यांचे खाद्य म्हणजे नारळ, केळी, मासे व डुकराचे मांस. यांचे जीवनाचे सारे व्यापार ' उघडे '. लपविण्यासारखे त्यांचे काहीच नाही !

एका शिलालेखात या बेटांचा ' नेक्कावरम् ' असा उल्लेख आढळतो. तेथील लोकांच्या दृश्यावरून ' नग्ना'ची कल्पना त्या शब्दात सूचित असावी आणि याच शब्दाचे पुढे अपभ्रष्ट रूप झाले असावे असे वाटते. मार्को पोलोने इ. स. १२९२ मध्ये या बेटांचा ' नेकूवरम ' असा उल्लेख केला, तर पुढे १३२२ मध्ये त्याचा उल्लेख ' निकोवरम् ' असा आढळतो. पोर्तुगीज लोकांनी १५२० मध्ये त्याचे ' नाकोबार ' केले, याचेच पुढे निकोबार होऊन तेच आज रूढ झाले.

अंदमानची बेटमालिका ही वस्तुतः ब्रह्मदेशातील आराकान पर्वताची पाण्याखाली दडलेल्या पर्वताची शिखरे आहेत. या पर्वताची ओळ पाण्याखाली ७०० मैल लांबीची आहे.

अंदमानचे लोक निकोबारच्या लोकांपेक्षा अगदी भिन्न. येथे भारतातून आलेल्या आर्य आणि द्राविडी संस्कृतीची छाप स्पष्टपणे उमटलेली आढळते. सुधारलेल्या लोकांची वर्दळ या बेटावर सुरू होती. त्यांच्याशी संपर्क वाढत होता. सन १८५७ च्या स्वातंत्र्य-संग्रामानंतर इंग्रजांनी हद्दपारीचे आणि जन्मठेपेचे कैदी येथे पाठविले. आजची येथील वस्ती मुख्यत्वेकरून त्या कैद्यांच्या वंशजांची आहे. वरील सारे गुन्हेगार भारताच्या निरनिराळ्या भागांतून आलेले होते. कित्येक वर्षे हे सारे लोक एके ठिकाणी आणि एकाच नियंत्रणाखाली वाढलेले होते. याचा परिणाम असा की, अंदमानात वर्णभेद, अस्पृश्यता, सामाजिक विषमता इ. गोष्टी लोप पावलेल्या होत्या.

अंदमानचा भूभाग चढ-उतारांनी व्याप्त, गावांची वस्ती टेकड्यांवरील उंचवट्यावर. सिमल्याच्या रचनेची आठवण करून देणारी येथील स्वाभाविक रचना. सामान्य माणसांना हा चढ-उतार जाचक वाटला तरी माकडांना त्याचे काहीच वाटणार नाही; आणि म्हणूनच याला ' हनुमान' असे नाव ठेवले असावे! हनुमानचे हंडमान, नंतर अंडमान व शेवटी अंदमान अशी या शब्दाची व्युत्पत्ती साधली जाते.

येथील आदिवासींची संख्या घटत होती. पण स्वच्छंदी वर्तनाचे हे लोक सुधारलेल्या लोकांशी संपर्क साधून सुधारत नव्हते. शिकार करणे, मध गोळा करणे, फळे, कंदमुळे जमविण्याकरिता जंगलभागातून सारखे हिंडणे हेच ह्यांचे उद्योग. यांचे खाद्य म्हणजे नारळ, मध, मासे, आणि कंदमुळे. डुकरांची शिकार हे लोक तीराने व कुत्र्यांच्या साहाय्याने करतात. डुकराचे मांस म्हणजे त्यांची मेजवानी ! खेकडे हे लोक चवीने खातात.

अंदमानचा कायापालट—विस्ताराच्या मानाने वस्तीचे मान मर्यादित, पण वस्ती वाढण्याला अनुकूल भौगोलिक परिस्थिती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताला लोकसंख्येचा प्रश्न आणि विशेष म्हणजे पाकिस्तानातून येणारे निर्वासितांचे लोंढे व त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न भेडसावीत होते. या समस्यांची उकल होण्याला अंदमानच्या विरळ वस्तीने आशेचा किरण दाखविला. सन १९४५ मध्ये इंग्रज सरकारने कैद्यांच्या शिक्षा भराभर कमी करून त्यांना सरकारी खर्चाने आपापल्या गावी जाण्याची परवानगी दिली. यामुळे सुमारे ५००० लोक अंदमान सोडून निघून आले. याचा परिणाम जवळजवळ ३३ टक्क्यांनी लोकसंख्येत घट ! ही परिस्थिती पुनर्वसनाच्या दृष्टीने चांगलीच झाली. भारत सरकारने याचा फायदा घेतला. पश्चिम बंगाल, केरळ, बिहार, मद्रास येथील सुमारे ३००० कुटुंबियांची सोय तेथे करण्यात आली ! सर्वांना उद्योग मिळण्याची सोय तेथे सहज होणारी आहे. सिलोनमधून ज्या भारतीय तामिळांना परत पाठविण्यात येत होते त्यांचे पुनर्वसन येथे चांगल्या तऱ्हेने होऊ शकले. येथे रबर, नारळ, भात यांच्या लावगडीकरिता भरपूर जमीन आहे.

हे सगळे लोक सुधारणेच्या वातावरणात वाढलेले असल्याने अंदमानचा कायापालट होण्याला मदतच होणारी आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आधुनिक

सुधारणा व सुखसोई यांनी अंदमानचे सारे रूप पालटले जात आहे.

अंदमानातील जंगलभाग दाट आणि विस्तृत आहे. जंगलसंपत्ती हे अंदमानचे वैभव. येथील लाकूड लोहमार्गावरील 'स्लिपर्स' करिता, आगपेट्यांकरिता आणि महत्त्वाच्या अनेक उद्योग-व्यवसायांकरिता उपयोगी पडणारे आहे. उंच आणि प्रचंड वृक्षांचे रक्षण करणे व त्यांची वृद्धी करणे यांकडे विशेष लक्ष द्यावे लागते. लाकडाच्या अवजड ओंडक्यांची हलवा-हलव करण्याकरिता हत्तींचा उपयोग करण्यात येई, पण आता त्यांच्या जोडीला 'ट्रॅक्टर्स'ची योजना केली आहे, हे आधुनिक 'गजराज'च !

जंगलाचे वैभव कायम राखून भातशेतीकरिता काही जमीन उपलब्ध करण्यात आली आहे. नारळाची वनराजी वाढविण्याकडे लक्ष पुरविण्यात येत आहे. फळे, भाज्या यांचेही उत्पन्न येथे काढले जाते. रबराच्या उत्पादनाला हा भाग अतिशय अनुकूल आहे असा तज्ज्ञांचा अभिप्राय पडला आहे. तसेच कॉफी, काजू, मिरी यांच्या निर्मितीस येथे भरपूर वाव आहे असेही आता लक्षात आले आहे.

देशाच्या उत्कर्षास आणि तेथील मागासलेपणाचे उच्चाटन करण्यास नुसते शेतीचे उत्पादन पुरे पडू शकत नाही. औद्योगिक विकासाची जोड त्याला हवी. त्याला अर्थातच विविध खनिजांचे साहाय्य हवे. अंदमानात कोळशाचा शोध लागला आहे. तसेच तेल व गॅसचा साठा उपलब्ध होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

छोट्या प्रमाणावर का होईना येथे पुढील उद्योगधंदे चालू आहेत— आगकाड्याच्या पेट्यांचा कारखाना, लाकूड कापण्याची गिरणी, भुईमुगाच्या तेलाचा कारखाना, प्लायवुडचा कारखाना, कोंबडीपालन, दूध-उत्पादन, मच्छीमारी, बोटी बांधण्याचा कारखाना इत्यादी उद्योगधंद्यांना लागणाऱ्या विजेच्या उत्पादनात ३५० पटींनी वाढ करण्यात आली !

अंदमानचा सारा परिसर आणि लोकांचे जीवन विजेच्या प्रकाशाने उजळून टाकले गेले ! सुधारणा, सुधारणा, सुधारणा ! शहरी जीवनाचे कोणतेही क्षेत्र अंदमानचे प्रशासक श्री. राजवाडे यांनी अस्पृष्ट असे या भागात ठेवले नाही. हिरीरीने त्यांनी कार्यास हात घातला आणि धडाडीने आणि कौशल्याने त्यांनी ते पार पाडले, याचे नाव जिद्द.

अंदमानचे ' आनंदमान ' करण्याच्या दृष्टीने प्रशासकांनी लोकांच्या हार्दिक सहकार्याने आधुनिक सुखसोईंच्या विविध योजना आखल्या आणि त्या कार्यवाहीतही आणल्या.

लोकांत शिक्षणाचा प्रसार झाला की आपोआप नवचैतन्य निर्माण होऊन लोकांचे जीवनमान सुलभतेने उंचावले जाईल या दृष्टीने शाळांची संख्या चांगलीच वाढविली, कार्यक्षम शिक्षकांच्या नेमणुका करण्यात आल्या. विद्यार्थ्यांची संख्याही वाढली. उच्च माध्यमिक शिक्षणापर्यंत सारे शिक्षण मोफत देण्याचे जाहीर करण्यात आले !

शासनात लोकांचे सहकार्य मिळण्याच्या दृष्टीने आणि लोकांनाही आपल्याला काही हक्क प्राप्त झाले आहेत याची प्रात्यक्षिक जाणीव होण्याकरिता नगरपालिकेची योजना ताबडतोब अमलात आणली. या नगरपालिकेने अर्थातच पाण्याचा साठा, नळांची सोय, रहदारीच्या रस्त्यांची सुधारणा व त्यांत वाढ इत्यादी गोष्टींकडे लक्ष पुरविले.

अंदमानला जगापासून तुटल्यासारखे वाटू नये, दूरावल्यागत भासू नये म्हणून अंदमान व भारत यांच्यासंबंधी मोजक्या, वेचक व महत्त्वाच्या बातम्या ' बुलेटिन ' द्वारा देण्याचा उपक्रम सुरू करण्यात आला. पुढे अंदमानला नभोवाणीवर स्थान मिळविण्यात आले. अंदमानचे वृत्त नभोवाणीवर शनिवारी अर्धा तास प्रक्षेपित होऊ लागले ! अंदमानचे प्रशासक येथेच थांबले नाहीत. अंदमानला स्वतःचा आवाज प्रक्षेपित करण्याकरिता आणि जगाला तो ऐकविण्याकरिता स्वतःचे असे केंद्र मिळावे ही आकांक्षा निर्माण झाली; आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे सन १९६१ मध्ये प्रत्यक्ष केंद्राचे उद्‌घाटनही झाले !

प्रशासकांच्या आकांक्षेचे क्षितिज वाढत चालले. अंदमानला ' प्रवाश्यांचे आनंदमान ' बनवावे आणि जगातील प्रवाश्यांचे लोंढे येथे यावेत, उतरावेत अशी विचारचक्रे मनात फिरू लागली. पण ' उतरावे ' कसे हा प्रश्न वाटतो तितका सोपा नाही. पण प्रयत्नांती परमेश्वर दिसतोच. अंदमानला एक विमानतळ हवा आहे. तो कोठे असावा याबद्दल बरीच चर्चा झाली. पण जपान्यांनी आपल्या औटघटकेच्या कारकीर्दीत येथे विमान उतरविले होते आणि तो तळ इंग्रजांनीही काही दिवस वापरला होता, या गोष्टींचा

विचार होऊन पुढील पायऱ्या झपाझप टाकण्यास सुरुवात झाली. विमानतळ ठरला आणि २५ नोव्हेंबर, १९६० रोजी 'एअर लाइन्स कॉर्पोरेशन 'चे विमान पोर्ट ब्लेअरच्या विमानतळावर उतरले ! आणि विमानाच्या या झेपेने अंदमानकरांना आणखी एक गोड धक्का दिला, कलकत्त्याच्या त्या दिवसाची ताजी वर्तमानपत्रे त्यांना मिळाली ! ही सारी किमया अंदमानचे अत्यंत उत्साही, धोरणी, कल्पक आणि धडाडीचे प्रशासक यांच्याचमुळे घडून आली. वृत्तपत्रांना पं. नेहरूंनी जगाकडे पाहण्याची 'खिडकी' म्हटले आहे, ती खिडकी उत्सुक अंदमानकरांना लाभली ! दूरचे अंदमान जवळचे झाले ! पावणेतीन तासांत कलकत्त्याहून पोर्ट ब्लेअरला विमान येते.

भूतलावरील नंदनवन किंवा स्वर्ग ही नामाभिधाने अंदमानला लावताना तुम्हाला आश्चर्यच वाटेल. पण अंदमानचा कायापालट झालेला ज्यांनी प्रत्यक्ष पाहिला त्यांचे उद्गार पाहा—रँग्लर परांजपे : 'मी माझ्या उभ्या' आयुष्यात या बेटातल्यापेक्षा अधिक आल्हाददायक सुटी घालविली नाही.' त्या वेळच्या गृहखात्याच्या उपमंत्री श्रीमती अल्वा व्हायोलेट येथील निसर्ग-सौंदर्य पाहून उद्गारल्या, '...हा पर्यटकांचा स्वर्ग होऊ शकेल....' आणखी वेगळ्या शब्दांत त्या म्हणतात, 'A gem hanging in the pendent of the Indian Peninsula that is India. सर हेन्री क्रेक व्हाइसरॉयच्या कौन्सिलचे सभासद यांनी तर आपला अभिप्राय पूर्वीच व्यक्त केला होता, 'हा तर उष्ण कटिबंधातील स्वर्ग आहे !' बंदिवान सावरकरांनी त्या वेळी येथे पाऊल ठेवताच पुढील उद्गार काढले होते—'समुद्रात ते बेट असे शोभे की, जसा एखाद्या अप्सरेचा सरोवरात बांधलेला बंगला...बेड्या पडलेल्या मनाचेही क्षणभर मनोरंजन व्हावे.' अंदमानच्या राज्यकारभारचे मुख्य ठिकाण पोर्ट ब्लेअर हे आहे.

• • •

२१. लखदीव-मालदीवमधील लोक

लखदीव-मालदीव इ. बेटांचा समुदाय अरबी समुद्रात भारतातील मलबार किनाऱ्यापासून १२५–१५० मैलांच्या अंतरावर आहे. त्यांना राजकीय महत्त्व प्राप्त न झाल्याने ही बेटे भारताचीच असूनही त्यांच्याकडे विशेष लक्ष पुरविले गेले नाही.

या बेटांच्या समुदायात लखदीव, मालदीव, मिनिकॉय, अमिनदिवी इ. बेटे प्रमुख असून दोनशेवर छोटीछोटी बेटे जवळपास आहेत. या बेटांना इतिहास आहे, पण तो तितकासा सुसंबद्ध नाही.

मलबारच्या किनारी भागातून आलेल्या लोकांनी येथे वस्ती केली. येथे येताना ते कोणत्याही धर्माचे असले तरी येथे आल्यावर ते सारे मुसलमान बनले किंवा त्यांना बनावे लागले.

या बेटांवर नारळांचेच मुख्य उत्पन्न आणि ते विपुल होते. येथील नारळाच्या झाडाला दोन वर्षांत फळ लागते, पण हे फळ आकाराने छोटे असते. येथे तांदुळ मुळीच होत नाही, पण रागी व इतर हलकी पिके होतात. केळी, फणस, लिंबे मात्र भरपूर होतात. आणखी एका खाद्याचे उत्पादन म्हणजे मासळीचे.

येथील चमत्कारिक गोष्ट अशी की, या बेटांवर उंदारांचा भयंकर सुळसुळाट असून त्यांचा उपद्रव कमालीचा होतो. यांच्या संहाराकरिता मांजरे, साप, मुंगूस, घुबडे इ. प्राण्यांची योजना केली तरी अपेक्षित इलाज होऊ शकला नाही. उंदीर विषालाही दाद देईनात ! ते त्यांनी पचवून टाकले आहे !

लखदीव म्हणजे 'लक्ष द्वीप' ! येथे कदाचित पूर्वी लाख बेटे असतीलही ! पण त्यांतील असंख्य बेटे, अर्थात काळाच्या ओघात, समुद्रात गडप

झालेली असणार हे उघड आहे. कनानोरचे अली राजे उदयाला आल्यावर लखदीव बेटे त्यांच्या अमलाखाली आली. पुढे इंग्रजांनी जेव्हा कननोर घेतले त्या वेळी लखदीव बेटे आपोआपच इंग्रजांकडे आली. सन १७९६ मध्ये इंग्रजांनी कननोरच्या बिब्बीशी स्वामित्वाबद्दल खंडणी घेण्याचा करार करून कारभार तिच्याकडेच सोपविला. पण पुढे खंडणी थकल्यामुळे ब्रिटिशांनी सन १८७५ मध्ये त्यांचा प्रत्यक्ष ताबा घेतला.

मालदीव बेटे सिंहली लोकांकडून वसविली गेली. याचे प्रत्यंतर तेथील पडके स्तूप देऊ शकतात.

मिनिकॉय बेटावरील कोळी विशेष धाडशी आहेत. यांचा धंदा खूपच फायदेशीर चालतो. येथील ४००० लोकवस्तीपैकी १००० पुरुष समुद्रात होड्या वल्हवीत असतात. या बेटांवर उंदरांप्रमाणे डासही भरपूर आहेत. यांचा उपद्रव म्हणजे यांच्या डसण्यामुळे ‘ हत्ती ’चा रोग होतो ! त्यामुळे मच्छरदाणीशिवाय झोपणे म्हणजे रोगाला आमंत्रणच.

येथील लोकांना नारळाचा उत्तम व्यवसाय लाभला आहे. नारळांची मोठ्या प्रमाणावर लागवड करणे, नारळ काढणे, जवळपासच्या मलबार किनाऱ्यावर नेऊन ते विकणे, तसेच नारळाचा काथ्या व काथ्याचे दोर वळणे इत्यादी कामांत लोक गुंतलेले आहेत. स्त्रियांचीही मदत या कामात चांगली होते.

दुसरा मोठा व्यवसाय म्हणजे मच्छीमारीचा. येथील कोळी समुद्रात लांबवर जातात आणि विविध जातींची खूप मासळी गोळा करतात. सुमारे शे-दोनशे रुपयांची मासळी ते दररोज आणतात ! पुढे खारवण्याचे काम आहेच. मासळीच्या विक्रीकरिता हे लोक सिलोनपर्यंतही जातात.

नारळ आणि मासे यांची निर्यात हेच त्यांच्या आर्थिक उत्पन्नाचे साधन. येथील लोकांच्या काही चालीरीती —

मिनिकॉय व लखदीव येथील व्यापार नाण्यांत न होता वस्तूंच्या देवाण-घेवाण पद्धतीने होतो, येथील सारी जमीन सरकारची अगर समाजाची समजली जाते. काही संपत्ती जमलीच तर ती एकत्र कुटुंबाची. स्त्री ही प्रमुख मानली जाते, स्त्रीराज्यच म्हणाना.

लग्न होईपर्यंत मुले आपल्या घरी राहू शकतात, पण लग्नानंतर मुलगा बायकोच्या घरी जातो ! त्याचे आडनावही बदलते ! जे बा ते त्याचे !

विशेष गोष्ट म्हणजे येथील स्त्रिया साक्षर असून त्याच आपल्या मुलींना शिकवितात. प्राथमिक शाळा आता निघू लागल्या आहेत.

येथे बायकांची मंडळे असतात, त्यांना ' वरांगी ' म्हणता मंडळात बायका सामाजिक, आर्थिक इ. अनेक प्रश्नांची चर्चा क यांच्या निर्णयांना पुरुषांना मान्यता द्यावी लागते, अर्थात पर सहकार्य असतेच.

या बेटावरील लोक मुसलमान आहेत, पण तेथे एकपत्नीव्रत क आचरले जाते. नवरीकडून नवऱ्याला हुंडेवजा काही मिळत नाही नवऱ्याकडून नवरीला जरूर पडल्यास द्यावयाची रक्कम ठरविली जा

मिनिकॉय बेटामधील लोकांत स्वच्छता विशेष आढळून येते. पुरुषांकरिता स्वतंत्र संडास, मुलेही शौचास उघड्यावर बसत नाहीत पाण्याचे तीन प्रकार—पिण्याकरिता, धुण्याकरिता आणि स्नानाक येथे स्त्रियांचे प्राबल्य असल्याने त्या मुसलमान असूनही त्यांच्यात पाळीत नाहीत.

येथील एकंदर समाजात तीन वर्ग आहेत—एक श्रीमंतांचा, हे आपल्याला नांबुद्री किंवा नायर वंशाचे मानतात. दुसरा खलाशां तिसरा मजुरांचा. येथील लोक मल्याळी भाषा बोलतात आणि लि अरबी लिपीचा उपयोग करतात.

येथे प्रत्येक बेटावर ' अमीन ' हा अधिकारी असतो. भारत स सन १९५६ मध्ये ह्या सर्व बेटांचा एक स्वतंत्र विभाग करून तो कें हुकमतीत ठेवला आहे. पंचवार्षिक योजनेत ह्या बेटांचा सर्वांगीण होण्याच्या दृष्टीने अंतर्भाव केला आहे. सव्वा कोटी रुपयांची त्या तरतूद आहे.

याच लेखकाची इतर पुस्तके

[१] शैक्षणिक कोश

[२] पाठ कसे घ्यावेत

[३] भौगोलिक कोश

[४] भौगोलिक का व कसे

[५] मुलांचा औद्योगिक भारत

[६] भारतीय बांधव